Your Posts 2021

कृपया क्रोधाला थारा न देता मैत्रीतच वाचावे, ही विनंती --

समीक्षा म्हणजे काय रे भाऊ ?

मराठीतली समीक्षा थांबलीय का, मराठी समीक्षा जागतिक का होत नाही, मराठी समीक्षेत नवे विचार का दिसत नाहीत, वगैरे विषय आपण चघळत असतो. पण, इतकी वर्षे होऊन गेली तरी आजही माधव आचवलच आठवावेत, असे का होते, याचा विचार आपण टाळतो. अहो, आधी मराठी साहित्य तरी होऊ द्या जागतिक मग समीक्षा आपोआप होईल, असेही आपण म्हणतो. जगप्रसिद्ध होण्यासाठी योग्य, दर्जेदार साहित्याच्या अनुवादाची प्रक्रिया असायला हवी – मराठीतून इंग्रजीत कोण करणार अनुवाद ? अकादेमिक वर्तुळात कार्य असलेल्या काही लेखकांचे होतातही अनुवाद पण अर्थातच ते पुरेसेही नसते आणि प्रातिनिधिकही नसते. त्यामुळे, ते देऊ सोडून आणि असा विचारू प्रश्न की जागतिक दर्जाचे म्हणावे असे कोणते कितपत साहित्य इथे निर्माण झाले वा होते ? या प्रश्नाला नक्कीच आशादायक असे उत्तर मिळावे अशी साहित्यनिर्मिती आपल्याकडे होत आलेली आहे. पण मग त्या निर्मितीची दखल घेण्याची कुवत इथल्या समीक्षेत आहे का – याचे उत्तर नकारार्थीच येते. असे का होते आहे याचाही रोखठोक विचार करावा लागेल. दलित साहित्य किंवा आंबेडकरी साहित्य आणि ग्रामीण साहित्य हे मराठीतले नक्कीच महत्त्वाचे प्रवाह आहेत पण साहित्य म्हणजे तेवढेच नव्हे. सामाजिक-राजकीय अन्यायाचा निषेध वा न्यायाची प्रस्थापना करायची निकड ही त्यांची उद्दिष्टे असतात. ती तशी असणे भागही असते. पण, मानवी जगण्याचाच आवाका घेणे, भान घेणे, नेहमीच अनुत्तरित राहणाऱ्या समस्यांचे दर्शन घडवणे, माणसाला सुजाण, संवेदनशील, परिपक्व असण्याच्या शक्यता निर्माण करणे, अशाही बाबी वा प्रक्रिया साहित्यात महत्त्वाच्या असतात. प्रत्येक समीक्षक या सर्वच बाबतींत अभ्यासूपणे बोलू शकेल, असे नव्हे. मार्टिन एस्लिनने अब्सर्ड नाटकावर एक जागतिक महत्त्वाचा ग्रंथ सिद्ध केला तसे निवडलेल्या विषयावरचे सखोल काम तरी का होत नाही ? खरे तर परिवर्तनवादी असो की इतर सर्व खुले साहित्य असो, समीक्षेने लेखकांसमोर आव्हाने उभी करायला हवीत. समीक्षेलाही सर्जकच समजायला हवे. समीक्षा आणि साहित्य या एकत्र चालणाऱ्या प्रक्रिया असायला हव्यात. मुळात आपला प्रश्न हा आहे की आशयानुगामी समीक्षेत कुणाला इंटरेस्टच नाहीय. आशयाच्या पाण्यात उतरण्याची हिंमतच नष्ट होत चाललीय. बाहेरून उडाणटप्पू शेरे मारून पळून जाणे हेच घडते आहे. या असल्या समीक्षेचे आद्यपुरुष अर्थात नेमाडे आहेत. त्या पद्धतीने अनेकांची चांगली सोयही झालेली आहे. पण, मूलत: हा दृष्टिकोण सर्जक साहित्याला क्षुद्र लेखणारा ठरतो, हे पाहायला हवे. अगदी परिवर्तनवादी समीक्षक म्हटला तरी त्या साहित्याबद्दल तरी तो खास मौलिक असे काय बोलतो ? इथे साहित्य संमेलनांच्या चार अध्यक्षांची उदाहरणे घेऊ. उत्तम कांबळे, नागनाथ कोत्तापल्ले, लक्ष्मीकांत देशमुख आणि फ्रांसिस दिब्रीटो. हे लोक काय करतात ? साहित्यात राजकारण वर्ज्य नसते असे म्हणत त्यांच्या भाषणातून साहित्यच वर्ज्य करतात आणि फक्त राजकारणावर बोलतात. आणि ते तरी काय असते ? कोणताही परिवर्तनवादी कार्यकर्ता जे भाषण कुठेही करू शकेल तेच भाषण हे संमेलनाच्या अध्यक्षपदावरून हाणतात ! म्हणजे घडते काय तर त्या अध्यक्षपदाच्या खुर्चीवर जाऊन बसणे ! चर्चांचे, परिसंवादांचे विषयही सगळीकडे तेच तसेच असतात – राजकीय विचार भरपूर मांडता यावेत असे. आणि आपण रडत असतो की मराठीत मौलिक समीक्षा का नाही आणि आपली समीक्षा जागतिक का होत नाही ! साहित्य म्हणजे फक्त राजकारण असे सतत बिंबवणारे जे लोक आहेत ते याचे खरे गुन्हेगार आहेत. साहित्याची इतर अनेक अंगे आणि सांस्कृतिक कार्ये नष्ट करत जाण्याचे काम यांनी केलेले आहे. वेळ कधीच गेलेली नसते. आताही यातून जागे होऊन बाहेर येणे शक्य आहे. हे असले ‘ निरुपयोगी ‘ फार लिहीत न बसता खाली काही विषय देतोय – त्यांचा आपल्या सर्जक साहित्याच्या संदर्भात कितपत उपयोग आहे याचा विचार व्हावा –

1. तुकारामाची रिकामीक आणि सार्त्रचा नथिंगनेस

2. मराठी कवितेतले प्रमुख प्रवाह
3. मराठी साहित्यातला उत्तर आधुनिकतावाद
4. साहित्य आणि तत्त्वज्ञान
5. साहित्य आणि मानसशास्त्र
6. मराठीतला भावकवितेचा काळ संपला आहे का
7. मराठी नाटक आणि त्याचे साहित्यमूल्य
8. कविता, पद्य आणि गद्य
9. मराठी कथा / कादंबरी यांचा बदलता कच्चा माल
10. मराठी साहित्यातले परदेश
11. मराठी साहित्य निराशावादी आहे का
12. आजच्या काळाचा दस्तावेज तयार करणे हे साहित्याचे काम आहे का

--- या प्रकारे आणखीही काही विषय सुचवता येतील. मुळात साहित्याशी संबंधित आहेत का हे विषय की साहित्यातून वर्ज्य करावेत असे आहेत, त्यावर आधी चर्चा व्हावी. मग हे विषय घ्यावेत असे सर्जक साहित्य आहे का मराठीत, यावर दुसरी चर्चा घ्यावी. आणि मग तिसरी चर्चा शेवटी यावर घ्यावी की मराठी समीक्षक हे विषय का महत्त्वाचे मानत नाहीत.

आता नेहमीप्रमाणे माझ्या डिसक्लेमर – मी स्वत: अभ्यासक नाही – यांतल्या एकाही विषयावर मी बोलू शकणार नाही, पण , कुणी अभ्यासपूर्वक यांवर बोलणार असेल तर मला त्यात प्रचंड इंटरेस्ट असेल. मी व्यक्त केलेले हे विचारही कुठल्या सखोल अभ्यासाचा नतीजा आहेत , असे नाही. इथल्या उथळ प्रचलित पद्धतीतलेच जरा वेगळे बोललोय इतकेच. तुटपुंज्या अभ्यासावर, फारसे काही न कळता बोलायची इतर अनेकांना असलेली सूट मीही घेत आहे. फार मनावर घेऊ नये. सोचना है तो सोचो नही तो छोड दो ! जय हिंद , जय महाराष्ट्र !

--- 000 ---

माझा संगणक बंद आहे --- जमेल तशी एका लॅपटॉपवरून ही पोस्ट देत आहे --

नाटक एक मुक्त चिंतन

0 रवींद्र दामोदर लाखे 0 ग्रंथाली प्रकाशन.

मुख्य म्हणजे, हे पुस्तक वाचून खूप आनंद झाला ! वाचताना मध्येही राहवेना म्हणून या आनंदाबाबत लाख्यांना फोन करून सांगितले. आपल्याकडे चांगले आणि नामवंत दिग्दर्शक झाले नाहीत असे नाही, पण , कुणीही नाट्यकलेबाबतचे स्वत:चे चिंतन या पद्धतीने मांडून ठेवले नाही. काहींनी आत्मचरित्रे लिहिली पण ती प्रामुख्याने आम्ही कसे ग्रेट झालो यावर होती. त्यांच्या चिंतनाचे दोनचार तुकडे त्यांतून शोधून काढावे लागतील, अशी. याला अपवाद म्हणता येतील ते म्हणजे अतुल पेठे आणि कुमार सोहोनी. आणि आता लाख्यांचे हे पुस्तक.

हे पुस्तक खरे तर नुसतेच नाटक या कलेबद्दलचे नसून जगण्याच्या कलेबाबतचेही आहे, असे म्हणता येईल. पण आपण याकडे नाटक या क्षेत्रापुरतेच पाहू. नट हा खेळाडू ( चापल्य ) आणि तत्त्वज्ञ ( गांभीर्य ) असावा अशा अर्थाचे एक वाक्य सर्वांनाच पाठ असते, पण त्याचा अर्थ नसतो माहीत. सर्वच तंत्रज्ञ आणि दिग्दर्शकही तत्त्वज्ञच असावे लागतात, म्हणजे काय ? त्याचा अर्थ त्यांनी कांट, हेगेल वा सार्त्र असावे लागते असा नाही. मनाने, समजुतीच्या प्रक्रियेने ते तत्त्वज्ञ असावे लागतात. ‘ मी, माझे, मला ‘ या हव्यासाचे लोक चांगले कलावंत नाही होऊ शकत. तुकारामाचा अशा अर्थाचा एक अभंग आहे की कीर्तनकाराचा नंतर मिळणाऱ्या दक्षिणेवर डोळा असू नये, त्यासाठी त्याने कीर्तन करू नये. त्याचप्रमाणे, नाट्यकला ही सर्वस्व अर्पण करत आत्मसात होणारी कला आहे. या छोटेखानी पुस्तकात ते लाख्यांनी अत्यंत प्रभावीपणे आणि गांभीर्याने विशद केलेले आहे.

हे पुस्तक का, कसे चांगले आहे हे सविस्तर सांगायचे म्हणजे या पुस्तकाइतकीच वा त्याहून जास्त पाने लिहावी लागतील. ते अर्थातच मी करणार नाही. नाटकाची सगळी तंत्रे आणि एकूणच नाटक ही एक कलाकृती म्हणून उभी राहण्याची अगदी तालमीपासूनची प्रक्रिया यांचे अत्यंत सखोल चिंतन या पुस्तकात आहे. मराठीत नाटकाच्या बाबतीतले हे एक बीजपुस्तक ठरू शकते.

पण मुद्दा असा आहे की मराठीत – या पुरोगामी महाराष्ट्रात – हवेय कुणाला हे असले पुस्तक ? अशा गांभीर्याने या कलेकडे पाहणाऱ्या चार लोकांचा तरी समूह इथे एकत्र जमा होणे शक्य आहे का ? यशासाठी आणि वलयासाठी हपापलेपणा हा या कलाक्षेत्रातला एक मोठा रोग आहे. दुसरा मुद्दा अधिकच गंभीर आणि असाध्य म्हणावा असा आहे. तत्त्वज्ञानात्मक गांभीर्य म्हणजे ते झाले आध्यात्मिक ! लगेच द्या टाकून, अशी प्रवृत्ती बोकाळलेली आहे. एका ठिकाणी, या पुस्तकात नटराजाची मूर्ती आणि नाट्यकलेच्या संदर्भातला तिचा अर्थ हा सविस्तर मजकूर पाहूनच काहींना अलर्जी होऊ शकते. धार्मिक अवडंबर आणि कर्मकांड हे वाईटच आणि घातकच, यात वाद नाही, पण त्याचबरोबर तत्त्वज्ञानात्मक, आध्यात्मिक समजुतीच्या प्रक्रियेचाही त्याग व्हायला हवा, असे समजणे, हे कोणत्याही कलाक्षेत्राची हानी करणारेच आहे.

हे एक अत्युत्तम पुस्तक मराठीत आलेले आहे. ते नुसतेच पालखीत ठेवले जाऊ नये. महाराष्ट्रातल्या पिढ्या न पिढ्यांना उपयोगी पडणारा हा एक अमूल्य ऐवज आहे, असे मला वाटते.

--- 000 ---

जीवेलागणीच्या कविता

0 रवींद्र दामोदर लाखे 0 वर्णमुद्रा प्रकाशन'

कुठल्याही गोष्टीची कधीही कशाशीही गाठ पडेल आणि त्यातून निर्माण झालेल्या अनाकलनीय गुंतागुंतीतून आपल्या ' स्व ' ची शकले उडू शकतील – अशी जगण्यातली गुंतागुंत, अनिश्चितता आणि निरर्थकता मान्य असलेली अशी ही लाख्यांची कविता आहे. पण याचा अर्थ ती दु:खाची वा निराशेची कविता आहे असे नाही. ही निरर्थकता म्हणजे ' आहे ते पाहणे ' या प्रकारची आहे. यापूर्वी मी दोनतीनदा लाख्यांच्या कवितेवर लिहिलेले आहे. आता फार नाही लिहीत. मराठीत ही एक स्वतंत्र पद्धतीची वेगळी कविता आहे, एवढे म्हणून ठेवतो. घटनांना ताळतंत्र नसल्याचा अनुभव देणारी आणि आपल्या जगण्याकडे पाहण्याची एक दूरस्थ दृष्टी देणारी अशी ही कविता आहे. वाचता वाचता ( त्या त्या वेळच्या मूडप्रमाणे ) आवडलेल्या कविता – कुठंतरी ( 27 ), लाईफ ( 46 ), मजकूर ( 76 ), माळी ( 81 ), बंद दरवाजा ( 86 ).

ही कविता म्हणते --

तुमच्या-माझ्यात फरक

गूढतेचा गोडवा चाखेस्तोवर केवळ ( 21 ).

--- 000 ---

" Look at it much more deeply. Why do I want to know who my great-grand-grandfather was? Who cares ? What matters is what I am now. Who cares whether somebody is a prince or a queen ? All that is so childish. " -- J. Krishnamurti.

" याकडे खूपच अधिक सखोलपणे पाहा. मला कशासाठी माहिती हवी असते की माझे खापर खापर पणजोबा कोण होते ? कुणाला काय पडलेय ? महत्त्वाचे हे आहे की आत्ता या क्षणी मी काय आहे. कुणाला फिकीर आहे की कुणी एखादा राजपुत्र आहे की एखादी राणी ? ते सगळे अत्यंत पोरकटपणाचे आहे. "

-- जे. कृष्णमूर्ती.

साहित्य संमेलन आणि साहित्य

पुन्हा एकदा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची वाद्ये वाजू लागली आहेत ! यंदा हे संमेलन नाशिकला होणार असल्याचे कळते. अध्यक्षपदासाठी सुचवले गेलेले पहिले नाव म्हणून डॉ . अनिल अवचट यांचे नाव समोर आलेले आहे. ते महानच आहेत यात दुमत नाही. फक्त एकच अपेक्षा आहे -- अध्यक्षीय भाषणातून कथा, कादंबरी, कविता, नाटक, ललित लेखन असे सर्व साहित्य वर्ज्य केले जाऊ नये. डॉ . अवचट या सर्व साहित्याप्रकारांबद्दल समकालाच्या संदर्भात काही प्रकाश टाकणार असले तर छानच होईल !

रीलया

– कथासंग्रह – रवींद्र  दामोदर लाखे – पार पब्लिकेशन्स.

रीलया म्हणजे काय हे मी लाख्यांना फोन करून विचारले. त्यांनी हा शब्द कसा तयार झाला वगैरे सांगितले. म्हटले ते ठीक आहे. मी मला समजलेय ते लिहीन. या कथांत जसे कुठूनही, काहीही एकत्र येईल, त्याच्यातून तिसरेच काही निघेल आणि म्हटले तर असंबद्ध विचारही कथेचा भाग बनतील – तसा हा शब्द आहे – अपघाताने काही अक्षरे एकत्र येऊन घडलेला – शब्दकोशातला कोणताही अर्थ नसलेला – या अर्थाने निरर्थक. लाख्यांना हे पटले – ते म्हणाले की आम्हीही आता हाच निरर्थ सांगत जाऊ.

उत्तम आहेत कथा. प्राणी, पक्षी, वस्तू , माणसे, निसर्ग, काहीही, भूत, भविष्य, वर्तमान, वास्तव, स्वप्ने – हे सगळे स्वतंत्र मूल्यात्मकतेशिवाय इथे आहे. निवेदन कुणाहीवरून सुरू होईल आणि कुठेही जाईल – ना या कथांना पात्रांची संगती असेल ना विशिष्ट घटनाक्रम ना कोणती कारण-परिणाम साखळी. प्रत्येक घटनेला जणू हजारो वर्षांचा भूतकाळ आहे – एखादी उथळ मालिका कुठली दाखवणार ? तरीही या कथाच आहेत – कथेत असणारी एक किमान उत्सुकतेची मात्रा इथेही आहे. या कथांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा चिंतनात्मक बाज. म्हटले तर हा संज्ञाप्रवाहासारखा आहे आणि म्हटले तर तत्त्वचिंतनासारखाही. अशा कथा मराठीत फारच विरळा आहेत. ही एक अगदी वेगळीच सघन शैली आहे. काही प्रमाणात ही शैली संगीतकलेशी साधर्म्य सांगते तर काही प्रमाणात अमूर्त चित्रकलेशी. ही एक स्वतंत्र, खुली, मुक्त शैली आहे. यामुळे लेखकाला जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांबाबत हवे तेव्हा हवे तितके बोलता येते. तरीही ते त्या त्या कथेचा एकसंध भागच असते. त्याचे वेगळे असे अस्तित्व जाणवतही नाही. मराठीत एक वेगळेच अनपेक्षित आशयघन दालन खुले करून देणाऱ्या या कथा आहेत.

एकेका कथेचा विषय-आशय सांगत बसण्यात अर्थ नाही – खरे तर तसा तो सांगताही येणार नाही. समग्र विश्व जणू एकत्रितपणे आणि समग्रपणेही हाताळणाऱ्या या कथा आहेत. तरीही, यांच्या बाबतीत एक प्रश्न पडू शकतो. समजा एकदोन कथा वाचल्यावर ही शैली समजली आणि एकूण कथांना वा पात्रांना फार स्वतंत्र ओळख असण्याचा इथे प्रश्न नाही, हे समजले तर पुढच्या सगळ्या कथा वाचायची गरजच काय ? असे वाटणे हा या शैलीचा दोष तर नाही म्हणता येणार ? पण, थोडा विचार करता आणखी एक मुद्दा लक्षात येतो. इथे जवळ जवळ प्रत्येक पानावर विजेचा धक्का म्हणावीत अशी अनेक समृद्ध वाक्ये आहेत. ती त्या त्या निवेदनाच्या ओघातच येणारी आहेत. आणि त्यांच्यामुळे प्रत्येक पान आशयनावीन्याने उजळून निघत आहे. या वैशिष्ट्यामुळे प्रत्येक कथेचे स्वतंत्र अस्तित्व समर्थनीय ठरते आहे.

उदाहरणार्थ येईल त्या पानावरची न निवडलेली ही वाक्ये पहा –

“ प्रेमात सफरिंगची मजा असते. सफरिंग ही मजेची गोष्ट वाटायला मन कसं असायला हवं ? “   ( ११२ )

“ कित्येक मुलींच्या मनांत लग्नाच्या आदल्या दिवशी लग्न न करण्याचं येतं. त्या उद्याचा दिवस उजाडू नये अशी प्रार्थना करत झोपतात. “ ( ११० )

-- अशी शेकडो वाक्ये या कथासंग्रहात आहेत.
मराठी कथेला वेगळेच आयाम आणि ऊंची आणि खोली देणारा कथासंग्रह !
लेखक आणि प्रकाशक यांचे अभिनंदन ! आणि खास रेखाटनांबद्दल चारुदत्त पांडे यांचेही !
--- ००० ---

आस्वादक आणि सैद्धांतिक
डॉ . सुधीर रसाळ सरांच्या एका लेखावर मी माझी प्रतिक्रिया त्यांना कळवली होती. माझ्या प्रतिक्रियेबाबतचे त्यांचे विचारही त्यांनी मला सविस्तर कळवले. सध्या मी सरांचा तो लेख आणि त्यांचे मला आलेले उत्तर जरा बाजूला ठेवतो आहे. मी त्यांना माझी जी प्रतिक्रिया पाठवली होती तेवढीच पोस्ट इथे त्यांच्या अनुमतीनेच देतो आहे. हेतू हा की आपणा साहित्यप्रेमींत चर्चा व्हावी असे दोन विषय यात आहेत --
१. आस्वादक समीक्षेत वेगवेगळी सैद्धांतिकता असते का ? कशा स्वरूपाची ?
२. माझ्या मते, सैद्धांतिक समीक्षा ही भेद माजवणारी असल्याने ती साहित्याच्या मूल्यात्मकतेलाच हरताळ फासते , त्यामुळे, फक्त आस्वादक समीक्षा हीच योग्य असते.
-- या दोन्ही मुद्यांवर आपण आपापले आकलन मांडावे म्हणून ही पोस्ट --
डॉ . सुधीर रसाळ सर आणि माधव आचवल .
मराठी समीक्षेच्या बाबतीत मी अलीकडेच एक पोस्ट दिली होती. त्या पोस्टमध्ये मी माधव आचवल हे माझे आवडते समीक्षक असल्याचा उल्लेख केला होता. तो रसाळ सरांच्या पाहण्यात आला असावा. योगायोग म्हणजे आचवलांच्या समीक्षेवरच रसाळ सरांचा एक लेख लौकरच एका ठिकाणी प्रसिद्ध होणार आहे. तो त्यांनी मला वाचायला पाठवला. तो मी ईमानदारीत वाचला. बालकल्याण खात्याच्या कारकुनाने अवजड उद्योग आणि पोलाद खात्याच्या मंत्र्याला भेटावे तसे ते झाले. पण हरकत नाही. मराठीत एक बरे आहे – तुम्हाला काही समजो वा न समजो, बोलायला विचारस्वातंत्र्य मुबलक उपलब्ध आहे. त्या आधारावर बोलतोय.
आमच्या बँकेत एक देशभक्त कर्मचारी होते. त्यांनी एकदा एक बातमी वाचली की नेहरू युनोकडे जात असून तिथे ते काश्मीर प्रश्नावर बोलणार आहेत. जाताना थोडा वेळ ते मुंबई विमानतळावर थांबणार आहेत. हे कळल्यावर त्या पठ्ठयाने मुंबई विमानतळाच्या पत्त्यावर नेहरूंना एक मोठी तारच पाठवली की बाबा काश्मीरवर बोलताना हे खालील मुद्दे विसरू नका – ते फार महत्त्वाचे आहेत ! तर हे जे मी लिहितो आहे ते तसेच समजावे, ही विनंती.
रसाळ सरांचे, आदरपूर्वक का असे ना, आचवलांबद्दल असे मत आहे की ना धड आचवलांना आस्वादक समीक्षा जमली ना काही समीक्षा-सिद्धांत मांडता आले. मला तर आचवलांचे ‘ जास्वंद ‘ वाचताना अत्युत्तम समीक्षा वाचल्याचा आनंद झाला होता. नंतर, माझ्यासारखाच आनंद झालेले मला आणखीही काही भेटले होते. त्यामुळे, तो सरांचा लेख पुन्हा एकदा वाचला.
रसाळ सरांच्या लेखातल्या पहिल्याच वाक्याला मला खडा लागला. “ मराठीत आस्वादक समीक्षेला जरी एक प्रतिष्ठा असली तरी या समीक्षेमागील सैद्धांतिक भूमिका मात्र मराठीत नीट मांडली गेल्याचे दिसत नाही. “ – हे ते वाक्य. सैद्धांतिक नाहीय म्हणूनच तर तिला आस्वादक समीक्षा म्हणायचे ना ? जी समीक्षा ना रसवादी आहे, ना दलित आहे ( सवर्णांची मस्त ठासलीय या कादंबरीत – ग्रेट आहे ! ), लिंगवादी ( फ्रेंच कवी रॅम्बो हा गे होता आणि व्हरलेन या कवीशी त्याचे संबंध होते, असे म्हणतात – ते काहीच लक्षात न घेता दि . पु . चित्र्यांनी लिहिलेच आहे की त्याच्यावर – पहा – ‘ साहित्य आणि अस्तित्वभान – १ ‘ ), स्त्रीवादी, उत्तर आधुनिकतावादी , मार्क्सवादी -- आशा कोणत्याच सिद्धांतावर आधारित नसलेली तीच ना आस्वादक समीक्षा ? पण, आस्वादक समीक्षेचेही प्रत्येक आस्वादकाने आपापले सिद्धांत निश्चित करून आस्वादक समीक्षेतले सैद्धांतिक उपविभाग मांडावे, अशी ही अपेक्षा असावी. “ कलाकृतीचा अभ्यास करताना आपण कलाकृतीत सापडलेल्या गुणांची तपासणी करीत असतो. हे गुणधर्म शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करण्याची कोणतीही साधने आपल्याला उपलब्ध नाहीत. त्यामुळेही कलाकृतीच्या अभ्यासाला मर्यादा

पडतात. “ हे आचवलांचे वाक्य रसाळ सरांनीच दिलेले असूनही ते सिद्धांतांची अपेक्षा करत आहेत, असे दिसते. इथेही एक इंटरेस्टिंग गोष्ट दिसते. आचवलांनी सैद्धांतिक मांडणी केलेली नाही हा आक्षेप व्यक्त करता करताच रसाळ सरांनी आचलांच्याच लेखनातून सापडलेले १९ मुद्दे घेऊन त्यांची ‘ सापडलेली ‘ भूमिकाही सिद्ध केलेली आहे. त्या सगळ्या घोळात न जाता एका महत्त्वाच्या मुद्याकडे जाऊ.

जगण्यात येणारा सचेतनतेचा अनुभव खरा आणि कलेतून येणारा आभासात्मक ही आचवलांची मांडणी मलाही योग्य नाही वाटत. चैतन्य ते चैतन्य – चैतन्याचा ‘ आभास ‘ हे अनावश्यक वेगळेपणा दाखवणारे वाटते. रसाळ सरांनी घातलेला पेच असा आहे की ते चैतन्य जर एकच आहे तर कला अपरिहार्य नाही ठरणार. मग हवीच कशाला कला, असे होईल. हे सरांचे म्हणणे पटणारे नाही. धर्म, तत्त्वज्ञान हेही जगणे समजून घेण्याचे मार्गच असतात – ते काही प्रत्यक्ष जगणे नसतात. तसेच कलेच्या माध्यमातून त्या सचेतनेतेचा प्रत्यय येत असेल तर तो अपरिहार्य आहे का, हा प्रश्न गैरलागू ठरतो. आणि बिनचूकपणाच्या आणि वैज्ञानिकतेच्या हव्यासापायी, जगण्याचा हेतू काय, त्याला काही अर्थ आहे का, दु:ख का होते, दु:खाशिवाय जगता येऊ शकते का, हे प्रश्न मारून नाही टाकता येणार. जगण्यातल्या सचेतनत्वाकडे जर हे प्रश्न नेत असतील तर ते महत्त्वाचेच ठरते. कलेतून आलेल्या त्या सचेतनत्वाची पुनरउभारणी करणे, हे समीक्षेचे काम आहे, असे जर आचवल मानत असतील तर त्यात गैर काहीच नाही. आणि आचवल अशी पुनरउभारणी करण्यात यशस्वी होतात असे माझ्यासारख्या अनेकांचे मत आहे. त्यासाठी आचवल जी भाषा वापरतात ती रसाळ सरांना अचूक बोध देणारी वाटत नाही. त्याला इलाज नाही. समीक्षा हीही एक सर्जक कलाच आहे या दृष्टीने पाहिले तर प्रत्येकच कलाकृती प्रत्येकाला पोचलीच पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही. मला स्वत:ला सैद्धांतिक मर्यादांत अडकणाऱ्या समीक्षेपेक्षा आस्वादक समीक्षाच महत्त्वाची वाटते. सैद्धांतिक समीक्षा ही भेद निर्माण करणारी आणि म्हणून हिंसक असते, असे मला दिसते. त्यामुळे, एकूणच माणसाने एकत्रितपणे शांततेने जगण्याचे मूल्यच ती नाकारते आणि परिणामत: कला ही मूल्यात्मक असताच कामा नये, अशी अट निर्माण करते. याचाच अर्थ कलेचे अस्तित्वसमर्थनच ती घालवते. हे लक्षात घेतले तर शास्त्रीय पद्धतीच्या सिद्धांतांची मागणीच गैर वाटते. भौतिक नियमांप्रमाणे कला समीक्षा कधीच, ‘ कुणीही केली तरी ती तशीच येणार ‘ अशी होऊच नाही शकणार, हे लक्षात घ्यायला हवे.

सचेतनतेचा प्रत्यय यायला साहित्यकृतीची अमुक एक रचना महत्त्वाची असते की नसते, असा एक प्रश्न रसाळ सर पुढे आणतात . रचना असतेच ना महत्त्वाची. कसेही काहीही मांडून सचेतनतेचा प्रत्यय कसा येईल ?

रसाळ सरांच्या प्रत्येक मुद्यावर लिहून त्यांच्या लेखाइतकाच मोठा लेख लिहिणे, ये मेरे बसकी बात नही है ! दुसरे म्हणजे, आचवलांचे ‘ जास्वंद ‘ हे पुस्तक पुन्हा एकदा वाचून अधिक तपशीलवार बोलावे इतका माझा दमसास नाही. त्यामुळे, इथेच थांबतो. समीक्षा हे क्षेत्र असे आहे की अमुक म्हणजे पूर्ण चूक वा निरर्थक, असे होण्याचा धोका कमी असतो – याचाच फायदा घेऊन अनेकजण यात लुडबुड करतच असतात – मग मीच का नको, असे याकडे सहानुभूतीने पाहावे, ही विनंती. ही असमान कुस्ती मला खेळायचीच नसल्याने ( पुरेशा खोड्या काढून झाल्यावर ) आता मी मैदानातून पळ काढत असल्याचे जाहीर करत आहे !

--- ००० ---

तत्त्वशील माणसे

तुकारामाने अनंततेचा उल्लेख केला की तो हिंदू धर्मातले काहीतरी बडबडतोय म्हणून त्याची चेष्टा होऊ शकते. ते जाऊ द्या, हे घ्या –

The fundamental principle of Buddhism is that the whole universe is in Limitless-Oneness, it is originally so, and pure, i.e., free from artificial limits of concepts, values and judgments. ( बौद्ध धर्माचे मूलभूत तत्त्व हे आहे की संपूर्ण विश्व हे एक अमर्याद एकत्व आहे, म्हणजेच, ते सर्व तऱ्हेच्या कृत्रिम विचारकल्पना , मूल्ये आणि निष्कर्ष यांपासून मुक्त आहे. )

बौद्ध धर्माचे प्राणतत्त्व आहे दु:खमुक्ती म्हणजेच निर्वाण – जे जगण्यात असू शकते. ते शक्य नसेल तर धर्म या शब्दाचा अर्थच खलास होतो. आणि ते तेव्हाच शक्य होते जेव्हा माणसाच्या टाळक्यात कोणते ना कोणते समरूप होण्याचे साचे नसतात. एखाद्या धर्माशी समरूप होऊन कट्टर होणारा आणि एखाद्या विचारसरणीचा कट्टर समर्थक हे दोघेही सारखेच घातक आणि हिंसक आणि विध्वंसक असतात. प्रश्न असा येतो की मानवजात तर अशी अमर्याद भानात जगत नाही – निरनिराळे समरूपतेचे साचे डोक्यात घेऊनच जगते. म्हणून मग घटनेत सर्वधर्मसमभाव, उपासनास्वातंत्र्य वगैरे तत्त्वे घालावी लागतात. ( घटनेत ही तत्त्वे आहेत म्हणून एखादा इहवादी घटना नाकारू शकत नाही. ) मानवी संबंधांच्या कोणत्याही समस्येत विचार, बुद्धी, प्रणाली हे सर्व कुचकामी ठरते. धर्माभिमानी, जात्याभिमानी, विचारसरणीचे अभिमानी हे सर्व एकाच प्रकारचे हिंसक गधडे असतात. फक्त ते सगळे, मी शहाणा आणि बाकीचे वेडे, असे म्हणत असतात, इतकेच. ‘ मी नास्तिक आहे, मी धर्म मानत नाही, उपासना मानत नाही ‘ म्हणजे मी कुणीतरी इतरांपेक्षा अधिक शहाणा आणि विवेकी आणि अधिक शूर आहे असे समजणारे काही हुशार मूर्ख लोक असतात. ते स्वत:ला बुद्धिप्राण्यवादी वा इहवादीही म्हणवून घेतात. समरूपतेचे सगळेच साचे हे इहवादीच असतात आणि सतत एकमेकांच्या संघर्षात असतात, हे समजून घ्यायला हवे. इथे राजकारणप्रियता प्रचंड प्रमाणात आहे आणि त्यात ‘ समान न्यूनतम कार्यक्रम ‘ किंवा common minimum programme याचे खूप महत्त्व आहे. कसले इयाटाचे तत्त्व ? अंतिमत: तत्त्व म्हणजे काय तर माझे व्यक्तिमत्व, स्वभाव, विचार, मते -- आणि नेमकी अशीच्या अशीच भेळ असलेली जगात दुसरी व्यक्ती असू शकत नाही. आपल्याला वाटते, मर्यादित असणे म्हणजे तत्त्वशील, आदर्श असणे ! खरे तर ते भंगार आणि हिंसक असणे असते ! – याचे पूर्ण आकलन झालेले तुकाराम वा बुद्ध हे अमर्याद एकतेबद्दल काय बोलत आहेत, हे समजून घ्यायची आपली कुणाचीच इच्छा नाही. आपल्याला तथाकथित तत्त्वशीलपणा मिरवण्यात जास्त इंटरेस्ट आहे.

पुरस्कार देणाऱ्याचे मूल्यमापन तुम्ही कसे करणार ? समजा तो सरस्वतीभक्त नाही पण भ्रष्टाचारी आहे किंवा अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणारा आहे – तुम्ही काय कसे तपासणार ? मला एकदा एका ब्राह्मण संस्थेकडून सत्कार करण्यासाठी निमंत्रण आले होते. मला काही चांगले पारितोषिक मिळाले होते म्हणून. मी त्यांना विचारले की तुम्ही माझे काही वाचले आहे का ? तर ते म्हणाले, नाही, ब्राह्मण आहात म्हणून करायचाय सत्कार. त्याला मी नकार दिला होता. माझ्या लेखनासाठी हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन , दलित, मराठा, बौद्ध, ब्राह्मण, कम्युनिस्ट कुणीही मला पारितोषिक दिले तरी मला प्रॉब्लेम नाही येणार. आता पारितोषिक तरी कशाला, हा एक वेगळाच मोठा विषय आहे. जाऊ द्या. वैचारिक स्तरावर तत्त्वशील-बित्त्वशील ही सगळी नुसती बकवास असते हे स्पष्ट पाहायला हवे.

--- ००० ---

आरभाट नोंदींचे प्रकरण

० रवींद्र दामोदर लाखे -- ० शब्दमल्हार प्रकाशन.

जी. ए. कुलकर्णी यांच्या एका पुस्तकाचे नाव आहे, ‘ माणसे अरभाट आणि चिल्लर. ‘ मूळ कानडी असलेला तोच शब्द ‘आरभाट ‘ असाही लिहिला जातो. मोठे, महत्त्वाचे असा त्याचा अर्थ आहे. लाख्यांच्या या पुस्तकातल्या बऱ्याच नोंदी या छोट्या छोट्याच आहेत. मग त्यांना आरभाट का म्हणायचे, तर मला असे दिसते की आपल्या सवयीतल्या पाहण्यापासून लांब असणाऱ्या अशा या नोंदी आहेत. एकदा सवयीतले नाही म्हटल्यावर ‘ किती सवयीबाहेरचे ‘ हे मोजणार कसे ? नोंद आकाराने वा ओळींनी कशीही छोटी-मोठी असो, ती सवयीबाहेरची असणे हेच तिचे मोठेपण वा महत्त्व आहे. या अर्थाने या पुस्तकाचे नाव स्वीकारायला हरकत नाही.

“ आपण स्वत: बिनमहत्त्वाचं होऊन जावं. म्हणजे आपलं जगणं बिनमहत्त्वाचं होईल . अखिल मानवजातीचं जगणं बिनमहत्त्वाचं होईल. सगळं सगळं बिनमहत्त्वाचं झालं की जगणं कितीही सुंदर झालं तरी तो बिनमहत्त्वाचा उत्सव असेल. तो आपण आनंदानं साजरा करावा. “ ( पृ . १११ ). – हे या नोंदींचे सूत्र म्हणता येईल. स्वला महत्त्व देत

त्याला केंद्रस्थानी ठेवून पाहणे, हे झाले सवयीचे पाहणे. हे तसे नाही. पाहण्यातल्या या आमूलाग्र वेगळेपणामुळे या नोंदी विशेष, नावीन्यपूर्ण झालेल्या आहेत.
रूटीन गोष्टींपासून ते अपवादात्मक अशा सनसनाटी बाबींच्याही नोंदी यात आहेत. हे नुसतेच नावीन्य नसून ही एक आशय-सघनताही आहे. चंद्रमोहनजींचे कल्पक मुखपृष्ठ खासच !
--- ००० ---

पॅरानोया ( कवितासंग्रह )
० हेमंत दिवटे ० पोएट्रीवाला प्रकाशन.
हेमंत दिवटे हे नाव सतत आघाडीवर राहून झळकत राहणारे नाव नाही. त्यामुळे, थोडी माहिती देतो. दिवटे हे ' अभिधानंतर ' या वाङ्मयीन नियतकालिकाचे संपादक होते. ( त्यात त्यांच्याबरोबर सचिन केतकरही होते. ) त्यावेळी ते सगळे अंक मी वाचले होते. उत्तम दर्जा आणि तसेच दर्जेदार सादरीकरण यासाठी ते लक्षात आहेत. त्यांच्या पोएट्रीवाला या प्रकाशन संस्थेतर्फे त्यांनी काही उत्तम कवितासंग्रहही प्रकाशित केलेले आहेत. ' व्हायरस अलर्ट ' या नावाने त्यांचा एक कवितासंग्रह दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी इंग्रजीत अनुवाद केलेला आहे. ही बाब त्यांचे महत्त्व जाणवून देण्यास पुरेशी आहे. शिवाय, आंतरराष्ट्रीय समुदायात कविता वाचनासाठी ज्याला निमंत्रणे येतात असा हा मराठीतला एकमेव कवी असावा. कोणतीही आक्रमकता न करता शांतपणे, संवेदनशीलपणे आपले काम करत राहणारी ही व्यक्ती आहे.
दिवाट्यांचा, ' पॅरानोया ' हा एक कवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झालेला आहे. पॅरानोया ही एक मानसिक विकृती असून तो एक रोगच आहे. हा रोग झालेल्या व्यक्तीला प्रत्येकाबद्दल अविश्वास आणि भीती वाटत असते. लोक माझ्याविरुद्ध कारस्थाने करत आहेत, ते मला मारणार आहेत, अशा प्रकारच्या भयग्रस्त मानसिक अवस्थेत ती व्यक्ती असते. आपण कधीही या ना त्या प्रकारच्या हिंसेचे शिकार होणार आहोत अशी ही दृढ मानसिक अवस्था असते. कवितासंग्रहाला दिवाट्यांनी हे नाव का दिले असावे ? त्या रोगात तर ती रोगी व्यक्ती वास्तवात नसलेल्या गोष्टींची काल्पनिक भीती बाळगत असते. इथे कोणत्या काल्पनिक भीती आहेत ? तर, मला वाटते, कवीला असे म्हणायचे आहे की ती रोगी व्यक्ती जे काल्पनिक वास्तव तयार करते तेच आजचे प्रत्यक्ष वास्तव आहे. पूर्ण समाज आणि सर्वच व्यक्ती त्या वास्तवाच्या शिकार झालेल्या आहेत. तोच रोग आता प्रत्यक्ष वास्तवावर आधारला गेलेला आहे ! हे भयानक आहे ! कुणाचाही कुणावर विश्वास नसणे आणि सर्वांनाच सर्वांची भीती असणे ! या कवितासंग्रहाचे हे शीर्षकच आजच्या जगण्यावरचे एक विदारक भाष्य आहे.
या संग्रहातल्या काही ओळी बघा –

सततच्या दहशतीची सवय एक
व्यसन हे कधीही न सुटणारं
एकदा ते लागलं तर पुन्हा कधी ते
सुटता सुटत नाही ( पृ. १४ )
मॅनईटर मॉबला
संपवून टाकायचाय मध्यमवर्ग ( पृ. १७ )
हत्या करून टाकायची
कुणाच्याही नकळत
स्वत:तल्या स्वत:ची ( पृ. २२ )
मीही गंजत चाललोय
देशही गंजत चाललाय

जगही ...
जंग जंग
गंज गंज ( पृ. २६ )

– आजच्या जगात जगणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तीच्या या प्रामाणिक प्रतिक्रिया आहेत. संग्रहाचे सादरीकरण अत्युत्तम आहे.

--- ००० ---

भगवान ट्रिप ( कवितासंग्रह )

० मन्या जोशी ० पोएट्रीवाला प्रकाशन.

मन्या जोशी हा कवी मला माहीतच नव्हता. याच्या सुट्या कविता कधी कुठे दिसल्या नाहीत. कुणाच्या बोलण्या-लिहिण्यातही याचे कुठे उल्लेख आले नाहीत. पण, हा कवितासंग्रह वाचला आणि लक्षात आले की अरे, हा तर आजच्या पिढीचा जादूगार कवी आहे. चार चार चेंडू हवेत उडवत-झेलत राहण्याची भाषिक किमया याच्याकडे आहे. कवितेची ही अशी भाषा मराठीत तरी मी पहिल्यांदाच पाहतो आहे. पण, मराठी साहित्य हे डोकीबंद विद्वानांसाठी प्रसिद्ध आहे. यावर पहिला मुद्दा चर्चेला येईल तो हा असेल की मुळात ही कविताच नाहीय. मग त्याच्याहून हुशार असा एखादा विद्वान उभा राहून म्हणेल की, अहो, कवितेचे जाऊ द्या, हे गद्यसुद्धा नाहीय. याला काही अर्थच नाहीय, यातून काहीच पोचत नाहीय. अशा महानुभावांकडे दुर्लक्ष करूनच ही कविता वाचायला हवी. ही नव्या पिढीची नवी भाषा आहे. आता ' भावना पोचल्या ' एवढे, इतके म्हणत बसायला कुणाला वेळ नाही आहे. ' भापो ' म्हणणार फक्त. लहानांची जशी निरर्थक बडबडगीते असतात ना, तशी, मी म्हणेन, ही मोठ्यांची गंभीर-उडाणटप्पू बडबडगीते आहेत. यांत तुम्हाला सुभाषिते वा पाठांतराला गोड ओळी मिळणार नाहीत. पण, नीट वाचलेत तर आपल्या आजच्या जगण्याचे हे ' जीवनदर्शन ' आहे. या भाषेत ' पिंजडेवाली मुनिया ' पासून अरुण कोलटकर, मन्या ओक, पु. शि. रेगे, आनंद बक्षी, सुरेश भट, महेश भट असे अनेक संदर्भ आहेत. ही कविता लिहिणारा पर्सोना हा बऱ्यापैकी शिकलेला आणि बहुश्रुत असा आहे. इथे टपोरी भाषेपासून विद्वज्जड भाषेपर्यंत सगळ्याची भेळ आहे. कवितेची ही शैलीच मुळात सगळे काही सांगून जाणारी आहे. शिवाय कविता सांगेल ते वेगळे !

एक बीअर मारू
एक पिझ्झा खाऊ
बस लागली की
विमानात जाऊ

--- याच्यापुढे येते ---

दळूं
कांडूं
खेळूं
आनंद
कळा ( पृ. १२४ )

( आता कशाचा काही आहे का संबंध ? तर, कुछ भी चलेगा – भंगारच झालेय सगळे, मग, सलग अर्थाची चिंता कशाला ? )

आता माझी मीमांसा न देता काही ओळी देतो –

पक्षी ग्रिलवर बसतात
काळे कावळे कणखर
खिडकी लावते बाई
निसर्ग अजरामर ( पृ. ३४ )

एका कवितेचा शेवट –

कोणीतरी
काहीतरी
करा ( पृ. ३८ )
पावसा, याही देशात देव पाड ( पृ. ३९ )
एकाच जागी
राहा उभा
हलु डुलु नको
बॅकग्राऊंड मी
बदलवत राहीन ( पृ. ५८ )
सेल्फी काढ
बघत बस
व्हीडिओज बनव
बघत बस
चूप चाप ( पृ. ६५ )
केंद्रस्थानी तू आहेस
पेरिफेरीवर दुनिया
विडयाचे सर्व रस चाखते
पिंजडेवाली मुनिया ( पृ. ७० )
चकाचक बायकांबरोबर
इलेक्ट्रॉनिक क्षण
स्वस्त फोन
स्वस्त मन
युगा युगांची मनबाधा
एकदम आली भेटीला ( पृ. ७२ )
जीजू बोलतात
मन मार
मोठं होतं ( पृ. ८० )

--- असे किती सांगणार ? ये कडू मेलडी खाव और खुद जान जाव !

--- ००० ---

पुरोगामी म्हणजे काय रे भाऊ ?

ही पोस्ट लिहिण्यात माझा कोणताही प्रतिगामी हेतू नाही. काही शब्द वा संकल्पना यांच्याबाबत अनेकदा गोंधळ दिसतो – फक्त माझाच नव्हे तर अनेकांचा. तर यात काही स्पष्टता आणता येते का ते पाहावे, हा हेतू आहे. यात मला मुख्य प्रश्न हा पडतो की भारतीयांना आपापल्या श्रद्धा बाळगण्याचे आणि उपासनापद्धती अनुसरण्याचे स्वातंत्र्य भारतीय घटनेने दिलेले आहे. आपण यातून जादूटोणा, जारणमारण, भानामती, पशुपक्षी वा मुलेमाणसे यांचे बळी देणे, असले प्रकार वगळू. पण, निरनिराळ्या धर्मांच्या उपासना, देवदेवता वा विभूती यांच्या उपासना, वारी, यात्रा, उत्सव या सर्व बाबी  मान्यताप्राप्त समजू. तर या ज्या मान्यताप्राप्त उपासनापद्धती आहेत, ज्या बुद्धिप्रामाण्यवादी वा इहवादी नाहीत, त्या अवलंबणारे लोक पुरोगामी असू शकतात की नाही ? पुरोगामी हा निरीश्वरवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी आणि कोणतीही श्रद्धा नाकारणाराच असावा लागतो का ? मान्यताप्राप्त उपासनांकडे सहानुभूतीने पाहण्यात आणि सहिष्णुता ठेवण्यात पुरोगाम्यांना अडचण नसते. कम्युनिस्टांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना निरनिराळ्या समूहांच्या धार्मिक उत्सवांतही सहभागी व्हायला सांगितल्याची बातमी मी वाचली होती. त्यावरून हेच दिसते, असे आपण म्हणू शकतो. दुसऱ्यांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी गोल टोप्या घालणे किंवा इतर धर्मीयांनी हिंदूंच्या धार्मिक उत्सवांत सहभागी होणे, हेही घडत असतेच. आता हे सर्व लोकशाहीत मते मिळवण्यासाठीही घडू शकते आणि खरोखरच ते गुण्यागोविंदाचा आविष्कारही असू शकते. की बाबा, माझी नाहीय ही उपासना पद्धती पण तुमचा आदर राखायला मला काही प्रॉब्लेम नाही, असे. तर हा आदर आणि ही सहिष्णुता मान्य पण श्रद्धावान पुरोगामी असू शकतो का, यावर जरा स्पष्टता यावी, असे वाटते.

दूसरा प्रश्न जरा वेगळा आहे. काही वर्षांपूर्वी बँकांमध्ये कम्युनिस्टांची युनियन प्रबळ होती. सगळेच त्याच युनियनचे सभासद असत. बाहेर आरेसेस वाले असणारेही इकडे या युनियनचे सभासद असत. हे थोडेफार स्वार्थासाठीच असणार. पण, मग अशा वेळी तो माणूस अर्धा पुरोगामी आणि अर्धा प्रतिगामी असतो का ? कारण आरेसेस म्हणजे प्रतिगामी असे असल्याने हा प्रश्न येतो. समजा जातवाद हा प्रतिगामी आहे तर एकीकडे मराठा महासंघ किंवा ब्राह्मण संस्था आणि शिवाय दुसरीकडे तोच पुरोगामीही, असे असू शकते का ? अशी फाटलेली माणसे पुरोगामी असतात का ? आणि ज्यांचे मेंदू असे तुकड्यातुकड्यांत विभागले गेलेले आहेत अशांना पुरोगामी नाही म्हणायचे, असे म्हटले तर एक म्हणजे पुरोगामी उरतील किती आणि त्यांची संख्या वाढायला कितपत वाव राहील ?

तिसरा प्रश्न येतो ‘ बहुजनसमाज ‘ या नामाभिधानाचा. बहुजनसमाज म्हणजे पुरोगामी, असे सामान्यत: समजले जाते. त्यात मग श्रद्धावान वा भक्तिमार्गीही येतात. बहुजनांत मुसलमानही येतात हे आपण बहुजन वंचित आघाडीत पाहिले. बहुजनांमध्ये नेमके येतात तरी कोण कोण ? की ब्राह्मण सोडून सगळे बहुजन ? मराठा हे उच्चवर्णीयांत येतात की बहुजनांत ? की काही उच्चवर्णीयही बहुजनांत येतात ? म्हणजे मागास उच्चवरणीय, असे काही ? वारकरी घ्या उदाहरणार्थ – ते बहुतेक बहुजनसमाजात येतात पण ते पुरोगामी असतात का ? की वारकऱ्यांत पुरोगामी आणि प्रतिगामी असे गट असतात ? बहुजन हा शब्द जातकेंद्रित असतो की दारिद्र्यकेंद्रित की फक्त ब्राह्मण नसला की तो बहुजन ? इतक्या मोठ्या जनसमुदायाने आणि एकापेक्षा एक दिग्गज नेत्यांनी सतत ब्राम्हणकेंद्रित राहणे हे, किरकोळ, शक्तिहीन लोकांना अनावश्यक मोठे फूटेज देणे नाही होत ? आणि सारखे बहुजनसमाजाला संबोधून बोलणे हे याच देशाचे नागरीक असलेल्या अल्पजनसमाजवाल्यांना दुय्यम समजणे नाही ठरत ? आणि असे करणे हे पुरोगामित्वात बसते ? ( इथे, बहुजन कसे काय पुरोगामी, असा प्रश्न येऊ शकतो. उत्तर सोपे आहे. " शाहू-फुले-आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र " असे आपण रोजच ऐकतो की नाही ? म्हणजे हा पूर्ण महाराष्ट्र पुरोगामी आहे. इथले बहुजन हे

पुरोगामी असल्याशिवाय पूर्ण महाराष्ट्र कसा काय पुरोगामी असू शकेल ? सारांश, बहुजन हे पुरोगामीच आहेत, हे सामान्यत: मान्यच असते ! )

सर्वच नेते, कार्यकर्ते आणि एकूणच जनताही निवडणुकीच्या खेळात, शक्य ते सगळेच प्रतिगामी मार्ग हाताळताना दिसतात. हे पाहता, हा आख्खा देशच प्रतिगामी म्हणावा का ? की अशी शुद्ध विभागणी वगैरे काही नसते आणि त्या त्या वेळच्या आपद्धर्माप्रमाणे हे ठरते ? म्हणजे लोकशाही ही शासनपद्धतच प्रतिगामी असते का ? तसे असेल तर मग लोकशाही देशात पुरोगाम्यांचे गुणगान कशाला ?

मला जरा वेगळे दिसते. निरनिराळे धर्म, श्रद्धा, विचारसरण्या हे काहीही असो, प्रत्येकाचा एकेक जगण्या-वागण्याचा साचा असतो. तो साचा जनुक नकाशा आणि परिस्थिती आणि इतर अनेक परिणाम व संस्कार यांनी घडलेला असतो. प्रत्येकजण आपापली सुरक्षितता आणि जमेल तेवढे वर्चस्व मिळवणे याच्या प्रयत्नात असतो. सगळीच माणसे सुखी-दु:खी, प्रेमळ आणि रागलोभद्वेष बाळगणारी आणि थोडीफार हिंसकचअसतात.आणि एकमेकांशी संघर्षातच असतात. सगळेच साचे समस्या निर्माण करणारेच असतात. यात खरा मूलभूत प्रश्न असतो तो हा की माणूस अशा साच्याशिवाय जगू शकतो का ? आणि तसा तो नसेल जगू शकत – तसा निष्कर्ष स्वीकारायचा, असे ठरले तर – माणसाला असे समस्याप्रधान जगायचा एक अभिशापच असतो, असे म्हणावे का ? आणि तसे असेल तर ' अभिशाप ' ही कल्पना प्रतिगामी की पुरोगामी ?

--- ००० ---

पुरोगामी आणि मी

' पुरोगामी म्हणजे काय रे भाऊ ? ' या माझ्या पोस्टवर झालेल्या चर्चेनंतर असे दिसू लागले की मी प्रतिगाम्यांना पाठिंबा देऊ इच्छितो असे काहींना वाटतेय. धर्मवाद वा पुनरुज्जीवनवाद चांगला का, तर नाही, विषमता जायला हवी की नको तर होय, जायला हवी , माणसांनी संघर्षात जगणे चांगले की सौहार्दात, तर सौहार्दात – असेच मलाही वाटते, हे मी सांगू इच्छितो. फरक कुठे होतो तर धार्मिक कट्टरतेतकीच वैचारिक कट्टरताही भेद माजवणारी आणि हिंसकच असते हेही मला स्पष्ट दिसणे. त्यामुळे, पुरोगाम्यांमधले आंतरविरोध, दंभ आणि मानवी जगण्याला घातक असणाऱ्या बाबींबद्दलही लिहिले जाते. धर्मवाद ही जशी एक अंधश्रद्धा म्हणता येते तशीच वैचारिक कट्टरता हीही एक अंधश्रद्धाच असते, असे एखाद्याला दिसत असले तर त्याने ते का म्हणू नये ? पुरोगाम्यांना वाटते की सद्यस्थितीत हे काही बोलू नये, करेक्ट राजकीय भूमिकाच सर्वांनी घेत राहावे. ' सद्यस्थिती ' या प्रकाराला कधीच अंत नसतो. आणि मुख्य म्हणजे, मानवी जगणे चांगले व्हावे, याच मार्गाने सर्वांना जावेसे वाटत असले तरी आत्मकेंद्रितपणाचा सर्वांचा पाया एकच पण वेगवेगळा असल्यामुळे तसे घडू शकत नाही. आहेत किती पुरोगामी ? त्यांना एवढे महत्त्व कशाला द्यावे, हा जसा एक प्रश्न असतो तसाच काहीजण हाही प्रश्न विचारतात की आहेत किती ब्राह्मण, त्यांना एवढे महत्त्व कशाला द्यावे ? पुरोगाम्यांचा मोठा प्रॉब्लेम हा दिसतो की फक्त आपणच तेवढे डोळस आहोत आणि बाकीचे सगळे अंधळे वा गंडलेले आहेत अशी त्यांची पक्की खात्री असते. तेही इतरांप्रमाणेच खोटेपणा करतात, दुटप्पी वागतात यावर कुणी बोलणे म्हणजे जणू त्यांच्या सात्त्विकतेवर अन्याय झाला, असे त्यांना वाटते.

प्रत्येक माणूस जगताना काही आकलन घेत जात असतो. सर्वांचेच आकलन आपापल्या मर्यादेत होत असल्याने त्यात ' सत्य ' असे काही असू शकत नाही. ही जगण्यातली एक प्रमुख समस्या असते. ती भेदणे शक्य आहे का, असाही एखादा महत्त्वाचा प्रश्न एखाद्याला पडू शकतो. आहेत किती असा प्रश्न पडणारे माझ्यासारखे लोक, कशाला त्यांच्याकडूनही तुमच्या राजकीय उद्दिष्टांची अपेक्षा करता, असे मी म्हणू शकतो. पण, पुरोगाम्यांना दिसते त्याबाहेरचे कुणाला काही दिसू-जाणवूही नये, असे त्यांचे ' न्याय्य ' म्हणणे असते.

आता माझे आकलन सांगतो. मला असे दिसते की धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या हे सर्वच माणसाला चांगले जगणे प्रदान करण्याच्या बाबतीत अपयशी ठरलेले आहे. विचारसरणीही भेदाभेद, फुटीरता आणि संघर्ष यांचेच संवर्धन आणि जोपासना करत असते. याचे महत्त्वाचे कारण एकच असते की विचारसरणी ही माणसाच्या

आत्मकेंद्रिततेला कोणताच प्रश्न विचारत नाही. तुझ्या आत्मकेंद्रिततेपेक्षा माझी आत्मकेंद्रितता अधिक हितावह आहे, असेच, प्रत्येक विचारसरणीचे म्हणणे असते. हे दुष्टचक्र भेदले जाण्याची शक्यता मला फक्त कलेत दिसते. कोणतीही चांगली, सर्जक कला माणसाच्या अमुक एका आत्मकेंद्रिततेला बढावा देत नसून त्याचे भान व्यापक, समावेशक करून त्याला संवेदनशील करणारी असते. इथे हे स्पष्ट करावे लागेल की हे काम परिवर्तनवादी कला करू शकत नाही कारण ती विचारसरणीभारितच असते. हे काम करणारी कला हीच सर्जक कला असते. हे काम कला अनेक मार्गांनी, अनेक प्रकारे करत असते. इतक्या महत्त्वाच्या, मौल्यवान प्रक्रियांना अडथळे आणणे, त्यांना खोडे घालणे, त्यांची वाढच होऊ नये अशा कृती करणे ही अशी विध्वंसक कामे हे पुरोगामी म्हटले जाणारेच सर्वाधिक कट्टरपणाने करत असतात. त्यांना फक्त ' करेक्ट राजकीय भूमिका ' एवढेच दिसत असल्याने कलेच्या या कार्याचे त्यांना महत्त्व तर नसतेच पण ते काही घडताच कामा नये, असेही त्यांचे प्रयत्न असतात. सांस्कृतिक क्षेत्रातल्या अनेक मोक्याच्या जागा पकडून ते हे त्यांचे जीवनकार्य करत असतात. त्यांच्या विचारांना बढावा मिळणे ही एकच गोष्ट कलेतूनही घडत राहायला हवी, असे त्यांना वाटते. म्हणजे कला ही जी एकमेव गोष्ट माणसामाणसात सौहार्द निर्माण करू शकेल असे मला दिसते त्याच गोष्टीच्या विरोधात हे पुरोगामी असतात. म्हणजेच, मला जे मौल्यवान वाटते त्याचा पाठपुरावा मी करताच कामा नये, असे त्यांचे म्हणणे असते. सगळ्यांबरोबरच सहिष्णुतेच्या गप्पा तेही मारत असतातच !
तर, असा आहे प्रश्न. मी, ज्याला प्रतिगामी म्हणतात तोही नाही आणि कलेतल्या सर्व मौल्यवान प्रक्रिया नष्ट करू इच्छिणारा पुरोगामीही नाही. आपण सगळेच एवढे सहिष्णू आहोत तर मी काय लिहिले पाहिजे याच्या कर्मठ अपेक्षा बाळगणे आणि मला सल्ले देणे, मलाच काय, कोणत्याही कलावंताला सल्ले देणे, असली कामे कुणीच करू नयेत, असे या निमित्ताने सुचवावेसे वाटते.

--- ००० ---

धर्म, परंपरा आणि पुनरुज्जीवनवाद हे बरोबर आहे असे मी कधीच म्हणत नाही -- विचारसरणीची कोणतीही कट्टरता ही धार्मिक कट्टरतेसारखीच वाईट आणि हिंसक असते, हे मात्र म्हणतो. हा गंडलेला आणि तो न गंडलेला असे काही नाही. वैचारिक निराकरणेच नाहीत हिंसकपणावर -- ही मांडणी गंडलेली कशी ते स्पष्ट करा.

जरा अधिक स्पष्ट करतो -- मला असे दिसते की मानवी समस्यांच्या बाबतीत धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या हे सर्व अपयशी ठरलेले आहेत . आता शक्यता फक्त कलेत आहे. कलेतूनच संवेदनशीलता आणि व्यापक, समावेशक भान हे शक्य आहे. परिवर्तनवादी कला नव्हे -- ती विचारसरणीतच येते. तर या कलेच्या सर्जक प्रक्रियांत अडथळे आणणारे, खोडे घालणारे, त्यांची हेटाळणी करणारे हे प्रामुख्याने पुरोगामी म्हटले जातात ते आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्या मठ्ठपणाबाबत अधिक बोलले जाणारच. पुरोगामी हा विचारसरणीचाच भाग आहे. माझे बोलणे, लिहिणे हे माझ्या आकलन-प्रक्रियेतूनच येणार. त्याला कुणी गंडलेले म्हटले तरी हरकत नाही. यात वाद घालून कुणी कुणाला काही पटवून देण्याचा प्रश्न नाही. कुणी म्हणेल, वा, करेक्ट आहे, कुणी म्हणेल, हे सगळे मठ्ठ फालतू आहे ! दोनो चलेगा !

खरे तर या प्रश्नांची उत्तरे वरील पोस्टमध्ये आहेतच -- माणसाच्या जगण्याच्या बाबतीत वेगवेगळ्या आकलनातून, तरीही चांगल्याच हेतूने, कृती चालू असतात. वैचारिक करेक्ट असणे हेच फक्त काहींना दिसते आणि तेच, तेवढेच महत्त्वाचे असे त्यांना वाटते. कला ही वैचारिक मर्यादेत चालणारी बाब नाही. वैचारिक मार्गाने माणसामाणसात सौहार्द कधीच तयार होणे शक्य नाही. कलेचा मार्ग ही एकच शक्यता समोर दिसते. तो अत्यंत मौल्यवान मार्ग नष्ट करण्याच्या कृती कोण करते ? सिलेक्टिव्ह टीकेचा प्रश्नच नाही -- कलेला स्वतंत्रपणे, मोकळेपणाने काम करता यायला हवे -- राजकीय कृतीपेक्षा हजार पटींनी हे महत्त्वाचे आहे. तरीही, राजकीय कृतीच फक्त महत्त्वाची असे ज्यांना वाटते ते तसे करत राहातातच ना. कलेत सामाजिक, राजकीय, वैचारिक असे वेगळे काही काढता येत नाही --

तो व्यापक, समावेशक आवाका असतो. राजकारणात हे वेगळे काढले जाते. त्यामुळे, कोणताही राजकीय पवित्रा हा करेक्ट वगैरे असू नाही शकत -- तो सर्जक मानवी जगण्याच्या विरोधातच असतो.

सगळे सविस्तर सांगून झालेले आहे, तरीही हेच मनात येत असेल तर तो माझा दोष नाही. धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या अपयशी ठरलेल्या आहेत. फक्त कलेतूनच काही भले होण्याची शक्यता आहे. कोणतीही वैचारिकता ही भेद माजवणारी आणि हिंसकच असते. कला व्यापक आणि समावेशक भान देणारी असते. ( यात परिवर्तनवादी कला येत नाही कारण ती विचारसरणीचाच भाग असते. ) राजकारणापेक्षा कला हजार पटींनी महत्त्वाची आहे. तीच नष्ट करण्याचे ज्यांचे प्रयत्न चालू आहेत त्यांच्यावर रोख असणारच ना ! आणि आहेत किती माझ्यासारखे लोक -- असू द्या ना ! पुरोगामी हे इकडेतिकडे पुरोगामी वगैरे असतात पण, साहित्य, कला यांत तद्दन प्रतिगामी असतात. आधुनिक सर्जकतेच्या प्रक्रिया, अभिव्यक्ति पद्धती यांत त्यांना शून्य इंटरेस्ट असते, त्यामुळे, समजतही नाही काही. आपल्याला ज्याचे महत्त्व वाटत नाही वा जे समजत नाही ते नष्ट करा असे त्यांचे विचार दिसतात. त्यांच्या दृष्टीने, ही राजकीय भूमिका की ती यांतून निवड करायची असते -- माझ्या आकलनात, राजकीय भूमिका की साहित्य-कला यांतून निवड करायची असते. सगळ्या राजकीय भूमिका माणसाच्या जगण्यातल्या सर्जकतेच्या विरोधातच असतात. या उपर माझ्या पोटात आरेसेस आहे असे कुणाला वाटले तर त्याची मी चिंता करू शकत नाही.

मी माझ्या क्लॅरिटीने लिहितो -- कोणतीही राजकीय भूमिका मांडत नाही -- पण, पुरोगामी म्हटल्या जाणाऱ्या लोकांच्या , माझ्या मते इथल्या समाजाच्या दृष्टीने अति-महत्त्वाच्या अशा बाबतीतल्या, विध्वंसकतेबद्दल लिहिल्याने ते कुणाच्या हातचे कोलीत ठरत असेल तर त्याला मी काय करणार ? -- ते असो. तुम्ही वर उल्लेख केलेली ' फट ' कथा पीडीएफ असेल तर प्लीज द्या ना पाठवून.

---

मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ( कथा )
--- सतीश तांबे.

सतीश तांबे यांची कथा ख्याल गायकीसारखी असते – धिम्या दमदारपणाने वाटेत येणारा राडारोडा, पानेफुले वगैरे वाहून नेत जाणारी. कथेचा विषय-आशय चहूबाजूंनी पाहात त्याला सर्वांगीण अभिव्यक्ती देणे, ही त्यांच्या कथेची खासियत असते. ' मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ' ही त्यांची कथा तशीच आहे. तांबे हे कथाकार म्हणून व्यक्तिगत मतमतांतरे व्यक्त करत नसून मानवी समस्यांचे दर्शन घडवतात, असे मला वाटते. कथा आधुनिक विदीर्णतेतून येते की एखाद्या एकसंध भानातून हा मला एक गौण मुद्दा वाटतो. कारण कथेची गुणवत्ता त्यावर अवलंबूनच नसते. या कथेत अशीच एक गुणवत्तेशी संबंधितच समस्या आहे. एके काळी मराठी साहित्यात दलित-शोषित-वंचित-पीडित अशा व्यक्तींच्या, समूहांच्या साहित्याचा एक लोंढाच आला होता. मराठी साहित्यविश्व ढवळून निघाले होते. मानवी जगण्यातले एक वेगळेच जग साहित्यात येत होते. त्याचे नावीन्य आणि धक्केही साहित्याची निकोपता वाढवणारे होते. पण कालांतराने त्यात साचलेपणा येत गेला आणि त्यातली जान कमीकमी होत गेली. तरीही, साहित्यात आलेल्या एका मोठ्या समूहाची त्या क्षेत्रात एक सत्ता निर्माण होत गेली. ' तशा ' नसलेल्या साहित्याला आणि लेखकांना नामशेष करणे घडू लागले. त्यातून मग लेखकांना ' स्ट्रॅटेजिक ' ( डावपेचात्मक ) वागण्याची गरज निर्माण होऊ लागली. आपल्याला लिहायचेय तेच लिहायचे पण बाहेर आपण ' त्यांच्यापैकीच ' असल्याचे दाखवणे महत्त्वाचे ठरू लागले. या कथेतला ज्येष्ठ लेखक हा मुळात भणगे या आडनावाचा आहे. पण, एका क्षणी त्याला ही

आयडिया सापडते की भणगे ऐवजी ‘ भणंगे ‘ असे नाव धारण करावे ! तो म्हणतो की या एका अनुस्वाराने खूप फरक पडला ! ही आपल्या साहित्य विश्वावरची एक प्रचंड  अन्वर्थक उपरोधिका आहे.
आयुष्य तर मध्यमवर्गीय म्हणावे असे गेलेय – जातेय  तर वंचित मसाला आणणार कुठून ? त्या बाबतीतलेही खूप तपशील या कथेत आहेत. या कथेतला तो थोडाफार मान्यताप्राप्त लेखक तीतल्या एका होऊ घातलेल्या लेखकाला म्हणतो की त्याची अवस्था ना घरका ना घाटका अशी झाली ! पण, इलाज नाही. ते जग आणि हे जग यांत एक सांस्कृतिक फट निर्माण करायची आणि त्या फटीत मुक्काम करून लिहायचे, हाच मार्ग ! “ गेल्या काही वर्षांमध्ये हालअपेष्टा,  शोषण, अवहेलना, दारिद्र्य यांची रट लावल्याशिवाय इथे लेखक म्हणून उभं राहणं अवघड होत चाललं आहे दिवसेंदिवस ! “ असे तो ज्येष्ठ लेखक म्हणतो. ‘ वास्तव वडापाव ‘ हा या कथेतला प्रकार मुळातूनच वाचावा असा आहे. “ साहित्याचा कला म्हणून विचारच नाही आहे या स्वत:ला लेखक म्हणवणाऱ्या बहुतेकांकडे. हे साले अनुभवांचे लेखनिक आहेत. “ असे एक जहाल वाक्य या कथेत आहे.
तो लेखक, साहित्य हे ‘ रचले ‘ पाहिजे, असे म्हणतो. मला असे दिसते की त्याचा अर्थ, नुसताच अनुभव परावर्तित करणे महत्त्वाचे नसून त्याच्या आकलनाची सर्जक प्रक्रिया साहित्यात यायला हवी, असे त्याला म्हणायचे आहे. साहित्य संमेलनात त्याच त्याच घिस्यापिट्या चर्चा करत राहण्यापेक्षा या कथेवर एक परिसंवाद घेतला तर तो मराठी साहित्याचे खूप काही भले करू शकेल, असे वाटते.
--- चं . प्र . देशपांडे.
--- ००० ---

अध्यात्म म्हणजे काय रे भाऊ ?

‘ अध्यात्म ‘ या शब्दाला हिडिसफिडीस करायची हल्ली एक फॅशनच पडलीय.  कुणी म्हणते, अध्यात्म म्हणजे आत्म्याचे ज्ञान, कुणी म्हणते आत्म म्हणजे स्वत: या अर्थी आत्मज्ञान, कुणी म्हणते की धर्माचे ज्ञान, कुणी म्हणते की जगाच्या मूळ सर्वव्यापी चैतन्याचे ज्ञान.  कुणी म्हणतो की ते धर्म, आत्माबित्मा सोडूनच द्या, ते सगळे काल्पनिक असते, नाही ते भ्रम नकोत. आणि आत्मज्ञान कसले ? आपण जे आहोत ते आहोत – ते दिसतेच, समजतेच आपल्याला – याहून अधिक आत्मज्ञान म्हणजे, शरीरात हाडे किती आहेत, रक्त किती आहे, ते समजा – ते कळतेच शरीरशास्त्रातून ! आणखी काय, कसले ज्ञान ? यावर थोडा विचार करू. माणूस एका भूभागावर जन्माला येतो, पुढे त्याच्यावर बिंबवले जाते की हा भूभाग म्हणजे भारत आहे. तू भारताचा नागरीक आहेस. त्याच पद्धतीने तो हिंदू वा मुसलमान असल्याचेही त्याच्यावर बिंबवले जाते. अशा गोष्टींमुळे अर्थातच माणसामाणसांत अंतर तयार होते, एक दूरी तयार होते, विभाजन तयार होते.  हे फक्त एवढ्याचमुळे नाही घडत. त्याचे दिसणे आणि वैचारिक-मानसिक असणे हे सर्वच विभागणारे असते. त्यामुळे, सर्वांचेच जगणे संघर्षमय, युद्धमय, एकमेकांची छळणूक करणारे, एकमेकांवर अन्याय करणारे, असे होते. आपण ‘ जे आहोत ते आहोत ‘ म्हणजे हे असते सगळे.  धर्म, भाषा, संस्कार, परिस्थिती, जगण्यात आलेली माणसे, घडलेले प्रसंग – हे सगळे मिळून असतो आपण. आणि आपली जनुकरचना, हे आणखी एक अलीकडे माहीत झालेले. हे सगळे विभाजन करणारेच असते.  मग माणूस, ‘ मजहब नही सिखाता आपसमे बैर रखना ,‘ वगैरे गाणी रचू-म्हणू लागतो. एखादा बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकी माणूस म्हणतो, ‘ माणसा माणसा माणूस हो ! ‘आणि आपण किती सर्वांच्या हिताचे बोलतो-वागतो, असे त्याला वाटत राहते. तरीही, ‘ आपण जे आहोत ते आहोत ‘ म्हणजे हजार प्रकारचे विभाजन, हे त्याला समजून घ्यावेच लागते ! अरे, तू म्हणतोस की माणूस होणे महत्त्वाचे, पण, तो म्हणतो, हिंदू होण्याशिवाय तरणोपायच  नाही, आणखी कुणी म्हणतो, कम्युनिझम हेच एकमेव उत्तर ! एका मानसिक अवस्थेत सगळी माणसे येणे हे कधीच शक्य नसते. त्यामुळे, शिरकाण, वर्चस्व, अन्याय हे सर्व अटळच बनते. कसले आत्मज्ञान – जो है सो है – असे म्हणणाऱ्याला हे सर्व मान्यच असते. धर्मवादी

आणि विचारसरणीवाले यांनाही हे मान्यच असते. मग काय, आयुष्यभर बोंबलत हिंडत राहणे, हेच जगणे ? सगळ्यांचा, इतरांना बदलण्यावर, इतरांच्यात परिवर्तन करण्यावर किंवा सर्वांच्या हितासाठी विरोधकांना सक्ती करण्यावर विश्वास असतो. तसे त्यांचे प्रयत्नही असतात. अशा उदात्त ध्येयासाठी ते पूर्ण आयुष्य खर्चायलाही तयार असतात. सगळ्यांना ‘ सत्य ‘ पटले की इथे स्वर्ग अवतरेल, असे त्यांना वाटते. तशी त्यांची खात्रीच असते. ते सोडून इतर लोक मूर्ख असणे एवढाच खरे तर प्रॉब्लेम असतो ! व्यक्तिव्यक्तीतल्या संबंधातही, एखादी व्यक्ती आवडली की तिच्यावर स्वामित्व असायची गरज वाटणे, त्यातून भीती, मत्सर, द्वेष, हिंसा यांची निर्मिती होणे हे या सर्वच आदर्श, महान, उदात्त लोकांमध्ये सारखेच आणि समानच घडत असते. माणूस मोदीभक्त असो की मोदीद्वेष्टा हे सगळे दोघांचेही एकसारखेच असते.
अगदी फारच इहवादी आणि बुद्धिवादी असतील त्यांना फार तर याबद्दल प्रश्न पडत नाहीत असे समजू. जे आहे ते माणसाचे हे गटारी जगणे आहे आणि ते तसेच असणार, हे मान्य करण्याची हिंमत त्यांच्यामध्ये असते कारण त्यांनी स्वत:ला तसे शूरवीर घडवलेलेच असते. पण, खूप लोक असे नसतात. त्यांना प्रश्न पडतात. हे कसले जगणे, असे त्यांना वाटते. यातून सुटण्याची शक्यता असेल का, असे विचार येतात. त्यातूनच मग, बुद्ध, तुकाराम, जे. कृष्णमूर्ती घडतात. तेही या जगाबाहेरून कुठून आलेले नसतात. आणि या जगाबाहेरचे, काल्पनिक, भ्रमाचेही बोलत नसतात. माणसाचे जगणे असे का होते आणि त्यातून तो बाहेर कसा पडू शकतो, हे ते सांगतात. ते नुसतेच काही बौद्धिक वा मेंदूला वळण लावणारे वगैरे काही नसते. त्या अर्थाने आपल्या जगण्यातल्या सवयीतले नसते. त्याला आपण अध्यात्म म्हणू शकतो. स्वत:च्याच वैचारिक-भावनिक- मानसिक तुरुंगातून बाहेर पडण्याच्या शक्यतेबद्दल ते बोलत असतात – तेच अध्यात्म.
हेच काम सर्जक कलाही करत असते. अनेक महत्त्वाचे कलावंत म्हणून गेलेले आहेत की कला ही आत्मकेंद्रित कृती नसते. ती व्यापक, समावेशक भानाची प्रक्रिया असते. वैचारिक, परिवर्तनवादी वा हेतूप्रेरित कला, अर्थातच, हे काम नाही करू शकत. कारण ती कलावंताच्या तुरुंगातूनच घडणारी कृती असते. तीत स्वातंत्र्य नसते. माणसाला अशा व्यापक भानाची समज येणे हीच फक्त त्याच्या जगण्यातली मूल्यात्मकता असू शकते. तेच त्याचे स्वातंत्र्य असते. स्वातंत्र्ययुक्त कला अध्यात्मिक असते आणि तीही परलोकवादी नसून इहवादीच असते, हे समजून घ्यायला हवे.
--- ००० ---

## समाज म्हणजे काय रे भाऊ ?

“ अरे, परवाच तुझी आई वारली ना मूर्खा, आणि लगेच आज कामावर येतोस ? ! चल, जा घरी – दिवसबिवस झाल्यावर ये – “ असे म्हणत बँकेच्या एका छोट्या शाखेच्या शाखाप्रबंधकाने कामावर आलेल्या त्याच्या शिपायाला सुनावले. याचीच एक सर्वांच्या आयुष्यात सतत ठाण मांडून बसलेली एक आवृत्ती म्हणजे ‘ लोक काय म्हणतील ‘ हे दडपण. यातले लोक म्हणजेच समाज. व्यक्ती जशी एकेक जिवंत अस्तित्वात असते तसा समाज हा एखादा मोठा गेंडा वा हत्ती या रूपात अस्तित्वात नसतो. समाज म्हणजे व्यक्तीव्यक्तींतले संबंध. हे व्यक्तींनी आपापल्या कल्पनांनी घडवलेले असतात. माणसाला सतत सुरक्षितता हवी असते, त्यामुळे तो अमुक अमुक कल्पना मानणाऱ्या व्यक्ती असा एक समूह म्हणून एकत्र असू इच्छितो. यातूनच एक सामाजिकता तयार होते. नीती-अनीती, एकनिष्ठ-व्यभिचारी, निस्पृह-भ्रष्टाचारी, न्यायी-अन्यायी, दुष्ट-सुष्ट, प्रतिगामी-पुरोगामी, वगैरे यातूनच जगण्या-वागण्याचे एक मॉडेल तयार होते. हे एवढेच नसते. आपले मॉडेल टिकवणे, सत्य म्हणून त्याला बढावा देणे, इतर मॉडेल्सबरोबर त्यासाठी पंगा घेणे, संघर्षांत राहणे, हेही त्यात अध्याहृत असते. शिवाय, वर्चस्ववादी असणे, आपमतलबी असणे, महत्त्वाकांक्षी असणे, यशपूजक असणे, स्पर्धा करणे, विरोधकांना नामोहरम करणे, अशा अपेक्षांचे जंजाळही समाज या पॅकेजमध्ये असते. स्थितिशील असण्यात माणसाला सुरक्षित वाटते. समाज हा थोडा थोडा बदलत असला तरी प्रामुख्याने तो

घट्ट स्थितिशीलच असतो. व्यक्तीही स्थितिशील असण्याच्या प्रयत्नातच असते. पण व्यक्तीची स्थितिशीलता आणि समाजाची स्थितिशीलता यांत फरक असतो. त्यामुळे, व्यक्ती आणि समाज यांत सतत एक संघर्ष सुरू असतो. शिवाय समाजा-समाजांत संघर्ष असतातच. मानलेले आदर्श आणि प्रत्यक्ष जगणे यांतल्या अंतरांमुळेही जगणे सतत संघर्षात असते. संघर्षात असणे म्हणजे परिपूर्ण, समाधानकारक नसणे, अपूर्णतेच्या असमाधानात, त्रासात वा क्रोधात असणे. अशा या जडजंबाली जगण्यात सर्वच व्यक्ती तोल हरवून बसलेल्या असतात वा विकृतही होतात. समाज म्हणजे अशा सर्किट व्यक्तींचा समूह असतो. समाज आणि व्यक्ती अथवा व्यक्ती आणि व्यक्ती यांतल्या सततच्या अटळ संघर्षामुळे कुणीच कुणाला सुखाने, सहज जगू देत नाही. व्यक्तीला सुरक्षितता हवीही असते पण सततच्या संघर्षमयतेतून सुटकाही हवी असते – हा आणखी एक संघर्ष जगण्याचा एक स्थायीभाव होऊन बसलेला असतो. द्वेष करू नये, असे तत्त्व व्यक्ती बोलते पण त्या तत्त्वाचे ती भाग पाडते – धर्मद्वेष वाईट पण जातिद्वेष चांगला किंवा उलट अशी उपतत्त्वे तयार होतात. आपले वैचारिक आदर्श ठरलेले हवेत, असे म्हणतानाच आपल्या विरोधी आदर्शांना हरवण्यासाठी वेगळ्या आदर्शांशी तडजोडी केल्या जातात. त्यांचेही वेगळे ताण निर्माण होतात.

मुळात प्रत्येक व्यक्तीचा जगण्याचा एक साचा तयार झालेला असतो. तिची जनुकरचना, कुटुंब, भाषा, संबंधात येत गेलेली माणसे, सुखदु:खांच्या, मानापमानांच्या स्मृती अशा असंख्य परिणामांनी युक्त ते साचे असतात. कोणतेही दोन साचे एकसारखे नसतात. त्यामुळे व्याक्तीव्यक्तींमध्येही संघर्ष असतात. आणि शिवाय व्यक्ति-समाज हे संघर्ष चालू असतातच. तर एकूण या अशा सर्व आदर्श प्रकारांनी माणसाच्या जगण्याचा गचाघोळ किंवा चोंबाळे किंवा जांगडगुत्ता किंवा मांजरसुंबा झालेला असतो ! आणि तो सुखावाह नसतो ! यातून सुटका व्हावी यासाठीही माणसाचे प्रयत्न चालू असतात. धर्म, तत्त्वज्ञान, विचारसरणी, विज्ञान  अशा मार्गांनी ते प्रयत्न घडत असतात. आणि असेही कळत असते की हे सर्व मार्ग अपयशी होताहेत. या प्रकारात माणूस हा व्यापक, समावेशक, प्रवाही भानापासून दुरावत जातो, संकुचित होत जातो आणि अर्थातच दु:खी होत जातो.

इथे कलेचा संबंध येतो. आता हे एकच माध्यम असे शिल्लक आहे की ज्यातून माणसासाठी व्यापक, समावेशक, प्रवाही भानाची शक्यता आहे. स्वत:च्या साच्यातून मुक्त होऊन लिहिणारे काही कलावंत असतात. तुकाराम म्हणतो, ' परी त्या विश्वंभरे बोलविले ', गाओ याला distanced gaze  ( दूरीभावातून पाहणे ) म्हणतो, वर्डस्वर्थ याला recollected in tranquillity ( शांततेत स्मरलेले ) म्हणतो,  टी . एस. एलियट याला escape from personality ( व्यक्तित्वमुक्ती ) म्हणतो – अशा प्रकारे जगातल्या अनेक कलावंतांनी या सर्जक प्रक्रियेची मूल्यात्मकता व्यक्त केलेली आहे. माणसाचे सवयीतले व्यक्ति-समाज टाइप जगणे हे माणसामाणसात कधीच सौहार्द निर्माण करणे शक्य नाही, हे लक्षात घेतले तर अशा कलेतल्या सर्जकतेचे महत्त्व लक्षात येईल. आता तर्काने पाहिले तर या सर्जक प्रक्रिया सर्वच माणसांना ' विरोधी ' वाटू शकतात. पण, खूप माणसे कलेतल्या या स्वातंत्र्याच्या, सौहार्दाच्या शोधात असल्याने त्यांना हे क्षेत्र मौल्यवान वाटत असते. समूह म्हणून पाहिले तर धर्म, जात, भाषा यांच्या अस्मितांचे जे समूह असतात ते त्यांच्या भावना दुखावणारे काही घडले तरच अशा कलाप्रक्रियांच्या विरोधात फणे काढतात. एरवी त्यांना त्यात काही रस नसतो, समजतही नाही आणि ' चालू दे ' असे ते अलिप्त राहतात. प्रश्न येतो तो ' पुरोगामी ' म्हटले जातात त्यांचा. कला हे माध्यम म्हणजे त्यांच्या सामाजिक-राजकीय उद्दिष्टांचे हत्यार म्हणूनच वापरले गेले पाहिजे, असा त्यांचा हट्टाग्रह असतो. ते माध्यम तसे न वापरणारे सगळे त्यांना असंवेदनशील आणि भरल्या पोटी करमणूक करणारे वाटतात. त्यामुळे, कलेतल्या  सर्जक प्रक्रियांत त्यांना इंटरेस्ट नसते, परिणामत: त्यातले काही समजतही नाही आणि त्यांच्या मूळ उद्दिष्टाशीच त्यांना त्या विरोधीही वाटतात.  म्हणजे मुळात विरोध आणि समजत नसल्याने येणारा न्यूनगंड अशा दोन कारणांनी ते लोक कलेतल्या सर्जक प्रक्रिया नष्टच करायच्या प्रयत्नात असतात. आपल्याकडे पाहिले तर अध्यक्ष कोण असावे, परिसंवाद कोणते घ्यावेत, पुरस्कार कसे दिले जावेत, परीक्षणे कशी यावीत – अशा बाबींवर सध्या अशा लोकांचा ताबा असल्याचे दिसते.  साहित्य संमेलन ही मुळातच एक उत्सवी आणि उथळ गोष्ट राहात आलेली आहे. पण हीही त्यांना त्यांच्या उद्दिष्टांसाठी वापरायची असते. संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात कलेतल्या सर्जक प्रक्रियांना जागाच मिळू नये, असे त्यांचे प्रयत्न असतात. त्यासाठी

ते सामान्यत: पुरोगामी अध्यक्षच निवडतात, म्हणजे ते फक्त राजकीय भाषण ठोकून कलेतल्या सर्जकतेला बाहेर ढकलून देऊ शकतात. पण, लाजेकाजेस्तव का असे ना, मध्येच एखादा बिनपुरोगामी किंवा बिनराजकीय असा अध्यक्ष त्यांना निवडावा लागतो. त्यातही एक अध्याहृत व्यूहरचना असते. आताचेच बघा. नारळीकर हे नाव सामान्यत: सर्वमान्य आहे कारण विज्ञान क्षेत्रातल्या त्यांच्या जागतिक कामामुळे ते आदरणीय आहेत. पण, ते कलेतल्या सर्जक प्रक्रियांकडे कितपत लक्ष देत असतील, त्यांबद्दल कितपत बोलू शकतील, असा विचार करून बघा. कलेतल्या सर्जक प्रक्रिया हद्दपार होणे हे असेही घडणार आहे. आणि असे जर असेल तर, नारळीकरांबाबत सामान्यत: लोकांत असणाऱ्या आदराचा हा एक राजकीय वापर करण्याचा धूर्त डाव म्हणता येतो. असला तर असू दे, असेच मीही पाहिले असते, पण माझ्याच काही मित्रांनी कुतूहल म्हणून काही प्रश्न विचारल्याने जरा सविस्तर लिहिले आहे.

व्यक्तीव्यक्तींमधले संबंध निकोप आणि सौहार्दपूर्ण होण्यासाठी व्यापक प्रवाही भानाची आवश्यकता असते. आपले सगळ्यांचे जगणे तसे असावे असे वाटणारे माझ्यासारखे आणखीही काही असतीलच. त्यांच्या मूल्यात्मकतेला वाव देणारे कुणीतरी लिहायला हवे, म्हणून मी लिहितो, इतकेच. बाकी मला योग्य वाटते ते काम मी कलाक्षेत्रात करत असतोच. तिकडे कुणी लक्ष देवो वा ते कचऱ्यात टाको, त्याची मी काळजी करत नाही. आता हे सगळेच काहींना त्यांच्या विरोधातले आहे असे वाटून राग येऊ शकतो. पण, सगळ्यांचेच विचार अर्धवटच असतात, अंतिम सत्य कुणाकडेच नसते, हे समजणारे आपण सर्वजण असल्याने, ‘ सहिष्णुता ‘ हा एक समान धागा आपल्यांत आहे. त्याचा लाभ मलाही मिळावा, हीच नम्र विनंती !

--- ००० ---

एकांकिका लिहिणे मुळीच डोक्यात नव्हते -- ' रंगवाचा ' च्या वामन पंडितांच्या पाठपुराव्यामुळे लिहिली गेली -- ' खुल्लम खुल्ला ' !

--- ००० ---

पायऱ्यांचा गेम ( कवितासंग्रह )

--- प्रणव सखदेव --- अमलताश प्रकाशन.

प्रणवच्या या कवितासंग्रहातल्या ‘ खोली ‘, ‘ सूर्याचा घोडा ‘, ‘ कोरी जागा ‘, ‘ सर्व्हायवल ‘, ‘ मी कोण ‘, ‘ एकरूप लँडस्केप ‘ अशा काही कविता मला विशेष आवडल्या. कोणत्याच कवीच्या सर्वच कविता सारख्याच उंची-खोलीच्या नसतात. पण, मी इथे एक वेगळीच खास बाब निदर्शनाला आणू इच्छितो. एकच अनुभव वेगवेगळ्या स्थळकाळभाषेत कसा व्यक्त होतो ते पहा – आधी ‘ कोरी जागा ‘ ही प्रणवची कविता बघा –

कोरी जागा

आज मी असतो असा
तसा काल नसतो कधी
उद्याही नसतो असणार
खरंतर,
काल म्हणजे गेलेला, संपलेला.
‘ काल ‘ असं काही नसतं
त्यामुळे ‘ कालचा मी ‘ पण गेलेला, संपलेला.
‘ उद्या ‘ म्हणजे मनाचा खेळ, मनाचा कल्पनाविलास.

‘ उद्या ‘ नसतो.
त्यामुळे ‘ उद्याचा मी ‘ पण मनाचा खेळ, मनाचा कल्पनाविलास.
‘ उद्याचा मी ‘ पण नसतो.
स्मरणाचा आणि कल्पनेचा
वापर करून तुलना केली
तर कालचा मी
उद्याचा असणारा मी
आजचा मी
एकसारखे नसतात
म्हणजे ‘ मी ‘
असा कोणीच नसतो
म्हणजे
‘ मी ‘ ची जागा कोरीच सोडायला हवी.
--- आणि या कवितेबरोबर निकॅनोर पाराची ही कविता वाचा --
The Last Toast
by Nicanor Parra
Whether we like it or not,
We have only three choices:
Yesterday, today and tomorrow.
And not even three
Because as the philosopher says
Yesterday is yesterday
It belongs to us only in memory:
From the rose already plucked
No more petals can be drawn.
The cards to play
Are only two:
The present and the future.
And there aren't even two
Because it's a known fact
The present doesn't exist
Except as it edges past
And is consumed...,
like youth.
In the end
We are only left with tomorrow.
I raise my glass
To the day that never arrives.
But that is all

we have at our disposal.
--- एकाच प्रकारचा आशय दोन कवींना कसा वेगवेगळा दिसतो ते आहे ना खास इंटरेस्टिंग ?
--- ००० ---

96 मेट्रोमॉल ( कादंबरी )
--- प्रणव सखदेव -- रोहन प्रकाशन.

विष्णुमय जग म्हणतात तसे आता वस्तुमय जग झालेले आहे. माणूस आणि वस्तू यांचे अतूट संबंध हा विषय. पण इथे वस्तू या वस्तूरूप नुसत्या न राहता सजीव अस्तित्वे होतात. आणि अशा कल्पनेने निर्मिलेल्या जगात माणूस आणि वस्तू यांतही रागलोभ, सुखदु:ख, भीतीधाडस यांची घटनामालिका आकार घेत जाते. अशा प्रकारची ही काल्पनिका मराठीत तरी पहिलीच असावी. वस्तू , साधने, उपकरणे, यंत्रे यांचे हे भरगच्च जग आहे. मला एक कबूलच करावे लागेल की यांतल्या बऱ्याच वस्तू आणि तांत्रिक बाबी या माझ्या आकलन-कक्षेतल्या नाहीत. त्यामुळे, लेखकाबद्दल आदर वाढला तरी मला तो एक अडथळाच ठरला. तरीही रेटून मी वाचलीच ही कादंबरी. माणसाने वस्तूंच्या इतके अधीन व्हावे की जणू जिवंत व्यक्तींप्रमाणे त्या वस्तूंनी माणसाच्या जगण्याचा कब्जा घ्यावा, हे आजच्या जगण्याचे भयानक सत्य ही कादंबरी मांडते. तेही कोणताही सनसनाटीपणा न करता – जणू काही एखादी साधीशी गोष्ट सांगणेच चाललेले आहे !
तरीही, मला येत असलेल्या उपरोल्लेखित अडथळ्यामुळे माझ्या मनाने एक वेगळाच मार्ग काढला. की बाबा, ठीक आहे ना, पहिल्या ४०-५० पानांत कळले की काय चाललेय ते – हेच आणखी ८०-९० पाने कशाला ? घटना असतील वेगळ्या, पण हेच ना ! समजले ना ! आणि असे म्हणतच पुढची पाने मी रिचवत गेलो.
माझ्या मर्यादा लक्षात घेऊनही मला असे वाटले की पुढे पुढे हा प्रकार कल्पनेच्या नावीन्यातच अडकत गेला. त्यामुळे, यातल्या बऱ्याच सखोल शक्यता आवाक्यात यायच्या राहून गेल्या. सारांश, खूप लांबवर जाऊ शकेल असे वाटलेली झेप जरा अलीकडेच पडली, असे वाटले. पण अशी झेप घेण्याचा जबरदस्त प्रयत्न म्हणून मराठीत हे एक अपवादात्मक काम ठरेल, हे नक्की.
हा अभिप्राय मी माझ्या आकलनाच्या स्पष्टतेतून खरेच देतोय का, ही शंका आहेच मनात !
--- ००० ---

मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ( कथासंग्रह )
--- सतीश तांबे – रोहन प्रकाशन.

‘ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥ '
--- तुकाराम.
“Life is not a problem to be solved, but a reality to be experienced.”
— Soren Kierkegaard

वरील दोन्ही भाषिते एकत्र केल्यावर जे समजते ती आहे या सर्व कथांमागची मर्मदृष्टी. या कथांमध्येही पात्रे आहेत, त्यांची सुखदु:खे आहेत, त्यांच्याही आयुष्यांत ताणतणाव, गुंताडे आहेत, संघर्ष आहेत, हिंसाही आहे, पण तरीही, लेखक याचा कोणताही प्रभाव न घेता लिहितो आहे, हे जाणवत राहते. त्यामुळे, या कथा ना कोणत्या सुखदु:खांचा प्रत्यय देणाऱ्या आहेत ना कोणता मूड तयार करणाऱ्या. जगण्याच्या एकूण जंजाळातून हा लेखक सहज विहरत

असल्याचे वाचकाला जाणवत राहते. या अर्थाने ही लेखकाची एक सहज पण गंभीर क्रीडा ठरते. यांतल्या पात्रांनाही अनेक समस्या आहेत, त्यांची निराकरणे देणे वा त्यांचा न्यायनिवाडा करणे हा इथे हेतूच नाहीय. कारण अर्थातच सर्व काही इतके जटिल आणि इतक्या प्रभावांनी युक्त आहे की त्याची सोडवणूक वा निष्कर्ष अशक्यच ठरावेत. एका सखोल परिपक्वतेने जगण्याकडे पाहणारी ही दृष्टी आहे. ही क्रीडा म्हणजे, ' शतदा प्रेम करावे ', ' प्रेम कर भिल्लासारखं ' किंवा ' फक्त लढ म्हणा ' अशी बावळट-उथळ नाही. जगण्यात एखादा सल्ला अंमलात आणणारी ही क्रीडा नाही. हा, कीर्केगार्ड म्हणतो तसा जगण्याचा समग्रतेने घेतला जाणारा अनुभव आहे. मानवी जगण्याचा व्यापक आवाका घेत जाणारी ही मर्मदृष्टी आहे. या कथांची निवेदनशैलीही या दृष्टीतून येणारीच आहे. घटनांचे सर्व तपशील आणि त्यांतले सर्व प्रभाव यांची दखल घेत हे निवेदन जाते. त्यामुळे ते सविस्तर आणि काही वेळी पाल्हाळीकही वाटू शकते. पण, विशेष म्हणजे यातले प्रत्येक वाक्य निवेदनात अर्थपूर्ण भर टाकत जाणारे आहे. कुठेही कंटाळा तर येत नाहीच पण हे संपूच नये असे वाटत राहते. या नुसत्या घटनांच्या कथा नाहीत. घटना घडण्याच्या प्रक्रियांचा बारकाईने धांडोळा घेत जाणाऱ्या अशा या कथा आहेत. या वैशिष्ट्यांमुळे या कथा मराठीत अद्वितीय म्हणाव्यात अशा आहेत. कलेतल्या अत्युच्च दर्जाच्या मूल्यदृष्टीचा हा एक विलोभनीय पट आहे. आता थोडक्यात एकेका कथेकडे पाहू –

यत्र – तत्र – सावत्र : -- मनात बाळगावे लागणारे, स्वत: सावत्र असल्याचे जन्मरहस्य , " ही देवाने दिलेली जमीन पैसे देऊन आपल्या नावावर करणं हा व्यवहार मुळातच काळा आहे – " हे सवयीच्या व्यवहारापालिकडचे सत्य, आणि " या पृथ्वीवर अढळ अशी जागाच नसावी बहुधा, प्रत्येक कणाकणावर वाकडी नजर आहेच कुणाची ना कुणाची ! " -- इथपर्यंत विचार येऊन पोचणे – हे आहे या कथेत. या संग्रहातल्या पाचही कथांमध्ये काही ना काही अपवादात्मक आणि नाट्यमयही अशा गोष्टी आहेत.

नाकबळी : ' नाकीडोळी नीटस असणे ' हा वाक्प्रचार एका अजब माहोलात नेणारी ही एक गंमतीशीर कथा आहे. नीतीअनीतीचे रूढ साचे ओलांडून ' समावेशक ' समाधान निर्माण करणारी !

मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट : ही या संग्रहातली जरा दीर्घ आणि कलाक्षेत्रातली एक महत्त्वाची समस्या हाताळणारी अशी एक कथा आहे. एक ज्येष्ठ ब्राह्मण लेखक आणि एक नवखा दलित लेखक यांची ही कथा आहे. दोघांनाही जगण्यातल्या पांढरपेशेपणामुळे एकाच सांस्कृतिक फटीत आश्रय घ्यावा लागणे, असा हा विषय आहे. अनुभव या साहित्यातल्या कच्च्या मालालाच मूल्यात्मक महत्त्व येणे, यातून निर्माण झालेली ही समस्या आहे. या कथेतल्या दोन्ही लेखकांना, तांब्यांना सापडलेली मूल्यात्मकतेची वाट सापडलेली नसावी, हेही एक कारण असू शकते.

संशयकल्लोळात राशोमान : या कथेच्या नायकालाच म्हणू, येणाऱ्या धमक्यांच्या फोन्सवरून हे सगळे सुरू होते. ते फोन्स कोण करत होते हा मुद्दा शेवटी गळूनच पडतो, पण, या कारणाने झालेला विचार-कल्पनांचा गच्चाघोळ आणि निरनिराळ्या संबंधांतले ताणेबाणे यांचे एक अजब विश्व आपल्या समोर उभे राहते. सत्यबित्य असे काही असते का, याचा हा एक शोध म्हणता येईल. यात शेवटी एक वाक्य आहे की " एकदा का एखादं शीर्षक घट्ट पाळामुळांसकट डोक्यात उमलल‌ं की, पुढची वाटचाल ही बहुतेक वेळा मला एखाद्या सोपस्कारासारखी वाटते. " हे तांब्यांच्या बाबतीतही खरे असावे. त्यांच्या कथांची अजब शीर्षके हा एक खास अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

रावण आडनावाच्या पांडवपुत्राच्या नावाची जन्मकथा : हे तर एक प्रचंडच धक्कादायक नाव ! हे सर्व अशक्यप्राय कथानक आपल्या सहज पचनी पडावे हे कथाकार म्हणून तांब्यांचे एक अगाध कसब आहे ! तांब्यांच्या बहुतेक सर्वच कथा ' रचलेल्या ' असतात, असे म्हणता येईल. ही कल्पना आहे की वास्तव या चिकित्सेत पडायची इच्छाच होऊ नये इतके हे सगळे सफाईदारपणे घडते.

या सगळ्यातून जे पोचते ते आपल्याला सवयीच्या जगण्यातून बाहेर काढणारे असते, हे नक्की !

--- ००० ---

डोक्याचे ओझे

गेले काही दिवस डावी मान, डावा खांदा आणि डावा दंड जोरदार दुखत होता. डाव्या लोकांचे शाप बहुतेक बाधले असावेत. मानेतले मणके थोडे झिजले आहेत असे समजले. त्यामुळे हा त्रास झालेला आहे. डोक्याचे ओझे सध्या मानेवर येऊ द्यायचे नाहीय. झोपून राहायचे आहे. शिवाय रोज एकदा वीज-करंट उपचार घ्यायचा आहे आठवडाभर. मग काही व्यायाम प्रकार वगैरे. कालपासून दुखणे बंद होऊन झोपबीप नीट सुरू झाली आहे. ते ठीक. ही पोस्ट मुख्यत: माझे वाचणाऱ्या भाग्यवान फ्रेंडससाठी देत आहे. कारण ७४ व्या वर्षी मी ही तक्रार घेऊन गेलो म्हणजे खूप मजेत जगल्यानंतर गेलो, असे समजले. याच कारणासाठी तिशी-चाळीशीतले पेशंटही तिथे येत आहेत.
पीसीवर बसताना आदर्श पोझिशन कशी असावी ते नेटवर दिलेलेच आहे. ते शोधून सर्वांनी वाचावे आणि अंमलात आणावे. मी सांगणार आहे ते जरा वेगळे आहे. मला वरून पाणी पिण्याची सवय होती, त्यामुळे मान अनेकदा मागे जात होती, ते मी बंद केले आहे. भांडे तोंडाला लावूनच पाणी पिणे इष्ट. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, परस्त्रीकडे डोळे वर उचलून पाहिल्यास जसा मानखंडना होण्याचा धोका असतो तसाच स्वपीसीकडे पाहिल्यासही असतो. खुर्ची खाली आणि स्क्रीन वर असे झाल्यास मानेचा व डोक्याचा, मागे, मानेच्या मणक्यांवर दाब येत राहतो. त्यामुळे कालांतराने हा त्रास उद्भवू शकतो. तसे होऊ नये याची काळजी घेणे सहज शक्य आहे. म्हणून, त्यासाठी ही पोस्ट. बाकी मी आता उत्तम आहे, आठ दिवस विश्रांती घेऊन बरा होईनच. माझी काळजी मी घेतोच आहे, तुम्हीही तुमची काळजी घ्यावी म्हणून ही पोस्ट दिली आहे. ‘ आपल्या डोक्याचेच आपल्याला ओझे होऊ लागले तर मग आपले राहिलेच काय ’ असा विचार मनात आला. असो.
बाकी, डाव्यांसह सर्वांना शुभेच्छा !
--- ००० --- २० फेब्रु २१ .

' चांगली कविता म्हणजे काय ' या विषयावरचे डॉ. सुधीर रसाळ सरांचे हे भाषण नक्कीच विचारांना आणि चर्चेला चालना देऊ शकेल -- हे ऐकून जरूर आपापली मते, आकलन यांना इथे अभिव्यक्ती द्यावी -- हा एक उपयुक्त, अर्थपूर्ण उपक्रम होऊ शकेल, असे वाटते -- लिंक खाली देत आहे –
--- ००० ---

नियमांचे गाढव घोडेस्वार
नऊवीत मी पार्ले टिळक सारख्या शाळेत सर्व तुकड्यांत पहिला आलो होतो. म्हणजेच बऱ्यापैकी हुशार होतो. दरम्यान माझे वडील मुख्याध्यापक म्हणून मालाडच्या एका शाळेत रुजू झाले. स्वत:च्या मुलाला पार्ले टिळक मध्ये ठेवून माझ्या या शाळेबद्दल मी लोकांना विश्वास कसा देणार, या विचाराने वडिलांनी मला पार्ले टिळक मधून काढून त्या मालाडच्या शाळेत घातले. त्या भागात एक हुशार विद्यार्थी म्हणून मी प्रसिद्ध होतो. एस एस सी ला तर मी मेरिट यादीत येणार अशीच अनेकांची कल्पना होती.
एस एस सी चा पहिला पेपर मराठीचा होता. त्या हॉलमधले पर्यवेक्षक प्रत्येकाचे हॉलतिकीट तपासू लागले तर पहिल्याच रांगेत मी होतो आणि मी माझे हॉलतिकीट विसरून आलो होतो ! पर्यवेक्षक म्हणाले, “ ऊठ ऊठ, लगेच बाहेर जा – “ आमच्या शाळेतल्या सर्व विद्यार्थ्यांचे हात थांबले ! आमच्या शाळेतली इतर मुले इथे आहेत, त्यांना विचारा, पुढल्या पेपरला मी आणतो हॉलतिकीट वगैरे सांगूनही ते सज्जन पर्यवेक्षक ऐकेनात. मग माझ्या लक्षात आले, मुलांचा पेपर नीट सुरू होईपर्यंत आमचे मुख्याध्यापक म्हणजे माझे वडीलच बाहेर थांबणार होते. मी त्या पर्यवेक्षकांना ते सांगितले. त्याचा उपयोग झाला. एकूण शहानिशा करून मला तो पेपर लिहू देण्यात आला !

चूक माझीच होती, हे मान्यच आहे पण नियम म्हणजे काही वॉशिंग्टनची कुऱ्हाड नव्हे. एखाद्या महत्त्वाच्या परीक्षेत, संधी मिळताच, एखाद्या विद्यार्थ्याची वाट कशी लावता येईल, अशा विचाराने ते नियम वापरू नयेत. डोके जागेवर ठेवणे, थोडे तारतम्य बाळगणे, सहानुभूतीने पाहणे – हेही गरजेचे असते.
हे आज आठवायचे कारण म्हणजे अशीच पण एक वेगळी अमानुष घटना कानावर आली. त्या तपशीलांत जायचे नाहीय. आता परीक्षांचा काळ सुरू होतोय. पर्यवेक्षकांनी नियमांचे गाढव घोडेस्वार होण्यापेक्षा जरा समंजस राहायचा प्रयत्न करावा, असे इथे सुचवायचे आहे.
--- 000 ---
कलाक्षेत्रात नवे काही परदेशात जन्मावे, आपण ते आत्मसात करावे, याबरोबरच, इथेही राहू द्या ना नव्याला वाव –
--- ००० ---

माणसाने सतत राजकीय भूमिका घेतच जगले पाहिजे असे म्हणणाऱ्याने युद्धविरोध, शांतता वा मानवतावाद यांवर बोलणे म्हणजे काळा विनोदच ! ( आठवणीतली जुनी पोस्ट ).
--- ००० ---

संशोधनासाठी कल्पना
आपल्याला अनेकदा, हे असे हवे, ते तसे हवे किंवा हे असे करता यायला हवे, वगैरे कल्पना सुचतात. आपण काही त्या त्या क्षेत्रातले संशोधक शास्त्रज्ञ नसल्यामुळे आपण तिकडे लक्ष देत नाही आणि ते विसरून जातो. या सर्व कल्पना जर सांगितल्या गेल्या तर त्यांतल्या काही तरी नक्कीच माणसाचे जगणे बदलणाऱ्या ठरू शकतील. हे लक्षात आल्यापासून मी माझ्या अशा काही कल्पना संबंधित शास्त्रज्ञांच्या डोक्यांत सोडत असतो. कालच अशी एक कल्पना मी एका मेंदू शास्त्रज्ञाच्या मेंदूत सोडलेली आहे, ती अशी –
मला असे दिसून आले आहे की जगण्यासाठी माणूस जे काम करतो त्याचा त्याच्या स्वभावावर परिणाम होतो. म्हणजे उदाहरणार्थ, शेअरबाजारात काम करणारा माणूस, सैनिक, शिक्षक, कारकून, दुकानदार, वगैरे. पण, होते काय की मध्येच मला एखाद्या राजकीय पुढाऱ्याच्या स्वभावाने जगावे, असे वाटू शकते. जगण्यातला तोच तोचपणा जाऊन त्याला विविधता यावी, असे वाटणे सहज शक्य आहे. तर त्याला म्हटले की असे संशोधन कर की वेगवेगळ्या कामांचे मेंदूवर कसे कसे परिणाम होतात – थोडक्यात, त्यात रासायनिक बदल कोणते होतात, ते शोधून काढ. मग हवी ती रसायने मेंदूत सोडून शिक्षकाला डॉन करणे वा दुकानदाराला सर्कशीतला विदूषक करणे शक्य होईल. अर्थात त्या त्या इंजेक्षनाचा प्रभाव असेपर्यंतच हे घडणार. पण यामुळे, शास्त्रज्ञ-दुकानदार, कारखानदार-भेळवाला, मटकेवाला-पुजारी – अशी मानवी जगण्यात विविधता येऊ शकेल !
त्या शास्त्रज्ञाला ही कल्पना खूप आवडलेली असून यात पैसाही खूप मिळू शकतो, असे त्याला वाटते ! म्हणजे आज ना उद्या होणारच हे संशोधन आणि अंमलात येणारच हे ! तुम्हीही विचार करून ठेवा, तुम्हाला कोणते इंजेक्षन घ्यायला आवडेल त्याचा. आयुष्य एकच आहे, त्यातच वेगवेगळे जगून घेता येईल !
--- ००० ---

माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' आता कानडीत – ०१-०३-२१
( ०४-०३-२१ च्या प्रयोगाची जाहिरात ).
--- ००० ---

' आरोग्य ' या विषयाचा समावेश असलेले जे. कृष्णमूर्तींचे हे एक विशेष भाषण --
J. Krishnamurti - Saanen 1984 - Public Talk 2 - The relationship of health to freedom

youtube.com

--- ००० ---

हे सगळे तयार करायचा व्याप पैसे घालून कुणीतरी केला

निसर्गाने ऊन पाडले

कुणीतरी मोबाइल कॅमेरा तयार केला होता

मी हे दृश्य आयतेच चोरले !

मन्या ओक

सतीश तांब्यांचे ' लेखाजोखा ' वाचतोय. त्यात मन्या ओक या भन्नाट कवी-लेखकावर एक अत्युत्तम लेख आहे. मन्याची आणि माझी भेट झाली तेव्हा मी कॉलेज-विद्यार्थी होतो. तांब्यांनी वर्णन केलेल्या त्याच्या सवयीप्रमाणे, माझ्याकडे पैसे मागायचा प्रश्नच नव्हता. मन्या ओक आणि षांताराम पवार दोघेही मालाडला आम्ही राहात असलेल्या भाड्याच्या घरात आले होते. नेमके कोणते अनियतकालिक ते आठवत नाही पण त्यासाठी त्यांना माझ्या कविता हव्या होत्या. मी भोळेपणाने म्हणून गेलो की " देतो की -- नाहीतरी कोण छापणार आहे त्या ! " मन्या म्हणाला, " मग नको -- तुझ्या कविता चांगल्या आहेत आणि या अनियातकालिकात त्या याव्यात असं तुला वाटतं, म्हणून दे -- " ते दोघेही बराच वेळ माझे कवितावाचन ऐकत बसले होते. काही वेळाने मी विचारले, " कशा वाटताहेत ? " उत्तर षांतारामने दिले -- " मला सिगरेटची तलफ आली की मी एक मिनिटही नाही थांबू शकत -- तलफ येऊन अर्धा तास होऊन गेला ! " मग आम्ही जाऊन त्यांचा सिगरेट हा विषय संपवून आलो. आल्यावर, माझ्यावर त्या दोघांनी तोच भविष्य सांगण्याचा प्रयोग केला, ज्याचे वर्णन तांब्यांच्या लेखात छानच आलेले आहे. चौकोन, त्रिकोण, गोल आणि एक नागमोडी रेषा -- या चिन्हांतले एक निवडायचे, ते तीनदा आणि उरलेली चिन्हे एकेकदा याप्रमाणे मन्याने काढून दिलेल्या चौकोनात काढायचे. हवे तसे काढा, कसेही बसवा. मी ते केले. ते काय बोलले ते आता आठवत नाही. पण, पुढे, हा एक मनवाचनाचा प्रकार आहे असे समजून मी स्वत:च जरा खोलवर त्याचा विचार केला. आणि नंतर अनेकांवर त्याचे यशस्वी प्रयोगही केले. एकदा तर आमचे बँकेतले सहकारी आणि दोनतीन ग्राहक यांनी हे सर्व असे करून नावे न टाकता माझ्याकडे १०-१२ कागद दिले ! प्रत्येक कागदाच्या मागे मी माझे रीडिंग लिहून आणले ! तोही प्रयोग प्रचंड यशस्वी झाला ! मन्याप्रमाणे नावानिशी मला काही सांगता येत नव्हते पण मनवाचन परफेक्ट होते ! हाच प्रयोग मी मराठीतला कथाकार अनिल डांगे याच्यावरही केला होता !

मुंबईचे वर्णन दोन शब्दांत करून दाखवा असे आव्हान दिले तर भलेभले गारठतील. पण, मन्याच्या कवितेत ते आहे -- ' दिवेटिंब मुंबई ' ! मी दादरलाच ( बहुतेक ) मन्याच्या घरीही गेलो होतो. त्या वेळी त्याच्या आईने त्याला जेवायला वाढले होते, हे आठवते. त्या अनियतकालिकाचे मुखपृष्ठ की देणगी मागायचे पत्रक, ते आठवत नाही -- त्यावर षांताराम पवार एक उंबरा काढणार होता आणि त्याच्या अलीकडे मन्याच्या झिजलेल्या चप्पलजोडाचा फोटो ! मन्याने त्या वेळी, मी किरकोळ एक विद्यार्थी असूनही, त्याच्या कविता मला वाचून दाखवल्या होत्या ! त्यांतली एक ओळ कायमची माझ्या मनात रुतून बसलीय -- ' हे प्रियतम माझे अंधार ' !

या निमित्ताने प्रिय मन्याच्या स्मृतीला सादर अभिवादन !

--- ००० --- ०४-०३-२१.

फेसबुकवर न दिलेला पण आठवणीसाठी लिहून ठेवलेला मजकूर – मन्या आणि षांताराम यांनी वापरलेली ‘ भविष्य पद्धत ‘ मी ‘ मनवाचन ‘ म्हणून कशी स्वत:ची स्वत: समजून घेतली –

मनवाचन

कुंडली, न्यूमेरॉलॉजी हे बाह्य योगायोगांवर आधारित प्रकार आहेत. ते मला फारसे पटत नाहीत. पण, सही, हस्ताक्षर, चेहरावाचन, हस्तरेषा आणि आता मी जे सांगतोय ते – हे प्रकार त्या त्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष असण्यावर आधारित आहेत. हस्तरेषांत तर आता व्होकेशन पामिस्ट्री, मेडिकल पामिस्ट्री, असेही प्रकार विकसित झालेले आहेत आणि माझ्या मते ते माणसाला खूपच उपयुक्त आहेत. या अशा प्रत्यक्षाधारित ' वाचना ' चे मी लक्षात घेतलेले तत्त्व असे आहे की -- you get the life that you expect -- तुम्ही जशी अपेक्षा करता तसे जगणे मिळते. यात प्रत्येक गोष्टीला ' हुशार ' फाटे फोडणे शक्य आहेच. मला म्हणायचेय त्यातले फक्त तथ्य बघावे. मी स्वत: सुमारे आठ वर्षे तीव्र अभ्यास करून हस्तरेषांच्या अर्थांचा प्रत्यक्ष अनुभव पाहिलेला आहे. काही वर्षांपूर्वी ते सगळे बंद केले. लेखन-वाचन की हस्तरेषा यांतल्या निवडीतून मी हस्तरेषा त्यागले. ते असो. तर आता ती मन्या ओक पद्धत सांगतो. गोल, चौकोन, त्रिकोण आणि नागमोडी रेषा ही चिन्हे वर छोट्या, कळण्यापुरत्या आकारात काढायची. मग खाली एक मोठा आयताकृती चौकोन काढायचा. लक्ष्य व्यक्तीला सांगायचे ते असे – या चार चिन्हांपैकी एक निवडा. तुम्ही जे चिन्ह निवडता ते तीन वेळा या चौकोनात काढायचे आहे. आणि उरलेली तीन चिन्हे याच चौकोनात एकेकदा काढायची आहेत. म्हणजेच, निवडलेल्या चिन्हाची तीन आणि ही एकेकवाली तीन अशी एकूण सहा चिन्हे या चौकोनात तुम्हाला हव्या त्या ठिकाणी, हवी तशी काढायची, बसवायची आहेत. हे सांगून तो कागद त्या व्यक्तीकडे द्यायचा. मग आपण लक्ष द्यायचे नाही. त्या व्यक्तीने हा कृतिक्रम पूर्ण केला की तिचे काम झाले. मग आपले काम सुरू. आपले काम म्हणजे एकाग्रपणे प्रत्येक बाब समजून घेत त्याचे अर्थ लावत जाणे. हेच, माझ्या मते, मनवाचन.

आता ही चिन्हे मुळात अर्थपूर्ण समजता येतात – गोल हा कमी कंगोऱ्यांचा, स्मूथ आवडींचा, म्हटले तर निरर्थकतेकडे झुकू शकेल असा प्रकार. चौकोन आणि त्रिकोण निवडणारे कमीजास्त महत्त्वाकांक्षी असतात – त्रिकोणाहून चौकोन जरा अवघड. नागमोडी रेषा ही वृत्ती, स्वभाव, आशानिराशा, जीवनलांबीही दर्शवू शकते. आता हे सगळे कसे काढले आहे ते पाहायचे. कामाच्या शेवटच्या क्षणापर्यंत दम न टिकणारे असतात ते चिन्हाचा शेवट कसा तरी करून टाकतात, रेषा जुळत नाहीत, वगैरे. तसे न होता उत्तमपैकी काढले असेल सगळे तर तेही कळतेच. हा सगळा एक प्रकारे त्या व्यक्तीच्या जगण्याचा आराखडाच असतो. नागमोडी रेषेत तर उघडेच पडते मन. ती केवढी आहे, स्पष्ट आहे की भित्रट, मध्ये तुटतेय का वगैरे पाहून तसे ' वाचन ' कळते. मुख्य म्हणजे दिलेल्या चौकोनात ही चिन्हे काढताना काही रचना लक्षात घेतली आहे की कशीही काढली आहेत यावरूनही मन कळते. चौकोनात इतकी जागा उपलब्ध असूनही काहीजण कुठे तरी कोपऱ्यात सगळीच चिन्हे बसवून टाकतात. त्यावरूनही मन कळते. असे खूप काही या ' कुंडली ' वरून समजते. इथून पुढे येतो तो उत्स्फूर्ततेचा भाग. ते सगळे पाहून कधी एक चित्र दिसते, कधी एखादी घटना जाणवते, कधी संघर्ष दिसतो कधी सगळ्याच चिन्हांचा एकमेकांना त्रास होतो आहे असे दिसते. त्याचप्रमाणे स्मूथ, यशस्वी आयुष्याचीही आखणी दिसते. त्यावरून बरेच काही समजते. नागमोडी रेषा किरटी, अधू, तुटक काढणाऱ्यांना तब्येतीच्या तक्रारी असतात.

एवढ्यावरून याचे तंत्र आणि प्रकार स्पष्ट होतो. यातले महत्त्वाचे हे की हा कृतिक्रम त्या व्यक्तीने सहज पूर्ण करून द्यायला हवा. त्या व्यक्तीला मुळीच सावध करायचे नाही, हे मनवाचन आहे, हेही सांगायचे नाही, ती व्यक्ती अनवधानाने ' खरी ' व्यक्त व्हायला हवी. आपण मन साधे ठेवून आपल्या उत्स्फूर्ततेला खुला वाव दिला तर तीही करामती करते !

आता गेली अनेक वर्षे मी असले कोणतेही प्रकार करत नाही. नाही तर लगेच सगळे हात पुढे करतात ! या प्रकारांचा अभ्यास आणि विचार या खूप गहन आणि वेळखाऊ गोष्टी आहेत. सापळ्यात पकडल्याप्रमाणे अडकवणाऱ्याही आहेत. बचके रहना !

--- ००० ---

वेडसरपणा आणि जीनियस असणे

ग्रेट ! आश्चर्यकारक ! ही सोबत एक लिंक देतोय -- इंग्रजीत आहे हा लेख -- ज्यांना शक्य आहे त्यांनी जरूर वाचा. वेडसरपणा आणि जीनियस असणे यांत एक संबंध आहे, असे शास्त्रीय प्रयोगांसह म्हणणारा. ' द ब्यूटिफुल माइंड ' या सिनेमातल्या ग्रेट गणिततज्ञाला विचारतात की बाबा, तू एवढा ग्रेट गणिततज्ञ, तर्कज्ञ, शास्त्रज्ञ आणि तरीही परग्रहावरचे लोक पृथ्वीचे भले करण्यासाठी तुझा वापर करतआहेत, असल्या विचाराला तू थारा तरी कसा दिलास ? त्यावर तो म्हणतो की गणितातल्या कल्पना जशा मला सुचतात तसेच हेही सुचते त्यामुळे मी ते खरे धरतो. कळले ना, आता निदान मनातल्या मनात तरी मी जीनियस असल्याचे मान्य करा, म्हणजे झाले !

https://getpocket.com/.../secrets-of-the-creative-brain...

--- ००० ---

गांभीर्य आणि विनोद यांचा बेष्ट संगम साधणारी कविता समजा माझ्याकडून लिहून झाली -- तर मलाही हसू येते कारण मलाही ते अनपेक्षितच असते ! पुढे आपले मन कडमडते मध्येच आणि हावरटपणे म्हणते की अशाच आणखी दोनचार लिहाव्यात कविता ! हा मला निर्बुद्ध करायचा सापळा असतो. मी माझ्या मनाला लगेच हाकलून देतो ! तू फक्त एक नोकर आहेस, या अशा कविता तुझ्याही नाहीत वा माझ्याही नाहीत ! जशा येतील तशा येऊ देत ! पुन्हा असला हावरटपणा करत माझ्याकडे यायचे नाही !

--- ००० ---

क्रोध

एक बिबट्या लोकांवर हल्ले करत होता त्याला वन विभागाने जेरबंद केल्याची बातमी टीव्हीवर दाखवली. बिबट्या पिंजऱ्यात होता आणि त्याला पाहायला त्या भागातले सुमारे पाचशे तरी लोक आलेले होते. बिनधास्त सगळे अगदी पिंजऱ्याच्या जवळ जाऊन त्याला पाहात होते. तो गप गुमान बसून होता. डोळे घट्ट मिटायचे आणि उघडायचे, असे करत होता. ' अग्निपथ ' हा अमिताभचा सिनेमा पाहिला आहेत का ? त्या सिनेमाच्या शेवटाकडे, शेवटच्या संघर्षापूर्वी अमिताभने जो अभिनय केला आहे तो कायम माझ्या लक्षात आहे. अगदी अशीच एखाद्या हिंस्र जनावरासारखी त्याने डोळ्यांची उघडझाप केलेली आहे. त्याचा प्रचंड क्रोध त्या एका दृष्यातून जाणवतो ! भयानक खरा अभिनय !

--- ००० ---

महिला दिन

या निमित्ताने हे लक्षात घ्यावे -- अलीकडेच हैदराबादच्या हाय कोर्टाने दिलेला निकाल बदलून सुप्रीम कोर्टाने न्यायाची एक कल्पना बदलून दिली आहे. गृहिणी काही आर्थिक कमाईचे काम करत नाहीत, ही ती कल्पना. एका आपघाताच्या केसमध्ये मयत महिला फक्त घरकाम करत होती, आर्थिक कमाई करत नव्हती म्हणून नुकसान भरपाई कमी दिली गेली होती. कोर्टाने सांगितले की घरकामाचाही योग्य मोबदला ठरवला गेला पाहिजे आणि विचारात घेतला गेला पाहिजे. यामुळे ती नुकसान भरपाई वाढवून दिली गेली !

सर्व महिलांचे, विशेषत: गृहिणींचे यासाठी अभिनंदन

! आणि अर्थातच सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा !

--- ००० --- ०८-०३-२१.

तयार राहा

असे वाचनात आले की माणसाच्या मेंदूची प्रतिकृती म्हणावी अशी यंत्रणा असलेले मशीन तयार होत आहे. त्याला जाणीव असणार. ते छोट्यामोठ्या, नव्याजुन्या स्मृती साठवू शकणार. आणि त्या स्मृतींवर आधारित समोरच्या घटिताला प्रतिसाद / प्रतिक्रियाही देऊ शकणार ! हे एवढे झाले तर कायद्याने त्या मशीनला जिवंत माणसाचा दर्जा येईल. मग, ते बंद करणे हा खुनासारखा गुन्हा धरला जाईल आणि तुम्हाला सगळे विसरून सक्तमजुरीवर तुरुंगात जावे लागेल !

तुरुंगात पोचल्यावर तुम्हाला दिसेल की तिथे जेलर म्हणून तसेच एक मशीन आहे ! ते हसून तुमचे स्वागत करतेय !

--- ००० ---

दिलीप पुरुषोत्तम चित्रे

चाहते त्यांना प्रेमाने दादा म्हणत. होतेच ते, त्यांच्या कामाने आपोआप झालेले दादा. नेमाड्यांप्रमाणे साहित्यिक शेरेबाजीची गुंडगिरी करून त्यांनी दादापद मिळवलेले नव्हते. खरे तर ' टीकास्वयंवर ' वाल्या नेमाड्यांऐवजी ' साहित्य आणि अस्तित्वभान – १ ' वाल्या चित्र्यांना मिळायला हवे होते ज्ञानपीठ. पण इथल्या बाजारबुणग्या विचारवंतांनी चित्र्यांची शिफारससुद्धा केली नसेल. ( टीकास्वयंवर वाचून कलेच्या मूल्यात्मकतेचे भान फारसे वाढणार नाही – ती ताकद अस्तित्वभान मध्ये आहे. नेमाडपंथियांनी हीही शेरेबाजी थोडी पचवून घ्यायला हवी. ) मुळात त्यांनी ते वाचलेच नसेल आणि वाचले असले तर अजीर्ण होऊन आजारी पडले असतील. विद्वत्ता आणि मर्मदृष्टी यांचा इतका प्रचंड आविष्कार असलेले पुस्तक मराठीत दुसरे कोणते आहे, ते मला तरी माहीत नाही. चित्र्यांच्या दर्जेदार सखोल कामांची यादी नेटवर आहे. मी नम्रपणे म्हणेन की आम्हा मराठीवासीयांची कुवत पाहता हा आमच्यासाठी एक चमत्कारच होता !

" तुकारामासारख्या विद्येश्वरानं आत्मभान आणि शब्दभान एकवटून स्वभावसमाधीचा प्रत्यय नोंदवून ठेवला. मानसिक क्षोभाच्या अवस्थेतून थेट तुर्यावस्थेपर्यंत पोचणारी तुकारामाची कविता ही खंडित आत्मभानाला अखंड बनवण्याच्या मराठी काव्यकलेचं उत्तुंग उदाहरण आहे. " असे वाक्य चित्रे सहज लिहून जातात. त्यांचा ' कवी काय काम करतो ' हा लेख मराठीत अजरामर ठरावा असा आहे. त्या लेखातला शेवटचा उतारा असा आहे – " समकालीन मानवी संस्कृतीच्या सार्वभौम संदर्भात भारतीय आणि मराठी वाङमयीन परंपरा पाहण्याचा आपल्याला प्रयत्न करावा लागेल. असा प्रयत्न करताना मराठीतही कवीची सांस्कृतिक भूमिका का आणि कशी बदलत गेली आणि तिचा एकूण मूल्यव्यवस्थेशी काय संबंध आहे, याचाही आपल्याला स्वतंत्रपणे शोध घ्यावा लागेल. जगातल्या वेगवेगळ्या समकालीन संस्कृतींमधल्या कवितेच्या आणि कवींच्या स्थानाची तुलना करून तिचा सार्वभौम मानवी श्रेयाच्या परिप्रेक्ष्यात आढावा घ्यावा लागेल. असं करताना कवी काय काम करतो याचा माणसाचं ह्या अस्तित्वसृष्टीत काम काय ह्या मूळ प्रश्नाशी असलेला संबंध उलगडला जाईल. असं जोवर होत नाही तोवर आपापलं कामसुद्धा आपल्याला कळणार नाही. बिचारा कवी तर दूरच राहिला. " याच लेखात एका ठिकाणी ते लिहितात, " अस्तित्वानुभवाची अनेक पदरी पीडा, आनंद, अचूक इंद्रियसंवेदना, उत्कट भावानुभव, तीव्र आणि सखोल अर्थप्रतीती, सार्वत्रिक मानवी समस्यांचे चिंतन या महत्त्वाच्या बाबी मराठी कवितेत विरळा होत गेल्या. हा काही इंग्रजीचा प्रभाव नाही तर धेडगुजरीपणा पराकोटीला जाऊन भाषिक आणि सांस्कृतिक आत्मभान क्षीण झाल्याचं हे लक्षण. "

हे सर्व समजून घेण्यात कोण इंटरेस्ट घेणार ? मानवी जगणे म्हणजे राजकारण अशा थिल्लर कल्पनांनी स्वत:ची करियर बांधत बसणारे इथले भूमिकावाले लेखक-समीक्षक या अशा कामाकडे लक्ष देणे तरी शक्य आहे का ? मानवी जगणे चालते ते राजकीय डावपेच आणि हलकटपणा यांवर नाही तर सौहार्द आणि प्रेम या मानवी मूल्यांवर, हे इथल्या असंख्य साहित्यप्रेमींच्या डोक्यात शिरण्याची शक्यताच दिसत नाही. असा हा ' आपल्या माती ' च्या दिशेने

वेगाने जाणारा समाज लौकरात लौकर दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांना नामशेष करील. या असल्या फडतूस भूमिकेत इंटरेस्ट नसलेल्यांनी तरी चित्र्यांचे ऋण मनापासून मान्य करायला हवे. त्यांची मर्मदृष्टी समजून घ्यायला हवी.
--- ००० ---

हिकिकोमोरी

हा एक जपानी शब्द आहे. स्वत:ला समाजापासून अलग पाडून घरात वा एका खोलीत कोंडून घेणे, असा त्याचा अर्थ आहे. ही विकृती विशेषत: तरुणांत अनेक देशांत पसरत चाललेली आहे. प्रत्येक मुलगा वा मुलगी काही अतिहुशार वा कार्यकुशल असेलच वा होईलच असे नसते. पण जबरदस्त स्पर्धा आणि रोजगार शक्यता कमी असणे यांतून हे प्रश्न तयार होत आहेत. बऱ्याच मुलांना असे वाटते की मला एखादे काही काम द्या, ते मी करतो आणि बाकी मला शांतपणे जगू द्या. तसे घडणे अशक्य होत चाललेय. त्यामुळे, ' बोंबलत जाऊ दे तो समाज आणि सगळे जग ' अशी प्रवृत्ती वाढत चाललीय तरुणांत. त्यांच्यांत बाकी फारशा कुठल्या मानसिक विकृती वगैरे नसतात पण नको तो कुणाशीही संपर्क, हा पाया होऊन बसतो जगण्याचा ! या असल्या प्रकारात दक्षिण कोरिया नंबर एकवर आहे म्हणे. त्यापाठोपाठ इतरही देश आहेतच. ही मुले एखाद्या खोलीत लॅपटॉप घेऊन बसतात तासंतास आणि आख्खे जग फाट्यावर मारतात ! त्यांतले एक पोरगे म्हणाले की कोरोनाचा मला काहीच त्रास नाही. एका खोलीत कोंडून घेऊनच तर राहातोय मी काही वर्षे !
माणसाचे जगणे हे असंख्य प्रश्नांनी युक्त असते आणि ते सगळे प्रश्न राजकारणातले आपापले ' साहेब ' सोडवून देतील असे समजणे ही आणखी एक विकृती ठरेल ! ' जाऊ द्या ना -- आपल्याकडचा नाहीय ना हा प्रश्न -- ' असे म्हणून आत्मतुष्ट राहणे हा एक गाढव गाफीलपणा होईल. मुलांना स्पर्धेच्या धारदार पात्यांखाली मरायला उभे करावे लागू नये, हे फार महत्त्वाचे आहे. आपापल्या पाल्यांकडून त्यांच्या कुवतीपेक्षा फारच जास्त अपेक्षा करणाऱ्या पालकांनी वेळीच सावध व्हायला पाहिजे.
अशा मुलांची सरकार कोणकोणती जबाबदारी घेऊ शकेल याचेही विचार अनेक देशांत सुरू झालेले आहेत.
मी वाचलेला लेख बराच मोठा आहे. ज्यांना शक्य असेल आणि ज्यांना या प्रश्नाचे गांभीर्य वाटत असेल त्यांनी जरूर वाचा. ही लिंक –
--- ००० ---

हा महाराष्ट्र ना कधी परीक्षांना घाबरला ना परीक्षा घ्यायला ! आठ दिवसांत परीक्षा घेणारच ही आमची जिद्द आहे !

आम्ही जिवाचे रान करू पण विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित कदापि ठेवणार नाही !

कविता कळत नाही म्हणून पळ काढणारा नाहीय हा महाराष्ट्र -- कितीही न कळो आम्ही जिद्दीने लढा देतच राहू !

अमूर्त चित्राकडे सहसा आम्ही लक्ष नाही देत, पण, जर का ते आमच्या नजरेला पडले तर, याद राखा, आम्ही त्याचा कोथळा बाहेर काढू !

फेसबुकवरचे अभिव्यक्ति स्वातंत्र्य वापरणे हा इतरांप्रमाणेच या महाराष्ट्राचाही अधिकार आहे -- आम्ही आयमाय उद्धारू पण फेबू वापरूच !
--- ००० ---

वाचन

नोकरीत असताना कधी कधी अगदी सुट्टीच्या दिवशीही ऑफिसात जावे लागे -- तरीही बऱ्यापैकी लेखन-वाचन होत राही. झोपेचे तास कमी करूनही जमत असे. आता तसे नाही जमत. आणि मुख्य म्हणजे आता तशी निकडही नाही वाटत. त्यामुळे मी न वाचलेल्या पुस्तकांची यादी रोज ढिगाने वाढत जाते ! माझे काही मित्र मात्र नेटाने वाचत असतात. ते कधी मला सांगतात की अमुक पुस्तक फालतू आहे, त्यावर तुमचा वेळ नका घालवू. बऱ्याचदा मला ते पुस्तक माहीतही नसते ! तरीही मी एक करतो -- न वाचण्याच्या माझ्या पुस्तकांच्या यादीत, मित्रांनी सांगितलेल्या अशा पुस्तकांना अग्रक्रम देतो ! कधी असेही होते की अमुक पुस्तक फार चांगले आहे असे मला कळते. मी ' अरे वा ! ' म्हणून शांत राहतो. ( तसे तर एकूणातच मी फार वाचलेला माणूस आहे, असे नाही, पण  कधी कधी मी तसा आभास निर्माण करू शकलो असेन, असे मला वाटते. )
मला माझे काही लिहायला जे शक्य वाटते तिकडे लक्ष देणे यालाच आता मी जास्त वाव देतो. तेही फारसे कुणी वाचणार नाही आणि एकूणच मराठीत ते रद्दडच ठरणार आहे, हे मला माहीत असूनही. पण, हा आता माझ्या जगण्याचा भाग आहे. माझी कुणाबद्दल तक्रार नाही तसेच मी वाचत नाही म्हणून इतरांनीही मला मग्रूर वा अहंकारी समजू नये, एवढीच माझी अपेक्षा असते.
लेखकाला मिळणारी प्रसिद्धी वा बक्षिसे ही काही लेखनाची प्रमुख कार्ये म्हणता येणार नाहीत. मग काय ? हा प्रश्न अनेकांच्या चिंतनात असायला हवा, खरे तर. पण असतो का ? -- सारांश, माझे जे काही चाललेय ते कसे बरोबर आणि योग्य आहे, ते सांगितले. जो लेखक इतर लेखकांचे फारसे वाचत नाही त्याचे इतर लेखकांनीच काय, कुणीही का वाचावे ? -- हा प्रश्नही नम्रपणे मी स्वीकारतोच.
थोडक्यात, ' धीरे धीरे चल, चांद गगन में ' असे चालू देतोय, बास !
--- ००० --- १३-०३-२१.

सादरीकरणात एक चूक होऊनही वाखाणले गेलेले नाटक -- माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' चा कानडी अवतार –
--- ००० ---

पारितोषिक

साहित्य अकादमीसाठी शिफारस करणारे मराठीतले विचारवंत कोण असतात, ते कोण, कसे निवडते, हे मला माहीत नाही. पण माहिती करून घ्यावेसे वाटतेय. कारण न जाणो काही चमत्कार घडला आणि मलाच एखादे पारितोषिक मिळण्याची वेळ आली तर ही रचना काय असते ते माहीत तरी करून घेऊ, असे मला वाटते. नंदा खरे यांनी साहित्य अकादमी पुरस्कार नाकारल्याची घटना सध्या चर्चेत आहे, त्यामुळे जरा उत्सुकता जागी झाली.
एकदोन ठिकाणी असे वाचनात आले की ते पारितोषिक जाहीर करण्यापूर्वी त्या सन्मान मूर्तीला याबद्दल कळवून त्या मूर्तीची स्वीकृती-संमती घेतली जाते. मुळात हे खरे आहे का ? की परस्पर आधी जाहीर होतात पारितोषिके आणि नंतर स्वीकृती वा अस्वीकृती कळवता येते ? तसे असेल तर फारच छान आहे. त्यामुळे, लेखकाचे दोन फायदे होऊ शकतात. एक म्हणजे तो त्या पारितोषिकायोग्य असल्याचे प्रसिद्ध होणे आणि शिवाय त्याच्या एखाद्या तत्त्वाला धरून त्याने ते नाकारल्यास त्या तत्त्वाची आणि त्या संबंधित लेखकाच्या तत्त्वशीलपणाचीही प्रसिद्धी होणे. मला वाटते की लेखकाला हे दोन्ही फायदे मिळायला हवेत. सांस्कृतिक घटना अशा खुल्या राहिल्या तर मराठी समाजाचे प्रबोधनही होत राहील, हा एक सामाजिक फायदा होईल तो वेगळाच.
कुणी म्हणते की स्वीकृतीबाबत सन्मानमूर्तीला फोनवर विचारतात. हे अन्याय्य तर आहेच पण यात पारितोषिक देणाऱ्या संस्थेचा भित्रेपणा आणि पळपुटेपणाही आहे. जे जे घडते ते ते लोकांना कळायला हवे. पडद्यामागे सेटिंग

करणे काही पटत नाही. म्हणजे, आधीच लेखकाने अस्वीकृती सांगितली तर ते पारितोषिक त्याला जाहीरच होणार नाही ! मग, त्या पारितोषिकायोग्य असण्याचे आणि ते नाकारण्याचे, अशा दोन्ही पुण्यांपासून लेखक वंचित राहील. असे होऊ नये. आधी विचारा हवे तर, पण ते लेखी पत्र पाठवून विचारा. म्हणजे लेखक त्या दोन्ही पुण्यांना पात्र होता याची नोंद राहील.

शिफारस समितीत कोण कोण आहे तेही जाहीर व्हायला हवे. त्याबद्दलही मतभेद असू शकतात. त्याचीही खुली चर्चा व्हावी. हे संस्कृतीचे क्षेत्र आहे, न्यायालय नव्हे. सातत्याने ठराविक विचारसरणीचेच लोक या शिफारस समितीत नेमले जात असतील तर अनेक लेखकांवर अन्याय होऊ शकतो. आपण जर अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे भोक्ते आहोत तर गुप्तपणा कशाला ? काही लेखकांना, योग्यता असूनही, पारितोषिक का नाही मिळू शकत, याचाही अंदाज लोकांना यायला हवा.

माझा या समस्येशी संबंध येण्याची शक्यता फारच कमी आहे कारण माझी फारशी पुस्तके नाहीच आहेत. जे काय आहे ते माझ्या संकेतस्थळावर मोफत आहे. पण, या पारितोषिक यंत्रणेत अशा माध्यमाला अजूनही मान्यताच नाही आहे. या विचारवंत महाराष्ट्राने, याही बाबतीत आपल्याला काळाबरोबर राहण्याचा काही डिजिटल पायंडा पाडता येईल का याचा विचार करायला हवा. मी नाही हो आशा लावून बसलेलो पण महाराष्ट्राने साभिमान आधुनिक होता येते का ते पाहावे यासाठी ही एक ( खोडसाळ ) सूचना !

शिफारस करणाऱ्या समितीला, विचारात कोणती पुस्तके, का घेतली आणि त्यांच्या गुणवत्तेचा कसा विचार केला याबाबत काही चिकित्सक लेखन करून ठेवायचे बंधन ठेवायला हवे. ही एकूण यंत्रणा कशी चालते ते लोकांना कळायला हवे. या समितीवर येणार का हेही संबंधित विचारवंताला लेखी विचारावे आणि त्याचे लेखी उत्तर घ्यावे. हे विचारवंत कसे निवडले जातात हेही कळू शकले तर ग्रेटच काम होईल !

--- ००० --- १४-०३-२१.

आपले मित्र रवींद्र दामोदर लाखे यांच्या ' आरभाट नोंदींचे प्रकरण ' ( शब्द मल्हार प्रकाशन ) या पुस्तकाचे आजच्या मटा मध्ये परीक्षण आलेले आहे. पुस्तकाच्या गांभीर्याला साजेसे, थोडक्यात पण वजनदार लिहिले आहे श्रीराम शिधये यांनी.

--- ००० ---

इडली नंतर सांभर की सांभार की सांबर की सांबार -- नेमके बरोबर काय ते साधार सांगावे –

( ‘ सांभार ‘ हे करेक्ट आहे. )

--- ००० ---

प्रत्यारोपण

मूत्रपिंड, यकृत यांच्या प्रत्यारोपणाबद्दल आपण ऐकत असतो. पुण्यातल्या डॉ. शैलेश पुणतांबेकर यांनी गर्भाशय प्रत्यारोपणही यशस्वीरीत्या केल्याची माहिती टीव्हीवर पाहिली. ती संबंधित महिला नंतर गर्भवती होऊन तिने एका बाळाला जन्मही दिला. डॉ. पुणतांबेकर अशा शस्त्रक्रिया यंत्रमानव-तंत्रज्ञानाने करतात. गर्भाशय प्रत्यारोपणाची त्यांनी शोधून काढलेली पद्धत जगभर ‘ पुणे पद्धत ‘ म्हणून प्रसिद्धी पावलेली आहे !

मध्यंतरी मेंदू प्रत्यारोपणाबद्दल एक लेख वाचला होता. तेही शक्य होऊ शकेल पण काही महत्त्वाचे प्रश्न येतील म्हणतात. एखाद्या अपघातात किंवा कसाही समजा एखाद्या पुढाऱ्याचा मेंदू निकामी झाला ( आठवा – ‘ कथा अकलेच्या कांद्याची ‘ ) आणि समजा एखाद्या मध्यमवर्गीयाचा मेंदू त्याच्यात प्रत्यारोपित केला गेला तर, भ्रष्टाचाराबद्दल तो स्वत:च स्वत:ला शिव्या देतोय असे दृश्य निर्माण होईल ! आणि संसारात तो सारखी काटकसर

करू लागेल ! दुसरा प्रश्न असा येईल की एखाद्या पतीचा मेंदू समजा बदलला तर त्याच्या पत्नीशी होणाऱ्या त्याच्या संभोगाचा आनंद दुसऱ्याच्याच मेंदूला होईल – मग त्याची पत्नी व्यभिचारी ठरेल का ? हाच प्रश्न हाताळणारे गिरीश कार्नाडांचे ‘ हयवदन ‘ हे नाटकही इथे आठवते.
बाकी सगळे परवडते पण मेंदूचे सगळेच अवघड !
--- ००० ---

कविता आणि गद्य

आम्हाला हिंदी शिकवायला एक शिक्षक होते. त्यांची शिकवायची पद्धत फार भारी आणि सोपी होती. समजा, शिकवत असलेल्या धड्यात असे एक वाक्य आले, " मुझे लगा की अब मुझे कलकत्ता जाना पडेगा I " की ते शिकवत, लेखक कहता है की तब उसे लगा की उसे कलकत्ता जाना पडेगा I -- या पद्धतीने प्रत्येक वाक्याच्या आधी, लेखक कहता है, असे जोडत गेले की तो धडा शिकवून होई ! -- या पद्धतीने जर कविता ' कळत ' असेल तर ती कविताच नव्हे. काही वेळी एखादे वाक्यच असते पण ते वेगळेच काही सांगत असते. मजकूराच्या रचनेत आणि दिसण्यात कविता शोधू नये. एखाद्याला लयबाजीची इतकी सवय असते की तिच्याशिवाय तो कवितेची कल्पनाच नाही करू शकत. चॉसर समजा म्हणाला की तिचे कपाळ सुंदर होते तर त्याला ते नसतेच सांगायचे -- कपाळ उघडे टाकणे हे निषिद्ध असून तिने ते उघडे टाकलेय, हे असे त्यात. समोर दिसणारा मजकूर म्हणजे कविता नव्हे. त्या मजकूरातला क्रम, कशानंतर काय कसे येते, त्यांतले आंतरसंबंध -- असे सगळे विचारात घेतले तर त्या मजकूराच्या दृश्य रूपाच्या बाहेरच असते कविता. काही वेळी वाचकाने बंदिस्त राहिल्यामुळे ती कविता त्याच्या मनात पूर्ण पोचत नाही, मग त्याला फक्त दृश्य मजकूरच पोचतो. जर कविता ' मजकूरबाह्य ' अंगांनी खूप व्यक्त होत असेल तर तो मजकूर गाता येत नाही म्हणून वाचकाने रुसून बसू नये. कवितेच्या रचनेतल्या आणि दृश्य रूपातल्या ढोबळ सवयी आणि अपेक्षा एकूण जगानेच कधीच सोडून दिलेल्या आहेत. एकदा समोरचा मजकूर ' एकूण ' रूपात मजकूरबाह्य असेही खूप काही सांगत असेल तर ती कविताच असते. जगात खूप कविता सरळ उताऱ्यांतूनही लिहिल्या गेलेल्या आहेत. एकदा का त्या मजकूराचे असे ' कवितापण ' कळले की तेच ' गद्य निवेदन ' म्हणून सांगता येईल का, हा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. आता गद्य की कविता अशी सीमारेषा आखत बसू नये. खुले राहणेच महत्त्वाचे आहे. यावरून हे लक्षात येईल की एकच कविता एकाला गद्य आणि दुसऱ्याला कविता असू शकते. ( १५-०३-२१. )
--- 000 ---

कविता

मी माझ्यापुरती आणि सध्याची कवितेची व्याख्या अशी करतो --
‘ शब्द आणि वाक्ये वा ओळी यांच्या साहचर्यातून, क्रमवारीतून व आंतरसंबंधांतून व्यक्त होणारी संसूचक अर्थवलये एका परिपूर्ण आशयाप्रत पोचवणारा एकसंध भाषिक मजकूर म्हणजे कविता. ‘ इथे अलंकारिकता, वृत्तबद्धता, सांगीतिक लय, भावनिकता, स्वप्नीलपणा – अशा गोष्टींना महत्त्व दिलेले नाही, हे लक्षात घ्यावे. अलिकडची आणि आजची जागतिक कविता या अशा गोष्टींना कवितेची व्यवच्छेदक लक्षणे मानत नाही.
कोणत्याही कलेत व्यक्तिगत आणि सामाजिक असे द्वंद्व अस्तित्वात नसते. ' सामाजिक ' चा वेगळा विचार ही एक निरर्थक बाब आहे.
फक्त कवितेतच आहे असे कवितेचे व्यवच्छेदक लक्षण असू शकत नाही. कवितेचे महत्त्वाचे लक्षण सतीश तांबे, राजन खान, लाखे वा काफ्का यांच्या कथात्म साहित्यातही असू शकते. शेवटी एखादा मजकूर तारतम्यानेच कविता ठरतो. एखादा मजकूर गद्य वाटतो पण एखाद्याच ओळीने त्याची परिमाणे बदलून ती कविता होते. कविता आणि गद्य हा

भेदच खोटा आहे -- तो मजकूर कविता म्हणून अर्थवलये देतोय की नाही, एवढेच पाहता येईल. तरीही मतभेद संभवतीलच.

--- ००० ---

लस घेतली !

--- 000 ---

या विषयावर तातडीची बैठक बोलावण्यात आलेली असून ती आज दुपारी वा रात्री वा उद्या संध्याकाळी होईल !

--- 000 ---

कानडीतले ' बुद्धिबळ आणि झब्बू ' लौकरच आणखी प्रयोग होतील –

16 मार्च 2021.

पुन्हा विशाखा आणि समीर ( सोनी मराठी टीव्हीवरची महाराष्ट्राची हास्यजत्रा )

दोन नामचीन वेडे ! तुम्ही म्हणाल, नामचीन तर गुंडांना म्हणतात, नामांकित म्हणायचेय का ? नाही, नामचीनच ! गुंडच आहेत हे ! प्रचंड दरारा असलेले ! महाराष्ट्राच्या हास्यजगतात ! घाबरून घाबरून प्रेमाने हसतच राहावे असे ! आत्ताच त्यांची दिवाळी पहाट पाहिली ! विशाखा ही भावगीत गायिका आणि तबलासाथ समीर ! आख्ख्या दुनियेची वाट लावतात हे दोघे ! भावगीत म्हणत नसतानाची जी भावगीत गायिका विशाखाने दाखवली त्याला तोडच नाही ! समीरची साथ म्हणजे चोरावर मोर ! थेट उस्तादाचा टोप घालून त्याने बरबाद करून टाकले सगळे ! गेल्या कित्येक महिन्यांत मी असा खळखळून हसलो नव्हतो ! माझा दोन वर्षांचा हास्ययोग पूर्ण झाला ! इतक्या थोड्या वेळात इतका जबरदस्त परफॉर्मन्स ! विशाखाला माझ्यातर्फे बोलाचाच कंठा आणि समीरला वडगाव डग्गा ची वतनदारी ! मजा करा, जा !!!

--- ००० ---

महाग्रेट ! महाआनंद ! आशा भोसले झाल्या महाराष्ट्र भूषण ! त्या तर आधीच कोट्यवधींच्या जिंदगी भूषण आहेत !

दोन वर्षांपूर्वीच्या कानडी ' ढोलताशे ' ची आठवण --

Sushma Rao
is with Vijay V Kulkarni
and Shrunga BV
at Ranga Shankara

·

McactfrmSchfgrp h27ftgonms, 2log0rc1red9 · Bangalore ·
What joy to meet the playwright before the show.....!
This World Theatre Day just gets better...!!
Playwright Cham Pra Deshapande is here to watch the show
Beediyolagondu Maneya Madi
directed by Mohit Takalkar.

कोंडी

अतुल पेठेच्या ' कचराकोंडी ' या लघुचित्रपटाने माझ्या मनाला कायमची एक खोल जखम केलेली आहे. काही माणसांना ही अशी घाणीत बुडून कामे करावी लागण्याची या समाजाला गरज असावी ही एक अत्यंत शरमेची बाब आहे. त्यातही त्यांना ना पुरेशी संरक्षक साधने ना त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना पुरेशा आरोग्य सुविधा ! ही शरमेची जखम पुन्हा उचकटली गेली ती वाझे प्रकरणातल्या शोधाची टीव्हीवरील दृष्ये पाहून. घृणास्पद -- अत्यंत ओकारीच आणेल अशा मिठी नदीच्या घाण पाण्यात उतरून तिकडे वाझेने टाकलेल्या वस्तू काही माणसे तळातून शिताफीने शोधून काढत होती ! पोलिस एखाद्या गुन्ह्याचे धागेदोरे पाताळातूनही उकरून काढू शकतात हे आपण साभिमान ऐकून असतोच. मुळात ही अशी कामे करायची सतत गरज निर्माण होणे हेच पूर्ण मानवजातीलाच शरमेचे आहे. इतके तंत्रज्ञान प्रगत झाले आहे म्हणतात तर माणसांना अशा घाणीत काम करावे लागू नये असे तंत्र नाही सापडू शकत ? की आपल्याला त्याचे काही महत्त्वच वाटत नसल्याने ते कधीच अग्रक्रमात येत नाही ?
तो गुन्ह्याचा तपास लागत जाणे याचे अर्थातच कौतुक होत राहील पण त्या घाण पाण्यात उतरलेल्या माणसांना आणि त्यांच्या कुटुंबांना उत्तम आरोग्यसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. घाण पाण्यातून कसे सगळे काढले बाहेर या शौर्याच्या स्तुतीपेक्षा त्या वीर कामगारांना माणसाचे सन्मानाचे जगणे मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. गुन्ह्याचे धागेदोरे शोधून काढण्याच्या मानवी हुशारीत माणुसकीचे धागे गहाळ होऊ नयेत. गुन्ह्याच्या रहस्याच्या कोंडीबरोबरच माणुसकीहीनतेची कोंडीही त्याच निकडीने फुटायला हवी !
--- ००० ---

हेमंत कर्णिकांच्या एका पोस्टची मी मनापासून स्तुती केली तर ते म्हणाले, " एवढं नको हो ! " त्यावर मी दिलेली कॉमेंट --
डॉक्टरीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणकाळात वेड्यांचे इस्पितळ दाखवणे हा एक कार्यक्रम असतो. तसे काही विद्यार्थी तिकडे गेले होते. काही वेडे तिथे बागकाम करत होते. त्यांतला एक वेडा एक गुलाबाचे फूल घेऊन एका विद्यार्थ्याकडे आला आणि त्याला ते स्मितपूर्वक देऊ लागला. तो विद्यार्थी जरा बिचकला -- ' नको नको ' म्हणू लागला. यावर तो वेडा मोठ्या आवाजात दरडावून म्हणाला, " घ्या -- " यावर कुणितरी त्या विद्यार्थ्याला म्हणाले की अरे, घे, घे, तो प्रेमाने देतोय !
-- कळला ना सारांश ?
--- 000 ---

श्रीधर तिळवे यांची मला महत्त्वाची वाटणारी कविता --
काही घडत जाण्याच्या प्रक्रियेचा असा समग्र आवाका घेणाऱ्या कविता आहेत किती मराठीत ? पण हा बाजारबुणग्यांचा, गटातटांचा, मतामतांचा, क्षुद्र मनांचा प्रांत होऊन बसलेला आहे. ही अशी एकच कविताही सगळा क्षुद्रपणा जाळून टाकू शकते. पण भांडणे, वादावादी म्हणजेच जगणे असे पक्के ठरवलेले लोक ही कविता वाचतील तरी कशाला ? मला तरी ही मराठीतली एक अपवादात्मक भान देणारी महत्त्वाची कविता वाटते. कलेची प्रक्रिया ही जिवंत परिपक्वता निर्माण करणारी असते पण त्या प्रक्रियेचा आपल्याला स्पर्शही होता कामा नये अशा निर्धारी अवस्थेतला रक्तमश्गुल समाज त्या प्रक्रियेलाच ' आय हेट यू ' असे म्हणत राहतो. वाचा ती कविता --
"आय हेट यू" श्रीधर तिळवे नाईक
"आय हेट यू"
आवाजातून भुंकलेले कुत्रे दुर्गंधाला जाऊन मिळालंय
द्वेषाचा कावळा चिडचिड करत कावकाव
चिमण्या उडून चाललेत काळोखात लपायला

"आय हेट यू"ची काळी दहशत फ्रंटफूटवर खेळत
हा प्रेमाचा दि एन्ड आहे काय ?
गरुड भाजून खाल्लाय शेवाळ्यांनी
आणि त्याच्या उड्डाणाच्या कथा अफवा बनतायत
सत्याच्या  टॉपवर प्रेमाच्या काचांचा फुटलेला आईनेमहल
संतापाला आय  क्यू नसतो हे तरी कितीवेळा समजवणार स्वतःला
गोष्टी कळत नाहीत तुला ?युनिव्हर्सिटीत टॉपर असलेल्या टॉपरला?
आतल्या समुद्राची धुणी बनवली वाळवली
वासनांच्या लाटा सुकत घातल्या त्यांची सूक्ते बनवली
कन्विनिएंसचे शर्ट घातले काढले
तुझा मूड बिघडू नये म्हणून स्वतःच्याच जाहिराती बनवल्या सादर केल्या
केवळ तू बाई आहेस म्हणून ब्लेम तर नाही ना असा प्रश्न शेकडोवेळा विचारला
वाऱ्याच्या चिंध्या करणारी धार तुझ्या शब्दाला होती म्हणून
भांडणे टाळली
भांडणाला वखवखलेली व्यक्ती ब्रह्मराक्षसासारखी घरावर बसून घरखाते म्हणतात
ते खरं कि काय ?
सृजनाने बनवलेले पाय आता सृजनाला पायदळी तुडवतायत
मतभेदांची अलॉटमेंट होती तेव्हा तू बहुदा पहिली होतीस रांगेत
म्हणून एव्हढी कारणे घेऊन आलीस
द्वेषाची कारणे बदलली प्रेमाची सेम राहिली
सरोवराकाठच्या झाडांनी बालकवींचे नाव घेत औदुंबर खायला सुरवात केली
लढायांच्या किंकाळ्या
मृत्यूशोकाच्या स्पेक्ट्रमच्या फुटलेल्या खाणाखुणा
इतिहासपूर्व स्त्रियांचे अरण्यरुदन
जबड्यांचें मेटॅलिक पवित्रे
मी थकलोय आणि तू म्हणतेस
"आय हेट यू"
इन द बिगिनिंग देअर वॉज हेट
त्याने द्वेष वेगवेगळ्या पद्धतीने सादर करण्यासाठी
द्वेषाने भरलेले रक्त बनवले
मग द्वेषाने भरलेले फुफुस
मग हृदय
मग आतडे
मग जोडपे
मग कपडे प्रेमाचे
रक्ताला फुफुसाला हृदयाला आतड्याला जोडप्याला
"आय हेट यू"
आरोपांचा फार्स चालू
प्रत्यारोपांचे प्रायोगिक रंगमंच ऑन

आता निरोपाचे नाटक लिहावे का ?
कि भारतवाक्य बोलून थेट पडदा पाडावा ?
तू सतत संताप छापत असतेस का ?
मिठीतली जाळीही भुकेली राहिलेली नाहीत
भाषा लष्कराने भरून गेलीये
किस सॅडीस्ट झालेत
लव्हट्रिक्सचे खेकडे एकमेकाला ओढत स्वतःत फसलेले
अशा वातावरणात तू "आय हेट यू" म्हणशील नाहीतर काय ?
तुझ्या हास्याचे खळखळते झरे ड्रॉवरमध्ये पडून
शपथा स्टक झालेल्या
ते मजेशीर संभोग भिंतीवर टांगते फ्रेममध्ये
मेंदू एकमेकांसाठी पाहुणे झालेले
"आय हेट यू" हे स्वाभाविक कि सगळ्याचा एकगठ्ठा परिणाम ?
मला म्हणायचंय
"गेलीस खड्ड्यात "
पण मी म्हणत नाहीये
तुझ्याबरोबर मला मीही त्या खड्ड्यात दिसतोय
श्रीधर तिळवे -नाईक
(चॅनेल : झ ,लिव इन एंड लिव ऑउट ह्या काव्यफाईलीतून )
--- ००० ---

पुन्हा एकदा, ‘ आई कुठे काय करते ‘ --

स्टार प्रवाह वरच्या या मालिकेत आईच्या प्रमुख भूमिकेत आहे मधुराणी गोखले. ती कॉलेज विद्यार्थिनी असताना आमच्या एका नाट्यसंस्थेशी संबंधित होती. नंतर एकदा एका एकांकिका अभिवाचन उपक्रमात तिने आणि सुबोध भावेने माझ्या एका एकांकिकेचे अभिवाचन सादर केले होते. त्यानंतर तिने माझ्या ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नाटकात एक महत्त्वाची भूमिकाही केली होती. या सर्व कारणांमुळे, फक्त ती कसे करतेय काम या मालिकेत या उत्सुकतेपोटी मी ही मालिका बघू लागलो. तिचे काम उत्तम होत असले तरी ही मालिका फारच चीप असणार असे सुरुवातीला वाटले होते. पण काही भागांनंतर हा समज कमी होत गेला. याचे प्रमुख कारण म्हणजे नमिता वर्तक आणि मुग्धा गोडबोले यांचे लेखन. मानवी संबंधांचे आणि त्यांतल्या एक प्रकारच्या बंदिस्त अटळपणाचे भान बाळगणारी मांडणी आणि तीच गोची व्यक्त करणारे ‘ समझदार ‘ संवाद हे मला आवडू लागले. एकूण टीमच उत्कृष्ट असून रवींद्र करमरकरांचे दिग्दर्शनही मानवी जगण्यातला हा आवाका नेमका घेत जाणारे आहे, हे एकूणच आश्चर्ययुक्त सुखावणारे होते.
अमिताभ गुन्हेगार झाला, अधोजगताचा किंग झाला तर लहानपणी त्याचे आयुष्य कसे वाईट गेले होते ते त्याच्या समर्थनार्थ दाखवायची पद्धत होती. पण अमजद खान का खलनायक झाला त्याचा शोध कधी घेतला जात नसे. नुसत्याच समाजमान्य नीतीतत्त्वांची भलावण करणाऱ्या सामान्यत: सर्वच ‘ धंदेवाईक ‘ कलाकृती हेच करतात. या मालिकेचे मला वाटणारे वैशिष्ट्य हे आहे की ही मालिका प्रत्येक पात्राला त्याचे त्याचे फूटेज देत आहे. ‘ सामान्यत: ‘ अमूकच बरोबर असे वाटत असले तरी प्रत्यक्ष जगण्यात तसे काही असू शकत नाही, ही मानवी जगण्यातली गोची ही मालिका जाणीवपूर्वक उत्तम प्रकारे व्यक्त करत आहे. ही मला या मालिकेची आशयसमृद्धी वाटते. आणखी

कोणत्या एखाद्या मालिकेने जाणीवपूर्वक हा आशय पाहिला होता का, हे मला माहीत नाही, पण, इथे हे काही विशेष घडते आहे, असे मला वाटते.  बरोबर काय घडायला हवे याच्या सेट अपेक्षा असणाऱ्या प्रेक्षकांना इथे सतत खरचटणारे असे काही ना काही घडत असते आणि तरीही कुणालाही दोष देणे कठीण होऊन बसते. उदाहरणार्थ त्यातल्या अनिरुद्धच्या आईने वा ईशा या पात्राने असे वागणे-बोलणे इष्ट आहे का, असे विचारले तर कुणीही नाहीच म्हणेल पण ती पात्रे आपापल्या साच्यात बद्ध आहेत, जसे आपण सगळेच असतो, त्यामुळे दोष कसा देणार, असे एक वेगळेच भान ही मालिका प्रेक्षकांना देते. विशेष म्हणजे ही पूर्ण टीमच हा आशय समजून काम करते आहे, हे थक्क करणारे आहे ! मानवी समस्यांना बौद्धिक निराकरणे नसतात – हे समजणे आणि ते टीव्ही मालिकेतून व्यक्त होणे हे अनपेक्षित महत्त्वाचे काही घडत आहे !

टीव्ही मालिकेच्या रूपातली ही एक उत्तम आबसर्ड – व्यस्ततायुक्त कलाकृती आहे, असे मी म्हणेन. मराठीत अशी उत्तरहीन मालिका येणे हे नक्कीच एक अघटित आहे ! या मालिकेच्या टीमला आणि स्टार प्रवाह ला धन्यवाद !

--- ००० ---

Madhurani Gokhale Prabhulkar

is with Champra Deshpande

·

clSAdfltdpordsil u3 astnSrstap 1on:sotor40e PMd  ·

चं.प्र. देशपांडे हे माझ्यासकट आणि अनेक रंगकर्मींसाठी गेल्या काही दशकातले अत्यंत महत्वाचे नाटककार आहेत...!

त्यांची नाटकं समजणं, भूमिकेची खोली कळणं, त्यांची वाक्यं तोंडात बसवून ती सअर्थ पोहचवणं हे कुठल्याही नटासाठी प्रचंड मोठं आव्हान असतं... सुरुवातीच्या काळातच त्यांची नाटकं करायला मिळणं हा माझ्या अभिनेत्री आणि माणूस म्हणून होणाऱ्या जडणघडणीतला मोलाचा भाग होता आणि आहे ... त्यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजते.

त्यांची नाटकं ज्यांनी वाचली नसतील त्यांनी www.champralekhan.com इथे जाऊन… See More

Champra Deshpande

clSAdfltdpordsil u3 astnSrstap 9on:sotor49e AMd  · Shared with Public

Public

पुन्हा एकदा, ‘ आई कुठे काय करते ‘ --

स्टार प्रवाह वरच्या या मालिकेत आईच्या प्रमुख भूमिकेत आहे मधुराणी गोखले. ती कॉलेज विद्यार्थिनी असताना आमच्या एका नाट्यसंस्थेशी संबंधित होती. नंतर एकदा एका एकांकिका अभिवाचन उपक्रमात तिने आणि सुबोध भावेने माझ्या एका एकांकिकेचे अभिवाचन सादर केले होते. त्यानंतर तिने माझ्या ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नाटकात एक महत्त्वाची भूमिकाही केली होती. या सर्व कारणांमुळे, फक्त ती कसे करतेय काम या मालिकेत या उत्सुकतेपोटी मी ही मालिका बघू लागलो. तिचे काम उत्तम होत असले तरी ही मालिका फारच चीप असणार असे सुरुवातीला वाटले होते. पण काही भागांनंतर हा समज कमी होत गेला. याचे प्रमुख कारण म्हणजे नमिता वर्तक आणि मुग्धा गोडबोले यांचे लेखन. मानवी संबंधांचे आणि त्यांतल्या एक प्रकारच्या बंदिस्त अटळपणाचे भान बाळगणारी मांडणी आणि तीच गोची व्यक्त करणारे ‘ समझदार ‘ संवाद हे मला आवडू लागले. एकूण टीमच उत्कृष्ट असून रवींद्र करमरकरांचे दिग्दर्शनही मानवी जगण्यातला हा आवाका नेमका घेत जाणारे आहे, हे एकूणच आश्चर्ययुक्त सुखावणारे होते.

अमिताभ गुन्हेगार झाला, अधोजगताचा किंग झाला तर लहानपणी त्याचे आयुष्य कसे वाईट गेले होते ते त्याच्या समर्थनार्थ दाखवायची पद्धत होती. पण अमजद खान का खलनायक झाला त्याचा शोध कधी घेतला जात नसे.

नुसत्याच समाजमान्य नीतीतत्त्वांची भलावण करणाऱ्या सामान्यत: सर्वच ‘ धंदेवाईक ‘ कलाकृती हेच करतात. या मालिकेचे मला वाटणारे वैशिष्ट्य हे आहे की ही मालिका प्रत्येक पात्राला त्याचे त्याचे फूटेज देत आहे. ‘ सामान्यत: ‘ अमूकच बरोबर असे वाटत असले तरी प्रत्यक्ष जगण्यात तसे काही असू शकत नाही, ही मानवी जगण्यातली गोची ही मालिका जाणीवपूर्वक उत्तम प्रकारे व्यक्त करत आहे. ही मला या मालिकेची आशयसमृद्धी वाटते. आणखी कोणत्या एखाद्या मालिकेने जाणीवपूर्वक हा आशय पाहिला होता का, हे मला माहीत नाही, पण, इथे हे काही विशेष घडते आहे, असे मला वाटते.  बरोबर काय घडायला हवे याच्या सेट अपेक्षा असणाऱ्या प्रेक्षकांना इथे सतत खरचटणारे असे काही ना काही घडत असते आणि तरीही कुणालाही दोष देणे कठीण होऊन बसते. उदाहरणार्थ त्यातल्या अनिरुद्धच्या आईने वा ईशा या पात्राने असे वागणे-बोलणे इष्ट आहे का, असे विचारले तर कुणीही नाहीच म्हणेल पण ती पात्रे आपापल्या साच्यात बद्ध आहेत, जसे आपण सगळेच असतो, त्यामुळे दोष कसा देणार, असे एक वेगळेच भान ही मालिका प्रेक्षकांना देते. विशेष म्हणजे ही पूर्ण टीमच हा आशय समजून काम करते आहे, हे थक्क करणारे आहे ! मानवी समस्यांना बौद्धिक निराकरणे नसतात – हे समजणे आणि ते टीव्ही मालिकेतून व्यक्त होणे हे अनपेक्षित महत्त्वाचे काही घडत आहे !
टीव्ही मालिकेच्या रूपातली ही एक उत्तम आबसर्ड – व्यस्ततायुक्त कलाकृती आहे, असे मी म्हणेन. मराठीत अशी उत्तरहीन मालिका येणे हे नक्कीच एक अघटित आहे ! या मालिकेच्या टीमला आणि स्टार प्रवाह ला धन्यवाद !
--- ००० ---

अत्युत्तम कार्यक्रम आणि मिलिंदचे लाजवाब सादरीकरण !
( मिलिंद शिंत्रे )

मोहोब्बत
' पहेली पहेली बार मोहोब्बत की है ' ( चित्रपट ' सिर्फ तुम ' ) असे गाणे जेव्हा एखादी नायिका म्हणत असते तेव्हा तिला काय सांगायचे असते, तर, ही माझी मोहोब्बत करायची पहिलीच वेळ आहे, काही चुकलेमाकले तर चालवून घे, थोडा सराव झाला की मी दुसऱ्या-तिसऱ्या मोहोब्बतकडे जाणार आहे. आणि जर ती असे गाणे म्हणू लागली की, ' तिसरी-चौथी बार मोहोब्बत की है ' तर त्याचा अर्थ काय होईल, तर, मला चांगला अनुभव आहे, तू मला अक्कल शिकवू नकोस ! पण सामान्यत: पहिल्या प्रकारचेच गाणे म्हणायची पद्धत आहे, दुसऱ्या प्रकारच्या गाण्याला ( ते खरे असले तरी ) लोक नाराज होण्याची शक्यता असते !
--- ००० ---

दुसरा डोसही झाला !
आता फक्त मुखपट्टी आणि समाजदूरी !
वर्षभराचे काम झाले ! ( 17 एप्रिल 2021 )

सकाळी सह्याद्री वाहिनीवर ' तराने पुराने ' या कार्यक्रमात ' जुडवा ' या सिनेमातले अन्नू मलिक ने संगीत दिलेले ' दुनिया में आये हो तो ' हे गाणे ऐकले-पाहिले. मस्त फ्रेश शुभारंभ झाला दिवसाचा ! अप्रतिम निर्बुद्ध निरर्थक सुंदर गाणे ! तीनचार मिनिटांत प्रेम, मृत्यू बित्यू सगळा दंगा ! अशी असंख्य गाणी आणि निरर्थकतेचे वैभव इथली जनता बाळकडू म्हणून  आस्वादत आलेली असल्याने कोरोना-बिरोना ला इथे कुणी घाबरत नाही –

थोडक्यात पण अत्युच्च दर्जाचे पुस्तक-परीक्षण ! मराठीत समीक्षेचा विभाग बोंबललेला आहे. गिरीशने ते काम मनावर घेतले तर फार चांगले होईल ! लाख्यांचे पुस्तक जसे अद्वितीय तसेच गिरीशचे त्यावरचे हे टिपणही अद्वितीयच आहे ! हे दोघेही माझे दोस्त असावेत आणि माझ्या अनेक नाटकांचे दिग्दर्शकही असावेत ही गोष्ट मला खूप समृद्धी देणारी आहे !

Girish Patke

is with Ravindra Damodar Lakhe

and 6 others

·

AtpcSrephaohfil 24nr ighaismt 5ilf:2o0u frmrceePMd ·

आपले मित्र रवींद्र दामोदर लाखे यांच्या "आरभाट नोंदींचे प्रकरण" या पुस्तकावर मी लिहिलेले परीक्षण मुंबई विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखेच्या कार्यालयातून प्रकाशित होणाऱ्या 'संभाषित' (मार्च २०२१ ) या तज्ज्ञपरीक्षित संशोधनपत्रिकेमध्ये प्रकाशित झाले आहे. संभाषितच्या संपादक मंडळाचे आभार. सदर परीक्षण येथील मित्रांसाठी देत आहे. वाचून प्रतिक्रिया कळवल्यास आनंदच होईल.

Antechamber मधील योगभ्रष्टाच्या आरभाट नोंदी

गिरीश पतके

संभाषित आणि डॉ. प्रतिभा टेंबे.

मुंबई विद्यापीठातर्फे हे अभ्यासपूर्ण लेखांचे मासिक प्रसिद्ध होत असते. गिरीश पतके यांच्या लेखांच्या निमित्ताने ते इथे फेसबुकवर माहीत झाले. अर्थात, मराठी साहित्याचे विद्यार्थी, अध्यापक आणि अभ्यासक असणाऱ्यांना ते आधीपासूनच माहीत असेल. या मासिकाच्या मार्च २०२१ च्या अंकाचे एक छोटेसेच पण उत्तम संपादकीय आपल्या इथल्या फ्रेंड डॉ. प्रतिभा टेंबे यांनी लिहिलेले आहे. त्यात एका उताऱ्यात त्यांनी साहित्य क्षेत्रातल्या बदलत्या अभिव्यक्तिप्रवाहांचा धावता आढावा घेतलेला आहे. तो असा --

" खरे तर नव्य- अभिजातवादाने निर्माण केलेल्या सांकेतिकीकरणाविरोधात, कृत्रिमतेविरोधात रोमँटिसिझम जन्माला आला आणि सर्वसामान्यांना- साहित्यिक- कलावंतांना निसर्गाकडे, आपल्या आंतरिकतेकडे वळविले; किंबहुना अंतर्मुख व्हायला भाग पाडले. याचा पुढे अतिरेक होऊन माणूस एकटा, एकाकी, एकलकोंडा झाला. त्याचा समष्टीशी असणारा संबंधच संपुष्टात आला. याविरोधात वास्तववाद जन्माला आला.यानंतर आपल्यातल्या आंतरिकतेला दुर्लक्षून समष्टीशीच तो इतका बद्ध झाला की त्याचे अस्तित्व, त्याचे जीवितकार्य, याचे भानच हरपून तो पूर्णपणे बहिर्मुख झाला. आता तर तो बाह्य वास्तवाच्या इतका आहारी गेला की ह्या वास्तवाच्या दाहकतेनेच त्याचे डोळे पोळले आहेत. अर्थात, ही अवस्था निर्माण होण्यामागेही त्याचा अतिरेकी स्वभाव, त्याची आसक्तीच कारणीभूत आहे. आधुनिकवादाने काही मूल्ये मानवी जीवनाला जरूर पुरवली पण उत्तर-आधुनिकवादाने तर मूल्ये, संस्कृती, विचारधारांचाच अंत झाला आहे, हे ठामपणे म्हटले आहे. सद्य:स्थितीत तर याच अनुभवाची प्रतीती येते आहे. कोरोनापुढे सर्वच विचारधारा, संस्कृती, मूल्ये यांचे सपाटीकरण झाले आहे. जात, धर्म, वर्ण, वर्ग, लिंग, संस्कृती,भाषा, या भेदाच्या भिंती ओलांडून कोरोनाने सर्वांना एका समान पातळीवर आणले आहे. व्यष्टीचा जो अनुभव आहे तोच समष्टीचाही अनुभव आहे. अशा वर्तमानाच्या पोटातून उद्या कोणता भविष्यकाळ जन्म घेणार आहे, हा प्रश्न आज तरी अत्यंत जटिल होऊन बसला आहे आणि मानवी जीवनाला, मानवी संबंधांना, मानवी व्यवहाराला, मानवी संस्कृतीलाच प्रश्नांकित करून कधी नव्हे इतका या साऱ्या घटितांचा पुनर्विचार करायला अवकाश प्राप्त करून दिला आहे. "

या निमित्ताने एक मूलभूत प्रश्न निर्माण व्हावा, असे वाटते. तो असा – साहित्य असो की कला असो, त्या त्या काळाच्या प्रभावाखाली असणे आणि त्या त्या काळातल्या जगण्याला प्रतिक्रिया देत राहणे हेच असते का कलेचे काम ? प्रतिक्रियारूप जगणे तर पूर्ण माणूस या प्राण्याचेच वैशिष्ट्य दिसते. आहेत त्याच प्रतिक्रिया जरा कौशल्याने मांडणे हेच असते का कलेचे काम ? की आणखी काही असते ? आपण जी कला मौल्यवान समजतो ती फक्त एक हुशार, कार्यक्षम प्रतिक्रियेचीच अभिव्यक्ती असते का ? तसे असेल तर कोणतीही प्रतिक्रिया मौल्यवान ठरू शकते का आणि तशी ती ठरू शकत असेल तर कोणत्या कारणाने वा कारणांनी ते घडते ?
डॉ. टेंबे यांच्या वरील उताऱ्याच्या निमित्ताने यावर चर्चा घडावी, असे वाटते.
--- ००० ---

पोटमारा ( कादंबरी )
ले ० रवींद्र पांढरे, प्रकाशक ० लोक वाङमय गृह.
याच लेखकाच्या ‘ अवघाची संसार ‘ या कादंबरीवर मी २०१८ साली लिहिले होते. त्यातली ही वाक्ये --
“ ‘ मनोगता’ त लेखक काय म्हणताहेत ते पाहा – “ आध्यात्मिक पातळीवर चिंतन करण्याची माझी कुवत नाही. त्यामुळे चिंतनाला आपोआपच सामाजिक आशयाची डूब लाभली आणि एक स्वतंत्र सामाजिक कादंबरी लिहून झाली. “ मला जाणवले ते असे की या लेखकाकडे अत्यंत सखोल आणि परिपक्व चिंतनाची कुवत असून ही कादंबरी आध्यात्मिक वा सामाजिक नसून एक परिपूर्ण अशी ‘ मानवी ‘ कादंबरी आहे. “ तेच याही कादंबरीबद्दल म्हणता येईल.
दोन मुलगे, पत्नी लीलाबाईच्या पदरात टाकून तिचा पती तरुणपणातच मरून जातो. त्यानंतरची ही त्या कुटुंबाची कथा आहे. तसे ते एक गरीब शेतकरी कुटुंब असते. थोरला मुलगा शेतीच करत राहतो आणि धाकटा शेतीतलेही कष्ट करत का असे ना शिकत जातो आणि पुढे एम ए बी एड होतो. त्याला नोकरी मिळाली की चांगले दिवस येतील असे त्यांना वाटत असते. पण, मग भ्रष्टाचाराचे नमूने समोर येत जातात. शाळेत नोकरी हवी असेल तर अमुक एक, समजा पाच लाख, द्यावे लागतील, अनुदान मिळेपर्यंत बिनपगारी काम करावे लागेल, वगैरे. आता यात नीतीअनीतीचा, चांगल्यावाईटाचा प्रश्नच नाही. हा या समाजाच्या जगण्याचा ढाचाच झालेला आहे. ही पूर्ण कादंबरी अशा देवाणघेवाणींनी भरलेली आहे. आर्थिक, राजकीय, नातेसंबंधांतल्या अशा अनेक प्रकारच्या नाइलाजाच्या म्हणा की समजूतदारपणाच्या म्हणा, देवघेवी. दुसऱ्या एका कुटुंबात बारावीला असलेली एक मुलगी आहे आणि तिला पती शेतकरी नको असून नोकरीवाला हवा आहे. पण, तिच्या पायात थोडा दोष आहे. चांगली नोकरी असलेला मुलगा तिला कशाला स्वीकारेल ? तर, त्या मुलीचा मामा एका शाळेत पदाधिकारी आहे, त्याला सांगून त्या मुलाला नोकरी मिळवून द्यायची आणि त्या बदल्यात त्याने या मुलीशी लग्न करावे, असे विचार अंमलात येतात. हे झाले की, त्याला नोकरी मिळेल, हिला हवा तसा पती मिळेल, वगैरे. हे सर्व ठरूनही, ऐन वेळी एक राजकीय देवघेव आड येते आणि त्या मुलाला ती नोकरी नाहीच मिळत. सर्वांचे आयुष्य कसे सर्वांच्या आत्मकेंद्री प्रभावांतून जणू अटळ नियतीप्रमाणे चालू असते त्याचा ही कादंबरी एक मोठा आवाका घेते. ना ऊरबडवेपणा, ना आक्रोश ना विद्रोही क्रोध – लेखक, जे आहे त्याचे दर्शन घडवत जातो. पूर्ण समाजच किडलेला असून हे असे किडके जगणे जणू सर्वांना मान्यच आहे. त्या त्या वेळची प्रत्येकाची शक्ती, डावपेच आणि परिस्थितीची साथ यांवर प्रत्येकाचे यशापयश ठरणार ! या सगळ्याचा शेवट त्या मुलाच्या विहिरीत बुडून मरण्यात होतो. सगळेच असे सडके असल्यावर असा इकडेतिकडे नाश होत राहणारच, अशी ही नाइलाज-अवस्था !
पोटमारा म्हणजे पोट मारत, अर्धपोटी राहात, जगणे. एवढे कष्टपूर्वक शिकूनसुद्धा त्या मुलाचा असा नाश होणे हे अन्यायाचे, माणुसकीहीनपणाचे आहे, यात वादच नाही. पण कोण जबाबदार याला ? पूर्ण समाजानेच स्वीकारलेला हा ‘ जीवनमार्ग ‘ आहे ! यात परिवर्तन कुठे करणार ? ही व्यवस्था बदलायची म्हणजे कुठे काय करायचे ?

लेखक पांढरे कुठलाही बोध देण्याच्या फंदात पडत नाहीत. अमुक पुढारी वा तमुक पक्ष वा ढमुक विचारसरणी हे सर्व गुंते सोडवून माणसाचे जगणे सुसह्य करील, असे काहीही लेखक सुचवत नाही. ही कादंबरी म्हणजे बाहेरची कुणाची कथा वाचणे नसून स्वत:सह सर्वांच्या सडकेपणाचे दर्शन घेणे आहे. हे अर्थातच परिपक्वता देणारे आहे. मानवी प्रश्नांवर कोणतीही जादूची कांडी उपलब्ध नाही. प्रत्येकाला येणारी परिपक्वता हीच यातून कदाचित मुक्त करू शकते. त्या तिथल्या ग्रामीण जीवनावर लेखकाची प्रचंड मास्टरी आहे. मराठीतली ही एक ग्रेट कादंबरी आहे !
--- चं. प्र. देशपांडे.
--- ००० --- ( 26 एप्रिल 2021 ).

वस्तुत: तिच्या डोळ्यांत दोष होता -- एक डोळा चंद्रासारखा होता तर दुसरा सूर्यासारखा ! पण प्रेमात त्याचाही आनंद होतो -- जसा देवानंदला झाला --
तेरे ये दो नैना चाँद और सूरज मेरे !
ओ मेरे जीवनसाथी !
( चित्रपट ' गाईड ' )
01 May 2021.

विश्लेषण
निवडणुकीतल्या यशापयशाच्या विश्लेषणासाठी महत्त्वाचे मुद्दे --
1. कितीही झाले तरी मार्केटिंगचे महत्त्व आहेच. आय टी सेल आणि तंत्रज्ञांची टीम कुणाची जास्त कुशल होती.
2. कुणी कुणाची माणसे पळवली. भारतात एखादा पक्ष वाढेल तर तो असाच पळवापळवीनेच वाढेल. पक्षवाढीला बाहेरची कुठली माणसे आणणार.
3. गुंडगिरी ही आता एक सांस्कृतिक परांपराच मानायला हवी. बिनबोभाटपणे ही जमवायचे चातुर्य कुणी जास्त दाखवले.
4. जातिधर्मभेद हे व्यूह आखणीचे एक महत्त्वाचे क्षेत्र असणारच. ते कोण आपल्या बाजूला कितपत वळवून घेऊ शकले.
5. पैसा खूप लागणारच. कुठेतरी चार पत्रके वाटून कुणी निवडून येत नसते.
6. प्रादेशिक अस्मितांचे महत्त्व ओळखण्यात आणि त्या आपल्या बाजूने चेतवण्यात कोण यशस्वी झाले.
7. भावनिक आवाहन करण्याचे कौशल्य कुणी जास्त यशस्वीपणे वापरले.
8. पवारांच्या पावसाप्रमाणे ममतांच्या व्हीलचेअरचा प्रभाव कितपत पडला.
-- एवढे बास. हे सगळे चर्चांमधूनच सापडलेले मुद्दे आहेत. यांतले बहुतेक सर्वच मुद्दे सगळ्याच निकालांच्या वेळी उपयोगी पडतील. या सर्व बाबतीत सर्वांनी आपापले विचारस्वातंत्र्य तर वापरले पाहिजेच पण शिवाय परमतांबद्दल सहिष्णूही राहिले पाहिजे. किंवा आपणच खरे सहिष्णू असे वातावरण तरी तयार करता आले पाहिजे. या सर्व गोष्टींबरोबरच, कुणाचे विचार काय होते, ते लोकांना कितपत व का पटले असावेत हेही चर्चेत घ्यावे. लोकशाहीसाठी ते अत्यावश्यक समजावे.
--- 000 --- ०३ मे २०२१.

मित्रवर्य आशुतोष पोतदार यांची एक जुनी पोस्ट -- ती  आत्ता कशी आली समोर कोण जाणे, पण ती शेयर होत नसल्याने लिंक देतोय --

https://www.facebook.com/permalink.php...

सर्व पांढऱ्या सदाफुल्यांचे हितसंबंध संभाळण्यासाठी आपण तिघे एकत्र येऊन डावपेच आखू आणि रणनीती ठरवू !

**अद्यावतीकरण**

माझ्या संकेतस्थळाचे ( Website ) 01 मे 2021 पर्यंतचे अद्यावतीकरण ( Updating )  )झालेले आहे. त्यात, विशेष म्हणजे, ' रंगावाचा ' मध्ये आलेली एकांकिका
खुल्लम खुल्ला
आता जमा झालेली आहे. खालील दोन गोष्टी प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर असल्याने सध्या यात घेतलेल्या नाहीत ---
1. ' सांस्कृतिक फट -- ' या सतीश तांबे यांच्या कथासंग्रहाचे आस्वादन  करणारा लेख.
2. ' तंबाखूची टपरी ' हा अनुसर्जित कवितांचा संग्रह.
बाकी सर्व लेखन समाविष्ट केलेले आहे.
संकेतस्थळ --
www.champralekhan.com

**सत्योत्तर** ( post truth )

हा कालखंडच तसा आहे म्हणतात. सत्योत्तर. सत्य की अफवा, खरे की खोटे यांचा फारसा संबंध नसलेला. संबंधच काय, गरजही नसलेला, असेही म्हणायला हरकत नाही. हे तत्त्व फक्त बोलणाऱ्यांबाबतचे नसून ऐकणाऱ्यांबाबतचेही आहे. रेटून बोलणे याप्रमाणेच रेटून ऐकणे हेही तितकेच प्रभावी ठरते आहे. बऱ्याच लोकांनी, कुणावर वा कोणत्या बाजूवर विश्वास ठेवायचा हे ठरवूनच टाकलेले आहे. माध्यमांतून येणाऱ्या प्रत्येक गोष्टीची शहानिशा करणे, प्रत्यक्षात तिची सत्यासत्यता पडताळणे शक्य तरी कुठे असते ? त्यापेक्षा काही सोपा मार्ग काढणेच बरे ठरते ! सारखी खऱ्याखोट्याची चिंता करावी लागत नाही. तर्क, बुद्धी यांचा फारसा वैचारिक व्यायामही करावा लागत नाही. एखाद्या बुवा वा बाबावर श्रद्धा असावी तसाच हा प्रकार दिसतो. मग यातून एकमेकांच्या विरोधी श्रद्धा तयार होतात आणि धर्मयुद्धांसारखीच युद्धे आकाराला येतात ! परदेशातून आलेली स्तुती वा निंदा ही आपल्या श्रद्धेय बाबाबद्दल आहे की विरोधी बाबाबद्दल यावर ठरते काय खरे मानायचे ते. रोज इतकी माहिती, इतक्या बातम्या येणार, कुठे विचार करत बसणार ! त्यापेक्षा एकनिष्ठ पत्नीप्रमाणे सर्वस्वार्पण करून कुठेतरी वाहून घेणे कधीही चांगले आणि सोपे आणि नीतीमानही !
यातून अर्थातच बेसलेस -- पायाहीन वाद, भांडणे आणि मारामाऱ्याही होतात -- होणारच ! काळाचा महिमा आहे ! इलाज नाही ! आता काळ आपण घडवतो की नियती, काय माहीत ! इथे स्वत:वर विश्वास असणारे आणि नियतीवर विश्वास असणारे अशा टाईमपास वादाची एक वेगळीच संधी मिळू शकते. बोंबलायला काहीही कळणे जर शक्यच नाहीय प्रत्यक्षात तर आपल्या प्रामाणिक विचारातून  काहीही खरे मानायला काय हरकत आहे ?
--- 000 ---

माझ्या या आधीच्या पोस्टमध्ये दिलेला फोटो ओव्याच्या पानांचा होता -- मी ते चुकून ब्राम्ही समजलो होतो ! त्यामुळे, ती पोस्ट काढून टाकली आहे ! तरीही, ती चूक दाखवून देणाऱ्यांना भरभरून धन्यवाद !

शेकडो सूर्य पाहिलेला प्राणी –

**आशय परिवार**

( २३ एप्रिल २०२१. )

सोलापूरचे नीतिन वैद्य आणि त्यांचे सहकारी पुरुषोत्तम नगरकर व जयंत राळेरासकर मिळून दर वर्षी ग्रंथदिनाला ' आशय परिवार ' चा अंक प्रसिद्ध करत असतात. अलीकडेच त्यांनी त्र्यं. वि. सरदेशमुख या मराठीतल्या लेखक-कवी-समीक्षक यांच्याबाबत केलेले दर्जेदार संशोधनात्मक काम सर्वांना माहीतच आहे. यंदाचा अंक त्यांनी सादर केला आहे तो कवी कुंजविहारी यांच्या कामाबाबतचा आहे. त्यांचे हे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने ते औचित्यही साधले गेलेले आहे.

कुंजविहारींना देव आणि देश यांचे कवी म्हटले जाते. या अंकाच्या मलपृष्ठावर दिलेली, ' चिरंजीव होवो जगी लोकशाही ' ही कविता पाहण्यासारखी आहे. या अंकात प्रा. निशिकांत ठकार यांचा एक अत्यंत दर्जेदार असा कुंजविहारींवर लेख आहे. त्यात ते म्हणतात, " कुंजविहारींचे व्यक्तिमत्व सौम्य, भावनाप्रधान, संवेदनशील, समन्वयशील, तत्त्वदर्शी, विश्वधर्मी, शालीन, माराठमोळे आहे. " त्यांच्या या सर्व गुणांचा प्रत्यय येईल असा कुंजविहारींनी केलेला कबीराच्या शंभर दोह्यांचा अनुवाद हे या अंकाचे प्रमुख आकर्षण आहे. कबीराच्या या शंभर कविता भारताचे ग्रेट कवी रवींद्रनाथ टागोरांनी निवडलेल्या आहेत. टागोरांनी इंग्रजीत केलेल्या कबीराच्या या कवितांच्या अनुवादावरूनच कुंजविहारींनी हे मराठीतले अनुसर्जन केलेले आहे. टागोरांनी निवडलेल्या कबीराच्या कविता पाहता येणे हेही औत्सुक्याचे ठरणारे आहे. अंकाच्या शेवटी कुंजविहारींच्या कामाचे एकूण निर्देशनही अभ्यासपूर्ण आहे.

' कहत कबीरा ' या कुंजविहारींच्या अनुसर्जनातल्या या काही ओळी बघा –

मन होता मायातीत, मंत्रमय बने वाणी
देव दिसेना दिसेना, असणे हा त्याचा गुण
असूनिही नसायचे, जाणतात योगीजन
रोमरोमी देव खेळे, बाहेरली भाषा बंद
जिथे जिथे तीर्थ तेथे, पाहिले मी पाणी घाण
जिथे जिथे देव तेथे, जड लाकूड, पाषाण
ग्रंथ-भांडार धुंडुनी, उकलिले शब्दधागे
घट-पट शीण सारा, घडले ना मनाजोगे
काही ऐकिले पाहिले, अभ्यासिले सर्व काही
अनुभवावाचुनिया, समाधान कोठे नाही
तळमळे मनोवृत्ती, कुणा सांगू मी वेदना
दु:ख एका अंतरीचे कळते ना दुजा कुणा
पशुपक्षी किडामुंगी, जीव सारे जाणतात
गर्भातही सांभाळाया, देवाजीचा सिद्ध हात
भक्तिबळे आत्मस्थिती, अनायासे प्राप्त होते

भाषा थोडी जुनी पद्यप्रभावी आहे, पण मराठीतला हा एक मौल्यवान ऐवज या अंकाने वाचकांना आणि अभ्यासकांना दिलेला आहे. अनुवाद व अनुसर्जन यांचा बारकाईने अभ्यास करू इच्छिणाऱ्याला तर हा अंक खूपच महत्त्वाचा ठरेल. यासाठी आशय परिवार परिवाराचे अभिनंदन !

--- ००० ---

**एकत्र**

यूनिसेफ ने सांगितलेय की बाबांनो, विसरा ते तुमचे राष्ट्रवाद किंवा तुमच्या त्या राष्ट्रांच्या स्वार्थासाठीही का असे ना, भारताला सत्वर लागेल ती मदत करा आणि त्यांना वाढत्या कोव्हिड संकटातून बाहेर काढा. अन्यथा, तिथल्या वाढत्या संसर्गात कोव्हिड विषाणू अधिकाधिक आणि अनेकदा आत्मक्रांत होत जातील आणि मग ते पूर्ण जगालाच ग्रासून टाकतील. ' जगातल्या माणसांनो एक व्हा ! ' म्हणजेच, विसरा ते धर्म, प्रांत, भाषा, जाती, वर्ण, लिंग , सगळे आणि एक व्हा ! कॉमन म्हणजे समान शत्रू असला की एक व्हावे इतपत माणसाला समजते, त्यामुळे, या महामारीशी एकत्रितपणे मुकाबला करेलही माणूस. म्हणजेच, एकत्र येण्याने चांगल्या गोष्टी घडू शकतात. मग, हीच अक्कल पुढे वाढवून जगातले सर्व भेदाभेद विसरून सर्व माणसांच्या प्राथमिक गरजा भागवाव्यात, त्यांना एकमेकांशी सौहार्दाने वागत शांततेत, मजेत जगता यावे, अशी व्यवस्था का नाही तयार होऊ शकणार ?
पण ते नाही होणार. भूतकाळातून मिळणारा आत्मगौरव आणि परद्वेष विसरून जायचा ? युद्ध, शौर्य, पराक्रम हे काहीच ठेवायचे नाही ? सर्वश्रेष्ठ होणे, हीरो असणे, दुष्टांची जिरवणे, शत्रूंना देशोधडीला लावणे, सूड घेणे – हे काहीच नको ? बोअर म्हणजे कंटाळवाणे होईल सगळे जगणे ! आपण जगतो आहोत, हेही आपल्याला कळणार नाही ! आणि मग कलानिर्मिती कशावर करणार ? सगळेच एकमेकांशी सहज चांगले वागायला लागले तर संघर्षच बंद होणार ! मग सध्या, ' माणसा माणसा माणूस हो ' म्हणणारे कलाकार काय करतील ? ते प्रसिद्ध कसे होतील ? रटाळ होईल सगळे जगणे ! संघर्ष, घाण, हिंसा हे हवेच सगळे !
सगळ्यांनी एकत्र छान सहज जगणे म्हणजे अहंकारच नष्ट होणार ना ! मग जगणे रटाळ वाटायला असेलच कोण ? छे छे, नको तसे ! फारच वाट लागायची वेळ येईल तेव्हा मानवतेच्या भूमिकेतून शत्रूलाही करू मदत – सर्वांनी जिवंत तर राहायलाच हवे ! त्याशिवाय जगण्यातली घाण वाढवून, ते अधिकाधिक दु:खमय करून ते अधिकाधिक इंटरेस्टिंग कसे करता येईल ? बिना अहंकाराचे जगणे आपल्याला नाही माहीत आणि ते शक्यही नाही वाटत – त्यामुळे, लाईफ इंटरेस्टिंग करण्याच्या आपल्या सर्व कृतीही चालूच राहायला हव्यात ! या महामारीने मरण्यापेक्षा शौर्य गाजवत, एकमेकांना मारत मरू ! त्यातूनच स्वर्ग घडवण्याचे प्रयत्नही चालू ठेवू ! स्वर्ग म्हणजे काय ते आम्हीच ठरवणार एवढेच आमचे न्याय्य आणि नैतिक म्हणणे आहे ! बास !
--- ००० ---

कौशल इनामदार

अत्यंत अभ्यासू आणि स्वत:ची मर्मदृष्टी असलेला संगीतकार आणि आमचा जुना मित्र कौशल इनामदार याची दिनेश अडावदकरांनी घेतलेली मुलाखत आत्ताच दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर पाहिली. अडावदकरांचे प्रश्न तर चांगले होतेच पण कौशलची सर्जकता अधिक कशी व्यक्त होईल याचीही त्यांनी काळजी घेतली होती. चाली तयार होण्यामागची कलाप्रक्रिया कौशलने छान उलगडून दाखवली. पुल, कुसुमाग्रज यांच्याबाबतच्या त्याच्या आठवणीही खास होत्या.
मराठीतल्या एका दर्जेदार, चिंतनशील संगीतकाराची ही मुलाखत, कौशलने थोडेफार गाऊनही दाखवल्यामुळे विशेष श्रवणीय झालेली आहे.
छान वाटले !
--- ००० ---

समीर दळवी
या आपल्या मित्राने आजच्या ' आपलं महानगर ' मध्ये ' रंगावाचा ' च्या विशेष अंकाला दिलेली मनमुराद दाद --
( तिथे शेयर ही निवड नसल्याने कॉपी-पेस्ट करतोय -- )
आजचा लेख - दैनिक आपलं महानगर - सारांश

सध्या कोरोनाची दुसरी लाट आली आहे. या लाटेचा जोर पहिल्या लाटेपेक्षा अधिकच विध्वंसक आहे. जिथे शासनाने पहिल्या लाटेतच आपल्या नाट्यक्षेत्राला आणि पर्यायाने अवघ्या मनोरंजन सृष्टीला शेवटच्या प्राधान्याने वागविलं होतं, तिथे आताच्या या अधिक प्राणघातक लाटेत आधीपेक्षा सुधारलेलं प्राधान्य आपल्याला मिळेल, अशी अपेक्षा बाळगणंच व्यर्थ होतं. साहजिकच, सगळे नाट्यव्यवहार पुन्हा एकदा अनिश्चित वेळेपर्यंत ठप्प झाले आहेत. अशा या अस्वस्थतेने भारलेल्या दिवसांत वाळवंटात पाणी सापडावं तसा 'रंगवाचा' या रंगभूमीविषयक नियतकालिकाचा अंक घरपोच मिळाला. कोरोनाच्या या वांझोट्या काळात ख-या अर्थाने जे रचनात्मक काम झालं, त्याचा दस्तावेज म्हणजे हा कणकवलीच्या वसंतराव आचरेकर प्रतिष्ठानच्या नाटकाला वाहिलेल्या नियतकालिकाचा ताजा एकांकिका विशेषांक होय.
गेल्या डिसेंबर महिन्यात याच सदरातून लिहीतांना 'एकांकिका' या नाट्यप्रकाराविषयी, तिच्या आजवरच्या प्रवासाविषयी आणि सद्यस्थितीविषयी उपलब्ध शब्दमर्यादेत काही मुद्दे मांडले होते. एक सुजाण नागरिक घडवण्याच्या प्रक्रियेत बालरंगभूमी जी भूमिका बजावत असते, तशीच भूमिका एक प्रगल्भ रंगकर्मी घडविण्यात एकांकिका स्पर्धांची आहे. 'एकांकिका' हा एक लघु पण तितकाच सघन नाट्याविष्कार आहे. तेव्हा त्यांचं सादरीकरण फक्त शहरी महाविद्यालयीन स्पर्धांपुरतं मर्यादित असणं, हे काही अंशी मारक आहे. नाही म्हणायला मुंबईच्या अमर हिंद मंडळासारख्या काही संस्था जरूर आहेत, ज्यांनी खुल्या गटातील रंगकर्मींना एकांकिकेचा फॉर्म हाताळून पाहण्यासाठी रंगमंच उपलब्ध करून दिला. तळकोकणातील कणकवलीमध्ये वसंतराव आचरेकर प्रतिष्ठान गेली कित्येक वर्षे एकांकिका महोत्सवाचे आयोजन यशस्वीरित्या करते आहे. दरवर्षी एक लेखक निवडून त्याच्या निवडक एकांकिकांचे प्रयोग सादर करण्यासाठी महाराष्ट्रातील मान्यवर संस्थांना तिथे पाचारण केले जाते. त्याशिवाय, शालेय आणि खुल्या गटात घेतल्या जाणा-या एकांकिका स्पर्धा ह्या या संस्थेच्या दरवर्षीच्या उपक्रमांचा भाग आहेत. दरवर्षी डिसेंबर ते जानेवारीच्या महिन्यात पार पडणा-या या उपक्रमांत यावेळेस कोरोनाने खोडा घातला. परिणामी, या स्पर्धांचं आयोजन दुर्दैवाने रद्द करावं लागलं. प्रत्यक्ष रंगभूमीवर एकांकिकेचे प्रयोग होऊ शकले नाहीत. त्याची रुखरुख वसंतराव आचरेकर प्रतिष्ठानच्या धुरीणांना स्वस्थ बसू देईना. गेली त्रेचाळीस वर्षे सलग सुरू असलेला हा उपक्रम खंडीत होऊ देणं कुणालाच पटत नव्हतं. प्रत्यक्ष स्पर्धेची कमतरता भरून काढण्यासाठी त्यांनी एकांकिका लेखन स्पर्धा जाहीर केली. 'बॅरिस्टर नाथ पै एकांकिका लेखन स्पर्धा, २०२०' असं या स्पर्धेचं नामकरण केलं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोरोनाकाळासारख्या माणसांमध्ये शिथिलता आणणा-या काळातही या लेखन स्पर्धेला अपेक्षेपेक्षा कितीतरी मोठा प्रतिसाद मिळाला. कोरोनाकाळात गिळून टाकणा-या अस्वस्थतेला भिडत अनेक स्पर्धक आणि मान्यवर निमंत्रित लेखकांनी आपली सृजनशीलता उपयोगी आणली आणि नव्याको-या ताज्या एकांकिकांचं लेखन केलं. कोरोनाकाळात व्यापून राहिलेल्या अस्वस्थतेला प्रत्येकाने आपल्या परीने दिलेली ही एक ठोस प्रतिक्रिया आहे, असं मला या निमित्ताने आवर्जून म्हणावंसं वाटतं. या निमित्ताने लिहील्या गेलेल्या एकांकिकांचे आशय, विषय, दर्जा आणि गुणवत्तेविषयी बोलण्यासाठी ही जागा नव्हे, याचं मला पूर्ण भान आहे. सद्यस्थितीत इतकं सारं ताजं नाट्यलेखन इतक्या लोकांकडून लिहून होतंय, हीच मनाला उभारी देणारी खूप मोठी बाब आहे.
तरीही, हा सगळा उत्साह, व्यक्त होण्याची असोशी पुरेशी समजून घेतल्यानंतर आता कुठल्याही लेखनाची महत्ता ज्या निकषांवर जोखली जाते, त्यांपैकी एक म्हणजे लेखनाचा घाट, त्याविषयी थोडंसं बोलावंसं वाटतं. अलिकडे बहुतांशी एकांकिका हा प्रकार लेखकाने त्याची भडास काढण्यासाठी वेठीला धरल्यासारखा जाणवतो. भडास म्हटली की ती अस्ताव्यस्त वाहत येते किंवा अस्ताव्यस्त वाहते म्हणून ती भडास असते. मेंदूत घोळत असलेले विषय,

खटकणारं आसपासचं राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण, जगण्यातले विरोधाभास, जवळजवळ अशक्य वाटणा-या कल्पना ज्याला आपण फँटसी म्हणून स्वीकारावं असं, कागदावर उतरवायचं. एकाच पात्राच्या तोंडी पानपानभर संवाद लिहायचे. असं ब-याच एकांकिकांमध्ये खूपदा वाचलंय. अर्थात, सन्माननीय अपवाद वगळले, तर एकांकिकेलासुद्धा क्राफ्टिंग असणं गरजेचं आहे, याची जाणिव दुर्मिळ झाल्यासारखी वाटते. क्राफ्टिंग इज ए डिफरंट आर्ट ऑलटुगेदर ! ॲब्सर्डिटी, जगावेगळ्या फँटसीज, सामाजिक, लोकाभिमुख, बक्षिसपात्र आणि इतर बरंच....कुठलाही आशय विषय असो, तो मांडताना एक प्रकारची सूचकता असावी, लिखाणातला घाट हवा, एक लोकविलक्षणपणा हवा. अर्थात, एकांकिका या माध्यमाला धरून असलेली ही माझी वैयक्तिक अपेक्षा आहे. ती सर्वमान्य असेल किंवा असावीच असा माझा दुराग्रह अजिबातच नाही. फार तर एक पर्सनल चॉईस म्हणूया.
'रंगवाचा'च्या विशेषांकातल्या तीस एकांकिकांपैकी निमंत्रित मान्यवर लेखकांनी लिहिलेल्या एकांकिका वाचल्यास उपरोक्त अपेक्षा बव्हंशी पूर्ण करतील अशा ताज्या रचना रंगकर्मींना करून पाहण्यासाठी उपलब्ध झाल्या आहेत. उल्लेख करायचा झाला तर चं. प्र. देशपांडेंची 'खुल्लम खुल्ला', प्राजक्त देशमुखची 'लाल', इरफान मुजावर यांची 'जन्नत-उल-फिरदोस', दत्ता पाटीलची दगड आणि माती' आणि विजयकुमार नाईक यांची 'मोहोळ' या एकांकिका माझ्या व्यक्तिगत पसंतीला उतरल्या. या एकांकिकांचा आशय विषय काय आहे याची चर्चा इथे मी करणार नाही. त्या ऐवजी समस्त रंगकर्मींना 'रंगवाचा' या नियतकालिकाचे सभासद होऊन अंक मिळवून या तीस एकांकिका प्रत्यक्ष वाचण्याचं आणि उद्याची वेळ आपल्या बाजुने असलीच, तर त्यांचे प्रत्यक्ष प्रयोगही करण्याचं आवाहन नाटयरसिकांच्या वतीने मी या सदरातून करतो आहे.
गेलं दीड वर्ष कोरोना काळ हा जणू आपली परीक्षाच घेतो आहे. नाटक हे मुळातच करून पाहण्याचं माध्यम आहे. तसं करून पाहण्यालाच सध्या अराजकीय स्वरूपातील बंदी घालण्यात आली आहे. हा बंदीवास केव्हा संपेल आणि हौशी, प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमी पुन्हा एकदा गजबजून उठेल, याची वाट पाहण्याशिवाय हातात काही उरलेलं नाहीय. या भयाण शांततेचा परिणाम आपल्या सृजनशीलतेवर होईल आणि एकतर आपण पूर्णत: ग्रासले तरी जाऊ किंवा राखेतून उठणा-या फीनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा झेप घेऊ. ती झेप घेण्यासाठी आधी पंखांत जे बळ असायला हवंय, तेच या विशेषांकात एकांकिका लिहीणा-या समस्त लेखकांनी दाखवून दिलंय. 'रंगवाचा'ने पुरवलेली ही रसद सध्या तरी खूपच मोलाची आहे. त्यासाठी त्यांचे अनेक आभार !
--- ००० ---

**एक कवितासंग्रह**

तुम्हाला काही तीव्र दु:ख आहे का, कोणत्याही कारणाने तुम्ही अत्यानंदात आहात का, तुम्हाला काही जीवनमरणाची वा एखादी साधीशीच का असे ना, समस्या त्रस्त करते आहे का, सामाजिक, आर्थिक वा राजकीय कारणांनी तुमच्यावर काही अन्याय चालू आहे का, स्त्री-पुरुष संबंधांतले काही विशेष बारकावे तुम्हाला जाणवत आहेत का, तुम्हाला खूप एकाकी वा निराश वाटते आहे का, जगण्यातली निरर्थकता जाणवते आहे का, आंतरद्वंद्वांमुळे काही नैतिक प्रश्न बिकट झाले आहेत का, एकूणच मूल्यहीन वाटत असल्याने भाषेचे अडवेतिडवे खेळ करत आहे ते साजरे करावे असे वाटते आहे का, स्वप्न, भ्रम आणि मनाची विचित्र अवस्था अशा काही बाबींतून तुम्हाला जगणे काही वेगळेच दिसते आहे का, कविता हा प्रकारच दांभिक वाटत असल्याने भाषा कशीही निरर्थकतेसाठीच वापरायची आहे का, तुमचे बदलते मूडस तुम्हाला एंजॉय करायचे आहेत का, निसर्गसौंदर्याचे तुम्हाला जाणवणारे हजार विभ्रम तुम्हाला व्यक्त करायचे आहेत का, तुम्हाला राग-तिरस्कार-शौर्य असे काही व्यक्त करायचे आहे का, तुम्हाला स्फूर्तिदायक वा बोधप्रद असे काही लिहायचे आहे का, प्रतिमांची श्रीमंती  दाखवत तुम्हाला चमत्कार करून दाखवायचे आहेत का, रोजच्या जगण्यात सामान्यत: सगळ्यांनाच येणारे अनुभव जरा कलात्मक करून तुम्हाला हसू आणि आसू निर्माण करायचे आहेत का, गतकातरता वा बालपणीच्या आठवणी वा आईचे प्रेम हे तुम्हाला व्यक्त

करायचे आहे का – असे आणखीही काही – हुश्श --- तर या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर – नाही हो, असले काहीच नाही – असे असेल तर ? मग कुणीही म्हणेल की बाबा मग तुम्ही कविता लिहिता तरी का आणि कशासाठी ? तर, समजा, काही नाही, तुम्ही म्हणताय ते काही नसूनही हेही एक मन आहेच ना – त्या मनाला उपलब्ध भाषेतून नक्षीकाम करायचा हक्क नाही आहे का ? मनाच्या इतर सर्व अवस्था चालतात तर ही का चालू नये ? – या प्रश्नाचे उत्तर शोधायला प्रवृत्त करणारा एक कवितासंग्रह आलेला आहे --

सटल
अनिरुद्ध दिवाकर आचार्य
वर्णमुद्रा प्रकाशन.

कोणत्या ना कोणत्या किंवा कोणत्याही मानसिक अवस्था जर कवितेतून व्यक्त होऊ शकतात तर सहज काही शाब्दिक नक्षीकाम करणारे मन का बहिष्कृत समजावे ? या संग्रहाचे मला एक वेगळेच महत्त्व वाटते. कोणत्याही मानसिक अवस्थांना अभिव्यक्ती देत राहण्याचे तरी काय महत्त्व आहे मुळात ? करमणूक वा पुन:प्रत्यय ही उत्तरे सोडून याचे काय उत्तर देता येईल ? – हे आव्हानात्मक प्रश्न समोर आणण्याचे काम हा संग्रह करू शकतो.
--- ००० ---

रवींद्र लाखे यांची पोस्ट --

कवी आणि नाटककार चं.प्रं देशपांडेंच्या मते मराठी कविता खालील सतरा कारणानी लिहिली जाते--
१.कवीला तीव्र दु:ख आहे असल्यास कविता लिहिली जाते,
२.कोणत्याही कारणाने कवी अत्यानंदात असल्यास कविता लिहिली जाते,
३.कवीला जीवनमरणाची वा एखादी साधीशीच का असे ना, समस्या असल्यास कविता लिहिली जाते,
४.सामाजिक, आर्थिक वा राजकीय कारणांनी कवीवर काही अन्याय चालू असल्यास कविता लिहिली जाते,
५.स्त्री-पुरुष संबंधांतले काही विशेष बारकावे कवीला जाणवत असल्यास कविता लिहिली जाते,
६.कवीला खूप एकाकी वा निराश वाटत असल्यास, जगण्यातली निरर्थकता जाणवत असल्यास कविता लिहिली जाते,
७.आंतरद्वंद्वांमुळे काही नैतिक प्रश्न बिकट झाले असल्यास कविता लिहिली जाते,
८.एकूणच मूल्यहीन  वाटत असल्याने भाषेचे आडवेतिडवे खेळ करत आहे ते साजरे करावे असे वाटत असल्यास कविता लिहिली जाते,
९.स्वप्न, भ्रम आणि मनाची विचित्र अवस्था अशा काही बाबींतून कवीला जगणे काही वेगळेच दिसत असल्यास कविता लिहिली जाते,
१०.कविता हा प्रकारच दांभिक वाटत असल्याने भाषा कशीही निरर्थकतेसाठीच वापरायची असल्यास कविता लिहिली जाते,
११.कवीला कवीचे बदलते मूडस एंजॉय करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१२.निसर्गसौंदर्याचे कवीला जाणवणारे हजार विभ्रम कवीला व्यक्त करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१३.कवीला राग-तिरस्कार-शौर्य असे काही व्यक्त करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१४.कवीला स्फूर्तिदायक वा बोधप्रद असे काही लिहायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१५.प्रतिमांची श्रीमंती दाखवत कवीला चमत्कार करून दाखवायचे असल्यास कविता लिहिली जाते,

१६.रोजच्या जगण्यात सामान्यत: सगळयांनाच येणारे अनुभव जरा  कलात्मक करून कवीला हसू आणि आसू निर्माण करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
१७.गतकातरता वा बालपणीच्या आठवणी वा आईचे प्रेम हे कवीला व्यक्त करायचे असल्यास कविता लिहिली जाते,
--- ००० ---

**माझे लेखक वा कवी असणे**

काही एका निमित्ताने कविता लेखनामागची कारणे काय असू शकतात ते लिहिले गेले. मित्रवर्य लाख्यांना ते इंटरेस्टिंग वाटले. त्यांनी सरळ त्या कारणांना क्रमांक देऊन त्याची एक वेगळी पोस्टच टाकली. यात खरे तर विशेष काहीच नव्हते. पण काहींना ते आवडले नसावे किंवा काहींना तर त्याचा रागच आला असावा, असे दिसून आले. ही काय भानगड ? समजा, एवढीच नसतात कारणे, ही आणखी चार असतात बाबा, म्हणा ना, चिडायचे काय कारण आहे ? कुणीतरी हे सगळे कायप्पा वरही नेले. ' स्वत:ला श्रेष्ठ समजणारे ' असे मला अभिधान देण्यात आले. अरे, सामान्यत: लिहिणाऱ्या प्रत्येकाला वाटत असते की तो काही मौल्यवान निदान दखलपात्र काही काम करतो आहे. त्यामुळे, ते अभिधान सोडून देऊ. पुढे ते सज्जन म्हणतात की मी आडव्या ओळी उभ्या लिहून त्यांना कविता म्हणतो, ते त्यांच्या डोक्यात जाते. माझ्यापेक्षा नवे कवी खूप चांगल्या कविता लिहितात. यावर माझे काही म्हणणे नाही. पण, एक त्रास मी घालवू शकतो किंबहुना घालवू इच्छितो. एक साधा, सोपा उपाय आहे. आपण कवितांचे दोन भाग पाडू – एक पद्य कविता आणि दुसरी गद्य कविता. मी गद्य कविता लिहितो, असे म्हणू. इथे एक लक्षात घ्यावे लागेल की गद्य कविता लिहिणारे कवीही खूप आहेत. जगभरात तर आता हा चर्चेचा विषयही नसतो. पण, आपल्याला येतो राग, तर मराठीत आपण गद्य कविता हा विभागच कमी दर्जाचा असतो, असे जाहीर करू. ते काहींना पटेल, काहींना नाही पटणार. मग ज्यांना नाही पटत ते कोण टिकोजीराव वगैरे म्हणत बसून उपयोग नाही. कवितेतले संगीत वा तिची गेयता हे कवितेचे अटळ वा व्यवच्छेदक लक्षण नसते, हे आपण हळूहळू समजून घ्यावेच लागणार आहे. गद्य कवितेतही ओळींची रचना, शब्दांचा क्रम, आंतरसंबंध आणि हे सगळे व्यापून असणारी सूचकता महत्त्वाची असते. माझ्या कवितेत ते असते असे काही म्हणतील, काहीजण म्हणतील, तसले काहीही नसते, फालतू असते ती कविता. यातही, अर्थात, मला काही प्रॉब्लेम नाही.
मी नाटकेही लिहितो, ती प्रायोगिक प्रवाहातली म्हटली जातात. त्यामुळे, किती प्रेक्षक आले आहेत याची आम्हाला चिंता नसते. चार लोकांपुढेही प्रयोग होतो. तेच तत्त्व कवितेत. तुम्ही येऊन वाचाच असा आग्रह नाही. तुमच्या हे डोक्यात जाते तर तुम्ही लांबच राहा ना. कशाला त्रास करून घेत राहता ?
कुणी गंमत केली, कुणी नाराजी दाखवली, कुणी म्हणाले, कवी लिहितो कविता, कारणेबिरणे नंतर चिकटवली जातात, कुणी म्हणाले, विचारच नाही करायचा, कविता आवडली, बास. एखाद्याला ही कारणे मांडण्याचा इतका राग आला की तो म्हणाला मग, या कारणांशिवाय लिहिणाऱ्यांना काय दैवी आदेश असतो काय ? पण, हे जरा गूढच वाटते ! काय असावे कारण या रागाचे वा खळबळीचे, हा प्रश्न अनुत्तरितच राहातोय.
कोणत्याही लेखकाला, ' अरे ग्रेट ' पासून ' रद्दड ' पर्यंत काहीही प्रतिक्रिया ऐकायची तयारी ठेवावीच लागते. तसे नसेल तर हे क्षेत्र महादु:खाचे होऊ शकते. माझी ' बस ' ही एकांकिका जेव्हा रंगायनने केली तेव्हा ते अशा नामवंत संस्थेने माझे काही प्रथमच सादर करणे होते. त्या एकांकिकेला माधव मनोहर ' सोबत ' मधून म्हणाले, ' हा कुठला लेखक आणलाय धरून ! ' त्याच वेळी त्याच एकांकिकेला ज्ञानेश्वर नाडकर्णी ' टाइम्स ऑफ इंडिया ' तून म्हणाले, ' बस इज बेस्ट ! ' तर, हे चालणारच. आता राहिला प्रश्न, मी स्वत:ला श्रेष्ठ लेखक समजण्याचा. याचे खरे उत्तर असे आहे की सर्जक प्रक्रियेत हा काही प्रश्नच नसतो. पण, म्हणू आपण एक संभाव्य सत्य म्हणून की हो, मी खरेच स्वत:ला श्रेष्ठ लेखक समजतो. पण  त्याचा कुणाला काही प्रॉब्लेम असायचे कारणच काय ? मी एक फालतू लेखक आहे असे तुम्ही म्हणा ना !
सारांश, मी ज्या लिहितो ओळी त्यांना आपण ' कविता ' न म्हणता, ' गद्य कविता ' म्हणू – बास ?
--- ००० ---

तीन पिढ्या एकत्र ---

नेट बंद होते -- आमच्या भागात गेले काही दिवस हा
असा त्रास चालू आहे –

**महापूर**

काल माझी पंच्याहत्तरी झाली. इथे फेसबुकवर आणि कायप्पावर सदिच्छांचा अक्षरक्ष: महापूरच आला ! शक्य तो प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे प्रतिसाद देण्याचा, शुभेच्छांचा स्वीकार करण्याचा प्रयत्न केला. तरीही, अनवधानेने कुणी राहिले असेल तर त्यांना आणि पुन्हा एकदा सर्वांनाच धन्यवाद देतो. मला कल्पना आहे की हे प्रेम माझ्या व्यक्तिमत्वाचे वा माझ्या आत्मकेंद्रित जगण्याबद्दलचे नसून त्यातून बाहेर पडून होणाऱ्या माझ्या लेखनाबाबतचे आहे. त्यामुळे, व्यक्ती म्हणून ते मध्येच ढापून मी हुरळून जाण्याचा प्रश्नच नाही.
गिरीशने त्याच्या पोस्टमध्ये माझ्या कवितांचा विशेष उल्लेख केला, तो मला महत्त्वाचा वाटला. माझ्या कवितांतून मराठीत यापूर्वी न घडलेले काही घडते आहे असेच माझेही आकलन होते पण हा दुजोरा आवश्यकच होता. लाख्यांनी, त्यांच्या पोस्टमध्ये, माझी आणि जेकेंची जन्मतारीख एक असल्याचा उल्लेख केला. इथे माझ्या एका काकांची आठवण झाली. ते म्हणत, ' लोक टिळकांचा कित्ता गिरवण्या ऐवजी त्यांचा अडकित्ता घेतात ! ' म्हणजे त्यांचे सुपारीचे व्यसन फक्त घेतात ! जन्मतारखेचा हा योगायोग तसा ठरू नये म्हणजे झाले ! माझ्या पत्नीचा भाचा डॉ . उमेश देशपांडे याने माझ्या तुकाराम प्रेमाचा विशेष उल्लेख केला. नुसती ' सामाजिक फलश्रुती ' म्हणून नव्हे तर कोणत्याही काळात स्वत:चे जगणे समजण्याची शक्यता निर्माण करणारा हा मराठीतला एक दीपस्तंभ आहे. माझ्या जगण्यात तुकारामाचे तेच स्थान आहे. निसर्ग देशमुखने माझ्या एका गुणाचा उल्लेख केला आहे, तो म्हणजे, माझा फेसबुकवरचा वावर आणि कुणाशीही मुक्त संपर्काला तयार असणे. कदाचित हा विशेष माझ्यात बँकेच्या नोकरीमुळे विकसित झाला असावा. मटक्याच्या आकड्यांची ने-आण करणाऱ्यांपासून सर्वांशी मला बोलता-वागता आले. एका खेड्यात एक अल्पसंख्याक मुलगा होता तो अशी कामे करत असे. म्हटले, अरे, एवढयावर तुझे कसे भागेल, काहीतरी धंदा कर. मग बँकेतर्फे त्याला सायकल दुकानासाठी कर्ज दिले. त्याला जोडून त्याने एक पान टपरीही टाकली. पण, कालांतराने आणखीही एकदोन सायकल दुकाने झाली. शिवाय, शिक्षकांना सायकलींसाठी कर्जे देण्याची एक योजना आली. मी शाळेशाळेत जाऊन त्या योजनेचा प्रचार केला आणि ५०-६० शिक्षकांना सायकली दिल्या ! परिणामत: त्या भागात सगळीकडे नव्याकोऱ्या सायकलींचा चमचमाट सुरू झाला. त्यामुळे, या आमच्या मटकामित्राच्या सायकली भाड्याने जाणे कमी होऊ लागले. अरे, म्हटले, आमची बँक एकदा एकाला गटारातून बाहेर काढल्यावर पुन्हा त्याला तिकडेच पडू देणार नाही. मग त्याला नव्या सायकली घेण्यासाठी पुन्हा कर्ज दिले ! अशी अनेक आहेत उदाहरणे. माझ्या कामातून, माझ्या अधिकारात असलेली अशी खूप सामाजिक बांधिलकी मी केली. ते सगळे सांगत बसत नाही. तर सर्वांत मिसळणे, सर्वांशी गप्पा मारणे हा माझ्या जगण्याचा नमूनाच घडत गेला. आपल्या वाट्याला आलेल्या जगण्यातूनच तर आपण घडत जातो.
खोटे कशाला बोलू, या अशा प्रचंड आत्मीयतेने भारावून जाण्याचा स्वार्थ नकळत साधला गेलाच आहे. त्याबद्दल, पुन्हा एकदा, पण वेगळे धन्यवाद देतो !
१२ मे २०२१.
--- ००० ---

आजच्या पुणे मटा मधली एक विशेष चौकट --
उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेच्या कामाची प्रशंसा केली आहे. त्यामुळे पुण्यामध्ये असे प्रकार होता कामा नयेत, याबाबत महापौर ------ आणि महापालिका आयुक्त ---- यांच्याशी चर्चा केली आहे.
-- उपमुख्यमंत्री.

काही लोक जी डी आर्ट असतात -- माझ्या नातीची ही सी डी आर्ट –

डॉ . मिलिंद अत्रे
हे विद्वान संशोधक एबीपी माझा च्या कट्टा वर होते. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत बोलताना त्यांनी काही महत्त्वाचे मुद्दे सांगितले. माझा वर ज्ञानदा कदम वृत्तनिवेदनही करते आणि सूत्रसंचालनही करते. तसे रोबो करू शकेल का, असे विचारले असता ते म्हणाले की तो निवेदन करू शकेल पण ज्ञानदाच्या चेहऱ्यावर जे कधी स्मित, कधी हास्य असते ते देणे त्याला जमणार नाही. ( हे खरेच आहे. तिच्या चेहऱ्यावर एक निर्मळ प्रसन्नपणा आहे, त्यासाठीही तिचे टीव्हीदर्शन छान वाटते ! ) दुसरे एक त्यांनी सांगितले की रोबोला विनोद किंवा उपरोध कळायची शक्यता दिसत नाही. ग्रेट ! नेटवर काही शब्दांतून कविता घडवून देणारी यंत्रे आहेत, हे काहींना माहीत असेलच. पण ती यंत्रे चिंतनशील वा ' सर्जक ' असणे सध्या तरी दृष्टीपथात नाही. याचाच अर्थ, लेखक, कलावंत यांना मरण नाही ! पूर्ण शब्दकोश डोक्यात घेऊन वावरणारा संगणक वा विद्वान तुकारामाचा एखादा अभंग नाही लिहू शकत. त्यासाठी जगण्यातल्या मूलभूत समस्या दिसणे आणि त्या समजण्याची तातडी वाटणे हेच महत्त्वाचे असणार आहे. आलेला अनुभव नुसता परावर्तित करणे वेगळे आणि सर्जकता वेगळी !
--- ००० ---

दहावी
१. मुलांमध्ये कोव्हिड नको जास्त पसरायला या काळजीपोटी राज्य सरकारने दहावीची परीक्षा रद्द करायचा निर्णय घेतला.
मग प्रकरण कोर्टात गेले.
२. कोर्ट म्हणाले की असे आततायी निर्णय घेऊन मुलांच्या भविष्याशी खेळ करता येणार नाही. बारावीची घेऊ शकता परीक्षा तर दहावीची का नाही ?
अशा प्रकारे चेंडू पुन्हा सरकारकडे आला.
३. सरकार म्हणतेय की परीक्षा देण्यासारखी मुलांची मनस्थिती नाही आहे. अशा वेळी त्यांच्यावर परीक्षा लादणे योग्य होणार नाही.
तसे तर चेंडू विद्यार्थी आणि पालक यांच्याकडे येऊच शकत नाही. त्यांच्या एकत्रित निर्णयाची यंत्रणाच उपलब्ध नाही, तशी ती असूही नाही शकत.
४. पालक आणि विद्यार्थी आता तज्ञ, योग्य, परिपूर्ण, भविष्यवेधी, माणुसकीयुक्त, न्यायाच्या, सहानुभूतियुक्त आणि करेक्ट निर्णयाची वाट पाहात आहेत. परीक्षेचे ठरेल काहीतरी पण पुढे अकरावीच्या प्रवेशाचे काय असतील निकष, हा प्रश्न आजच सगळ्यांना भेडसावतो आहे.
सत्ताधारी असोत की विरोधक, सर्वांनाच मुले असतात, ही यातली गोची आहे !
--- ००० ---

चोरून ऐकणाऱ्या पात्रांची मालिका

सध्या एका मालिकेत असे दिसतेय की, निरपवादपणे, मुख्य पात्रापासून ते इतर सर्वच पात्रांपर्यंत सर्वांनाच चोरून ऐकायची सवय आहे ! कोणतीही दोन पात्रे बोलत असली की तिसरे एखादे पात्र येऊन कडेला उभे राहून त्यांचे संभाषण ऐकत राहते आणि मग जरा वेळाने त्या संभाषणात प्रतिक्रियारूप भाग घेते ! लहान, मोठ्या सर्वच पात्रांचे हे वागणे पाहून, इथे महाराष्ट्रात चोरून ऐकणे हा एक सर्वमान्य, सभ्य प्रकार असणार, असा समज सर्वदूर पसरू लागलेला आहे !
' आई कुठे --- ' वाले, वेगळ्या काही युक्त्या काढा ना शोधून !
--- ००० ---

थोडीफार तांत्रिक आवड आणि जाण  असणाऱ्यांना कृतीसाठी प्रोत्साहित करेल असा हा व्हीडियो जरूर बघा -- आपले मित्र मनोज गांगल यांनी ही यंत्रणा प्रत्यक्षात आणलेली आहे ! त्यांनीच म्हटल्याप्रमाणे ही काही परिपूर्ण सुविधा नाही आहे, परंतु, अवघड परिस्थितीत प्राणरक्षक मात्र ठरू शकते.
Home made Oxygen Concentrator

वातावरणच असे झालेय की " ते अमुक माहिती आहेत ना " अशी कुणी सुरुवात केली की " ते गेले " असेच येते मनात !

" सोड ते ! नशीब इतके थोर असते तर आज
चोक्सीच्या ऐवजी मी असतो अटकेत ! "

दिठी
किशोर कदमने दु:खाचा धक्का बसलेला, विठ्ठलाबाबत भ्रमनिरास झालेला, पराभूत रामजी पूर्ण समजुतीने वठवलेला आहे. त्यासाठी त्याला १०० टक्के गुण. इतरही सर्वांचा अभिनय चित्रपटातल्या ‘ सांगण्या ‘ ला बढावा देणारा. बाकी सतत पाऊस असणे आणि जगण्याला एक मलूल, नाइलाजाची गती असणे, हेही नीट आलेले आहे. परंतु, हा चित्रपट पाहिल्यावर मनात काही प्रश्न आले, ते इथे चर्चेसाठी मांडणार आहे. जे लोक फारच भावनिक वा जराही काही वेगळे विचार सहन होत नाहीत असे टची असतील त्यांची आधीच माफी मागून ठेवतो.
चित्रपटातले मुख्य पात्र रामजी हे आहे. त्याचा मुलगा नदीच्या पाण्यात वाहून गेलेला असल्याने त्याला दु:खाचा धक्का बसलेला आहे. “ मी तीस वर्षे वारी आणि विठ्ठलाची भक्ती करतो आहे, तरीही त्याने असे का करावे ? मी एवढे केले त्याचे पुण्य कुठे गेले ? “ – हे तर त्याच्या डोक्यात आहेच पण शिवाय याच सुमारास सुनेला मुलगी झाल्याने त्याचे वंशसातत्यही खुंटणार आहे, त्यानेही तो व्यथित आहे. नुसता व्यथित नाही तर, एवढ्या दु:खातही क्रोधाविष्ट होऊन तो सुनेला तिच्या बाळासह घर सोडून जायला सांगतो !
यातला ‘ माणुसकी ‘ चा भाग असा आहे की याही दु:खद परिस्थितीत तो एका अडलेल्या गायीची प्रसूती नीट करून तिला सोडवतो आणि सर्वांसाठी सुखनिर्मिती करतो. रामजी हा या कामात निष्णात आहे पण तो दु:खात असताना त्याला कसे बोलवावे ही विवंचना असते. पण त्याला यासाठी बोलावल्यावर तो दु:ख विसरून माणुसकीने वागतो. गायीला कालवड होते, त्याचा सर्वांना आनंद होतो. त्या एकूण प्रकारानंतर रामजीला उपरती होते आणि तो सुनेला घरातच राहायला सांगतो.
मग शेवटचे ज्ञानेश्वरांच्या ओवीचे गाणे येते. अज्ञान हे ज्ञानात विलीन होते आणि शेवटी दोन्ही नष्ट होऊन एक रिकामीक हे सत्य उरते, वगैरे. या चित्रपटाला या असल्या तत्त्वज्ञानात काही इंटरेस्ट आहे, असे दिसत नाही. संदेश

हाच येतोय की देवबीव काही नाही आहे, देव कुणाचे रक्षणबिक्षण करत नाही, देवाला आपल्या सुखदु:खांचे काही देणेघेणे नाही, पण, त्याचा, रंगून जाण्याची एक पळवाट म्हणून फक्त उपयोग आहे, इतकेच. प्रत्यक्ष जगण्यात माणुसकीने वागणे, लिंगभेद न करणे, वंशसातत्याच्या वेडगळ कल्पना सोडून देणे, हेच खरे तर महत्त्वाचे आहे. नाही तरी लोक म्हणतच असतात – खुद्द देवाचे मंदिर लुटले वा पाडले तरी देव काही करू शकला नाही, देव कोणताही अपघात टाळू शकत नाही, देवदर्शनाहून येतानासुद्धा दुर्घटना घडतात, देव दुष्काळ, कोव्हिड यांपासून रक्षण करू शकत  नाही, वगैरे. जणू काही देव म्हणजे मानवी मनासारखेच एक करप्ट, विकृत अस्तित्व असून त्याने देवाणघेवाणीचे नियम-नीती पाळत चालले पाहिजे ! ‘ देवाला रिटायर करा ‘ असे म्हणणारे सांस्कृतिक नेतृत्वही इथे काही जणांनी मान्य केलेले होतेच. म्हणजे काय रिटायर करा – मूर्त्या आणि श्रद्धा ? की तुकाराम म्हणतो ते ‘ एकविध मन ‘ ?

समजा इथला धर्म, भक्ती वगैरे भंगार आहे, ज्ञानेश्वर-तुकाराम बोगस आहेत, याचाच अर्थ सर्वच धर्म खोटे आहेत, असा नाही होत ? म्हणजेच, माणुसकी आणि जमेल त्या समाजसुधारणा हीच फक्त मूल्ये आहेत ? या प्रश्नांवर ‘ दिठी ‘ च्या निमित्ताने विचार व्हावा.

--- ००० ---

72 Comments

Sujit Birje याच्या ध्रुवपद (dhruv.pad) या Instagram page साठी मी केलेलं Champra Deshpande यांच्या कवितेचं वाचन. ऐकून प्रतिक्रिया कळवा.
कविता : चंप्र देशपांडे
वाचन : ऋषिकेश निकम

आज कविता लिहिता लिहिता उल्लेख झालेले गाणे --
मला अत्युत्तम वाटणारी अभिनेत्री -- वहीदा रहमान
गायिका -- शमशाद बेगम
गीत -- मजरूह
संगीत -- सदाबहार ओ. पी. नय्यर
चित्रपट सी आय डी ( १९५६ )  ---
( कहीं पे निगाहें  )

' मुक्त शब्द ' च्या मार्च-एप्रिल २०२१ च्या अंकात आलेला माझा लेख --
सतीश तांबे यांचा नवा कथासंग्रह,

‘ मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ‘
--- चं. प्र. देशपांडे.

गंमतीने असे म्हटले जाते की सध्या मराठीत शोधनिबंध सादर करून डॉक्टर झालेले लोक ढिगाने आहेत पण समीक्षक म्हणावेत असे फारसे कुणी नाहीत. यातले तथ्यही मान्य होण्यासारखे आहेच. त्यामुळे नव्या असो की लिहून लिहून ज्येष्ठ झालेल्या असो, अनेक लेखकांची योग्य दखल घेणे वा त्यांचे नीट मूल्यमापन होणे राहून जाते आहे. इंग्रजीत डिलान थॉमस या कवीच्या अगदी सुरुवातीच्या कविताही नजरेसमोर येताच टी. एस. एलियटसारख्या तिथल्या नामवंताने त्याचे महत्त्व जोखले होते आणि ते जाहीरही केले होते. आपल्याकडे कानोसा पद्धती जास्त

वापरली जाते. कोण काय म्हणते हे बघत बेताबेताने बोलायचे. किंवा मग कवी वा लेखक कोणत्या गटातला, कोणत्या जातीचा, कोणत्या राजकीय टोळीचा, ग्रामीण की शहरी वगैरे पाहूनही समीक्षा केली जाते. ' ग्रामीण साहित्य चळवळ म्हणजे प्रस्थापित साहित्याला आव्हान ' अशी बालिश कुस्तिगीर विधाने करणारे समीक्षकही दिसतातच. साहित्य, कला हे काही जिंकण्या-हरण्याचे प्रांत नव्हेत, इथे मानवी मूल्यात्मकतेचा संबंध असतो, हे लक्षात घेणारे समीक्षक अभावानेच दिसतात. एकदा एक लेखक म्हणाला होता की माझे मराठी साहित्यातले स्थान काय आहे, हे मला मरायच्या आधी कळायला हवे. ' विपुला च पृथ्वी ' याच्यावर त्याचा विश्वास नव्हता. ते ठीक, पण, सांगणार कोण तुमचे स्थान ? गटातटापलिकडे मान्यता असणारे समीक्षक कुठे आहेत ? नाही तर मग, योग्य टोळीत शिरून, फील्डिंग लावून भलीभली पारितोषिके तरी मिळवता यायला हवीत. म्हणजे निदान कागदोपत्री तरी तुमचे स्थान नोंदवले जाईल. पण त्याने समाधान होऊ शकेल ? त्यातला पोकळपणा जाणवत राहणारच ना ! त्यामुळे, आजच्या मराठी साहित्यिकाला, ' माती असशी मातीत मिळशी ' हे समजूनच आपले लेखन करत राहणे भाग आहे. इथे लेखन हा पोटापाण्याचा उद्योग का होऊ शकत नाही याची चर्चा अनेकदा झालेली आहे. व्यावसायिक यशस्वी लेखकांचे क्षेत्र सोडून, आर्थिक अपेक्षा न बाळगता लिहिणाऱ्या सर्जक लेखकांबद्दल हे प्रश्न आहेतच. म्हणजे मग हे असे लेखक, लेखन हा धर्म मानतात म्हणायचे का ? या संदर्भात मग ---

कथा करोंनिया मोल ज्या पें घेती
तेही दोघे जाती नरकामध्ये
किंवा
जेथे कीर्तन करावे तेथे अन्न न सेवावे

--- या तुकारामबुवांच्या ओळीही लक्षात घ्यायला हव्यात. तुमचे स्थान तरी कशाला निश्चित करून हवेय तुम्हाला ? धर्माच्या दर्जाची कलानिर्मिती करत असाल तर विसरून जा ना ! आपले काम करा आणि जा निघून ! कसली वाट पाहात थांबताहात ? --- हे प्रश्न काहींना निर्दयपणाचे वाटतील पण मानवी मूल्यात्मकतेच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांना हे विचारले जाणे अयोग्यही नाही.

हे सगळे लिहायचे कारण म्हणजे सतीश तांबे हे मराठीतले एक महत्त्वाचे कथाकार. आता इथे, ' महत्त्वाचे ' हा मूल्यात्मक शब्द नकळत लिहिला गेलाच ! पण, सध्या अशीच आहे परिस्थिती. प्रत्येक गोष्टीची चिकित्सा, विश्लेषण आणि ऐतिहासिक प्रक्रियेतली जागा या पद्धतीने बोलता येत नसले तरीही, सर्जक लेखकांनी त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या साहित्यकृतींवर लिहीत राहायला हवे. समीक्षक नाही म्हणून लढणार कुणाशी आणि रडत बसून उपयोग काय ? तर, मला असे वाटते की तांब्यांचे कथाकार म्हणून योग्य ते मोजमाप झालेलेच नाहीय. गाडगीळ. जीए, खानोलकर, पानवलकर, तेंडुलकर, कमल देसाई, मेघना पेठे अशा नामावलीत, सतीश तांबे हे नावही खरे तर असायला हवे. ' मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट ' हा त्यांचा नवीन कथासंग्रह आलेला आहे, तो वाचताना याची जाणीव झाली. या कथासंग्रहातली शीर्षक कथा आपण बोलत असलेल्या, मराठीतल्या अनेक प्रश्नांना कवेत घेणारी आहे. तीबद्दल बोलूच.

बराच काळ मराठी साहित्य ही, लक्ष्मण माने यांनी म्हटल्याप्रमाणे, एकूण मराठी समाजातल्या साडेतीन टक्क्यांची मक्तेदारी होती. १९६३ ची नेमाड्यांची कादंबरी ' कोसला ', १९७३ चा ढसाळांचा कवितासंग्रह ' गोलपीठा ', आणि १९७८ चे दया पवारांचे ' बलुतं ' अशा क्रमाक्रमाने अनेक साहित्यकृती येत गेल्या आणि ही मक्तेदारी मोडली गेली. मराठी साहित्याने वगळलेली अनुभवक्षेत्रे साहित्यात फुसांडत आली. आता यातला सुरुवातीचा काळ हा वास्तववाद आणि देशीवादाचा असणे भागच होते. जो तो आपापल्या अनुभवक्षेत्राचे लिहिणार आणि ते गुंताडयाचे असून चालणार नाही. त्यामुळे, जे घडले ते सांगणे, असे सोपे तंत्रच आवश्यक होते. नेमाड्यांनी नुसते ते वापरले नाही तर त्याची आक्रमक भलावण केली. " गेल्या शंभर वर्षांतील मराठी समीक्षेचा आढावा घेतल्यास टेनिसन-ब्राऊनिंगपासून एलियट-बेकेट अशा त्या मानाने दुय्यम दर्जाच्या साहित्यिकांची थोरवी मानणारे भाबडे मराठी विद्वान भीतभीतच तुकारामाची विश्वसाहित्यात गणना करताना दिसतील. " ( टीकास्वयंवर पृष्ठ ११५. ) एलियट-बेकेट हे दुय्यम लेखक

? जे आपल्याला समजणारे वा झेपणारे नाही त्याची आक्रमक टिंगलटवाळी करणे हे सुरुवातीच्या काळात गरजेचे होते, असेही म्हणता येईल. याचबरोबर आणखी दोन गोष्टी महत्त्वाच्या झाल्या. एक म्हणजे अनुभवाचा ' दलित-शोषित-वंचित-पीडित–बहिष्कृत ' पणा आणि डावा परिवर्तनावाद. ' डावी राजकीय भूमिका ' हे जणू साहित्याचे व्यवच्छेदक लक्षणच मानले जाऊ लागले.

हे सगळे लिहिण्याचा हेतू हा आहे की तांब्यांसारखा लेखक काहीसा बेदखल का राहिला असावा, हे पाहणे. त्याचबरोबर, या कथासंग्रहातली शीर्षक कथाही या प्रश्नाशी संबंधित आहे. तांब्यांचे ' लेखा-जोखा ' नावाचे एक पुस्तक आहे, त्यात पृष्ठ २०३ वर ते म्हणतात, " त्यामुळे एकूणात झाले काय तर आपल्या वैयक्तिक जगण्यात, आसपासच्या घडामोडींत जे काही घडते ते साग्रसंगीतपणे रंगवले की साहित्यनिर्मिती होईल असा संदेश नेमाड्यांच्या अनुयायांमध्ये रुजला. " अनुभवांची दाहकता आणि विविधता असली की झाले, असे झाले. तांबे एका ठिकाणी म्हणतात की एक दृश्य वास्तव असते आणि एक अदृश्य वास्तव असते. " अदृश्य वास्तवाचा वेध आपल्या अनुभवाधिष्ठित कल्पकतेतून घ्यावा लागतो. " ( पृष्ठ २०७. ) वास्तव हुबेहूब रंगावण्याच्या प्रयत्नात ही परिपूर्णता येणे राहून जाते, असे तांब्यांचे म्हणणे आहे. या सर्व प्रकारात साहित्याच्या ' कल्पकता ' या महत्त्वाच्या अंगाचा विसर पडला, अशी तांब्यांची मांडणी आहे आणि अर्थातच ती पटण्यासारखीच आहे. याच कारणामुळे, जीएं च्या फिक्शन च्या प्रयोगांची नेमाडपंथीयांकडून ' मोठ्यांचा चांदोबा ' अशी खिल्ली उडवली गेली, असे तांबे म्हणतात. अशा प्रकारांमुळे साहित्य घडवणे आणि रचणे या महत्त्वाच्या निर्मितीप्रक्रियेलाच अडथळे निर्माण झाले. आता, फिक्शन म्हणजे काय, फँटसी म्हणजे काय या चिकित्सेत न पडता पुढे जाऊ.

हे जे सगळे लिहिले त्याचा या कथासंग्रहातल्या ' मुक्काम पोस्ट .. ' या शीर्षक कथेशी संबंध आहे. त्यामुळे, आधी तीवर बोलू. म्हटले तर ही एक दीर्घकथाच आहे. तांबे म्हणतात त्याप्रमाणे ( चांगल्या अर्थाने ) ही एक उत्तम ' रचलेली ' कथा आहे. हीत दोन प्रमुख पात्रे आहेत. एक म्हणजे मार्तंड भणगे हे एक जुने, बऱ्यापैकी नाव असलेले ज्येष्ठ ब्राह्मण लेखक आणि त्यांचा चाहता असलेला, नव्यानेच लिहू पाहणारा असा एक तरुण दलित लेखक भुवन केंदळे. एक अत्यंत महत्त्वाची अशी सामाजिक, सांस्कृतिक समस्या एका कलात्मक अनुभवातून व्यक्त करण्यासाठी लेखकाने रचलेले हे मैदान असून लावलेली फील्डिंग आहे. दोघेही शहरात राहणारे आहेत आणि दोघांच्याही वाट्याला सामाजिक दु:खाचे, अवहेलनेचे आयुष्य आलेले नाही. एका ठिकाणी भणगे भुवनला म्हणतात, " ह्या मराठी साहित्याचं काही खरं नाही. वाट्याला रटरट नसेल तर सारं व्यर्थ आहे इथे. वास्तविक पाहता मराठी साहित्याच्या उगमाशीच ज्ञानेश्वरांनी खरंतर चांगला धडा घालून दिला होता की , समाजाने कितीही छळ केला असला तरी त्याच्याविषयी आवाक्षर न काढता त्याच्या मंथनातून आलेल्या चिंतनाचा उपयोग करून निर्मिती करायची. पण ते सारं काळाच्या ओघात वाहून गेलं आणि गेल्या काही वर्षांमध्ये हालअपेष्टा, शोषण, अवहेलना, दारिद्र्य ह्यांची रट लावल्याशिवाय इथे लेखक म्हणून उभं राहणं अवघड होत चाललं आहे दिवसेंदिवस. " ही एक वेगळीच समस्या निर्माण झालेली आहे. हा एक वेगळाच रेटा आहे आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्यावरचा घालाही आहे. साहित्यात असे यमनियम वा पथ्यकुपथ्य तयार होणे हे कधीच समाजाच्या सांस्कृतिक पोषणाला हितकारक असू शकत नाही. भुवनच्या मनात आहे की भणग्यांना आपले वसतिस्थान दाखवून आपण काही पांढरपेशे नाही हे दाखवून द्यावे. भुवनला भणग्यांचे लेखन आवडायचे कारण ते उत्कंठावर्धक असायचे, आणि मुख्य म्हणजे वातावरण पांढरपेशे असूनही तशा जगण्याची कोडकौतुके त्यात नसायची. उलट त्यात त्या जगण्याचा पर्दाफाश करणे होते, श्रेष्ठत्वाचा दंभस्फोट होता. दलित साहित्यातल्या सततच्या कर्मकहाण्यांपेक्षा त्याला हे आवडत होते. पण, लेखनाच्या या वैशिष्ट्यांमुळेच, लेखक म्हणून भणगे ना पांढरपेशांना आपले वाटत होते ना दलितांना. तीच परिस्थिती भुवनचीही होणार होती, कारण, तो दलित असला तरी त्याच्याकडे ' दलित अनुभव ' नव्हता. दोघांचीही स्थिती ' न घरका न घाटका ' अशीच असणार होती. जगण्यात ज्या नाट्यमय घटना घडतात त्यांचा खोलात जाऊन वेध घ्यायला हवा आणि तो वेध घेण्याची प्रक्रिया व्यक्त होईल अशी ' रचना ' करायला हवी, असे भणग्यांचे म्हणणे. पण त्याला आता महत्त्व नाही. दारिद्र्य, अवहेलना यांच्यासह जे घडले ते सांगितले की झाले साहित्य, अशी कल्पना बळावलेली आहे.

असल्या लेखकांना भणगे ' नुसते अनुभवांचे लेखनिक ' म्हणतात. अमुक प्रकारच्या अनुभवाच्या आग्रहाबरोबरच वास्तववादाचा आग्रह ही साहित्यातली आणखी एक समस्या झालेली आहे. खरे तर प्रत्येकाचे वास्तव वेगळे असते पण या सूक्ष्मतेची गरज राहिलेली नाही. सामान्य निवेदनाच्या स्तरावरचे वास्तव सांगणे हाच वास्तववाद, असे झालेले आहे. आणि भणगे तर फिक्शनचे महत्त्व मानणारे आहेत ! ' वास्तव वडापाव ' या गाडीची योजना करून वास्तववादावरचा उपरोध भेदकपणे या कथेत व्यक्त झालेला आहे. अनुभवाने ना पांढरपेशाधार्जिणा ना बहुजन पद्धतीची रट लावणारा – या अवस्थेला ही कथा ' सांस्कृतिक फट ' म्हणून सादर करते. शेवटी भणगे भुवनला म्हणतात, " ... तू आता एकच कर.... माझ्या मरणानंतर त्या सांस्कृतिक फटीत मुक्कामाला जा. जे काही लिहायचं असेल ते तिथून लिही. अभिजन आणि बहुजन दोघांनाही सोडून एकटा पड. पुढचं साहित्य या सांस्कृतिक फटीतूनच प्रसवेल, याची मला खात्री आहे. " यावर अधिक भाष्याची गरज नाही. अनुभव आणि वास्तववाद या संकल्पनांचा सर्वांगीण वेध घेणारी कथा म्हणून या कथेला मराठीत एक खास स्थान राहील यात शंका नाही.

जगण्यातल्या अनुभवाचा सखोल वेध घेऊन तो आशय ' रचून ' व्यक्त करणारी या संग्रहातली आणखी एक सर्जक कथा म्हणजे, ' रावण आडनावाच्या पांडवापुत्राच्या नावाची जन्मकथा '. नाव, घराणे, जगण्याचे आदर्श नमूने अशा गोष्टींतल्या ॲब्सर्डिटीचे कारंजे उडवत राहणारी ही एक अकल्पनीय आणि तरीही कुठेही ' वास्तवा ' बाबत शंका घ्यायचा विचारही मनात येऊ नये, अशी एक उत्तम कथा आहे. एक सेमिनार होणार असून त्यात निबंध वाचणाऱ्या एकाचे नाव आहे ' मल्हारी पांडव रावण ' ! कसे काय बाबा हे असे अजब नाव ? – या उत्सुकतेतून ही कथा सुरू होते. पूर्वी लहान मुलांना एक कथा सांगितली जायची की कथेचा नायक राजकन्येला राक्षसाच्या तावडीतून सोडवायला निघतो तर वाटेत त्याला एक मुंगी भेटते, मी येऊ का म्हणते, तो चल म्हणतो. आणि या पद्धतीने एक कावळा, उंदीर, हत्ती हेही या मोहिमेत सामील होत जातात. तोच पारंपरिक लोककथेचा घाट ! त्यामुळे, शंका घेणे आणखीनच दुरापास्त ! या नावाचे रहस्य उलगडत जाणे आणि वाटेतल्या अनेक बाबतींतला उपरोध यांनी ही कथा मराठीतली एक उत्तम असंगत ( absurd ) फिक्शन ठरते. लेखन ही एक क्रीडा म्हणून पाहणे हे तांब्यांच्या कथेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य या कथेत प्रकर्षाने जाणवते. शेवटी या कथेचा निवेदक जेव्हा या रावण महाशयांना विचारतो की तुमची ही नामकथा मी लिहून प्रसिद्ध केली तर चालेल का ? त्यावर ते रावण म्हणतात, " बेलाशक. आणि त्या मंडळींनी प्रवासाची लिखित माहिती कोणतीही न ठेवल्याने तुम्ही त्यात काहीही तपशील भरू शकता. यात तुमच्या हाताशी ठोस वास्तव असं फारसं काही नाहीच आहे. त्यामुळे उलट ते छानच होईल. " तांब्यांच्या लेखक म्हणून असणाऱ्या सर्जकतेच्या कल्पनेला हे पूरकच आहे.

तांब्यांच्या कथांची नावे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. ' संशयकल्लोळात राशोमान ' हे असेच एक नाव. ज्यांना अकिरा कुरुसोवाचा जगप्रसिद्ध ' राशोमान ' हा सिनेमा माहीत आहे त्यांना हा ' सत्यशोधा ' चा मराठी अवतार खासच अर्थपूर्ण वाटू शकेल. सगळे मनोव्यापारांचे खेळ ! कथेच्या निवेदकाला खुनाच्या वगैरे धमक्या येणे हा या कथेचा ट्रिगर पॉइंट किंवा उद्घाटनबिंदू म्हणा. साहजिकच काय बाबा ही भानगड, अशी उत्सुकता निर्माण होते. कथा यातल्या अनेक शक्यतांचा धांडोळा घेत जाते पण शेवटी हाताला काहीच लागत नाही. इतकेच नव्हे तर, धमक्या कोण देत होते, हा प्रश्नही गळून पडतो. शेवटी निवेदक म्हणतो, " तर या सर्व मानसिक गदारोळातून मला हळूहळू सत्य आणि संशय यांच्या ह्या सरमिसळीतून एक भन्नाट नवीन नाटक दिसू लागलं, ज्याचं नाव असणार होतं, ' संशयकल्लोळात राशोमान ' – ज्यात मी माझ्या आयुष्यात घडलेलं हे तुम्हाला सांगितलेलंच कथानक थोडेफार फेरफार करून मांडणार आहे आणि एकदा का एखादं शीर्षक घट्ट पाळामुळांसकट डोक्यात उमललं की, पुढची वाटचाल ही बहुतेक वेळा मला एखाद्या सोपस्कारासारखी वाटते. " हेच तर सगळे तांब्यांच्या कथेचेही विशेष आहेत. तांब्यांच्या कथेत दलित-शोषित-वंचित-पीडित यांचे जग आणि त्यांच्या समस्या या चलनी मटेरियलला बढावा दिलेला नसतो. जग पांढरपेशे वा कुठलेही वा काल्पनिकही असू शकते. त्यातून मानवी मूल्यात्मकतेच्या दिशेने होणारा कलात्मक प्रवास हाच इथे महत्त्वाचा असतो.

या संग्रहातल्या इतर दोन कथाही या अशा तांबे-प्रक्रियेने युक्त अशाच आहेत. त्यांच्याबद्दल थोडक्यात --

‘ यत्र – तत्र – सावत्र ‘ : -- मनात बाळगावे लागणारे, स्वत: सावत्र असल्याचे जन्मरहस्य , “ ही देवाने दिलेली जमीन पैसे देऊन आपल्या नावावर करणं हा व्यवहार मुळातच काळा आहे – “ हे सवयीच्या व्यवहारापलिकडचे सत्य, आणि “ या पृथ्वीवर अढळ अशी जागाच नसावी बहुधा, प्रत्येक कणाकणावर वाकडी नजर आहेच कुणाची ना कुणाची ! “ -- इथपर्यंत विचार येऊन पोचणे – हे आहे या कथेत. या संग्रहातल्या पाचही कथांमध्ये काही ना काही अपवादात्मक आणि नाट्यमयही अशा गोष्टी आहेत.

‘ नाकबळी ‘ : -- ‘ नाकीडोळी नीटस असणे ‘ हा वाक्प्रचार एका अजब माहोलात नेणारी ही एक गंमतीशीर कथा आहे. नीतीअनीतीचे रूढ साचे ओलांडून ‘ समावेशक ‘ समाधान निर्माण करणारी !

तांब्यांच्या कथेची वैशिष्ट्ये थोडक्यात अशी सांगता येतील --

‘ सूर्याचिया परी । तुका लोकीं क्रीडा करी ॥ '

--- तुकाराम.

“Life is not a problem to be solved, but a reality to be experienced.”

— Soren Kierkegaard

वरील दोन्ही भाषिते एकत्र केल्यावर जे समजते ती आहे या सर्व कथांमागची मर्मदृष्टी. या कथांमध्येही पात्रे आहेत, त्यांची सुखदु:खे आहेत, त्यांच्याही आयुष्यांत ताणतणाव, गुंताडे आहेत, संघर्ष आहेत, हिंसाही आहे, पण तरीही, लेखक याचा कोणताही प्रभाव न घेता लिहितो आहे, हे जाणवत राहते. त्यामुळे, या कथा ना कोणत्या सुखदु:खांचा प्रत्यय देणाऱ्या आहेत ना कोणता मूड तयार करणाऱ्या. जगण्याच्या एकूण जंजाळातून हा लेखक सहज विहरत असल्याचे वाचकाला जाणवत राहते. या अर्थाने ही लेखकाची एक सहज पण गंभीर क्रीडा ठरते. यांतल्या पात्रांनाही अनेक समस्या आहेत, त्यांची निराकरणे देणे वा त्यांचा न्यायनिवाडा करणे हा इथे हेतूच नाहीय. कारण अर्थातच सर्व काही इतके जटिल आणि इतक्या प्रभावांनी युक्त आहे की त्याची सोडवणूक वा त्या बाबतचे निष्कर्ष अशक्यच ठरावेत. एका सखोल परिपक्वतेने जगण्याकडे पाहणारी ही दृष्टी आहे. ही क्रीडा म्हणजे, ‘ शतदा प्रेम करावे ‘, ‘ प्रेम कर भिल्लासारखं ‘ किंवा ‘ फक्त लढ म्हणा ‘ अशी बावळट-उथळ नाही. जगण्यात एखादा सल्ला अंमलात आणणारी ही क्रीडा नाही. हा, कीर्केगार्ड म्हणतो तसा जगण्याचा समग्रतेने घेतला जाणारा अनुभव आहे. मानवी जगण्याचा व्यापक आवाका घेत जाणारी ही मर्मदृष्टी आहे. या कथांची निवेदनशैलीही या दृष्टीतून येणारीच आहे. घटनांचे सर्व तपशील आणि त्यांतले सर्व प्रभाव यांची दखल घेत हे निवेदन जाते. त्यामुळे ते सविस्तर आणि काही वेळी पाल्हाळीकही वाटू शकते. पण, विशेष म्हणजे यातले प्रत्येक वाक्य निवेदनात अर्थपूर्ण भर टाकत जाणारे आहे. कुठेही कंटाळा तर येत नाहीच पण हे संपूच नये असे वाटत राहते. या नुसत्या घटनांच्या कथा नाहीत. घटना घडण्याच्या प्रक्रियांचा बारकाईने धांडोळा घेत जाणाऱ्या अशा या कथा आहेत. या वैशिष्ट्यांमुळे या कथा मराठीत अद्वितीय म्हणाव्यात अशा आहेत. कलेतल्या अत्युच्च दर्जाच्या मूल्यदृष्टीचा हा एक विलोभनीय पट आहे.

एखाद्या विचारसरणीचे महत्त्व मांडणे, एखादी भूमिका अभिव्यक्त करणे, अमुक अशा प्रकारचे परिवर्तन अपेक्षिणे – असले काहीही या कथा करत नाहीत. त्यांचा आवाका त्याहून खूपच मोठा आहे. जगण्याच्या समग्रतेचे भान देणे म्हणजेच एक मानवी परिपक्वता निर्माण करणे – हे कलेचे अत्यंत मौल्यवान काम या कथा करतात. कोणताही तात्विक/ आध्यात्मिक आव न आणता साधेपणाने केलेल्या निवेदनातून या कथा अशी आशयघन उंची गाठतात. इथे एक विशेष मुद्दा सांगणे मला महत्त्वाचे वाटते. फेसबुकसारख्या समाजमाध्यमांवरचा तांब्यांचा वावर पाहिला तर तो निश्चितच भूमिकायुक्त आणि त्यांची व्यक्तिगत मते व्यक्त करणारा असतो. पण, कथाकार तांबे यातून मुक्त असल्याचे दिसते ! यावरून हेच स्पष्ट होते की ‘ मते ‘ हा एक मर्यादित प्रकार आहे. कला ही व्यापक, समावेशक असते. लेखकाच्या व्यक्तिगत मतांवरून कलेचे मूल्यमापन करणे, ही आणखी एक समस्या होऊन बसलेली आहे. मराठीने या ‘ फटी ‘ च्या गरजेतून, वास्तववादाच्या पकडीतून आणि व्यक्तिगत भूमिका व मते यांतून लौकर बाहेर पडणे हे सांस्कृतिक हिताचे होईल, हे या निमित्ताने समोर यावे.

--- ००० ---

सॅक्सोफोन हे वरातीत वाजवायचे वाद्य नव्हे ( कवितासंग्रह )

--- गणेश वामन कनाटे – वर्णमुद्रा प्रकाशन.

कवीने कविता ही वाचकालाच काय, स्वत:लाही बौद्धिक निवेदानासारखी ‘ कळली ‘ पाहिजे असा आग्रह धरू नये. कवितेतच ती स्वत:ला आणि वाचकाला समजावून देऊ नये. चांगली कविता संदेश देण्याची वा बोधप्रद असण्याचीही जबाबदारी घेत नाही. एखादी मीटिंग संपल्यावर जसे, या मीटिंगमध्ये आपण काय विचार केला आणि काय ठरवले याची एक कॅप्सूल पुन्हा एकदा बोलली जाते त्याप्रमाणे कवितेत गोषवारा वा सारांश कधीही  देऊ नये. शिवाय, कविता असते कशी किंवा कशी असायला हवी याच्या प्रभावयुक्त पूर्वकल्पना मनात फिट नसाव्यात. ही तत्त्वे तंतोतंतच काय, जरा अधिकच कडेकोटपणे पाळणारे कवी ग्रेस हे गणेश कनाटे यांचे आदर्श आहेत. हा त्यांचा कवितासंग्रहच त्यांनी ग्रेस यांच्या स्मृतीला अर्पण केलेला आहे, तरीही वर उल्लेखिलेल्या तत्त्वांचे इथे अनेकदा उल्लंघन होताना दिसते. त्यामुळे, कवितेत पाणी मिसळल्यासारखे होऊन ती सपक होण्याकडे कलू लागते. माझ्या आवडीनिवडी वा ‘ कविता म्हणजे काय ‘ याचे माझे आकलन हे हजारांतले एक असते आणि ते अंतिम मुळीच नसते याची मला जाणीव आहे. एखाद्या लेखकाचे वा कवीचे, माझ्या मते सदोष असलेले काम चिवडत न बसता त्याच्या जमलेल्या आणि चांगल्या कामावरूनच त्याचे मोल ठरवावे असे मला वाटते. या दृष्टीने पाहता या ‘ सॅक्सोफोन ‘ कवितासंग्रहातल्या खालील कविता मला चांगल्या वाटल्या –

मांजर, कुत्रा, वटवाघूळ आणि मी ----------------- पृष्ठ ५८
सैरभैर पक्षी आणि नदीची पाणीदार काया ---------- “ १०१
जेव्हा मी गुं गुं गुं असा आवाज करत बोलेन -------- “ १०४
एकटा माणूस खूप खूप खूप एकटा असतो ---------- “ ११२
‘ दि एण्ड ‘ पूर्वी  एकदा तरी ----------------------- “  १२०
रिकाम्या जागा आणि निर्वात पोकळी --------------- “ १२५
अठ्ठावीस युगांचे वाट बघणे ------------------------- “ १२६
स्वप्नातल्या स्वप्नातला मी हरवून जातो हल्ली ---------- “ १३०
झेब आणि तिचे गाणे व मी आणि माझे गाणे  --------- “ १३६
रात्र – रात्र जागून लिहून ठेवलेल्या नोंदी ( १ ) -------- “ १४२
नेहमी नाही पण कधीतरी घडतंच ------------------  “ १४८

मला असे जाणवते की कनाट्यांची कविता ही मुख्यत: एकटेपणाची कविता आहे. ही तशी आजच्या जगातली एक प्रमुख समस्याही आहे. तो एकटेपणाही पूर्ण कळू शकत नाही आणि त्या एकटेपणातूनही पुरेसे काही आकलन होत नाही. असे हे अर्धवट दर्शनातले जगणे असते. या अवस्थेतूनच कनाटे मानवी जगण्याचा आवाका घेऊ पाहतात. प्रास्ताविकात ते म्हणतात की लौकिक दृष्ट्या ते असतीलही यशस्वी पण मुळात स्वत:ला ते एक पराभूत, निराश व्यक्तीच वाटतात. या मूडची वा मनोवस्थेची तीव्रता ही अर्थातच असह्य असणार. अशा प्रत्येक वेळी कवितेनेच त्यांना तारलेले आहे, असे ते म्हणतात. एकटेपणा हा एक ताण असून त्या ताणाची अशी एक शक्ती असते. त्यातूनच या कविता जन्मतात. पण, कविता तारते म्हणजे काय, तर ती कवीला या मूडबाहेर नेते, थोडेफार स्वातंत्र्य देते. या अर्थाने या एका परिपूर्ण स्वातंत्र्याची वाट पाहण्याच्या कविता आहेत. कनाट्यांना सूर सापडतो तेव्हा हीच मानवी आकांक्षा त्यांच्या कवितांतून विविध प्रकारे व्यक्त होते. त्यांचा पुढचा संग्रह अधिक केंद्रितता आणि अधिक संपृक्तता घेऊन येईल, असे वाटते.

--- ००० ---

*मनोहर शियेकर* एक दिलखुलास अभियंता.

मनोहर शियेकर हे नाव खरेतर जळगाव जिल्ह्यामध्ये गिरणा धरणावर ज्यांनी काम केले त्यांना नक्कीच माहित आहे. गिरणा धरण 1964 च्या आसपास ज्यावेळी बांधले जात होते, त्यावेळी त्याच्या पायामध्ये असंख्य प्रश्न निर्माण झाले होते. आणि धरण होईल का नाही? अशी शंका येऊ लागली होती. त्या वेळी तरुण व तडफदार व शिस्तबद्ध काम करणारे मनोहर शियेकर यांची नेमणूक त्या प्रकल्पावर झाली. अत्यंत कठीण अशा प्रश्नावर त्यांनी तोडगा काढला. सिमेंट बेन्टोनाईट ग्राऊटींग आणि इतर अनेक मार्ग वापरून कमी खर्चामध्ये धरणाचा पाया पूर्ण केला. आणि मग धरण उभे राहू लागले.

तीच गोष्ट भंडारदारा धरणाची. कोयनेत 1967 साली ज्यावेळी भूकंप झाला त्यावेळी भंडारदरा धरणाला तडे गेले. आणि मोठी गळती सुरू झाली. 1969 सालात तर गळती खूप प्रमाणात वाढली आणि धरण फुटण्याची शक्यता निर्माण झाली. त्यावेळी पुन्हा मनोहर शियेकर यांची तिथे नेमणूक झाली आणि 1971 पर्यंत धरणाचे मजबुतीकरण त्यांनी पूर्ण केले. त्यानंतर ते इराकमध्ये सिंचन तज्ञ म्हणून गेले. तिथेही अनेक प्रकल्पांवर त्यांनी कामे केली.

नंतर सांगली जिल्ह्यात चांदोली जवळ वारणा प्रकल्प व धरण याची सुरुवात त्यांनी केली. मातीच्या धरणामध्ये खूप चांगली प्रगती त्यांनी केली.

त्यानंतर मात्र आपल्याला पदोन्नती मिळणार नाही, अशी परिस्थिती सिंचन खात्यामध्ये निर्माण झाली व मनोहर शियेकर यांनी पाटबंधारे विभागाला राम राम केला.

त्यानंतर किर्लोस्कर कन्सल्टंट या कंपनीमध्ये अत्यंत मोठी मोठी व जोखमीची कामे त्यांनी केली. मनोहर शियेकर यांनी नुसतीच कामे केली नाहीत तर केलेल्या कामांचा व कामात आलेला अनुभव पुढच्या पिढीला उपयोगी पडावा म्हणून त्यांनी पुस्तके लिहिली. त्यांच्या प्रत्येक वाढदिवसाला त्यांचे एक पुस्तक प्रकाशित होत आहे.

दिनांक 30 मे हा त्यांचा वाढदिवस. ते आता 87 वर्षाचे झालेत. या वाढदिवसाला त्यांनी गिरणा धरणाचे व इराकमधील धरणांचे तांत्रिक अनुभव लिहून इंग्रजीमध्ये *Treatment to pervious foundations of dams* हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पाटबंधारे विभागातील अभियंत्यांनी जरूर संग्रही ठेवावे असे हे पुस्तक आहे. पुण्यातील र फल्स पब्लिकेशन सर्विस यांनी याचे प्रकाशन केले आहे. मनोहर शियेकर यांनी जिथे जिथे काम केले तिथे तिथे त्यांचे अनुयायी तयार झाले. त्यांचा शिस्तबद्ध पणा व प्रामाणिकपणा यांची शिदोरी घेऊन पुढे अनेक अभियंते आपल्या कारकिर्दीमध्ये यशस्वी झाले आहेत. शियेकर यांना नाटक व चित्रपट व संगीत याची खूप आवड आहे. प्रकल्प वसाहतीमध्ये कर्मचाऱ्यांकडून त्यांनी अनेक नाटके बसवून घेतली आणि त्यात स्वतः सुद्धा काम केले. अनेक निवृत्त कर्मचाऱ्यांना आणि अभियंत्यांना याची आठवण आहे. पुण्यातील पाषाण येथील त्यांचे चिरंजीव राहुल यांच्याबरोबर ते सध्या राहत आहेत.

श्री मनोहर शियेकर यांना यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा. तसेच त्यांच्याकडून असेच चांगले लेखन होत राहो ही सदिच्छा.

--- चंद्रमोहन हंगेकर .

शकुनीमामा

--- ले ० डॉ. कमलेश सोमण --- गोयल प्रकाशन, पुणे.

मयासुराने पांडवांबाबतच्या कृतज्ञता बुद्धीतून त्यांना निर्माण करून दिलेल्या मयसभेपासून हे कथानक सुरू होते. चमत्कारांनी युक्त अशा त्या आभासी सभेत दुर्योधन अनेकदा फसतो. त्याची पांडवांकडून आणि विशेषत: द्रौपदीकडून खिल्ली उडवली जाते. त्या अपमानाने दुर्योधन क्रुद्ध होतो. पण पांडवांना युद्धात हरवणे अशक्य असते. त्यावर शकुनीमामा एक धूर्त उपाय काढतो – तो म्हणजे, पांडवांना द्यूत खेळायला बोलावून त्यात त्यांना हरवायचे

आणि त्यांचे सर्वस्व लुटून त्यांना नामोहरम करायचे. फासे टाकण्यात आणि त्यातल्या कपटीपणातही शकुनीमामा माहीर असल्याने हे घडणे नक्कीच शक्य असते. इथून सुरू झालेले हे कथानक शेवटी युद्ध पूर्ण होईपर्यंत जाते. या १०८ पानी लघुकादंबरीचे वैशिष्ट्य हे आहे की यातले बरेच निवेदन शकुनीमामाकडूनच येते. ( काही निवेदन हे कादंबरीच्या निवेदकाकडून येते. निवेदानाचे हे दोन प्रकार अधिक तांत्रिक सजगतेने वापरून कादंबरीची धार वाढवता आली असती, असे वाटले. )

यापूर्वी मी डॉ. सोमणांच्या ‘ विदुर ‘ या कादंबरीबद्दल लिहिले होते. तसाच व्यापक आवाका इथेही आहे. मानवी जगण्यातल्या समस्या कशा अनेक कारणांनी, प्रक्रियांनी आकाराला येतात आणि त्या कशा निराकरणहीन बनतात याचे फारच प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आहे. चूक-बरोबर, न्याय-अन्याय वगैरे बाबींचे एकतर्फी निर्णय देणे कसे अवघड असते याचे भान ही कादंबरी देते. अनेक स्वभाव, अनेक हेतू यांचे हे एक अत्यंत गुंतागुंतीचे मिश्रण इथे आहे. मानवी जगणे समजून घेण्याच्या उत्तुंग शक्यता महाभारतात कशा ओतप्रोत आहेत याची जाण ही कादंबरी देते.

एका वेगळ्या कोनातून लिहिलेली, छोटेखानी पण समृद्ध अशी ही कादंबरी आहे. ही लिहिल्याबद्दल डॉ. सोमणांचे आणि प्रकाशित केल्याबद्दल गोयल प्रकाशन यांचे अभिनंदन !

--- ००० ---

द्वेष

आपण कितीही संविधानाचे गोडवे गात असलो आणि ‘ अनेकता मे एकता ‘ चे नारे देत असलो तरी खरोखरच आपण तसे आहोत का, हे मधून मधून पाहायला हवे. कोणतेही संघटन, विशेषत: राजकीय संघटन उभे करताना कुणी तरी एक शत्रू लागतो. नुसतेच शांतता, प्रेम या मूल्यांवर आधारित माणसे एकत्र असू शकतात का, असा प्रश्नच पडावा अशी परिस्थिती दिसते.

गौतम बुद्धाचे एक वचन सांगितले जाते की तुम्ही द्वेष बाळगत जगणे म्हणजे कुणाकडे तरी फेकण्यासाठी हातात निखारा घेऊन जगणे. तो निखारा आधी तुम्हालाच भाजून काढतो. यावर झालेले संशोधन असे सांगते की द्वेष, क्रोध या टॉक्सिक ( विषारी ) भावना असून त्या शरीरावर दुष्परिणाम करतात. हृदयरोग, रक्तदाब असे विकारही घडवतात. तो एक प्रकारचा शक्तीनाशही आहे. सर्जकता नष्ट करून डल, मंद, अकार्यक्षम करणारा. अशी एक गोष्ट सांगितली जाते – एका आजोबाने त्याच्या नातवाला सांगितले की त्याच्यात दोन लांडगे आहेत. एक शांतता हवी म्हणतो आणि दुसरा द्वेष आणि राग हवा म्हणतो. नातू त्याला विचारतो की मग यांतला कोण जिंकेल, त्यावर आजोबा म्हणतो की मी ज्याचे पोषण करेन तो. सॉक्रेटिसला दिले तेच फक्त विष नसते, द्वेष पाजला जाणे हेही विष पाजणेच असते.

जात, धर्म, भाषा वा राजकीय पक्ष यांतले कोणते तरी एक साधन द्वेषासाठी निवडावेच लागते, त्याशिवाय सामूहिक सुरक्षिततेची गरज निर्माण करणे आणि एखाद्या समूहात एकोपा साधणे शक्य होत नाही. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रज हा एक काँग्रेसपुढे मोठा आणि पूर्ण भारत एकवटेल असा शत्रू होता. त्या साधनाने तयार झालेले संघटन नंतरही काही वर्षे टिकले. पण, देशांतर्गत द्वेष हे काँग्रेसचे तत्त्वज्ञानच नाही तर मग एकोपा कशावर आधारित साधणार ? त्यामुळे, आता राजकीय द्वेष हे एकच साधन उरते. इतर अनेक पक्षांकडे राजकीय द्वेषाबरोबरच काही उपद्वेषही साथीला असतात. त्यामुळे ते काँग्रेसपेक्षा अधिक प्रभावी दिसू लागतात.

द्वेष निर्माण करणे आणि तो जोपासणे हे काम विशेषत: राजकीय पक्षांना करावेच लागते. त्याचा वाईट आणि विनाशक परिणाम आपल्या अनुयायांवर होईल याची फिकीर करून त्यांना चालत नाही. निरनिराळ्या अस्मिता माजवणे, द्वेष माजवणे, श्रद्धास्थानांचे उत्सव करणे या गोष्टी केल्याशिवाय अनुयायी मिळत नाहीत. या गोष्टींमुळे समाजस्वास्थ्य तर बिघडतेच पण सर्वांच्या व्यक्तिगत आरोग्याचीही हानी होते. त्याला कुणाचाच इलाज नाही, हे सर्वांनाच मान्य असते.

या प्रकारांचे आत्मनाशाचे जसे परिणाम असतात तसेच ते द्वेषपात्रांवरही होत असतात. सतत द्वेष, राग, हेटाळणी झेलत, स्वीकारत राहणे हे राग, भीती, न्यूनगंड, आक्रमकता अशा नकारात्मक भावना निर्माण करते. तेही व्यक्तिगत आणि सामाजिक हानी करणारेच असते.
या गोष्टी अटळच दिसतात. यांतली हानी ज्यांना दिसते, जाणवते त्यांनी शक्य तो या प्रकारांना बळी न पडणे हाच यावर एकमेव मार्ग आहे. त्यासाठी, बुद्ध काय म्हणतात, तुकाराम काय म्हणतात, हे समजून घेण्याचे महत्त्व लक्षात यायला हवे. ते सर्व आध्यात्मिक म्हणून फेटाळून लावणे हे आत्महत्या करण्यासारखेच आहे. एकमेकांशी सौहार्दाने जगावे की संघर्ष करत जगावे याचा निर्णय त्यावरच अवलंबून असणार आहे.
--- ००० ---

हा मॉन्सूनपूर्व आहे म्हणे पाऊस -- याला जोडूनच आता मॉन्सूनचा येईल -- चालेल, चालेल -- दोन्ही बेष्ट !

माझा मित्र मिलिंद शिंत्रे हा एक फारच सज्जन, नम्र माणूस असल्याने तो स्वत:ला अजिबातच कवी समजत नाही. पण, अपघाताने, त्याच्याही न-कळत तो मराठीतली एक अत्युत्तम न-कविता ( anti poem ) लिहून गेलेला आहे. मित्रत्वाच्या नात्याने मी त्याला योग्य तो सल्ला आणि प्रोत्साहन दिलेले आहे. त्याच्या नम्रपणामुळे आपण सर्वांनीच या कवितेच्या न-आस्वादाला मुकू नये म्हणून मी हो-पुढाकार घेत आहे. ओळी तोडून थोडा कवितेचा आभास तयार करायची जबाबदारी मी घेत आहे. मिलिंदची परवानगी न घेताच ( शक्य तिथे न यावा म्हणून ) मी ती न-कविता खाली देत आहे --

एकपात्री समूहनृत्यात
--- कवी --- मिलिंद शिंत्रे ( या कवितेचा शिल्पकार अर्थातच – मी किंवा न-मी ).

गुडघे दुखत असल्याने, आम्ही सायकियाट्रिस्टची अपॉइंटमेंट घेतली होती.
पण त्यांना अर्धशिशीचा त्रास होत असल्याने, ते डर्मिटोलॉजिस्टकडे गेले होते.
मग ते ऐकून आम्हाला खूप भूक लागली. काहीतरी चमचमीत खावे म्हणून नीरा
प्यायला गेलो. तर तिथे आम्हाला उपवासाचे मटण मिळेल, अशी पाटी दिसली.
मटणविक्याच्या एका कानाला बहिर्गोल भिंगांचे कर्णयंत्र होते आणि दुसऱ्या हातात
कबड्डीची हॉकीस्टिक होती.
तितक्यात एका तरुणीने त्याला कॅरमच्या सोंगट्या देता का किलोभर, असे विचारले.
पण मटणविक्या म्हणाला की, शाकाहारी व्हिक्सच लावा मैदानाला उगाळून,
म्हणजे छान पोहता येईल त्यात अंडरवॉटर.
तोच बंद पडलेल्या पालथ्या रेडिओवर बैठकीचा भांगडा लागला आणि नंतर
छातीच्या डेंटिस्टची जाहिरात लागली. त्यामुळे आम्हाला गुडघ्यांची आठवण झाली.
एकपात्री समुहनृत्यात मोठ्या आवाजात गायल्यापासून आम्हाला गुडघेदुखी झाली होती.
शेवटी ती सहन न झाल्याने अंतिम उपाय म्हणून डोळ्यांच्या चेस्ट हॉस्पिटलमध्ये
आम्ही सदेह घुसलो !!! आम्ही म्हणजे मी एकटाच हो , जणू आचार्य मिलिंद अत्रेच !
--- ००० ---

सर्जकता

‘ आरोग्यता तुका पावला अष्टांगी ll ‘ असे जाहीर करणे ही काही खाऊची गोष्ट नाही. मराठी मानस सगळ्यात जास्त कशात इंटरेस्ट घेत असेल तर चुका टिपणे, टोच्या मारणे, उपरोधिक आणि कुत्सित बोलणे आणि समोर येईल ते आधी फेटाळून लावणे, यात ! अशा प्रांतात तुकारामाने हे जाहीरपणे म्हटले ! त्याला सर्जकतेचा आणि रोगप्रतिकारक शक्तीचा संबंध उत्स्फूर्तपणे कळला असणार. गेल्या दहा वर्षांत सर्जकता आणि मेंदू यावर झालेले संशोधन नक्कीच विचारात घेण्यासारखे आहे. तुकारामासारखेच रामकृष्ण परमहंस म्हणा किंवा जे. कृष्णमूर्ती म्हणा, सर्जक होतेच ना, तरीही, त्यांना कसा झाला कॅन्सर – असा विचार करून झटकन सगळे नाकारून आपले आहे तेच चालू ठेवणे शक्य आहेच. पण, एकदम टोक न गाठता यात काही तथ्य असेल का, असा समजुतदार शोध घेणेही शक्य आहे.

मानवी जगण्यात कला ही एक निरुपयोगी बाब असून फार तर करमणूक करणे एवढेच तिचे काम असू शकते, असे समजणारे महाभाग बरेच आहेत. ( दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा ‘ कवी काय काम करतो ‘ हा मराठीतला एक अमर लेख असून तो सर्वांनी वाचावा, असे या निमित्ताने सुचवतो. ) नवे संशोधन याच्या उलट काही सांगते. मेंदूचा डावा भाग म्हणजे तर्क आणि गणित आणि उजवा भाग म्हणजे भावना आणि कल्पना असे ढोबळपणे समजले जात होते. ते आता मागे पडलेले आहे. मेंदूतले सर्वच आंतरसंबंध आणि साहचर्य हे एकूणच जगण्यात महत्त्वाचे असतात असे आता सप्रयोग सिद्ध झालेले आहे. साहित्य, संगीत, बागकाम, विणणे असे काहीही सर्जकतेला बढावा देणारे असते. ही सर्जकता काय काय करते ते जाऊ द्या सध्या, पण, ती मानसिक आणि शारीरिक आरोग्य प्रदान करते, राखते, हे सिद्ध झालेले आहे. आता आरोग्याची काय गरज आहे असा मूर्ख प्रश्न तरी कुणी विचारू नये. सध्याच्या कोव्हिड काळात रोजच रोगप्रतिकारक शक्तीबद्दल बोलले जात आहे. त्यासाठी औषधेही सांगितली जात आहेत. पण, सर्जकतेची वा कलेची आवड असणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे, हे लक्षात घ्यायला हवे. निराशारोग, स्मृतिभ्रंश यांपासून तर सर्जकता बचाव करतेच पण  एकूणच विचारशक्ती वाढवणे, केंद्रितता वाढवणे, कार्यक्षमता वाढवणे हीही कामे तिच्यामुळे होतात. तरीही, कला निरुपयोगी आहे, असे ज्यांना वाटते त्यांना बोंबलत त्यांच्या मार्गाने जाऊ द्यावे.

राजकीय पुढारी किंवा कोणतीही सरकारे सर्जकतेच्या क्षेत्रात काय करतात ? सांस्कृतिक वारसे जपणे आणि काही रकाने भरून त्यासाठी निधी खर्च करणे. ( सगळेच तसे नसते, काही चांगलेही केले जाते, हे मान्यच. ) त्यामुळे, सरकारी पाठबळाची वाट बघत थांबायचा हा विषय नाही. ज्यानेत्याने प्रत्येकाने समजून घेणेच महत्त्वाचे आहे. राजकीय पुढारी आपल्याला जयंत्या, पुण्यतिथ्या, उत्सव आणि सोहळे यांत गुंतवून ठेवू इच्छितात कारण त्यात त्यांचा फायदा असतो. त्यातच जगण्याचा अर्थ साठलेला आहे, असे ज्यांना वाटते त्यांचा प्रश्नच नाही. बाकीच्यांनी तरी, जमल्यास, वाटल्यास या विषयाकडे स्वत: लक्ष देणे आवश्यक आहे.

साहित्य वाचा, चित्रे पाहा, संगीत ऐका !

--- ००० ---

मुंबईत मॉन्सून पाऊस सुरू
पुण्यात अजून मॉन्सूनपूर्व
कर्जतला दोन्ही एकत्र !

भारताचे आपले एक ग्रेट अभिनेते दिलीपकुमार आजारी आहेत -- त्यांच्यावर चित्रित झालेले हे एक भजन बघा -- ( चित्रपट ' गोपी ' १९७० ) -- इतरही सगळ्यांनी छान रंगत आणलेली आहे –

( रामचंद्र कह गये सियासे -- )

नवल ( कादंबरी )
ले ० प्रशान्त बागड – प्र ० पपायरस

हा एक वेगळाच प्रयोग आहे. ना फारसा भूतकाळ ना फारसे भविष्य अशा मजकूराची कादंबरी. हिचा वर्तमानकाळच महत्त्वाचा. मागे काय काय घडत आले हे तुमच्या लक्षात राहीलच असे नाही आणि पुढे काय होईल याची उत्सुकता ताणणारेही काही नाही. घटनांची सलग साखळी नाही. मानवी संबंधांतले ताणेबाणे, त्यांचे परिणाम, त्यांतून उद्भवणाऱ्या समस्या असले फारसे काही नाही. नायकाव्यतिरिक्त येणारी पात्रे तशी जुजबी आणि फारशी घनता नसलेली आहेत. नायक सोनकुळे हा एक मुखदुर्बळ विद्यार्थी असून तो कॉलेज शिक्षणासाठी पुण्यात आलेला आहे, हे आपल्याला सुरुवातीला कळते. पूर्ण कादंबरी ही काही सहाध्यायी विद्यार्थी, त्यांचे भाऊ वा मित्र यांच्या आसपास फिरत राहते. स्त्री पात्रे तर नाहीतच असे म्हणायला हरकत नाही. सनसनाटी वा खूप भावनिक असे काही घडत नाही. कथानक असे काहीच नाही. ही कादंबरी आपण वाचत जातो आणि वाचलेले विसरतही जातो. साडेतीनशे पानांची ही कादंबरी वाचून झाल्यावर आपण फार तर पाच मिनिटे हिच्यावर बोलू शकू.
मग आहे तरी काय हीत ? तर नायकाबरोबर जात राहणे आणि त्याच्या दिसण्यात जे जे येईल ते बारकाईने पाहात जाणे आणि त्याच्या वेळोवेळी येणाऱ्या काही आठवणी. जागतिक आणि मराठी साहित्यातले, तत्त्वज्ञानातले मधून मधून येणारे संदर्भ पाहता हा नायक बऱ्यापैकी वाचन केलेला आणि खूप विचार करणारा आहे असे आपण मानू शकतो. पूर्ण निवेदन हे कादंबरीचा निवेदकच करत असून अनेकदा ते सोनकुळेचे मनोगत या रूपात येत राहते. नायकाला भेटणाऱ्या व्यक्ती, त्याला दिसणारी दृश्ये आणि त्याच्या दिनक्रमाच्या भोवतीचे जग हे आहे या कादंबरीचे अनुभवविश्व. या एकूण प्रकारात महत्त्वाचे आहे ते, जे समोर आहे ते नीट लक्ष देत वाचत जाणे. कथानक असे नसल्याने समोरच्या घटितांचे धागे आणि कण जणू मोकळे होतात आणि इतस्तत: पण पूर्णपणे दिसू लागतात. त्यांचे अवधान घेत जाणे हाच आहे या कादंबरीचा आशय. कधी तो काव्यमय वाटतो तर कधी निरर्थक. इथे वस्तूंना वा घटनांना त्यांचे असे वजन वा मूल्य नाही – त्यांचे भान घेत जाणारे मन हाच इथला आशय प्रवाह. निरर्थकता, भावनिकतेचा जवळपास अभाव आणि तरतमभाव न बाळगता समोर येत जाणारे तपशील यांमुळे वाचकाला एक स्वातंत्र्याचा, मोकळेपणाचा फील येऊ शकतो. म्हटले तर ही कादंबरी कुठूनही वाचता येते. अर्थात, शेवटाच्या भागात येणारे छत्री हरवण्याचे प्रकरण नंतर पूर्ण कादंबरीवर त्याची छाया टाकते.
ही भराभर वाचून संपवायची कादंबरी नाही. नायकाबरोबर वाचकानेही त्याच्या मनातल्या घटितांबरोबर चालावे, अशी अपेक्षा करणारे हे तंत्र आहे. मराठीत हा एक नवीनच प्रकार आहे. हे वाचन सवयीत बसणारे नाही. त्यामुळे, त्याचे नावीन्य ओसरल्यावर पुढे वाचत राहण्याचा कंटाळाही येऊ शकतो. मी मात्र त्याला बळी पडलो नाही. हा प्रयोग गंभीरपणे केलेला आहे आणि कसदारही आहे हे पाहून मी यातला शब्द न शब्द वाचत गेलो. काही ठिकाणी येणारे काव्यमय भाग, काही ठिकाणी येणारे अनपेक्षित तपशील वा वाक्यरचना हे पाहात जाणे मला इंटरेस्टिंग वाटले. पण, सर्वच वाचकांना असे वाचत जाणे आवडेल का याची शंका निश्चितच आहे. या प्रयोगाच्या यशापयशाबद्दल लगेच भाष्य करणे अवघड आहे.
तरीही, सुचलेल्या एका वेगळ्याच मार्गाने अशी पूर्ण कादंबरी लिहिल्याबद्दल बागडांचे आणि तशाच धाडसाने ती प्रकाशित केल्याबद्दल पपायरस प्रकाशनाचे अभिनंदन केले पाहिजे, असे मला वाटते.
--- ००० ---

आपल्या सृजन द क्रीयेशन चे अजून एक ऑनलाईन सादरीकरण। आज रात्री इथेच। live। नक्की बघा।
बुद्धिबळ आणि झब्बू ( दीर्घांक )

**१५ जून २०२१.**

Girish Patke shared a memory — with Champra Deshpande.

tS8tposhnsorued ·

काही कारणामुळे पाच वर्षांपुर्वी "बुद्धिबळ आणि झब्बू" या चंप्रंच्या Champra Deshpande नाटकातील काही संवाद मी येथे दिले होते. ते आज फेबुच्या आठवणीतून वर आले.

गंमत म्हणजे काल सृजन या मुंबईतील ग्रुपने या नाटकाचे अभिवाचन केले. एक चांगला योगायोग यामुळे घडून आला.

5 Years Ago

See Your Memories

Girish Patke is with Kimeya Chaubal-Gadkari.

JsucttmSponnsuSoe r1sem6,rmcmgfed 2016 ·

Ravindra Damodar Lakhe यांच्या एका पोष्टवरून बरीच चर्चा चालू आहे.

ती वाचत असताना मी २००० साली केलेल्या " बुद्धिबळ आणि झब्बू " या Champra Deshpande यांच्या नाटकाची प्रकर्षाने आठवण झाली.

त्या नाटकातील काही संवाद....

नयनतारा - नुसता चावटपणा आहे हा !

जगदीप - नाही. तसं नाही. कुठलंही लेबल न लावता अनुभवानं शिकण्याची वृत्ती ठेव. असं सूक्ष्मपणानं वागायची गरज माणसानंच काळाच्या ओघात तयार केलेली आहे. समाज नीतीमान ठेवण्यासाठीच हा सूक्ष्मपणा चालू असतो. प्रत्येकवेळी स्त्री शरीरानीच सामील झाली पाहिजे असं काही नसतं. नुसते मनाचे सहवासही उत्सव होऊ शकतात.

नयनतारा - पण हे सगळं मला सांगायचं कारण ?

जगदीप - कारण विचारण्यापेक्षा ऐकावंस वाटतंय की नाही ते सांग.

नयनतारा - हे पेचात पकडणं झालं मग.

जगदीप - एकदा मोकळेपणा ठेवायचा म्हटलं की पेचात पकडणंही आलंच न त्यात.

नयनतारा - तू तुझा मुद्दा सोडणार नाहीस, विषयाची गोडी निर्माण केलीस पण तू माझ्यात. तरी एक गोष्ट माझ्या लक्षात आलीय. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू समजतोस तू.

जगदीप - अर्थात् ! आणि स्त्रीलाही ज्या ज्या गोष्टीचं सुख, आनंद वाटतो ती ती गोष्ट तिच्या बाबतीत उपभोग्यच असते. ज्या ज्या गोष्टींचं सातत्य आपल्याला आवडतं ते ते सगळं उपभोग्यच असतं. उदाहरणार्थ आपलं आयुष्य ! उपभोग्यच ! आपलं स्वतःचं सातत्य टिकवण्यासाठी आपली धडपड असते. म्हणजे आपण स्वतःही स्वतःला उपभोग्यच ! एखाद्या गोष्टीचं आपल्याला सुख होतं, तिचं सातत्य आवडतं पण ती गोष्ट उपभोग्य नाही असं एखादं उदाहरण दे तू !

नयनतारा - तू सगळ्या गोष्टींना अनपेक्षित कलाटणी देतोस. मजा येते.

जगदीप - नुसता सहवास जरी म्हटला तरी, सुख वाटलं नाही तर प्रश्नच येत नाही; पण सुख वाटलं तर उपभोग्यपणा आलाच. एका वेगळ्या प्रकारे तो मित्रा-मित्रात किंवा मैत्रिणी-मैत्रिणीतही असू शकतो. पण, मित्र आणि मैत्रिण, किंवा स्त्री आणि पुरूष असं म्हटलं की हा एक पदर त्याला येणारच - नाकबूल केलं तरी.

16 June 2021

विज्ञान म्हणून यातले शून्य कळत असूनही कविता म्हणून मला हे कळते आणि ग्रेट वाटते --
With this new insight into gravity, physicists at last were able to make actual predictions about the universe's behavior, turning cosmology into a science. Einstein was the first to try. Yet as events showed, even Einstein was a fallible genius. A misconception about the nature of the universe led him to propose a mysterious new gravitational effect—a notion he soon rejected. But he may have been right for the wrong reasons, and his "mistake" may yet turn out to be one of his deepest insights.

मर्मदृष्टी

विश्वाच्या अवस्थेबाबतच्या चुकीच्या कल्पनांमुळे
त्याने एका गूढ नव्या गुरुत्वाकर्षणाची शक्यता सांगितली
पण लौकरच त्याने तिचा त्याग केला
पण त्याचे बरोबरही असू शकेल काही चुकीच्या कारणांमुळे
आणि अजूनही त्याची ' चूक ' ठरू शकते
त्याच्या सखोल मर्मदृष्टीचे एक उदाहरण.
----- वाह रे वाह ! क्या कमालकी कविता है !!!!!
--- ००० ---

सतीश तांबे --

अलंकरण , प्रतिमा वगैरे कवितेची व्यवच्छेदक लक्षणे न योजताही
रोजच्या जगण्यात असलेली कविता / काव्य शोधण्यात
Champra Deshpandeचा हातखंडा आहे .
लयीचाही फारसा सोस न बाळगल्यामुळे
काहीशी गद्याकडे झुकलेली त्यांची कविता
अधिक प्रामाणिक आणि
मराठी कवितेत एकांडी वेगळी ठरते .
ही कविता त्याचे उत्तम उदाहरण आहे .
====================
काहीबाही ( कविता )
-----

अशी चिंतनशील मुलाखत क्वचितच समोर येत असते -- सामान्यत:, ' मी कसा यशस्वी झालो ' यावरच मुलाखती चाललेल्या दिसतात. नुसते नाटकच नव्हे तर एकूणच कला क्षेत्रातल्या सर्वांनी ही मुलाखत ऐकावी. ही काही ' अधिकारवाणी ' नव्हे पण विचाराला, समजून घेण्याच्या प्रक्रियेला नक्कीच चालना देणारी ही मुलाखत आहे. एक चांगली मुलाखत घेतल्याबद्दल मनाली काळे यांचेही अभिनंदन ! ( रवींद्र लाखे यांची मुलाखत ).

**पु. शि. रेगे यांच्या तीन कविता**

पु. शि. रेगे यांची कविता सामान्यत: स्त्रीदेह, निसर्ग, काम आणि शृंगार या अनुभवक्षेत्रात फिरणारी आहे. पण ती व्यक्तिगत नशेची सुखगाणी वा विरहाची दु:खगाणी गाते, असे म्हणता येत नाही. कवितेतला आशय निसर्गावकाशात पसरून एक व्यक्तिनिरपेक्ष व्यापक अस्तित्व साकारताना दिसतो. कोणत्याही कवितेत व्यक्तिगततेचा अणुस्फोट घडून निर्माण होणारी प्रगल्भता प्रत्ययाला येत असेल तर अनुभव क्षेत्राच्या मर्यादेचा निर्देश करण्यात फारसा अर्थ राहात नाही. इथे रेग्यांबाबतचे एक उद्धृत प्रस्तुत ठरावे -- " छांदसी (१९६२) हा त्यांच्या समीक्षालेखांचा संग्रह असून १९६८ मध्ये त्याची सुधारित आवृत्ती निघाली आहे. रेगे साहित्याला स्वतंत्र वस्तू मानतात. जीवन जगले तर साहित्य जगणार नसून साहित्य जगले तरच जगण्यासारखे काहीतरी उरणार आहे, असा साहित्याच्या सामर्थ्याचा त्यांनी गौरव केला आहे. कलाकृतीचे सौंदर्य तिच्या घाटात असून तिचे श्रेष्ठत्व तिच्यातील जीवनदर्शनाच्या संपन्नतेवर अवलंबून असते, असे सांगताना रेगे यांनी 'परतत्त्वस्पर्श' हा शब्दही वापरला आहे. – गो. म. कुलकर्णी. "
रेग्यांसारखे विचक्षण, विदग्ध, प्रगल्भ व्यक्तिमत्व आपल्याकडे असेल वा नसेल पण त्यांची कविता व्यक्तिमत्वबाह्य आशयाला स्पर्श करणारी असल्याने सर्वांनाच एका एकत्रित अनुभवात मिलाफ पावणे इथे शक्य होते. आज वाचताना रेग्यांच्या कविता कशा ' कळतात ' या पद्धतीने मी लिहीत आहे. सुरुवातीला त्यांची ' शेवगा ' ही कविता घेऊ.

शेवगा

दोन प्रहर. निवांत सारें.
श्रमभरानें बाजेवरतीं
            पांगुळलेली तूं.
खिडकीबाहेर ढाळिती चवरी
आसुसलेला शेवगा दारचा.

०००

सुरुवात ' दोन प्रहर ' अशी आहे. ' दुसरा प्रहर ' अशी नाही. म्हणजे दोन प्रहर पूर्ण होऊन गेलेले आहेत. दुसरा प्रहर सकाळी ९ ते १२ असतो. म्हणजे ही त्यानंतरची वेळ आहे. दुपारचा एक वाजलाय, असे म्हटलेले नाही – जरा जुनीच कालगणनेची भाषा आहे. आधुनिकतेचा स्पर्श झालेला नसणे, हे यातून जाणवते. निवांत सारे – कोणतीही गडबड, गोंधळ वा आवाज नाहीत. हे एखादे लहान गाव असावे असे मनात येत असतानाच पुढल्या ओळींत त्याला पुष्टी मिळते. श्रमभराने बाजेवरती पांगुळलेली तू. कॉट वा बेड नव्हे, बाज. सकाळच्या अनेक कामांचे श्रम तिने केलेले आहेत. इतके श्रम करून ती पांगुळलेली आहे म्हणजे ती तरुण आहे हे सांगायला नकोच. ( ' श्रमभराने ' हा शब्द वापरताना ' स्तनभाराने ' हा पूर्वीच्या साहित्यातला शब्द मनाला स्पर्शून गेला असावाच. ) तिने बरेच श्रम केलेले असून ती पांगुळलेली आहे. अर्थातच घामेजलेलीही असेल. अशा अवस्थेत बाहेर मंदसा वारा आहे हे पुढच्या ओळींतून कळतेय. खिडकीबाहेर शेवग्याचे झाड असून तो शेवगा ' ढाळिती चवरी ' असा आहे. हे अर्थातच तिच्या विश्रांतीत सुखावणारे आहे. तो शेवगा, शांतपणे तिची विश्रांती व्हावी म्हणून चवरी ढाळतो आहे. जणू एक निष्ठावान सेवकच. पण, त्यालाच येते विशेषण, ' आसुसलेला '. हे अर्थातच आरोपित विशेषण आहे. आसुसलेला दुसराच कुणी असून ते या शेवग्यावर आरोपित झालेले आहे. याचाच अर्थ त्या शेवग्याची ' सेवावृत्ती ' त्या दुसऱ्यातही आहे. एकाच वेळी तो आसुसलेलाही आहे आणि तिची तो काळजीही घेऊ इच्छितो. हा या नात्यातल्या समजुतीचा उच्चबिंदू आहे. एका लहान गावातले बैठे घर, खिडकीबाहेर शेवगा, दुपार आणि मंद वारा, असे हे चित्र आहे. आसुसलेला पण चवरी ढाळणारा शेवगा हे या कवितेतले माणूस आणि निसर्ग यांचे व्यक्तिगततेचा अणुस्फोट करणारे अजब मिश्रण आहे. या भानाने ही कविता पाहात गेल्यास आपल्या मनात ही आणखीही अधिकाधिक उलगडत जाऊ शकते.

इथे एक वेगळी गंमत म्हणून याच नावाची सदानंद रेगे यांची ही कविता वाचायला हरकत नसावी --

शेवगा

फुलवुन पंखा
शुभ्र फुलांचा
तुरा टपोरा
तलम उन्हाचा
टाकित टाकित
सुने उसासे
टिपे शेवगा
धुंद कवडसे!

२१. ६.५४ – सदानंद रेगे.

ooo

आता दुसरी कविता --

कोरुनि मी नभ घेतों

कोरुनि मी नभ घेतों
झाडांच्या हातांनीं,
वदन तुझें अलवालें
या माझ्या हातांनीं;
फुसलावुनि अन घेतों
मातीच्या ओठांनीं
संथ तळ्यांतिल पाणी,
डोळ्यांतिल तव गाणीं.

ooo

इथेही पुरुषाच्या कामभावनेचा निसर्गाच्या अमर्याद अस्तित्वातला आविष्कार व्यक्त होतो आहे. ‘ कोरुनि मी नभ घेतो झाडांच्या ( अगणित ) हातांनी ‘ यात काहीतरी प्रचंड आहे हे जाणवते पण त्याचा खुलासा पुढच्या ओळींत होतो – ‘ वदन तुझे अलवाले ( या शब्दातून नाजुकपणा, लाड आणि आसक्ती जाणवते ) या माझ्या हातांनी ‘. हे दोन्ही मिळून एकच ! पुरुषाच्या कामभावनेची व्यक्तिगतता आणि ती मर्यादा ओलंडणारी निसर्गाची अ-व्यक्तिगतता यांचा हा महाप्रचंड मिलाफ, पहिल्याच कडव्यात तो अणुस्फोट घडवतो. आता याच्यापुढे काय असू शकेल, या प्रचंड उत्सुकतेत आपण असताना पुढचे कडवे येते. याच अवाढव्य विस्तारातले आणखी एक घटित समोर येते – पहिलाच शब्द कामुक येतो – फुसलावुनि. मातीच्या ओठांनी संथ तळ्यातील पाणी तो घेतोय. यात धसमुसळेपणा नसून एक अत्युच दर्जाची पूर्वक्रीडा आहे. संथ तळ्यातील पाणी म्हणजेच डोळ्यांतील तव गाणी ! इथे पुन्हा एकदा तोच, पण संथ, अणुस्फोट घडतो. इकडे तर कामभावनेची मग्नता आहे पण त्याच वेळी ती ओलांडणारा निसर्गही आहे. कामघटनेचा आविष्कार निसर्ग-घटनेतून होतो आहे. ती संथ असली तरी तिच्या डोळ्यांत गाणी आहेत आणि ती तो मनसोक्त ‘ पिऊ ‘ शकतोय ! कामभावनेचा प्रत्यय या प्रकारे इतका विस्तारतो की ती नुसती व्यक्तिगत मग्नता राहात नाही. हे सर्व लक्षात घेऊन वेळोवेळी अनेकदा ही कविता वाचली तरी ती आपल्या मनात सदानावीन्याने उलगडत राहते.

आता तिसरी कविता --

बदामी, वैशाख १८८०

उगवत्या सूर्याहून थोडा वेगळाच लालसर,

किंचित तपकिरी छटा पांघरलेल्या
पिवळ्या रंगाची मधूनच ज्याच्यावर उलगडलेंली आहे झालर
असा हा तुकडा
सलग होता स्तन इथल्याच गुंफेतील
कुणा शिल्पित सहेलीचा – अजून उष्ण, आततायी –
आणि तरीही इथून उंचावरून खाली खोल चितारलेल्या तळ्याभोवतालच्या
नाही नाही त्या हिरव्या
कळा सांगणाऱ्या झाडांच्या कालिंदी पानांचा
गारवा सलोख्याने लपेटून घेणारा,
खंडाळ्याला पाहिलेल्या त्या निर्मनस्क जांभुळवेड्या जांघांच्या डोंगराला
पुन्हा एकदा छेडणारा.
०००

--- या कवितेवर आधीच दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी लिहिलेले आहे. त्यांचे ऋण मान्य करून काही लिहितो आहे. अमुक कालनिश्चिती करणारा उल्लेख हिंदू पद्धतीचा येणे हे या कवितेतल्या सांस्कृतिक संदर्भाशी सुसंगत आहे. पहिल्या कडव्यात रंगसंवेदनांचे तपशीलवार वर्णन करत उत्सुकता ताणली जात राहते. ‘ असा हा तुकडा ‘ पण कसला ? दुसऱ्या कडव्याच्या पहिल्याच ओळीत स्पष्टता यायला सुरुवात होते. हा गुंफेतल्या शिल्पाचा तुटून पडलेला तुकडा आहे. आणि ते शिल्प आहे ‘ कुणा सहेलीचे ‘. इथे आता कोणतीही जिवंत स्त्री नाही आहे. जे आहे ते एका स्त्री शिल्पाच्या स्तनाचा तुकडा. ‘ – अजून उष्ण, आततायी – ‘ इथे ही पुरुषाची जाणीव सुरू होते. उत्सुकता ताणत नेण्याचे तंत्र वाचकाला काहीसे अधीर करत जाते. अनुभवाचे हे एकच पूर्ण युनिट असून ते तीन कडव्यांतून विस्तारलेले आहे. ‘ अजून उष्ण, आततायी ‘ च्या नेमके उलट वास्तव पुढे येते, ते असे – ‘ आणि तरीही इथून उंचावरून खाली खोल चितारलेल्या तळ्याभोवतालच्या नाही नाही त्या हिरव्या ‘ या अर्धवट वर्णनावर हे कडवे संपते. ती सहेली जर शिल्पकला आहे तर ते तळे चित्रकला आहे. त्या स्तनाच्या तुकड्याबद्दलच चाललेय, हे लक्षात ठेवायचे. त्या तुकड्याला हे प्रचंड महत्त्व देणेही आहे. तर तो तुकडा ‘ नाही नाही त्या हिरव्या कळा सांगणाऱ्या कालिंदी पानांचा गारवा सलोख्याने लपेटून घेणारा ‘ हे येते. म्हणजे तो तुकडा उष्ण आहे आणि गारवा लपेटून घेतोय. लपेटून घेण्यात एरवीच्या झाकण्याच्या क्रियेचे सूचन वाटते. कालिंदी हे यमुना नदीचे नाव असून तिचा रंग हिरवा आहे. ती हिमालयातून येत असल्याने तिच्या गारव्याचीही कल्पना करता येते. ( मी नाही हे पाहिलेले हो, ही मिळालेली माहिती आहे. आता त्या नदीचे ड्रेनेज झाल्याचे कळते, ते सोडा. ) आता बघा – स्तनाचा तुकडा बदामीचा, यमुना येते हिमालयातून आणि कविता संपते कुठे तर खंडाळ्यात ! खंडाळ्याचे डोंगर दिसतात जांभळे. पण इथे तेवढेच नाही – तो ‘ निर्मनस्क ‘ जांभूळवेड्या जांघांचा डोंगर आहे. जाणीवपूर्वक आलेला हा शारीरिक उल्लेख आहे. तर चाललेय काय तर त्या निर्मनस्क डोंगराला छेडणे ! इथे वाचक हुश्श म्हणून ‘ वा भिडू ‘ म्हणू शकतो ! म्हणजे पुन्हा उष्ण भावना आणि निर्मनस्कता यांच्या मिलाफाचा, महाप्रचंड अवकाश व्यापणारा अणुस्फोट ! झाले, आता कळली ही कविता, असे संपणारे हे प्रकरण नाही. प्रत्येक वेळी नवे नवे काही देत जाण्याची क्षमता असणारी ही कविता आहे.

सारांश, रेग्यांची कविता नुसतीच पूर्वक्रीडा, मध्यस्फोट आणि उत्तरक्रीडा यांच्या अनुभवांचे सुखवर्णन करणारी नसून ती एक प्रकारे त्या भावानांचे उन्नयन करून सम्यक भानाची अनुभूती देणारी आहे, असे म्हणता येईल.

--- ००० ---

**बदलती कविता**

काळ बदलत असतो म्हणजे काय तर माणसाच्याच कृतींनी जगण्याचा माहोल बदलत जात असतो. यंत्रे येतात मग संगणक येतात मग रोबो येतात, वगैरे. वापरातल्या आणि चैनीच्या वस्तू बदलत जातात. व्यवहारांचे आकार आणि गुंतागुंती वाढत जातात. आकांक्षा वाढत जातात आणि ताणही वाढत जातात. गोंधळ आणि हिंसा वाढत चालल्याची जाणीव होत जाते. या अशा सगळ्या बदलांबरोबरच सामान्यत: त्या त्या काळाला येणाऱ्या माणसाच्या प्रतिक्रियाही बदलत जातात. आधी स्वप्नील, भावनिक, स्वच्छंदी, आदर्शभक्त असणारा माणूस अधिक बुद्धिप्रधान होतो, त्याचा भावनिकपणा कमी होतो पण तरीही तो आदर्श वा तत्त्वे यांची कास सोडत नाही. नंतर एक काळ असा येतो की ही सगळीच त्याला भंकस वाटायला लागते. सत्य, आदर्श हे सगळे फोल वाटायला लागते. यातच समांतरपणे चालणारा एक विद्रोही, परिवर्तनवादी प्रवाह असतो. कष्ट, दु:ख, अन्याय आणि यातना यांचा हा एक क्रोधी उद्गार असतो. प्रत्यक्षात ते तसले आयुष्य जगावे लागणारे त्याला तडक अभिव्यक्ती देतात तर ज्यांना स्वत:ला त्या झळा लागत नाहीत त्यांना एक नैतिक भूमिका घेत, बघा हे दु:ख, बघा हा अन्याय असे संवेदनशील राहणे महत्त्वाचे वाटते. म्हणजे जणू काही ती दु:खे भोगणारे आणि हे संवेदनशील लोक सोडून बाकीचेच सगळे या विषमतेला जबाबदार आहेत, असा हा आत्ममग्न, आत्मतुष्ट पवित्रा असतो.

कला या अर्थी कवितेबद्दल बोलायचे झाल्यास, या सर्व बदलांबरोबर सामान्यत: माणसांच्या प्रतिक्रियारूप मनस्थिती बदलत जात असल्याने कवितेच्या अभिव्यक्तिपद्धतीही बदलत जात असतात. जागतिक कवितेत हे बदल मोठ्या प्रमाणावर झालेले दिसतात. ते बदल स्वीकारणेही जणू त्यांच्या जगण्यातली सहज प्रक्रिया असल्याचे दिसते. मराठीत मात्र जरा डल, मंदबुद्धी वातावरण दिसते. वेगळे काही आले की आधी ते फेटाळायचा प्रयत्न करायचा ही इथली परांपराच आहे. ती इमानेइतबारे जोपासण्याचे काम सर्वच जातींतून आणि वर्गांतून घडत राहते. फेटाळण्याची प्रतिक्रिया विषमताहीन आणि एकोप्याची असल्याचे दिसते. भावनिक किंवा भावविवश कवितेची इथली आवड कोणत्याही बदलांची दखल न घेता वर्षानुवर्षे टिकून राहिलेली दिसते. प्रत्यक्ष जगण्यात खरे तर भावनेचा अभाव, व्यावहारिकता, जे आहे ते आहे तसे पाहणे, ऊरबडवेपणा वा हळवेपणा करत न बसणे, हे घडत असलेले दिसते. पण इथे कवितेत भावनिकता कमी दिसली रे दिसली की लोक उसळून उठतात. रममाण होण्याचे, वाहून जाण्याचे, त्यासाठी लागणारी लयीची गुंगी वा सजावटीचे सामान हे सगळे जर नसेल कवितेत तर हवालदिल होणारे बरेच लोक इथे आहेत. विद्रोही कवितेतही आहे तो रटाळपणा चालू ठेवण्याचे अथक प्रयत्न चाललेले दिसतात. मुळात बोंबलायला वाचते कोण हो मराठी कविता ? ज्या कवितांची भावविभोर गाणी होऊ शकतात त्याच कविता इथे जरा पोचू शकतात – हे खरेच आहे. तरीही काळानुरूप होणारे प्रतिक्रियांच्या प्रक्रियांतले बदल समजून घेण्याचे महत्त्व आपण ओळखायला हवे, असे सुचवावेसे वाटते.

नुसत्या प्रतिक्रियांतून मौल्यवान कविता नाही निर्माण होत. त्यासाठी लागणारे भान वा मर्मदृष्टी कोणत्याही काळात, कोणत्याही प्रकारच्या मानसिक अवस्थेतून येऊ शकते. ते प्रतिक्रियांचे सम्यक भान असते. ते असलेल्या कोणत्याही कविता या सर्वच काळाला प्रस्तुत असतात कारण त्या मनाच्या साच्यात अडकलेल्या नसतात. व्यक्तिगत अनुभव आणि प्रतिक्रिया यांचे अलिप्त भान असल्याशिवाय कवितेला मूल्यात्मकता येत नाही.

--- ००० ---

**२६ जून २०२१.**

चुकून, ' नाद आहे या घटाला अन घटाच्या भोवती ' असे लक्षात राहिले होते -- अत्युत्तम ओळ म्हणून लक्षात होते, पण, हे कुणाचे आहे ते आठवत नव्हते. शोधून सापडले शेवटी ! ते ग्रेट कवी आरती प्रभूच निघाले ! --

गीत – आरती प्रभु

संगीत – पं. हृदयनाथ मंगेशकर

स्वर – लता मंगेशकर

अल्बम – मैत्र जिवाचे

दुःख ना आनंदही अन् अंत ना आरंभही,
नाव आहे चाललेली कालही अन् आजही.
मी तसा प्रत्यक्ष नाही, ना विदेशी मी जसा,
मी नव्हें की बिंब माझें ! मी न माझा आरसा.
याद नाही, साद नाही, ना सखी वा सोबती,
नाद आहे या घड्याला अन् घड्याच्या भोवती.
सांध्यछाया आणि काया जोडुनी यांचा दुवा
नाव आहे चाललेली, दूरची हाले हवा.
एकला मी नाहि जैसा, नाहि नाहि मी दुणा
जीवनाला ऐल नाही, पैल, तैसा मध्य ना.

--- ००० ---

जर्मनीत शिकून डॉक्टर झालेला एक हाडशस्त्रशास्त्री की जो आता इंग्लंडमध्ये आहे -- तो मला फ्रेंडरिक्वेस्ट पाठवतो, याचा अर्थ काय समजावा ? मराठी येणाऱ्यांनाही मी लिहिलेले काही समजत नाही तर हा माझ्या मैत्रीत कशाला येऊ इच्छित असेल ? चेहऱ्यावरून मात्र वाटतेय की असेल बाबा हा सर्जन. पण हा फोटो त्याचाच असेल तर ! परदेशी स्त्रियांना मी आधीच घाबरत असल्याने त्यांच्या रिक्वेस्टी मी तुरंत निकाली काढत असतो. या डॉक्टरलाही तोच मार्ग दाखवणार आहे. की मी जे. कृष्णमूर्ती ग्रुपमधले जे येईल ते वाचत असतो, त्याचा असेल हा परिणाम ? एवढी वर्षे लिहूनही इथेच मला कुणी ओळखत नाही तर हा कसा काय ओळखतोय ?

Satish Tambe

भाषा अनेक गोष्टी सूचित करत असते .शब्द घडण्याच्या प्रक्रियेत खूप अर्थसंचिताचे गुप्तधन सामावलेले असते . शिवाय वाक्प्रचार म्हणी रुळलेल्या उक्ती ह्यामध्ये पिढ्यानुपिढ्यांचे अनुभव सुप्तपणे वावरत असतात.
रोजच्या व्यवहारातील भाषावापरात भाषेचा फक्त बाह्यस्तर योजला जातो. कवीला मात्र भाषेचा अंत:स्तर जाणवत असतो. थोडक्यात ' जे न दिसे एरवी , ते देखे कवी ' असे म्हणता येईल , ह्याचे एक चपखल उदाहरण आहे , Champra Deshpande ह्यांची ' मिडास ' ही कविता .
' स्वभावाला औषध नसते ' हे आपण सर्रास ऐकत -बोलत असतो , पण औषध तर रोगासाठी दिलं जातं. ह्याचा अर्थ भाषा आपल्याला ' स्वभाव ' हा एक रोग असल्याचे सूचन करत असते, तर ते आपल्या ध्यानीमनी नसतं. कारण असा विचार करणे आपल्याला परवडणारेही नसते . चं प्र ह्यांच्यासारखा करिअरिस्ट नसलेला व भाषेतूनही जीवनाचे आकलन करण्याची सवय अंगवळणी पडलेला कवी मात्र भाषेच्या तळापर्यंत सूर मारत असतो. त्याला भाषेची सूचने/ अर्थाच्या हाका नीट जाणवतात .
म्हणूनच ते सुरुवातीलाच , आजोबांचे इंटरेस्टिंग वाटणारे बोलणे ऐकताना

>> हा धोका नसे दिसत की साले हे सगळे
आपला स्वभाव घडवत जातेय <<
असं स्वभावाच्या जडणघडणीच्या प्रक्रियेवर नेमके बोट ठेवतात .
ताबडतोब ते ' अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी ' उमटत असणाऱ्या कवितेकडे वळतात, जिथे त्यांना आपल्या कवितेचे ' स्वभावदोष ' दिसू लागतात ते असे -
>> मी कविता लिहू लागलो तर सुरुवातीला
असे त्रासिक का येते सगळे असा मला प्रश्न पडे
असे क्वचितच काही लिहिले वा वाचले जाई
जे कुणाच्या वा कशाच्याही विरुद्ध नसे <<
हे जाणवल्यावर ते आत्मनिरीक्षण-परीक्षण सुरु करतात, ज्यातून त्यांना
>> कसली ही साली डांबून घेणारी खत्रुड सवय <<
हे आकलन होते , ज्यातून स्वभाव सोडण्याची वाटचाल सुरु होते
>> ज्या क्षणी सापडले याचे रहस्य
तेव्हा मी स्वभाव सोडून उभा होतो <<
त्यामुळे सुरवातीला ज्या कविता लिहिण्याचा उल्लेख केला आहे
त्याचे परिवर्तन
>> मी नुसती लिहायला सुरुवात करतो कविता
जे येतील त्या शब्दांची कविता होते <<
असे होते , अशा वेळी कवीला ' हात लावेन त्याचं सोनं होणारा मिडास आठवतो.
आणि ' स्वभावो दूरतिक्रम : ' सोडल्यावर येतील ते शब्द कविता होतात ,
ह्यातील साम्य जाणवतं.
ह्या कवितेतून चं प्र वाचणाऱ्या प्रत्येकालाच आपल्या स्वभावाच्या जोखडामुळे
आपले काय झाले आहे आणि ते भिरकावले तर त्यातून काय निष्पन्न होऊ शकते
ह्याची प्रचिती आणि प्रेरणा देतात .
चं प्र ची कविता ही मराठी कवितांशी मिळून मिसळून वागणारी नसली तरी माझ्या मते ते अत्यंत गंभीरतेने आणि चिकाटीने अभ्यास करावा अशी कविता सातत्याने लिहीत असतात आणि ' मिडास ' ही त्यातील एक अत्यंत लक्षणीय कविता आहे .
--- 0 ---

मजकूर सेव्ह करताना कंट्रोल + एस ही बटणे एकत्र घेतली जातात. त्यात एक धोका आहे. एस च्या शेजारीच डी हे बटण आहे. चुकून कंट्रोल + डी असे एकत्र दाबले गेले तर आख्खी फाईल डिलीट होते आणि मग त्याला अनडू हा परतीचा मार्ग उपयोगी पडत नाही. सरळ ॲ रो वापरून वरच्या सेव्ह चिन्हावरून सेव्ह करावे, हेच बरे !

कविता म्हणजे काय ?

अलीकडे किंवा पूर्वीपासूनच कवितेच्या आकारात, ओळी तोडून मी जो ‘ गद्य ‘ मजकूर कविता म्हणून ‘ खपवतो ‘ त्यामुळे बरेच मित्र-मैत्रिणी अस्वस्थ होतात आणि माझ्याबद्दल मुळात स्नेहभावना असल्यामुळे जरा सौम्यपणे विचारतात की या असल्या मजकूराला कविता का म्हणावे ? अगदी वरवर पाहिले तरी बौद्धिक स्तरावर जगाच्या मूल्यव्यवस्थेत आणि त्यामुळे दृष्टिकोणात बदल होत असतात आणि त्याचे परिणाम अभिव्यक्तिपद्धतींवरही होत

असतात, हे समजून घेतले पाहिजे. असे समजून घेण्याची पद्धत आणि कुवत बहुसंख्य मराठी साहित्यिकांत आणि रासिकांत नाही, हे दुर्दैव आहे. खरे तर ' रसिक ' हा शब्दही बदलायला हवा आहे कारण तो भावनिक परिणामाचा द्योतक आहे. कवितेतल्या भावनिकतेला जोरदार प्रतिक्रिया जगात कधीपासूनच – खूप वर्षांपूर्वीपासून आलेली आहे. भावनिक वा भावविवश नसलेली न-कविता जगात अवतरून बरीच वर्षे झाली. तसेच अतिवास्तववादाचेही आहे. हा काही वैचारिक वाद नसतो नुसता – हे प्रत्यक्ष जगण्यातले सत्य असते. आपण म्हणणार, ते तिकडचे आहे, आपल्या मातीतले नाही. हा निव्वळ बावळटपणा आहे. मन वापरण्याची पद्धत जगभर एकसारखीच असते, शिवाय, आता तर समजण्या-पाहण्याच्या स्तरावर जगाचे सपाटीकरण झालेले आहे, होत आहे, हे मराठीवाले सोडून सर्व जगाला कळत असते. मराठी मात्र अंग मुडपून पडून असते आपल्याच देशी कोषात. कवितेचे मुख्य लक्षण सूचकता हेच मानले जाते. ही सूचकता एक तर अनुभवाची व्यामिश्रता वेधणारी असू शकते आणि दुसरे म्हणजे दिलेल्या मजकूराच्या बाहेरचे भान निर्माण करणारी असू शकते. ते मजकूराच्या बाहेरचे, मजकूराच्या मर्यादा ओलांडणारे जे भान व्यक्त होते ती असते कविता. आणि ही अशी कविता कोणत्याही साहित्यप्रकारात असू शकते. मेघना पेठे आणि सतीश तांबे यांच्या कथालेखनातही ती असते. दृश्य स्वरूपात कथा, कादंबरी, नाटक, कविता, असे भेद मानले तरीही. ' वेटिंग फॉर गोदो ' ही या अर्थाने कविताच असते. तरीही ' कविता ' या साहित्यप्रकाराची दृश्य वैशिष्ट्ये आणि तंत्रकौशल्ये वेगळी असतात. ' गद्य ' वाटणाऱ्या मजकूरातही, शब्दक्रम, ओळी तोडणे, उताऱ्यांची वा कडव्यांची रचना अशी अनेक तंत्रे वापरली जात असतातच. मराठीची मर्यादा ही आहे की अजूनही इथे भावनिकता, सांगीतिक लयबद्धता, प्रतिमा व अलंकार यांचे स्तोम आहे. मुख्य म्हणजे व्यक्तिगत सुखदु:खे, भावभावना आणि प्रतिक्रिया म्हणजेच कविता अशा खुजा, संकुचित मर्यादेत मराठी कविता फिरत असते. त्यामुळे, माझ्या कविता काय किंवा रवींद्र लाखे वा श्रीधर तिळव्यांच्या कविता काय, नाकारण्याकडेच इथे कल दिसतो. या कवितांना ' गद्य ' म्हणून फेटाळावे आणि आपला सवयीचा संसार सुखाने चालू ठेवावा, असा हा प्रकार आहे. जे लोक अशा कवींना ' गद्य ' म्हणून नाकारत असतात त्यांची मते नाकारणे हे अशा कवींनाही भाग असते.

आता प्रश्न फेसबुकावर येणाऱ्या कविता. या माध्यमाच्या उपलब्धतेमुळे लिहिणारे वाढलेले आहेत आणि बरेचसे सामान्य लेखनही प्रसिद्ध होत असते. या लेखनाला हेटाळून स्वत:चे श्रेष्ठत्व दाखवायची फॅशन मला मान्य नाही. या सगळ्यांचे स्वागतच केले पाहिजे, असे मला वाटते. जे स्वत:ला बनचुके समजतात त्यांचेही सगळेच लेखन खूप दर्जेदार असते, असे काही नाही. प्रत्येक लेखक नेहमीच त्याच्या कुवतीच्या अत्युच्च टोकाला जात असतो का ? तर, असे नाही होत. खूप लोक लिहीत असतील तर लिहू द्यात, त्यांना नाउमेद करणारे आपण कोण ? अशी अधिकारवाणी कुणीही स्वत:कडे घेऊ नये, असे मला वाटते. सध्या सामान्य लिहिणारे जे आहेत तेही शिकत जातील, त्यांच्या लिहिण्याच्या आवडीसाठी इतरांचे वाचतही राहतील, त्यांनाही आशयाचे गांभीर्य म्हणजे काय, हे कळत जाईल, या शक्यता बंदच करायचे प्रयत्न कुणी करू नयेत आणि असे प्रयत्न करणाऱ्या लोकांना लिहिणाऱ्यांनीही जुमानू नये.

माझा अनुभव, माझा राग, माझे शौर्य एवढीच नसते कविता. आणि असे ज्यांना वाटत असेल ते त्यांचे त्यांना लखलाभ !

--- 0 ---

कवितेचा आशय -- १.

चिडचिड करायची नाही. हा एक प्रयोग आहे. आपण साहित्याच्या, कवितेच्या क्षेत्रात आहोत तर आपण स्वत:ला तपासण्याचे कामही चालू ठेवले पाहिजे. माझ्याकडे एक कविता आहे, कुणाची ते विचारायचे नाही. ती मी इथे देतो आहे. ती कविता कशी वाटते, आवडते वा नावडते याच्या सकारण प्रतिक्रिया द्यायच्या. मीही माझी प्रतिक्रिया शेवटी देणार. कविता अशी आहे --

खुनास अंधाराच्या

सखी सावळी साक्षी
निकाल येण्याआधी
घंटेचा होतो पक्षी
यावर जरूर मते यावीत. आपण कवितेचे रूप आणि आशय यांचा विचार करत आहोत. त्या दृष्टीने मनापासून पण व्यक्तिगत रागालोभाशिवाय बोलावे.
--- 0 ---

काही काळासाठी बाय बाय
' कवितेचा आशय ' यावरच्या पोस्ट २ आणि ३ म्हटल्याप्रमाणे देईन. त्यानंतर मात्र काही काळासाठी निरोप घेईन. बास झाले आपले म्हणणे आणि अभ्यासहीन मते मांडणे, असे आता वाटते आहे. मी खाते चालूच ठेवेन, मधून मधून वाचेनही, पण , पोस्टस वा कॉमेंटस वा लाईकस हे बंद करेन. अर्थात माझे लेखन बंद नाही होणार, ते चालूच राहील आणि ते वेळोवेळी माझ्या वेबसाईटवर अपडेट केले जाईल. मी ज्या शेवटच्या दोन पोस्टस देणार आहे त्याही अनेकांना न पटणाऱ्या वा काहींना राग येणाऱ्या अशाच असणार आहेत. पण, तरीही, स्वत:चे अवमूल्यन होण्याचा धोका पत्करूनही मी ते काम करणार आहे. त्यानंतर मात्र आपले एकमेकांना काही काळ तरी दर्शन होणार नाही. आणि तेच सर्वे भवन्तु सुखिनः, असे वाटले तर तसेच पुढेही चालू ठेवता येईल.
आता त्या दोन पोस्टस एका वेळी देऊन मी थांबेन. सर्वांना शुभेच्छा !
--- ००० ---

याआधीच्या माझ्या पोस्टमध्ये माहिती दिल्यापमाणे, या पोस्टवरच्या चर्चेत मी सहभागी होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कवितेचा आशय – २.

सामान्यत: कवितेचे वाचक हे काव्यमय अर्थाचे भोक्ते असतात. म्हणजे त्यांना बौद्धिक, भावनिक अर्थ हा सांगीतिक लयीतून आणि सजवून हवा असतो. मग तो अर्थ एकरेषीय निवेदनासारखा मर्यादित असला तरी त्यांना चालते. मराठीतल्या बहुसंख्य मान्यताप्राप्त कविता या एकरेषीय निवेदनेच आहेत. कवितेच्या अर्थाला अशी काव्यमयता देण्यात ग्रेस हे कवी आघाडीवर आहेत. मी ज्या प्रकारच्या कविता लिहितो ते पाहता किंवा ‘ व्यक्तिगतता ‘ असणाऱ्या कविता खुज्या असतात असे म्हणतो त्यावरून मी काही ग्रेस यांच्या कवितेचा चाहता नाही, हे कुणीही ओळखू शकेल. सुरुवातीला त्यांच्या काही कविता मी वाचल्या पण नंतर ये मेरी चाय नही है, हे ओळखून मी तो नाद सोडून दिला. तरीही त्यांचे चाहते उदंड असल्यामुळे त्यांच्या काही कविता वा ओळी समोर येत राहिल्या. तर तेवढ्या तुटपुंजा शिदोरीवर आधारितच मला जे प्रश्न पडले ते मांडतोय. ग्रेस यांच्या या ओळी घेऊ --
मी महाकवी दु:खाचा
प्राचीन नदीपरी खोल
दगडाचे माझ्या हाती
वेगाने होते फूल
मुळात दु:खाचा महाकवी ही कल्पनाच मला मान्य होऊ शकत नाही. दु:ख मांडणे वा दु:खाची अनुभूती देणे हे मी कवितेचे सर्जक काम मानतच नाही. पण हा कवी स्वत:ला त्यातला महाकवी म्हणून जाहीर करतो तिथेच माझ्या दृष्टीने विषयच संपतो. माझे म्हणाल तर मी न-कविता, अतिवास्तववादी कविता, असंगत कविता,  निरर्थक कविता वा स्वयंचलित कविता – हे सर्व प्रकार महत्त्वाचे मानू शकतो. पण काव्यमय अर्थाचे भोक्ते वाचक जे असतात त्यांचे तसे

असू नाही शकणार. त्यांना काव्य आणि अर्थ ( वर दिलेल्या अर्थाने ) दोन्ही लागणार. तसे नसेल तर त्या मजकूराला ते कविता म्हणून मान्यताच नाही देणार. हे लक्षात घेऊन मला असा प्रश्न पडतो की अशा वाचकांना या चार ओळींत अर्थ काय सापडत असावा ? हा प्राचीन नदीपरी खोल आहे म्हणजे हा काही नुसताच सध्याचा संस्कारित वा प्रभावित साचा नाही आहे. शिवाय, त्याचा स्पर्श होताच ‘ वेगाने ‘ म्हणजे सत्वर – त्या क्षणी, दगडाचे फूल होते आहे – म्हणजेच दु:खाचे आनंदात रूपांतर होते आहे ! म्हणजेच, दु:ख क्षणभरही अस्तित्वातच येऊ शकत नाही आहे. मग हा स्वत:ला दु:खाचा महाकवी का म्हणवून घेतो आहे ? वाचकाला यातून ‘ अर्थ ‘ काय प्रतीत होत असेल की तो नुसताच काव्यमय चमत्कृतीने वा जादूने प्रभावित होऊन ‘ वाह ‘ म्हणत असेल ? दुसऱ्या एका ठिकाणी त्यांच्या अशा ओळी पाहिल्या --

सूर्य रोज अस्ताला जातो
कळे ना मज काही
झोळीत कधीही माझ्या
अंधार उगवला नाही

इथेही अर्थ तोच येतोय. यांच्याकडे अंधार उगवलाच नाही ! दु:ख अनुभवाला आलेच नाही ! इथे एक लक्षात घ्यायला हवे की माझ्या काय किंवा अनेक कवींच्या कवितांतला ‘ मी ‘ म्हणजे कवी स्वत: नसतो. तो एक पोएटिक पर्सोना असतो -- एक काव्यगत व्यक्तिमत्व असते – अनेकदा ती वेगवेगळी पात्रेही असतात. पेसोआ या जगप्रसिद्ध कवीने ७६ टोपण नावांनी वेगवेगळ्या कविता लिहिल्या. हे सजावटीचे भावनिक काव्य लिहिणारे कवी जे असतात ते सामान्यत: त्यांच्या कवितेतही स्वत:च उपस्थित असतात. त्यामुळे, तिकडे काय म्हटले त्याचा पुरावा दुसऱ्याही कवितेत, असे चालू शकते. तर अशा कवितांचे शौकीन लोक त्यातली भावनिकता, सजावट आणि जादू यांनाच भुलून ‘ वाह ‘ म्हणतात का, असा मला प्रश्न पडतो. इथे तर एकरेषीय अर्थाचाही अभाव दिसतो ! तरी वाचकांना हे कशामुळे चालत असेल ? की भावनिकता, सजावट आणि सांगीतिक लय एवढे सामान असले की अर्थाची गरजच नसते ? मस्त एंजॉय करता येते ? दु:खाच्या महाकवीच्या कविता अशा एंजॉय करणे कितपत समर्थनीय आहे ? की इकडे अशा दु:खहीन कविता लिहायच्या आणि तिकडे दु:खात बुडूनही लिहून त्याचीही वाहवा मिळवायची असा काही हा प्रकार असेल ? दु:खाची अशी चेष्टा करणे कुणालाही परवडणारे नाही, असे इथे सुचवून ठेवावेसे वाटते. राग नसावा, ही विनंती.

--- ००० ---

याआधीच्या माझ्या पोस्टमध्ये माहिती दिल्यापमाणे, या पोस्टवरच्या चर्चेत मी सहभागी होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कवितेचा आशय – ३

आता हा मात्र मी जरा धोक्याचा खेळ करतोय. हा जर फसला तर माझे आख्खे कवितालेखन ( सुमारे १८०० पाने ) एका फटक्यात फेटाळून लावायची सोय उपलब्ध होऊ शकते. पण, वाचक सहृदय असावेत असे एक म्हटले जाते तसेच मराठीतही ते आहेत अशा विश्वासाने मी लिहितो आहे. इथे मी माझीच एक कविता घेऊन ती ( भावनिकता, सजावट आणि सांगीतिक लय नसूनही ) कविताच का आहे, हे सांगायचा प्रयत्न करणार आहे. असे काही करावे असे सुचणारे आणि तशी कुवत असलेले समीक्षकच मराठीत नसल्याने असा थोडा निर्लज्जपणा प्रत्येकच कवीने करणे गरजेचे आहे, असे मला वाटते. मुद्दाम शोधून, माझे नीट मार्केटिंग करता येईल अशी कविता न घेता सध्या हाताला येईल ती घेतोय –

प्लॅन

पटतेय मला तुमचे आम्ही तुमच्याबरोबर
नाही आलो तर तुम्ही आमचे
खूप नुकसान करू शकता पण मी
तुम्हाला वेगळा सांगतोय प्लॅन
आत्ता आमचे सभासद हितचिंतक यांना
डिस्टर्ब नको करायला आमचा तुम्हाला म्हणजेच
आपला एकमेकांना उपयोग होण्यासाठी
आमची शक्ती कमी होऊन चालणार नाही
सध्या आम्हाला त्यांच्याबरोबरच राहू द्या
त्यांची ताकद वाढू नये याची आम्ही काळजी घेत राहू
एकदम निवडणुकीच्या वेळी असे काही घडवू
की आपल्याला एकत्र येता येईल म्हणजे मग
त्यांना चेपणे सोपे जाईल सध्या आम्हाला
तुमच्या विरोधातच राहू द्या फार तर तुम्हीही
आमच्या विरोधी काही करत राहा पण नंतर
ते टोकाला जाणार नाही हे पाहू
हे आज आपण भेटलो ते
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी असे म्हणू
पण फार तर दोघेही
एकमेकांच्या विरोधाची धार जरा बोथट करू
एखादे काही चांगलेही बोलू एकमेकांबद्दल
म्हणजे आपल्या एकत्र येण्याचा धक्का
त्या वेळी जरा कमी बसू शकेल
बाकी तुमचे आमचे विद्वान आपण जे जे
करत राहू त्याचे समर्थन करतच राहतील
काही असतील स्वत:ला निस्पृह समजणारे
ते फार तर आम्हाला विश्वासघातकी म्हणतील
त्याने फारसे काही बिघडत नाही
शेवटी मतदार संभाळणे महत्त्वाचे विद्वान नव्हे

--- ००० ---

सुमारे १९६५ च्या आसपास ' टाइम ' मासिकात मी निस्सीम ईझीकेल यांचा एक लेख वाचला होता. कवितेतली भावनिकता कशी लोप पावत चाललेली आहे असा काही तो विषय होता. मला तो लेख विशेष महत्त्वाचा वाटला कारण मी तशीच कविता लिहीत होतो. त्यानंतर सुमारे १९७७ ला माझा ' कवितेतील अ-भाव ' हा लेख ' सत्यकथे ' त आला, त्या लेखात मी ईझीकेल यांच्या त्या लेखाचा उल्लेख केला होता. स्वत:ची भावनिकता व्यक्त करणे हे मला कवितेचे महत्त्वाचे काम आहे, असे कधीच वाटले नाही. सांगायचा उद्देश म्हणजे, अजूनही आपल्याकडे हा विषय ताजातवाना आहे याकडे लक्ष वेधणे. मी वर दिलेली माझी कविताही त्याच कारणामुळे काहींना ' कोरडी ' वाटू शकते. खरे तर हा काळाचा महिमा आहे. व्यावहारिक आत्मकेंद्रितता हा आता जगण्याचा मूलमंत्रच आहे. पण,

इथली कविता मात्र यापासून अलिप्त, आहे तशी ओली, हळवी राहावी असे प्रयत्न इथे निकराने सुरू असतात. वाचकांचीही सामान्यत: तीच मागणी दिसते. हे असे कशामुळे आहे त्या चर्चेत इथे जात नाही. तर मुद्दा असा की वातावरणातच एक निर्दय स्पर्धा आणि सरळ सरळ मूल्ये, नीती, या सगळ्या गोष्टी विक्रीयोग्य झालेल्या आहेत. काळाच्या याच भानातून ही कविता लिहिलेली आहे. राजकारण हे आपण सामान्यत: समोर येणाऱ्या बातम्यांतून समजून घेत असतो. तेही आपल्या कुवतीप्रमाणे. कवी म्हणून मला याची खोलातली पाताळयंत्रणा पाहावीशी वाटली. मी काही प्रत्यक्ष राजकारणातला अनुभवी वगैरे नाही. पण, माणसाचे मन आणि त्याचा हलकटपणा हे मी जाणून असतो. कोणताही लेखक वा कवी त्याच्या या मन-भानावर आधारितच लिहीत असतो. तर ही कविता म्हणजे दोन पक्षांच्या हायकमांडांमधला संवाद आहे. ही माझी नव्हे तर पात्रांची कविता आहे. कवितेची सुरुवात थंडपणे होते पण विषय काय आहे तर ' तुम्ही आमचे खूप नुकसान करू शकता ' ! तो देवघेवीला वा ' एकत्र ' यायलाही तयार आहे, पण सध्या नको, एवढेच सुचवतोय. पुढे हे कसे घडवायचे याचा प्लॅनही तो त्याच थंडपणाने सांगतोय. मध्यंतरीच्या काळात आपण विरोधीच राहू, म्हणतोय. म्हणजे तो आत्ता ज्यांच्याबरोबर आहे त्यांना पूर्ण गंडवून तो पुढचे ' यश ' साकारू इच्छितोय. यात कोणतीही तत्त्वे वा विवेक वा देशहित वगैरे असले विचार असूच नाही शकत. हे वेळ येईल तसे, त्यातूनही आपले हित साधत जाणे आहे. लोकांना दिसणार वेगळे पण मुळात असणार वेगळे. तुमचे आमचे विद्वान आपण जे काय करत राहू त्याचे समर्थन करत राहतीलच, असे तो म्हणतो. कहर म्हणजे, एखादा निस्पृह विद्वान आम्हाला विश्वासघातकी म्हणेल, पण , ते काही महत्त्वाचे नाही, असे म्हणतो. विश्वासघातकी असणे आणि कुणी तसे म्हणणे हे इथे मुळीच महत्त्वाचे राहात नाही. म्हणजेच, बातम्यांवरून वरवर दिसणारे सगळे तसेच खरे असण्याची शक्यता नाही, दिसते त्यापेक्षा वेगळेच प्लॅन शिजत असू शकतात आणि बुद्धीने प्रचंड विश्लेषण करू शकणारे विद्वान नगण्य, निरर्थक असतात ! जगण्यातली ही अब्सर्डिटी व्यक्त करणे हे माझ्या कवितेचे एक काम असते. सर्व बौद्धिक भान, समज आणि अभ्यासयुक्त विश्लेषणे फडतूस ठरण्याचे सत्यदर्शन ही कविता देते. ते भान त्या कवितेच्या मजकुरात नसून ते सगळे वाचून झाल्यावर येणारे असे आहे. एकेका ओळीवर असे बोलत बसत नाही. हे काही माहिती देणारे गद्य टिपण नाही. यात जगण्याच्या अवस्थेचे आणि प्रक्रियेचे स्वच्छ पण अमुक असे मर्यादित नसलेले भान व्यक्त होते आहे. त्यामुळे, ही कविताच आहे, असे मला म्हणायचे आहे. मी म्हटल्याने काही खरेखोटे ठरत नाही, हे मला समजते, पण, सद्यस्थितीत असे ' आपले आपण ' बोलायला हवे, असे मला वाटले. या असल्या लेखनाच्या या उद्योगासाठी मी दिलगीर असून माफी चाहता हूं !

--- ००० ---

**०८ जुलै २०२१**

फेसबुक संन्यासात असा मध्येच एखादा दिवस संसार घेण्यात येईल --

कुसुमाग्रजांचा ईश्वर-विचार

वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्म १९१२ साली झाला आणि ते १९९९ साली निवर्तले. या काळातल्या महत्त्वाच्या घटना म्हणजे १९३० साली, डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेल्या काळाराम मंदिराच्या दलित प्रवेश आंदोलनात त्यांनी घेतलेला सहभाग, १९५६ पासून झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही झालेले त्यांचे योगदान आणि १९६७ ते १९८२ या काळातली त्यांची साहित्य निर्मिती लक्षात घेऊन त्यांना १९८७ साली दिला गेलेला ज्ञानपीठ सन्मान. त्यांच्या एकूण जगण्यात त्यांनी कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता अशी विपुल साहित्य निर्मिती केली. इथे त्यांचे कवितालेखन विचारात घेऊन काही लिहिण्याचा विचार आहे. त्यासाठी प्रामुख्याने माझ्या

समोर, शंकर वैद्य आणि बा. भ. बोरकर यांनी संपादित केलेले कुसुमाग्रजांच्या निवडक कवितांचे ‘ रसयात्रा ‘ हे पुस्तक आहे. शिवाय नेटवर सापडलेला काही प्रस्तुत मजकूरही आहे.

कुसुमाग्रजांच्या कविता वाचत असताना प्रथम लक्ष वेधून घेते ते त्यांचे तेजस्वी भाषावैभव. त्यांच्या कविता सोन्याचांदीप्रमाणे झळाळत्या, रत्नखचित शब्दांच्या, चमकत्या, किरणमयी, तेजस्वी आहेत. शब्द, भाषा, रचना यांवरचे त्यांचे प्रभुत्व आणि कौशल्य दिपवून टाकणारे आहे. अर्थात ते अवडंबर वाचताना अडथळाही ठरते आणि वाचनाची गतीही नियंत्रित करते. कधी कधी तर नको ती श्रीमंती, असेही होते. त्यांच्या बऱ्याच प्रख्यात कविता या वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. या कविता प्रामुख्याने कल्पना विलासाला मुबलक वाव देणाऱ्या आहेत – उदाहरणार्थ – अहि-नकुल, कोलंबसाचे गर्वगीत, आगगाडी व जमीन, पृथ्वीचे प्रेमगीत, वगैरे. कल्पनाविलास उत्तुंग आहेत. बऱ्याच कविता देशभक्ती व शौर्य यांचा गौरव करणाऱ्या आहेत. या शौर्याची माणसाला गरज पडावी, ही एक मोठी समस्या आहे असे त्यांना वाटल्याचे कुठे दिसत नाही. सर्वसामान्यपणे रागालोभाच्या, अभिमानाच्या, अस्मितेच्या ज्या भावभावना लोकांच्या मनांत असतात त्याच स्वीकारून ते चमक-दमक कविता लिहितात, असे दिसते. यांना जगण्यात कधी मोठ्या दु:खाचा धक्का बसला असेल का, काही असह्य समस्यांची झळ लागली असेल का, असे प्रश्नच पडावेत असा एकूण या कवितांचा माहोल आहे. “ सामाजिक अन्याय व विषमता या विषयांवर कुसुमाग्रजांनी त्यांच्या लिखाणातून कठोर टीका केली. ‘ साहित्यिकाने सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे ‘ या मताचा त्यांनी पुरस्कार केला. कुसुमाग्रजांचा साहित्यविचार समाजसापेक्ष असून ते सामाजिकतेलाच परतत्त्व मानतात. कुसुमाग्रज, क्रांती ही साहित्याची प्रेरणा मानतात. साहित्य हे परिवर्तनास पूरक ठरू शकते, असे मानतात. त्यामुळे साहित्याला ते विशुद्ध कला मानत नसून सामाजिक साधन मानतात. “ असे म्हटले गेलेले आहे. पण तेही काही प्रभावीपणे वा तीव्र तातडीने व्यक्त झाले आहे, असे फारसे दिसत नाही. विद्रोह वा परिवर्तनावाद हा त्यांच्या रक्तात भिनून येतो आहे, असे वाटत नाही. इथे ‘ रसयात्रा ‘ च्या प्रस्तावनेत शंकर वैद्यांनी लिहिलेले हे वाक्य प्रस्तुत ठरावे – “ कुसुमाग्रजांचे प्रेम, परमेश्वर, समाज, जीवन अशा वेगवेगळ्या विषयांसंबंधीचे विचार जीवनलहरीपासून व्यक्त होत आलेले आहेत. परंतु त्या सर्वांतून एक सुसूत्र विचारप्रणाली हाती लागावी असे त्या विचारांचे एकमेकांशी खोलवर नाते जुळत नाही. “ हे सर्व लक्षात घेता, प्रश्न असा पडतो की मूलभूत समस्या दिसत नाहीत, जगण्यातली गुंतागुंत जाणवत नाही तर मग या कवीचे गांभीर्य शोधावे तरी कुठे ? या प्रश्नामुळे मग लक्षात येते की देवाचे अस्तित्व यावर विचार मांडणाऱ्या बऱ्याच आहेत त्यांच्या कविता. म्हणून मग मुख्यत: यावरच लक्ष केंद्रित करावे असे ठरवले. याच विषयावर, नेटवर, आसावरी काकडे यांनी लिहिलेला एक लेख उपलब्ध आहे. पण मला काही वेगळे बोलायचे आहे. त्यासाठी खाली काही कविता विचारार्थ घेत आहे.

‘ सुख पाहता जवापाडे दु:ख पर्वताएवढे ‘ हा अनुभव सर्वच माणसांना येत असल्याने, दु:ख का होते, हे निर्माणच कशासाठी झाले सगळे मुळात, याचा कुणी निर्माता वा चालक आहे का, जगण्यात चांगले-वाईट असे काही असते का, शोषक-शोषित असे भेद का आहेत, जगण्याला काही हेतू वा अर्थ आहे का – असे अनेक प्रश्न माणसाला हजारो वर्षे पडत आलेले आहेत. त्यातूनच ईश्वर वा देव ही अस्तित्वे मानली गेलेली आहेत. कुणाही गंभीरपणे जगणाऱ्याला हे प्रश्न पडणे साहजिक आहे. त्याबाबतचे चिंतन घडणे हे तसे अपरिहार्य आहे. खालील कविता वाचताना याबाबतची उत्सुकता असणे योग्यच आहे.

पाऊल चिन्हे

मी एक रात्रि त्या नक्षत्रांना पुसले
परमेश्वर नाही घोकत मन मम बसले
परि तुम्ही चिरंतन विश्वातील प्रवासी
का चरण केधवा तुम्हांस त्याचे दिसले !

स्मित करुन म्हणाल्या मला चांदण्या काही,
तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही
उठतात तमावर त्याची पाउल चिन्हे –
त्यांनाच पुससि तू, आहे की तो नाही
--- ० ---

‘ कलंदर ‘ या कवितेत ते म्हणतात –

माझ्या साम्राज्यात आता
मीच भूप मीच राजा
माझ्या देवळात झालो
मीच देव मीच पूजा
आणि शेवटी –
माझ्या आत्मतेस नाही
आता अहंतेचा पार
झाले आनंताचे घर
त्याला जीवनाचे दार.
--- ० ---

निराकार

या दु:खाला नाही आकार
नाही रंग, नाही नाव –
ते आहे माझे
पण मी ओळखत नाही त्याला
आणि नसशील ओळखत तूही
मला माहीत आहे इतकेच –
तुझा रुपेरी रथ दूर जात असता
या क्षितिजावर जो तरंगत होता
निळापांढरा मेघ
त्या मेघातच जन्म झाला
या निराकार दु:खाचा
आणि त्या मेघाप्रमाणेच –
ते फिरते आहे आकाशाच्या पोकळीत
शोधीत स्वत:साठी
एखादे नाव, एखादी रेषा –
एखादी आकृती.
--- ० ---

जोगीण

मला हवी आहे नास्तिकता
पण सहस्त्र वर्षं
मनाला मिठी घालून बसलेली
ही आस्तिकता होत नाही दूर
माझ्यापासून.
रंगमंचावरील दिव्यांच्या प्रकाशात
व्याधाच्या नक्षत्रासारखी
विविध रंगांत उमलणारी
सुरेल पदन्यास करीत
माझ्या अंत:करणात प्रवेश करणारी
ती मोहक नृत्यांगना
उभी आहे माझ्या मंदिराच्या दाराशी.
पण मलिन वस्त्रे परिधान करून
गहन काळोखात गुरफटलेली
एकतारीवर एकच एक गीत गाणारी
ही उदासी मितभाषी जोगीण
मान टेकून दरवाजाच्या स्तंभावरती
बसली आहे वाट अडवून
प्रवेशाच्या पायरीवर.
--- ० ---

पांथस्थ

अज्ञाताच्या गूढ धुक्यात
अस्पष्टपणे तरळणाऱ्या तुझ्या अस्तित्वापर्यंत
कोणाची पावले कधी पोहोचली नाहीत,
माझीही पोहोचणार नाहीत.
आणि तरीही –
त्या असाध्याकडे जाणाऱ्या मार्गावर
मी जातो आहे पुढे, सारखा पुढे –
गतीने बधिर झालेल्या माझ्या मनाला
आता स्मरण उरले नाही त्या स्थळाचे
ज्याच्याकडे मी जात आहे.
आणि राहिली नाही आवश्यकता
तेथपर्यंत पोहोचण्याचीही.
कारण या गतीतच आहे त्या श्रेयाचे संपादन
या प्रवासातच आहे

प्रवासाची अंतिम सांगता.

--- ० ---

## मार्जिन

ईश्वर नाही म्हणता ? माझे –
मतही अगदी तसेच आहे
ऐकलेत ना परवा भाषण
सांगितले मी –
या विश्वाच्या विविध दर्शनी
जड तत्त्वाचा अंध कायदा
भरून राहे.
हेही म्हटले, जिथे न जाते
प्रज्ञा तेथे कशास घ्यावा
शोध वगैरे
म्हणून म्हणतो ईश्वर नाही
या मुद्यावर तुमचे अमुचे
जमते सारे.
हो हो आपण म्हणता तेही
नाही खोटे
रोज प्रार्थना मीही करतो
हात जोडल्याविना जिवाला
बरे न वाटे
देव नसे पण शक्ति असे ती
जिचे नियंत्रण जगतावरती
तिचे कराया स्तवन जरासे
अडचण कोठे ?
नाही – अगदी तसेहि नाही –
मानवमन ना निराकारता
कधी साहते
आणि अखेरी आहे-नाही
तिथेच असते.
अचेतनाला करी सचेतन
शून्याला दे अर्थाचे धन
मग अपुऱ्या नजरेने जीवन
सदा पाहते –
म्हणून माझ्या डोळ्यापुढती
किरीटधारी रूप प्रभूचे
( मंदिरातले तजबिरीतले )

उभे राहते.
असो तसे पण – ( मार्जिन सोडा )
ईश्वर नाही या प्रश्नावर –
अपुले जमते.
--- ० ---

मार्ग

चालतो मी सारखा हा
चालण्याला अंत नाही
चाललो कोठे कशाला
हीहि आता खंत नाही.
एकदा पूर्वी मलाही
वेड होते शोधण्याचे
वेदनेवाचून काही
लाभ झाला त्यांत नाही
जाणत्या थोरांकडेही
खूप केली चौकशी मी
शब्दजालांतून कळले
अज्ञतेला पार नाही.
योजनेचा या नकाशा
ज्या ठिकाणी ठेवलेला
खंदकाने वेढलेल्या
त्या स्थळाला दार नाही.
ना कळावे हीच इच्छा
जो कुणी आहे तयाची
शोधता त्याच्या कृपेचा
शोधका आधार नाही
मी म्हणोनी सोडला तो
नाद आता मंझिलाचा
चालण्याचे श्रेय आहे
अन्य धर्माचार नाही.
--- ० ---

गाभारा

दर्शनाला आलात ?
या...
पण या देवालयात

सध्या देव नाही.
गाभारा आहे, चांदीचं मखर आहे,
सोन्याच्या समया आहेत,
हिऱ्यांची झालर आहे
त्यांचंही दर्शन घ्यायला
हरकत नाही.
वाजवा ती घंटा
आणि असे इकडे या...
पाहिलात तो रिकामा गाभारा ?
नाही...तसं नाही...
एकदा होता तो तिथे.
काकड आरतीला उठायचा
शेजारतीला झोपायचा,
दरवाजे बंद करून
बरोबर बाराला जेवायचा,
दोन तास वामकुक्षी घ्यायचा,
सारं काही ठीक चाललं होतं.
रूपयांच्या राशी
माणिकमोत्यांचे ढीग
पडत होते पायाशी,
दक्षिण दरवाज्याजवळ
मोटारींचे भोंगे वाजत होते,
मंत्रजागर गाजत होते,
रेशमी साड्या, टेरीनचे सूट
समोर दुमडत होते,
बँकेतील हिशेब हरिणाच्या गतीनं
बागडत होते,
सारे काही घडत होते
हवे तसे.
पण एक दिवशी...आमचं दुर्दैव...
उत्तर दरवाज्याजवळ अडवलेला
कोणी एक भणंग महारोगी
तारस्वरात ओरडला...
' बाप्पाजी बाहेर या ! '
आणि काकडआरतीला
पहाटे आम्ही पाहतो तर काय
गाभारा रिकामा.
पोलिसात वर्दी
आम्ही दिलीच आहे;

परत ? कदाचित येईलही तो...
पण महारोग्यांच्या वस्तीत
तो राहिला असेल
तर त्याला पुन्हा
प्रवेश द्यावा की नाही,
याचा विचार करावा लागेल
आमच्या ट्रस्टींना.
जयपूरला पत्रव्यवहार चालू आहे
दुसऱ्या मूर्तीसाठी.
पण तूर्त
गाभाऱ्याचं दर्शन घ्या,
तसं म्हटलं तर
गाभाऱ्याचंच महत्त्व अंतिम असतं.
गाभारा सलामत
तो देव पचास....
---- कुसुमाग्रज.

कुसुमाग्रजांचीच ' देवाच्या दारी ' नावाची एक कविता आहे. त्या कवितेत, वरील सर्व कवितांकडे पाहायला उपयोगी पडतील आशा काही सूत्ररूप ओळी आहेत, त्या अशा --

केव्हाचा रे उभा मीही तुझ्या दारी
उशीर का परी आज असा ?
म्हणतात तुझ्या दयेला न अंत
पुकारती संत थोरी तुझी
तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन !
आणि आज मन शंकित हे होई
आहेस की नाही मुळात तू
दुर्बलता माझी दडवाया गेलो
अधिक जाहलो दुर्बल मी
परततो आता रणात माघारा
सैनिका निवारा समरात
माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार तुझ्या दारी
आहेस की नाही आज नसे चिंता
दोहींमधे आता भेद नुरे !

आता, आपण इथे घेतलेली एकेक कविता पाहात जाऊ. कुसुमाग्रजांच्या कवितेत संत वाङमयाचा उल्लेख येतो. आणि मराठीतल्या एवढ्या विपुल-लेखन कवीने ते वाचले असेलच असे आपण गृहीत धरू शकतो. आता,

ज्ञानेश्वरांच्या देव कल्पनेचे विशेष कोणते तर स्वसंवेद्यता आणि विश्वात्मकता. तुकाही ‘ आकाशाएवढा ‘ होतो म्हणजेच अमर्याद होतो. ते कधी घडते तर जेव्हा ‘ तुका टाकावा थुंकोन ‘ म्हणजे आपली प्रतिमा टाकून दिल्यावर. त्यालाच तो ‘ एकविध मन ‘ म्हणतो. तसे मन म्हणजेच अमर्याद, विश्वात्मक मन. हे मानवी बुद्धीने – प्रज्ञेने कळत नाही, असाही उल्लेख कुसुमाग्रजांच्या कवितेत येतो. तरीही, ‘ गाभारा ‘ ही कविता बघा. ईश्वराला मानवी मनाचे गुणावगुण चिकटवून एक सामाजिक अशी आदर्श कल्पना इथे व्यक्त केली जाते. दु:खिताच्या सेवेसाठी देव गाभारा सोडून गेलेला आहे ! तसे घडत असते तर जगात इतके दु:ख आणि अन्याय का आहेत, असा प्रश्न त्यांना पडत नाही. जणू देवळात येणारे लोक दु:खितांकडे पाठ फिरवणारेच असतात ! खुद्द दु:खित असलेलेही बरेच लोक देवळात येत असतात, त्याचे काय ? पण सामाजिक मूल्यात्मक भूमिका घेतली की बाकीचे गांभीर्य सोडून देता येते, हा यातला व्यावहारिक विचार आहे. ‘ पाऊल चिन्हे ‘ या कवितेत कवी चांदण्यांना विचारतो की तुम्हाला कुठे ‘ तो ‘ दिसला का, ते. म्हणजे तो नसावाच बहुधा, हा आशय. ‘ कलंदर ‘ मध्ये स्वत:ला अंत वा पार राहिला नाही, असे कवी म्हणतो ! खरेच घडले का असे ? की एक आपली बोलायची पद्धत ? ‘ मी गुरुचरणी लीन झाले ‘ अशा ज्या कविता धार्मिक मासिकांत येतात, तसे ? हे खरोखरच घडले असते तर मग इतर सर्व कविता अशा आल्या असत्या का ? ‘ निराकार ‘ या कवितेत ते अशीच एक निराकार दु:खाची खोटी कल्पना मांडतात. दु:ख जर निर्गुण-निराकार असते तर देवावर एवढ्या कविता लिहायची गरजच कशाला पडली असती ? ‘ जोगीण ‘ ही कविता अशीच खोटी वाटते. तुमच्या अनुभवातून आणि निवडीतून तुम्ही नास्तिक झाला असाल तर आस्तिकता तुम्हाला अडवते अशी तुम्ही तक्रार करत बसाल ? ‘ पांथस्थ ‘ ही कविता शोध संपवून निष्कर्षात प्रश्न मिटवण्याची पळवाट काढणारी आहे. ‘ मार्जिन ‘ ही कविता नास्तिकतेतून थोडा मार्ग काढणारी आहे –

देव नसे पण शक्ति असे ती
जिचे नियंत्रण जगतावरती
तिचे कराया स्तवन जरासे
अडचण कोठे ?

--- असा. त्याचप्रमाणे ‘ मार्ग ‘ ही कविता

एकदा पूर्वी मलाही
वेड होते शोधण्याचे

--- असे म्हणून आताच्या ‘ बिनशोध ’ अवस्थेचे समर्थन शोधते !
सारांश म्हणजे, कुसुमाग्रजांच्या ईश्वर शोधात काही तथ्य नाही. आता हे बघा –
‘ तो प्रवास सुंदर होता ’ या पुस्तकात प्रा. के. रं. शिरवाडकर यांनी म्हटलंय, ‘ वादळवेल ’मध्ये ‘ विशाखा ’तील नास्तिकता अथवा संशयवाद संपला आहे.’, ‘ लक्षात येणारी गोष्ट ही की आस्तिकतेच्या विरोधी सूर काढणारी कविता पुढील काळात आली नाही.’, ‘ कुसुमाग्रज दोन कारणांवरून आस्तिकतेचे स्वागत करतात. एक आहे सौंदर्यवादी (aesthetic) आणि दुसरं आहे परमेश्वराचे प्रेममय स्वरूप. या दोन्ही कारणांनी जाणवणारे परमेश्वराचे अस्तित्व प्रातिभ आहे. वादाच्या, तर्काच्या पलीकडे आहे अशी त्यांच्या कवितेची धारणा आहे.’ याच पुस्तकात पंढरपूर भेटीची एक आठवण दिलेली आहे.-- “मराठी संस्कृतीच्या आणि इतिहासाच्या गर्भागाराकडे चाललो आहोत अशा भावनेने आपण पंढरपूरला जात आहोत असे तात्यांना वाटत होते. तात्या लिहितात, ‘ नास्तिकतेच्या प्रांतात वारंवार संचार आणि मुक्काम करणारे मन पाण्यात टाकलेल्या स्पंजासारखे भाविकतेने जड झाले होते ’ (‘प्रतिसाद’- लेखसंग्रह, ३०).”

‘ छंदोमयी ’ या कवितासंग्रहातल्या ‘ चार्वाक ’ या कवितेत चार्वाकाची नास्तिकता समजून घेताना जाणवलेली चार्वाक-विचारातली मर्यादा दाखवून दिलेली आहे. ‘ नजर ’ या कवितेतही कुसुमाग्रजांनी निरीश्वरवादी विचारसरणीतली त्यांच्या कवीमनाला जाणवणारी उणीव दाखवून दिलेली आहे. ती पूर्ण कविता अशी --

‘मार्क्स रसेलसारखे
सारे निरीश्वरवादी
थांबतात सृष्टीच्या उगमाशी असलेल्या
एका कायद्यापाशी.
उदय नाही, अंत नाही
रूप नाही, रंग नाही
अल्याड नाही पल्याड नाही
अशा पार्थिव कायद्यापाशी
एका स्वयंभू जाणीवहीन अस्तित्वापाशी.
माझ्या तर्काला हे पटते
आणि तरीही वाटते
की या निरीश्वरवाद्यांनी
उत्तर रात्री उठून
पाहिलेले नाही कधीही
चांदण्यांनी खचलेले
अपार धूसराने ओथंबलेले आकाश
माझ्या नजरेने..!
***

‘ अंतहीन ’ या कवितेत अस्तित्वाच्या तळाशी सत्य असेल या कल्पनेनं कवीमन जळता पलिता घेऊन खोल उतरत जातं. आलेले अनुभव, हे ‘ ते ’ सत्य नाही म्हणत आणखी खोल नेतात. पण भोवती विझलेले काजवे, भयप्रद निशाचर, पंख तुटलेले गरुड आणि गिधाडे दिसतात. अखेरी हताश झालेल्या कवीमनाला वाटतं --

‘ कळले आता वृथा शोध हा
मृगजळात या फसलो आहे
याच पायरीवरती आता
पलिता विझवुनी बसलो आहे.’

--- या सर्वातून निघते काय, तर सामाजिकता हेच परतत्त्व ! इथे, जे. कृष्णमूर्तींच्या एका छोट्या उताऱ्याचा अनुवाद देणे प्रस्तुत ठरेल --

“ ईश्वराचा शोध घेण्यामागची प्रेरणा कोणती आहे आणि खरोखरच घ्यायचा आहे का तो शोध ? आपल्यापैकी बऱ्याचजणांसाठी ती वास्तवापासून उपलब्ध अशी एक पळवाट असते. त्यामुळे, आपण या बाबतीत अगदी स्पष्ट असले पाहिजे की ही एक पळवाट तर नाही ? की खरोखरच तो सत्याचा शोध आहे ? आपल्या मानवी संबंधांतल्याही सत्याचा ? वस्तू, कल्पना, विचारसरण्या यांच्यामधल्याही सत्याचा ? आपण या दु:खमय जगाला

कंटाळलो आहोत म्हणून आपण ईश्वर शोधाचे काम अवलंबत असलो तर ती एक पळवाटच आहे. मग आपण देवाची निर्मिती करतो पण तो देव नसतो. देवळांचा, पुस्तकांचा देव हा देव नसतोच, ती एक विलोभनीय पळवाटच असते. देव वा सत्य हे गोंधळलेल्या, प्रभावित, मर्यादित मनाला समजूच नाही शकत. असले मन त्याचा विचारही नाही करू शकणार. आधी त्या मनाने प्रभावयुक्तता टाकल्याशिवाय त्याला देवाबद्दल काहीच समजू शकणार नाही. " कुसुमाग्रजांच्या बाबतीत ती नुसती एक पळवाटच नाही तर एकदा असे, एकदा तसे बोलून सर्वांना आपल्या राज्यात सामील करून घेणे आहे. झळाळती भाषा, भव्यदिव्य कल्पनाविलास आणि आस्तिक, नास्तिक या सर्वांनाच ' आपले ' करणे, हे काही लुंग्यासुंग्याचे काम नाही. राहता राहिले शोषित, वंचित, पीडित. त्यांच्यासाठी हे –

ध्रुवपद

हे सारे खरे असेल
अथवा आहेही
पण तरीही –
माझ्या गीताचे ध्रुवपद एकच आहे,
माणसाच्या माथ्यावर
दारिद्र्यासारखा शाप नाही
पृथ्वीच्या पाठीवर
इतके अमंगल, इतके दु:खदायक, इतके भेसूर
दुसरे पाप नाही !
जोपर्यंत माझ्याजवळ गीतासाठी शब्द आहेत,
शब्दासाठी श्वास आहे
तोपर्यंत –
याच ध्रुवपदाचा, याच ध्रुवपदाचा
माझ्या गीताला ध्यास आहे !

--- यापुढेही बरीच आहे कविता – ती मिळवून पूर्ण वाचा.
सारांश, कोणत्याच बाबतीतले गांभीर्य झेपत-पेलत नाही किंवा जगण्यातल्या जटिल गुंतागुंतीचाही आवाका घेण्याची, तो व्यक्त करण्याची कुवत वा हिंमत नाही, असे असेल तर करावे तरी काय – हा बऱ्याच साहित्यिकांचा प्रश्न असू शकतो. ज्यांना गरिबी आणि अन्याय यांची प्रत्यक्ष झळ पोचलेली असून त्यातून ते सामाजिक वा विद्रोही झालेले असतील त्यांचा प्रश्नच नाही. बाकीच्यांना मूल्यात्मकतेसाठी सामाजिकतेशिवाय पर्याय नाही ! कसलीही झळ पोचलेली नाही, कोणत्याही बाबतीत पुरेसे गांभीर्यही नाही पण भाषा आणि कौशल्य बऱ्यापैकी हासिल आहे तर अशांनी साहित्यात यशस्वी होण्याचे प्रयत्न का करू नयेत ? बक्षिसे का मिळवू नयेत ?
असे प्रश्न पडणाऱ्या लेखकांसाठी मराठीत दीपस्तंभ म्हणावेत असे बरेच लोक उपलब्ध आहेत !
--- ००० ---

ज्यूलिअस सीझर ( तीन अंकी नाटक )
लेखक-अनुवादक – दिलीप जगताप, प्रकाशक – कॉपर कॉईन.

जागतिक नाटककार विल्यम शेक्सपीअर याचे हे एक ग्रेट नाटक. उत्तम अनुवादाने हे नाटक मराठीत उपलब्ध होण्याची ही एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना आहे. अविनाश सप्रे यांनी या पुस्तकाला लिहिलेली साडेतीन पानी प्रस्तावना हा एक उत्तम प्रस्तावनेचा नमूना आहे. शेवटी ते म्हणतात, " दिलीप जगतापनी भाषांतर करताना मूळच्या संहितेला कुठेही धक्का न लावता, हे भाषांतर आहे असे वाटूही नये, हे अस्सल मराठी नाटक आहे, असे वाटावे अशी किमया केली आहे आणि राजकीय नाटक किती श्रेष्ठ दर्जाचे असू शकते हे दाखवून दिले आहे. त्यासाठी त्याने वापरलेली भाषा नाटकी स्वरूपाची नसून ' नाट्यात्म स्वरूपाची ' ( थिएट्रिकल लँग्वेज ), अस्सल देशी वाणाची आणि शेक्सपीअरच्या भाषेला पर्याय देणारी आहे, याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. " – हे तंतोतंत पटण्यासारखे आहे. ही एक वेगळ्याच प्रकारची शोकांतिका आहे. या नाटकाचा नायक कोण, सीझर की ब्रूटस यावर जगभर चर्चा झडत आलेल्या आहेत. मला ही एका व्यक्तीची नव्हे तर एका समाजाची शोकांतिका वाटते. एका पराक्रमी, महत्त्वाकांक्षी व्यक्तीकडून कुणी दुखावले जाणे, कुणी मत्सरग्रस्त होणे, यांतून निर्माण होणारी ही एक क्रिया-प्रतिक्रियांची श्रृंखला आहे. त्यातून उभा राहणारा प्रचार, कारस्थाने, त्यात सरळ, सज्जन व्यक्तींचेही सामील होणे आणि या सर्वातून तो समाज यादवीकडे, अराजकाकडे ढकलला जाणे आणि त्यातून मोठा सामाजिक विध्वंस होणे – असा खूप मोठा आवाका घेणारे हे नाटक आहे. मानवी स्वभाव आणि राजकीय मूल्ये यांच्यांतल्या संबंधांचाही सखोल धांडोळा हे नाटक घेते.
हे एक महत्त्वाचे, अमूल्य नाटक मराठीत उपलब्ध करून दिल्याबद्दल लेखक व प्रकाशक यांचे अभिनंदन !
--- चं. प्र. देशपांडे.
--- ००० ---

( १ ) रंगे हात ( २ ) काठपदर -- दोन नाटके.
लेखक ० दिलीप जगताप – प्रकाशक ० कॉपर कॉईन.

दिलीप जगताप हे मराठीतल्या प्रायोगिक रंगभूमीवरचे एक प्रख्यात लेखक आहेत. त्यांच्या नऊ नाटकांची चार पुस्तके अलीकडेच प्रकाशित झालेली आहेत. पाहाताक्षणी उत्तम दर्शन देणारी ही पुस्तके आहेत. तरीही, मुद्रित शोधन जरा अधिक चांगले असायला हवे होते, असे जाणवले.
( १ ) ' रंगे हात ' हे सार्त्रच्या ' डर्टी हँडस ' ( म्हणजेच ' क्राईम पॅशनेल ' ) या नाटकाचे मराठी रूपांतर आहे. एका राजकीय प्रश्नावर आधारित असे हे नाटक आहे. आक्रमकता चांगली की तडजोडीने पुढे जाणे चांगले, हा विषय आहे. पात्रांची नावे मुळातली तिकडची असली तरी जगतापांच्या सिद्धहस्त, ओघवत्या मराठीमुळे वाचन सहज आकलनीय होते. कोणत्याही विचारांचे साचे हे मानवनिर्मित असून त्याला सत्याचे वगैरे मूल्य नसते – ते सगळे त्या त्या वेळी बरोबर-चूक ठरवणे असते याची मनाला एक वेगळीच जाग हे नाटक देते. पूर्वी या नाटकाचे मराठीत रूपांतर श्री. ना. पेंडसे यांनी
' डॉ. हुद्दार ' या नावाने केले होते. जगताप हे एक जातिवंत, जुने, जाणते नाट्यकर्मी असल्याने त्यांचे हे रूपांतर उत्तम झालेले आहे. खरे तर ह्युगोला त्याची बायको होर्डररच्या मिठीत दिसल्यामुळे त्याने त्याचा खून केलेला असतो – ठरलेल्या तत्त्वासाठी नव्हे. पण शेवटी तो ते नाकाबूल करतो – " पण एक सांगतो, माझं त्याच्यावर खरंखुरं प्रेम आहे आणि जर मी त्याला मारला हे नाकारलं तर तो एका क्षुद्र मादीसाठी मेलेलं निरुपयोगी, बेवारशी प्रेत ठरेल ... " या विचाराने तो स्वत: मरण पत्करत खोटे बोलतो ! जरूर वाचावे असे नाटक.

( २ ) ‘ काठपदर ‘ हे जिआ जेनेच्या ‘ द मेडस ‘ या नाटकाचे मराठी रूपांतर आहे. या नाटककाराचे जीवन प्रचंड नाट्यमय होते. गुन्हेगारीतही बरबटलेले. शेवटी त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली तेव्हा सार्त्र आणि पिकॅसो यांनी फ्रान्सच्या अध्यक्षाकडे रदबदली करून त्याला सोडवले होते. हे नाटक शोषक आणि शोषित यांच्यांतल्या नात्यांचा आणि त्यांतल्या हिंसेचा सखोल वेध घेणारे आहे. जेने हा एक ‘ क्रौर्याचा रंगमंच ‘ चा पुरस्कर्ता होता, हे इथे लक्षात घ्यावे. दोन मोलकरणी आणि त्यांची मालकीण यांच्यांतले हे विदारक नाट्य आहे. या मोलकरणीच आलटून पालटून मालकीण होतात आणि त्यांची मने त्या खोट्या खोट्या दृश्यांतून व्यक्त करत राहतात. या नाटकाच्या शेवटच्या भागात येणारे छबी या पात्राचे एक मोठे स्वगत हा नाट्यमयतेचा एक उत्तुंग नमूना आहे. भूमिका बदलांचे हे नाटक लक्षपूर्वक वाचावे लागेल असे आहे. इथेही जगतापांच्या ओघवत्या संवादांमुळे ते आकलन-सुलभ झालेले आहे.
दिलीप जगताप हे माझे जुने मित्र आहेत. नाट्यक्षेत्रात त्यांचे बरेच काम झालेले असूनही एक प्रकारे ते दुर्लक्षितच राहिलेले होते. आता त्यांची नाटके प्रकाशित झालेली आहेत, ही एक चांगली घटना घडलेली आहे. त्याबद्दल, कॉपर कॉईन प्रकाशनाचे अभिनंदन

.

--- चं. प्र. देशपांडे.

--- ००० ---

शब्दांची नवलाई ( बालकवितासंग्रह )

कवी – एकनाथ आव्हाड , प्रकाशक – दिलीपराज प्रकाशन.

आपले इथले मित्र एकनाथ आव्हाड यांनी बालांसाठी हा एक आगळावेगळा, त्यांच्या भाषाज्ञानात हसतखेळत भर घालणारा असा एक उत्तम कवितासंग्रह लिहिला आहे. हा बालांसाठी जरी असला तरी सर्वांचीच छान उजळणी करून घेईल असा मजेदार संग्रह आहे. व्याकरणातले काही सोपे प्रकार, नामांचे विविध प्रकार, वाक्यांचे प्रकार, वाक्प्रचार, म्हणी, विविध संदर्भांत येणारे काही खास शब्द अशा नावीन्यपूर्ण योजना यात आहेत. मुलांसाठी आणि पालकांसाठीही प्रत्येक घरात असावे असे हे पुस्तक आहे. उत्तम कागद, उत्तम छपाई आणि संतोष घोंगडे यांची छान रंगीत चित्रे यांनी सजलेले असे हे पुस्तक आहे. मुलांनी वा मोठ्यांनी सहज हाताशी ठेवावे आणि जातायेता एखादे पान तरी वाचावे अशी ही खरोखरच एक विशेष नवलाई आहे.
आव्हाडांनी मुलांसाठी यापूर्वीही खूप लेखन केलेले असून त्यांना बरीच पारितोषिके व सन्मानही मिळालेले आहेत.
तुमच्याआमच्या मुलानातवंडांसाठी सातत्याने असे मोलाचे काम करत राहणाऱ्या आव्हाडांचे अभिनंदन !
--- ००० ---

एका टीव्ही बातमीचा अर्थ --

जे राज ठाकरे आहेत ते राज ठाकरे पुण्यात आलेले आहेत आणि जे राज ठाकरे नाहीत ते राज ठाकरे पुण्यात आलेले नाहीत.

‘ हृषिकेश मुखर्जींचे चित्रपट – आस्वादन आणि जीवनदृष्टी ‘
लेखक – डॉ. कमलेश सोमण, प्रकाशक – गोयल प्रकाशन.

गुन्हेगारी, नायक-खलनायक, मारामाऱ्या, पाठलाग, गोळीबार, कॅबरे नाच वगैरे मार्गाने न जाता परिस्थिती आणि माणूस, माणूस आणि माणूस यांच्यांतल्या समस्या, दु:खे, भावभावनांचे हेलकावे या मार्गाचे चित्रपट सुचण्यासाठी आणि त्यांचे दिग्दर्शन करण्यासाठी एक वेगळी चिंतनशीलता लागते. ती असलेले भारतातले अपवादात्मक दिग्दर्शक होते हृषिकेश मुखर्जी. दु:ख आणि मिस्किलपणा यांचे हृद्य मिश्रण करू शकणारे अजब जादूगार होते ते ! त्यांच्या चित्रपटाचे चित्रीकरण चालू असताना कधी महमूद हा विनोदी नट तिथे गेला तर तो म्हणे, “ बकवास पिक्चर है ये – नही चलेगी – “ असे ‘ बकवास ‘ चित्रपट काढण्याचे धाडस थोड्याच लोकांकडे असते. त्यांतले एक होते हृषिदा ! आनंद सारखी बरीच पात्रे त्यांनी त्यांच्या प्रतिभेने कायमचा ठेवा म्हणावा अशी निर्माण करून ठेवलेली आहेत. साधेपणा, साधी माणसे, उत्तम पण उत्तेजकता नसलेले संगीत, आणि भडकपणा टाळत केलेली सहज हाताळणी ही त्यांची वैशिष्ट्ये होती. धर्म असो की राजकारण असो की कला, प्रत्येक क्षेत्रात करमणुकीसाठी वखवखलेल्या या देशात मसालाहीन चित्रपटांची इतकी निर्मिती करणे हे येरागबाळाचे काम नोहे ! त्यांचा एखादा तरी चित्रपट ‘ खूप महान ‘ म्हणावा असा आहे का, यावर मतभेद होऊ शकतील पण त्यांनी प्रेक्षकांची मानवी संबंधांची जाण वाढवली, त्यांना अधिक संवेदनशील केले याबाबत मात्र दुमत होऊ नये.
अशा या आपल्या प्रिय दिग्दर्शकाच्या १५ चित्रपटांचा मौल्यवान ऐवज एका ठिकाणी देणारे पुस्तक आपले मित्र डॉ. कमलेश यांनी लिहिलेले आहे – ‘ हृषिकेश मुखर्जींचे चित्रपट – आस्वादन आणि जीवनदृष्टी ‘. मुसाफिर, अनाडी, अनुराधा, छाया, असली-नकली, अनुपमा, आशीर्वाद, सत्यकाम, गुड्डी, बावर्ची, आनंद, अभिमान, नमकहराम, चुपके चुपके आणि मिली – हे आहेत ते चित्रपट. या चित्रपटांचे कथासार, काही महत्त्वाचे प्रसंग, काही विशेष संवाद, त्यांतली गाणी, काही फोटो आणि या सर्वांतून लेखकाला जाणवत गेलेले बारकावे यांनी युक्त असे हे पुस्तक आहे. डॉ. कमलेशांनी  हे खास प्रेमाने लिहिलेले पुस्तक आहे यात शंकाच नाही.
हिंदी चित्रपट हे भारताचे एक अधूबिंदू म्हणावे असे प्रकरण आहे. त्यातल्या एका महत्त्वाच्या विषयावर आलेल्या या पुस्तकाचे मन:पूर्वक स्वागत आहे ! लेखक आणि प्रकाशक यांचे अभिनंदन !
--- ००० ---

अश्वत्थामा ( कादंबरी ).
ले ० डॉ. कमलेश सोमण, प्र ० गोयल प्रकाशन.

‘ सूड ‘ या एकाच मानवी भावनेवर आणि तीतून निर्माण होणाऱ्या विध्वंसावर चिंतन करणारी ही एक कादंबरी आहे. द्रोण-द्रुपद आणि अश्वत्थामा-पांडव अशा दोन सूड प्रवासांची ही कथा आहे. ही नुसती घटनात्मक कथा नसून मने घुसळून काढत मानवी जगण्याचा अंतर्बाह्य  वेध घेणारी एक दर्शनात्मक शोकांतिका आहे. ही सर्व कथा अश्वत्थामा स्वत: निवेदन करतो आहे. त्यात एक प्रकारची तटस्थताही आहे आणि पश्चात्तापही आहे. पण त्या त्या वेळच्या उकळत्या मनस्थितीही  तीव्रतेने निवेदन केलेल्या आहेत.
शेवटाकडे व्यासमुनी अश्वत्थाम्याला विचारतात, “ – कसला विचार करतो आहेस ? अजूनही तू तुझ्या भूतकाळातल्या दु:खाने त्रस्त आहेस का ? “ हा एक भेदक प्रश्न आहे. त्यानंतर ही कथा वर्तमान काळातल्या संदर्भालाही स्पर्श करते.
‘ महाभारत ‘ हे मानवी जीवन हजार प्रकारे मंथन करून पाहणारे एक दर्शक महाकाव्य आहे, हे तर जगन्मान्यच आहे. त्यातल्या अनेक भागांनी असंख्य कलाकृतींना आजवर प्रेरणा मिळालेली आहे. त्यावर लिहावेसे वाटणे आणि

ते पेलता येणे हे दोन्ही इथे घडलेले आहे. डॉ. सोमणांनी त्यांची डॉक्टरेट एलकुंचवारांच्या नाटकांवर एक सखोल अभ्यास-प्रबंध लिहून केलेली आहे, हे इथे विशेषत्वाने नमूद करण्यासारखे आहे.
करमणुकीपेक्षा खूपच अधिक काही ' देणारी ' ही एक विशेष कलाकृती आहे.
--- ००० ---

द पिझ्झा

महेंद्र डोंगरे यांनी दिग्दर्शित केलेला ' द पिझ्झा ' हा लघुचित्रपट पाहिला. ज्येष्ठांमध्ये पसरत चाललेला एकाकीपणाचा रोग हा विषय आहे. एक ज्येष्ठ माणूस. त्याची बायको वारलेली असून त्याचा मुलगा ऑस्ट्रेलियात आहे. एका मोठ्या शहरातल्या एका आलीशान फ्लॅटमध्ये तो एकटाच राहतो आहे. सुरुवातीलाच एका मूकदृष्यातून त्याचा एकाकीपणा प्रस्थापित केला जातो. घरात खायला काही नाही आहे. तो पिझ्झा मागावतो. पिझ्झा तयार होण्याच्या प्रक्रियेपासून सर्व काही दाखवले जाते. यातून त्या ज्येष्ठाचा एकाकीपणा अधिकाधिक ताणला जात राहतो. मग तो पिझ्झा घेऊन डिलिव्हरी बॉय निघतो. खूप रस्ता आणि रहदारी पार करून तो योग्य इमारतीपर्यंत पोचतो. तिथली लिफ्ट बंद असते. त्या ज्येष्ठाने फ्लॅट नंबर चुकीचा दिलेला असतो. शिवाय त्या इमारतीत तीन शुक्ला असतात ! हे सगळे पार करून तो त्या ज्येष्ठाच्या घरी पोचतो. त्यानंतर त्या ज्येष्ठाने त्याला घरात बोलावणे, थोडा पिझ्झा खायला लावणे आणि गप्पा मारत आग्रहाने बसवून ठेवणे घडते. त्या डिलिव्हरी बॉय ची कहाणीही जरा शोकात्मच असते. शेवटी उशीर झाला म्हणून तो निघतो. तो ज्येष्ठ म्हणतो, " मी उद्या पुन्हा ऑर्डर करेन पिझ्झा ! " जाहिद नाव असलेला तो डिलिव्हरी बॉय चांगला तगडा आहे, त्यामुळे, त्याने केलेली जिन्यांची चढउतर खरी वाटते. शिवाय गप्पा मारतानाही त्याचे त्या ज्येष्ठात रमणे छान आले आहे. त्या ज्येष्ठाचा गप्पांसाठीचा अधाशीपणा चांगला आला आहे.
भारतात ज्येष्ठांपैकी निम्मे लोक या एकाकीपणाच्या समस्येने ग्रस्त आहेत. २०३० पर्यंत ही समस्या खूप उग्र होणार आहे, असे अभ्यासक म्हणताहेत.
कोणतीही भाषणबाजी वा आकडेवारीची प्रबोधनबाजी न करता निव्वळ दृश्यात्मकतेतून या समस्येचे गांभीर्य मांडण्यात हा लघुपट यशस्वी झालेला आहे. चांगले काम !
--- ००० ---

मन्ना, लता आणि शंकर-जयकिशन ! १९५९. चित्रपट ' उजाला ' ! या गाण्याने प्रचंड धमाल उडवून दिली होती त्या वेळी ! त्यात अमीन सायानींचे सनसनाटी निर्माण करणारे निवेदन ! ग्रेट ! बिनाकाचे हे सरताज गीत होते ! आता बघताना जाणवते -- गरिबांच्या या गाण्याची लोकेशन्स बघा -- इथल्या इथे प्रचंड बहार ! कशाला हवे इंग्लंड-अमिरिका ? ( झूमता मौसम मस्त महीना )

--- ००० ---

**१३ ऑगस्ट २०२१ पर्यंत**

अमूर्त चित्रात जसे रंग आणि आकार तसेच कवितेत शब्द आणि रचना –

अमूर्त चित्रात जर अमुक वस्तू, आकार वा दृश्य असे ओळखता येण्याची गरज नाही तर कवितेत तरी अमुक विचार वा अनुभव तरी ओळखता येण्याची काय गरज आहे ? अमूर्त कविता का असू नये ?

साभिमान आदर

माझ्या पत्नीच्या थोरल्या बहिणीचा मुलगा डॉ . उमेश देशपांडे याचा काल मुंबईत त्याच्या कामाच्या वॉर्ड विभागात सत्कार झाला ! हा सत्कार एका विशेष कारणासाठी होता. कोरोना काळात धारावी विभाग भारतातच काय जगातही किती गाजला होता ते आपल्याला माहीत आहे. कोरोना पसरण्याचे धारावी झोपडपट्टी हे एक मोठे केंद्रच होईल की काय अशी भीती होती. पण तिथे अथकपणे, सुट्टी, रजा न घेता काम करणारे काही मोठे मानवदूत होते ! त्यांत आमचा हा भाचा डॉ. उमेश होता ! नंतर  तो भाग या रोगाच्या बाबतीत पूर्ण नियंत्रणात आला. ही काय जादू झाली हे अभ्यासण्यासाठी परदेशांतले तज्ञही तिथे येऊन गेले. गेले काही दिवस तर तिथे नवीन कोरोना रुग्णांचा आकडा शून्यावर वा एक अंकी इतका खाली आलेला आहे ! तर या अशा कामासाठी हा सत्कार होता ! आम्हा सर्व कुटुंबियांसाठी तर हे आनंदाचे आहेच पण हा आनंद सर्वच माणसांत वाटला जावा असा आहे. एरवी डॉ. उमेश हा आमचा एक ' लहान ' नातेवाईक असतो, आम्ही त्याच्याशी कसेही काहीही बोलतो, गंमती करतो, पण , त्याच्या या कामाबद्दल मात्र त्याच्याबद्दल अभिमान आणि आदर वाटतो आहे. त्याच्या पुढील कामासाठी मी त्याला आशीर्वाद-शुभेच्छा तर देतोच पण  त्याच्या या कामासाठी मात्र त्याला एक कडक सॅ ल्यू ट !
--- ००० ---

अभिप्रायार्थ माझ्याकडे येणारी पुस्तके

काही लेखक व कवी त्यांची पुस्तके माझ्याकडे अभिप्रायार्थ पाठवत असतात. काही असे अभिप्राय मी इथे पोस्टही करत असतो. त्याबाबत काही मुद्दे स्पष्ट करावेत असे वाटल्याने ही पोस्ट --
१. माझा अभिप्राय म्हणजे काही आकाशवाणी नव्हे, हे मी समजून असतो. एखाद्या पुस्तकाबाबतचे माझे आकलन अपुरे वा चुकीचेही असू शकते. त्यामुळे, माझे अनुकूल वा प्रतिकूल लिहिणे हेही चुकीचे असू शकते.
२. माझ्या दृष्टीने ७० टक्के चांगले असलेल्या पुस्तकाला मी ८० टक्के चांगले म्हणू शकतो पण माझे प्रतिकूल आकलन असेल तर ते मी अनुकूल करून सांगत नाही.
३. प्रतिकूल अभिप्राय असेल तर आधी मी तो संबंधित लेखकाला दाखवतो आणि त्याला वाटले तरच त्याची इथे पोस्ट देतो.
४. माझेही काही लेखन-वाचनाचे काम चालू असते, त्यामुळे, आलेले पुस्तक वाचायला माझ्याकडून उशीरही होऊ शकतो.
५. सर्वच प्रकारची पुस्तके माझ्या आवडीच्या क्षेत्रात येतील, असे नाही. असे होऊ शकते की वाचायला सुरुवात करताच न आवडणे, वाचनीय न वाटणे. असे झाल्यास ते पुस्तक मी वाचण्याची शक्यता नाही, हेही कृपया समजून घ्यावे. न वाचता अभिप्राय लिहिणे हे मला जमत नाही.
६. आणि इतकेही करून माझी अभिप्राय-पोस्ट वाचतात किती लोक, तर १०-२०-२५. हाही मुद्दा विचारात घ्यावाच. उगीचच मला पाठवण्यात पुस्तकांच्या प्रती वाया जाऊ नयेत म्हणून ही पोस्ट दिली आहे.
--- ००० ---

खालील पोस्ट नीट विचार करून द्यावी असे वाटत होते पण अडचण अशी झाली आहे की मी लिहिलेले सेव्हच होत नाही आहे -- पुन्हा कुठे हे लिहीत बसणार -- म्हणून आहे तशी देतो आहे --

‘ तंबाखूची टपरी ‘ च्या निमित्ताने –

अनुसर्जित कवितांचा माझा हा संग्रह वर्णमुद्रा प्रकाशन काढेल असे ठरून अनेक महिने होऊन गेले. त्याबाबतच्या संपर्कासाठी कायप्पावर एक समूहही करण्यात आला. त्या समूहात आजवर मला एकही मेसेज आलेला नाही, हा भाग वेगळा. दर काही महिन्यांच्या अवकाशाने मी दोनतीनदा विचारले तर ‘ लौकरच ‘ असे समजले. नंतर या कोरोना संकटामुळे काही अडचणी येत आहेत, असेही समजले. शिवाय त्यांनी आधी ठरवलेली काही पुस्तके रांगेत असणार, असेही दिसते आहे. सारखे विचारण्याचा मला संकोच वाटत असल्याने आता हा संग्रह मी माझ्या संकेतस्थळावर द्यायचे ठरवले आहे. संकेतस्थळावर एवढ्यात देऊ नये, हे माझे मीच स्वीकारलेले बंधन होते. पण एकूण परिस्थितीमुळे त्याचा पुनर्विचार करावा लागतो आहे. अर्थात याने पुस्तकावर ( प्रकाशित झाल्यास ) काही परिणाम होईल असे मला वाटत नाही. कारण मला भेटणारे-दिसणारे कोणतेही मराठी वाचक हेच म्हणतात की आम्हाला वेबवर वाचणे नाही जमत, आम्हाला पुस्तकच लागते हातात. याला दुसरा पुरावा म्हणजे माझ्या संकेतस्थळाचा उल्लेख वा कणभरही दखल कुठे घेतल्याचे दिसणार नाही. ( ‘ पल भर के लिये कोई हमे प्यार कर ले झूठा ही सही ‘ -- असेही नाही ! ) लेखनच मुळात खास काही नसल्याने असे होत असेल, हीही शक्यता मी नाकारत नाही. निरनिराळ्या परदेशांतले काही वाचक या वेबसाईटला भेट देत असतात, हे मात्र समाधानाचे वाटते. मराठीत इथे म्हणाल तर ही वेबसाईट असली काय आणि नसली काय, काही फरक पडत नाही. तरीही, मी हा निर्णय घेतल्यामुळे, ते पुस्तक प्रकाशित करायचा निर्णय बदलावा असे प्रकाशकांना वाटू शकते. कोणत्याही कटुतेशिवाय माझे याला दिलखुलास अनुमोदन असेल.

आपोआप आलेल्या सहकार्यामुळे वेळोवेळी माझी काही पुस्तके निघाली. मी त्यासाठी खूप आटापिटा केला नाही. मराठीतला एकूण पुस्तकव्यवहार पाहता मला त्याबद्दल फारशी आत्मीयता नाही. मी ना कुठल्या टोळीचा सभासद आहे ना माझे सारखे कुठे जाणेयेणे वा भेटीगाठी असे काही असते. लेखन, कला हे एकटेपणातून येणारे काम आहे, असे मला वाटते. त्यामुळे मी कुणाला ‘ आपला ‘ वाटण्याची शक्यता फारच कमी असते. आणि कुणाच्याही लेखनात असून असून काय असणार आहे – गेले काही वगळले तरी काय मोठे बिघडणार आहे, हे मान्यच करावे लागते. त्यात परत माझे बरेचसे लेखन कळत नाही अशी तक्रार असतेच. आणि लेखक आणि वाचक यांतला एक दुवा म्हणावा अशी ‘ समीक्षक ‘ नामक जमात तर इथे कधीच मृत्यू पावलेली आहे. हे सगळे लक्षात घेऊनच मी हा संकेतस्थळाचा मार्ग अनुसरला आणि चालू ठेवला. “ अरे, काढत नाही त्याची पुस्तके कुणी “ अशीही कुजबूज माझ्या कानावर आली. एकूण आहे या वातावरणात हे असे काही ना काही असणारच. या सगळ्याकडे दुर्लक्ष करायचे मी ठरवले.

आपण कवितेचे उदाहरण घेऊ. माझ्या दृष्टीने कविता ही एक सर्जक प्रक्रिया आहे आणि वाचकाकडून ती वाचली जाणे यात तिची पूर्तता आहे. नंतर पुस्तक निघणे, त्याला बक्षीस मिळणे, कवीचा गौरव होणे या गोष्टींचा त्या सर्जक प्रक्रियेशी काहीही संबंध नसतो. त्यामुळे, कविता वाचायला उपलब्ध असणे हेच महत्त्वाचे. आणि ते काम माझ्या वेबसाईटने होते. फारच अगदी कुणाला आरामात पडून हातात पुस्तक असल्यासारखेच वाचायचे असेल तर तो त्याचा प्रिंट आऊट काढून घेऊ शकतो. अर्थात, पुन्हा तो प्रश्न आहेच -- नाही वाचले तरी काय बिघडणार आहे ? तर याचा सारांश हाच आहे की मला महत्त्वाचे वाटल्याने किंवा मला ते आवडत असल्याने किंवा करमणूक म्हणून हे लेखन मी करत आलेलो आहे. यथावकाश ही वेबसाईटही बंद पडेल आणि सगळे मातीत जाईल ! चलता है !

--- ००० ---

**२५ ऑगस्ट २०२१.**

टीव्हीवर एकजण सांगत होते की सोडावॉटरच्या बाटल्या फेकायचे जे स्किल ( कौशल्य ) पूर्वीच्या तरुणांकडे होते ते आताच्या तरुणांकडे नाही आहे ! -- तरुणांची अशी अधोगती का झाली आहे, यावर एक गंभीर चर्चा होणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

राजकारणात कृतिशील लढाऊ तरुणांची आवक हल्ली कमी होण्याचे एक कारण टीव्हीवर असे सांगण्यात आले की कॉलेजांमधल्या निवडणुका बंद होणे ! हे शक्य वाटते. कारण त्या निवडणुकांच्या निमित्ताने एखादा मर्डर करणे, कुणाचे हातपाय तोडणे अशा ज्या संधी तरुणांना मिळत असत त्याच त्यांच्याकडून हिरावल्या गेलेल्या आहेत !

जयंत पवार

आमच्या फार काही भेटी झाल्या असे नाही. तीनचारदा भेटी आणि दोनचारदा फोन. पण एकमेकांबद्दल आम्हाला आस्था आणि आपुलकी होती. माझ्या अनेक नाटकांची परीक्षणे त्याने मटातून लिहिली. त्याचे स्वत:चे काही विचार असले तरी कलेकडे व्यापक मानवी दृष्टिकोणातून पाहू शकणारा असा तो एक खरोखरचा स्वतंत्र समीक्षक, लेखक, कलावंत होता. त्याची एकूणच नाट्यसमीक्षणे वाचणे हे एक नाट्यप्रशिक्षणच असे. माझ्या नाटकाबाबत लिहिताना, कुणालाही न सुचलेला असा एक मुद्दा त्याने मांडला होता – तो होता अभिनयाबद्दलचा. माझ्या नाटकात अभिनय वेगळा का, कसा लागतो हे त्याने सांगितले होते. हा एक स्वत:चे चिंतन असलेला लेखक होता. त्याच्या चिंतनात असलेला एक महत्त्वाचा प्रश्न माझ्या लक्षात आहे. त्याला असे दिसत होते की वास्तव फार वेगाने बदलते आहे. त्यामुळे, लेखकाला-कलावंताला या बदलत्या वास्तवाचे आकलन होऊन ते त्याच्या कलेतून अभिव्यक्त व्हायच्या आतच वास्तव खूपच बदलून गेलेले असते. मग लेखक ‘ आजचे ‘ कसे लिहिणार ? असे गंभीर प्रश्न पडणे हेच खरे तर कोणत्याही सर्जकतेचे लक्षण आहे. त्याच्या या प्रश्नावर मी एक लेख लिहिला होता. ' ढोलताशे ' या माझ्या नाटकाच्या निमित्ताने, अरुण नाईकांच्या ' नाटक ' या त्रैमासिकासाठी त्याने माझी एक मुलाखत घेतली होती.

या प्रेमळ, शहाण्या मित्राला मन:पूर्वक आदरांजली !

--- ००० ---

संकेतस्थळाचे अद्यावतीकरण

माझ्या संकेतस्थळाचे २५-०८-२०२१ पर्यंतचे अद्यावतीकरण पूर्ण झालेले आहे. इतर सर्व मजकूराबरोबरच
तंबाखूची टपरी ( अनुसर्जित कविता )
हा कवितासंग्रहही आता यात दिलेला आहे. याचे पुस्तक निघणार होते म्हणून हा संग्रह इथे दिला नव्हता. पण, मराठी सारस्वताच्या दुर्दैवाने सध्या तरी हा संग्रह पुस्तक रूपात येणे शक्य नाही. त्यामुळे, निदान, कुणाला वाचायचे असल्यास, उपलब्ध असावा म्हणून आता इथे दिला आहे.
संकेतस्थळ --
www.champralekhan.com

जिंदगी का सफर

माझा एक चुलत भाऊ आहे. प्रा. मधुकर देशपांडे. माझ्यापेक्षा फक्त सहा महिन्यांनी लहान. शाळकरी वयात आमच्या आवडी सेम होत्या. तो पुण्यात, मी मुंबईत. आम्ही खूप चित्रपट पाहायचो. माझी मुंबईतली ठरलेली टॉकिजे म्हणजे न्यू इरा आणि कस्तुरबा, मालाड. आणि त्याची पुण्यातली विजयानंद आणि अल्पना. तो मराठी,

हिंदी, इंग्रजी सर्वच पाही, मी फक्त हिंदी. त्यांच्या पुण्यातल्या घरी कधी कधी सुट्टीला आमचे येणे होई. एम आर आय मध्ये घालावे अशा त्यांच्या चिंचोळ्या  जिन्यात बसून आम्ही दोन चित्रपट कथाही लिहिल्या होत्या. पण चांगल्याला जगात किंमत नाही, असे ठरवून आम्ही ते कागद फाडून टाकले होते. तरीही, एकमेकांना, पाहिलेल्या चित्रपटांच्या कथा, बारीक सारीक तपशीलांसह सांगणे हा छंद मात्र आम्ही नेमाने पार पाडत असू. पुढे तो एका लहान गावात मराठीचा प्राध्यापक म्हणून गेला आणि मी बँकेत नोकरीला लागून इकडेतिकडे जात राहिलो. मग संपर्क फार राहिले नाहीत. नात्यातल्या कार्यात वगैरे भेटी होत. तेव्हा मस्त हास्यविनोद, गप्पा होत. गेली काही वर्षे आता आम्ही दोघेही निवृत्तीचे जीवन जगत आहोत. या काळात त्याने भारत बघणे आणि परदेश बघणे हे कार्यक्रम बऱ्यापैकी राबवले. मी त्या मानाने फारसा कुठे फिरलो नाही. दोघेही पुण्यातच असूनही अंतरे जास्त आणि एकूण व्यापताप यांमुळे फारसे भेटणे होत नसले तरी मधून मधून फोनवर बोलणे होई. शिक्षण क्षेत्रातल्या काही गंमती तो सांगे. मराठी साहित्याचे बर्बादीकरण यावर मी बोले. बोलण्याला कोणतेही पुरावे वगैरे लागत नसल्याने मजा येई.

तर या माझ्या भावाला सुमारे सहा महिन्यांपूर्वी अमुक एक प्रकारचा कॅन्सर झाला. संपर्क फारसा नसल्याने मला माहीतच नव्हते. योगायोगाने काल कळले. म्हणून मग मी त्याला फोन केला. त्याला वेदना वगैरे नाहीत पण अशक्तपणा खूप आलेला आहे. कुणाच्यातरी आधारानेच चालावे लागते. आयुर्वेदिक आणि अलोपथिक अशी दोन्ही प्रकारची औषधे चालू आहेत. या वयात सर्जरी नको असे डॉक्टरी सल्ल्याने ठरलेले आहे. हे तपशील सोडले तर आमच्या गप्पा नेहमीप्रमाणेच झाल्या ! वाचन, टीव्ही यांत त्याचा बराच वेळ जातो. ज्या गावात त्याने आयुष्यभर काम केले तिथे त्याची खूप प्रेमाची माणसे आहेत. कुणी भेटायला येतात, कुणी फोन करतात. गावातल्या एका प्रतिष्ठित असामींचा फोन आला – हे काय हो सर, देवाची काहीतरी चूक झालेली दिसते – त्यावर हा म्हणाला – अहो, मी पाहून आलो त्यांचे दप्तर, चूक काही नाही आहे, माझेच नाव आहे तिथे ! नंतर मग आम्ही साहित्य प्रांतात आलो. मनोज पाठकने माझ्या ‘ तंबाखूची टपरी ‘ या कवितासंग्रहातल्या माझ्या प्रस्तावनेतल्या काही भागाचे केलेले वाचन यू ट्यूबवर होते, ते त्याने ऐकले होते. साहित्यातली आमची इंटरेस्ट वेगवेगळी असली तरी मराठी माणसाच्या जगण्यातले साहित्याचे स्थान लोप पावत चाललेले आहे यावर नेहमीच आम्ही शिक्कामोर्तब करतो, तसे आताही केले. मग पथ्यपाण्याचा विषय निघाला. तो म्हणाला, गेले काही महिने भाकरी आणि मुगाचे वरण खातोय, त्याचा मात्र आता  कंटाळा आला आहे. यावर मी म्हणालो की तेच आनंदाने खा म्हणजे लोक तुला संत म्हणतील !

विशेष म्हणजे त्या पूर्ण कुटुंबानेही या त्याच्या आजाराची वस्तुस्थिती स्वीकारलेली आहे. नो टेंशन, नो सतत नाराजी ! जेव्हा या आजाराचे निदान झाले तेव्हा अर्थातच धक्का बसला, वाईट वाटले, डोळे पाणावले, पण, आता ते काही नाही. हसत-खेळत जिंदगी चालू आहे ! जेवढी किल्ली असेल तेवढी चालेल गाडी आणि खूप झाले की तसे, असे तो म्हणतो. आयुष्यभर तो प्राध्यापक म्हणून शिकवत आला, आता, आताचे हे त्याचे मस्त जगणे पाहूनही, वाटल्यास, कुणालाही बरेच काही शिकता येईल. त्याच्याशी बोलून मस्त मजा आली !
--- चं. प्र. देशपांडे.
--- ००० ---

सायड ( कादंबरी )
ले ० रवींद्र पांढरे, प्र ० रोहन प्रकाशन.

या कादंबरीचे लेखक जन्मजात जळगाव जिल्ह्यातल्या पहूर या गावाचे आहेत. विशेष म्हणजे एसटीने या गावापासून सुमारे तासादीडतासावर असलेल्या लोहारा या गावी शाखाप्रबंधक म्हणून मी साडेतीन वर्षे होतो. किमान ५०-६० वेळा तरी या गावावरून मी ये-जा केलेली आहे. लोहाऱ्यावरून जळगावला जाताना पहूरपर्यंत कच्चा धुळीचा रस्ता

असे आणि मग तिथून पुढे चांगला रस्ता. ( आता काय परिस्थिती आहे ते मला माहीत नाही. ) हे सांगायचे कारण म्हणजे तिथल्या त्या जामनेरी भाषेचा लहेजा मला चांगलाच परिचयाचा आहे. ही कादंबरी वाचताना, आपण एका महान कलाकृतीबरोबर आहोत याच्या आनंदाबरोबरच मला त्या भाषास्वादाच्या पुन:प्रत्ययाचा आनंदही मिळत होता.

‘ सायड ’ ही मराठीतली एक महान कलाकृती आहे. हा लेखकच मुळात मराठीतला एक उत्तुंग प्रतिभेचा कलावंत आहे. पांढऱ्यांच्या ‘ अवघाची संसार ’ आणि ‘ पोटमारा ’ या कादंबऱ्यांवर मी पूर्वी इथे लिहिलेलेच आहे. आनंद होणे ही एखादी मानसिक विकृती म्हणावी असा हा काळ असला तरी ही कादंबरी साहित्यातल्या महानतेचा आनंद देणारी आहे, हे आधीच नमूद करतो. या कादंबरीला ग्रामीण वा परिवर्तनवादी असल्या कोणत्याही अभिधानात बसवता येणार नाही. ही माणसाबद्दलची – मानवी जगण्याचे असंख्य धागेदोरे, कंगोरे समजून घेत वाचकाला एकूण जगण्याबाबतचीच एक परिपक्वता प्रदान करणारी अशी कलाकृती आहे. अभिव्यक्तिपद्धती आणि तीत अंतर्भूत दृष्टिकोण यांवरून आपण आधुनिक, उत्तर-आधुनिक, अस्तित्ववादी, अतिवास्तववादी वगैरे विभाग पाडतो. तसल्या एखाद्या विभागात बसवू टाकावे असेही हे काम नाही. ही एक, म्हटले तर, साधी, सरळ अशी, कोणत्याही आविर्भावाशिवाय सांगितलेली माणसांची कथा आहे. तिथल्या माणसांच्या जीवन-पद्धती, वागणे-बोलणे आणि निसर्ग यांवर तर या लेखकाचे प्रभुत्व आहेच पण माणसांचे मूल्यमापन करणारा स्वमतदूषित असा भाव कुठेही नसल्यामुळे या एकूणच लेखनाला एक आध्यात्मिक उंची लाभलेली आहे. कोणत्याही धर्मातले कर्मकांड आणि यमनियम या अर्थी इथे ‘ अध्यात्म ’ हा शब्द वापरलेला नाही, हे कृपया लक्षात घ्यावे. रूढी, परंपरा, आचार-विचार पद्धती यांच्या मान्यताप्राप्त साच्यामुळे मानवी जगण्याला स्थैर्य मिळत असले तरी तोच साचा जगण्याच्या नैसर्गिक प्रवाहाच्या विरोधात असल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे सर्वंकष भान ही कादंबरी घेते. शांती आणि यशवंता ही या कादंबरीतली दोन प्रमुख पात्रे असली तरी ही काही फक्त त्यांची कथा नाही. १३३ पानांचा मजकूर असलेल्या या कादंबरीत निम्मे तरी केंद्रित फूटेज यांना मिळते का हे पाहण्यासारखे आहे. त्यांच्या निमित्ताने ही पूर्ण मानवी जगण्याचीच कथा सांगितली जाते आहे, हे जाणवत राहते.

सायड म्हणजे एकमेकांचे न्यून ते पुरते करून घेण्यासाठी दोन शेतकऱ्यांनी एकमेकांची शेतीची कामे एकत्रितपणे करण्यासाठी केलेला समजुतीचा करार. शांती आणि यशवंता यांच्यामध्ये तसा करार आहे. त्या दोघांच्या वेगवेगळ्या लग्न कहाण्यांपासून सुरू होणारा सगळा प्रवाहच याला कारणीभूत आहे. याची कथा नाही सांगत बसत. नको ते कोणतेही भरताड नसलेली ही एक समृद्ध कलाकृती आहे. साहेबू आणि यशवंता यांनी अजिंठ्याला जाणे किंवा यशवंताने शांतीसह शेंगोळ्याच्या जत्रेला जाणे अशा प्रसंगांची वर्णने नुसती पाने वाढवणारी नाही आहेत. शांतीची सासू निवर्तल्यानंतर ती आणि तिची आई यांच्यांत होणारा संवाद किंवा साहेबू आणि यशवंताचे शेवटी शेवटी येणारे संवाद हे सखोल शहाणपण व्यक्त करणारे आहेत. ती ती पात्रे त्यांच्या त्यांच्या मर्यादांतलेच बोलत आहेत पण हे सगळे पाहण्यात-सांगण्यात असणारे लेखकाचे शहाणपण हे मराठी साहित्याने आपला दागिना समजावे, असे आहे. असे आणखीही काही प्रसंग आहेत. “ शेवटी नशीब नावाची काही एक गोष्ट राह्यतेच का नही आयुष्यात ? तू तुह्याकडून व्हयीन तेवढं करशील शांतीसाठी, पन शेवटी तिचं नशीब तं काही बदलवता येनार नाही तुले. नाशिबाच्या पुढं कोन्हाचं काही चालत नही, यशोंताभू. ” – इथे ही कहाणी येऊन ठेपते. तसे तर या कथेचे बारीकसे मूळ म्हणावे तर यशवंताच्या बायकोच्या आईचे अवाजवी कन्याप्रेम ! तिला नेण्यासाठी आलेल्या यशवंताला अनेकदा तिला न घेताच परतावे लागल्याने शेवटी चिडून तो म्हणतो की आता न्यायला कुणी येणार नाही, यायचे तर तिने आपल्या पायाने चालत यावे. यातला एक किरकोळ अहंकाराचा, नंतर दुतर्फी झालेला, मुद्दा ! म्हटले तर हाच सगळे घडवतो ! या पद्धतीने पाहिले तर ही एक अत्युत्तम मूर्षा ( absurd ) कथा ठरू शकते. आणि मग असाही प्रश्न येऊ शकतो की किरकोळ काय आणि महत्त्वाचे काय ? एखाद्याचा स्वभाव, एखादी घटना, नैसर्गिक

प्रेरणा – काय, महत्त्वाचे काय समजावे ? इथे लेखक जसे माणसांचे मूल्यमापन करत नाही तसेच एकूण जगण्याच्या कुठल्या भागांचेही नाही करत. हे सगळे मिळून एकत्र आहे याची जाणीव देत राहतो.

या कादंबरीतली निवेदन शैली एखाद्या कवितेसारखी मितभाषी आणि गणितासारखी बिनचूक आहे. आशयाचा एक कणही इथे दुर्लक्षित राहात नाही. त्यामुळे अथ पासून इति पर्यंत वाचताना सतत एक परिपूर्णतेचा प्रत्यय येत राहतो. आणि हे सगळे सहज साधेपणाने घडत राहते. ही नुसतीच एक महान कलाकृती नाही आहे तर अनेक कारणांनी ' अभ्यसनीय ' ठरावी अशी कादंबरी आहे. रचना आणि शहाणपण यांचा इतका सुंदर मिलाफ क्वचितच पाहायला मिळतो ! पाने फक्त १३३ पण ही खरी समृद्ध कादंबरी !

या कादंबरीची आस्वादक समीक्षा कुणी करू शकला तर ती किमान या कादंबरी इतक्या आकाराची तरी होईलच, असे मला वाटते !
--- चं. प्र. देशपांडे.
--- ००० ---

परमेश्वरा, कवितेत-साहित्यात मी काय करतोय ते ज्यांना समजत नाही त्यांना माफ कर !

Ravindra Damodar Lakhe
Septemfbipeora 4 ilath l10:02 AnMrr ·
'तंबाखूची टपरी'
Link http://www.champralekhan.com/
चंप्र देशपांडें यानी अनुवादित केलेल्या जगभरच्या निवडक कवितांचा 'तंबाखूची टपरी' हा कविता संग्रह त्यांच्या वेबसाईटवर वाचला.
वाचून होताक्षणी असं वाटलं की अरे हा तर चंप्रंच्याच कवितांचा संग्रह आहे.
असं का वाटलं याचा विचार करताना लक्षात आलं की अनुसर्जन हा शब्द सार्थ करणारा हा कवितासंग्रह आहे. यात जागतिक पातळीवरच्या कवींच्या कवितांचे अनुवाद आहेत आणि अनुवादकर्त्याची सर्जकताही आहे.
अनुवादकर्त्याच्या सर्जकतेमुळे या संग्रहाला एकसंधता प्राप्त झाली आहे.

आमचे घराणेच शिक्षकी पेशाचे आहे. त्याला आम्ही नेहमीच जागून असतो. आम्हाला काही येवो न येवो, इतरांना शिकवण्यात आम्ही कंजूषी करत नाही. त्यामुळे, या अशा शिक्षक दिनी आम्ही अशा सगळ्या ( निवडक ) शिक्षकांना वंदन करतो की जे स्वत:ला येते तेच इतरांना शिकवतात आणि एकूणच जगण्यात क्लॅरिटीचे उपासक असतात ! ( कधी कधी तर असे वंदन करायला कुणी सापडतच नाही, हा भाग वेगळा ! ) तरीही, ( एक प्रोत्साहन म्हणून ) एकूण सर्वच शिक्षकांना विनम्र नमन !

खिन्नता रोग आणि तदनुषंगिक काही

एकूणच हल्लीच्या काळात आणि विशेषत: या कोरोना काळात ही खिन्नता रोगाची समस्या वाढत चालल्याचे वाचनात येते. धर्मातली बाकीची कर्मकांडे यात्राजत्रा वगैरे द्या सोडून पण ध्यान ( याला खरे तर धार्मिक वगैरेही म्हणायची गरजच नाही ) हे मात्र या समस्येवरच नुसते नव्हे तर एकूण जगण्यावरच उपकारक ठरणारे प्रकरण आहे, हे शास्त्राने सिद्ध झालेले आहे. ' रिव्हर्सल ऑफ हार्ट डिसीझ ' लिहिणारा डीन ऑर्निश तर आहेच पण यावर जगभर

सतत संशोधन चालू असून त्याचे निष्कर्षसुद्धा ही बाब अधोरेखित करणारे आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. ध्यानाचे बरेच प्रकार सांगितले जातात. त्यातले काही तज्ज्ञांकडून शिकावे लागतात, असे म्हणतात. पण ध्यानाचा सगळ्यात सोपा प्रकार, आपल्या महाराष्ट्राचे कायमचे डॉक्टर संत तुकाराम यांनी सांगितलेला आहे. तो आहे नामजपाचा. हाच मार्ग अनेक संतांनी सांगितलेला आहे. ( मी स्वत: नामजप करत नाही हे इथे नमूद करून ठेवतो. माझी स्वत:चे मन समजून घेण्याची प्रक्रिया चालू असते, एवढे मी म्हणेन. ) नामजप असो किंवा दिवसातून पाच वेळा नमाज पढणे असो – याने ईश्वरसेवा वा भक्ती तर घडत असेलच पण मुख्यत: मानसिक समस्याग्रस्ततेच्या सातत्यात ते खंड पाडते. असा खंड पडला की त्या समस्येची तीव्रता जाते. शारीरिक म्हणाल तर ध्यानामुळे हृदयरोग, बीपी, मधुमेह, दमा एवढेच काय तर एका ठिकाणी कॅन्सरही वाचले – हे रोग आटोक्यात येतात. ध्यानाने होणारे खालील फायदे शास्त्रीय संशोधनातून पुढे आलेले आहेत –

१. कामातली लक्षपूर्वकता वाढते.
२. मेंदूवर होणारे वयाचे परिणाम कमी होतात.
३. डोक्यातला मीपणा किंवा सैतान कमी होतो.
४. चिंताकाळज्या, खिन्नता आणि वेदना कमी होतात.
५. मेंदूच्या महत्त्वाच्या भागांची वाढ होते.
६. व्यसनाधीनता कमी होते.
७. वगैरे.

हे सगळे आपल्या तुकारामबुवांना एखाद्या प्रयोगशाळेतून असे कळलेले नव्हते. त्यांच्या स्वत:च्या चिंतनातून किंवा उत्स्फूर्ततेतून कळलेले होते. तरीही नामजपाबद्दल ते काय म्हणतात ते पहा –

याविण असता आणीक साधन । वाहातसे आण विठोबाची ।।
किंवा – नलगे हालावे चालावे बाहेरी । अवघेचि घरी बैसलिया ।।
त्यांचे एवढेच म्हणणे आहे --
ठाउकाचि आहे संसार दु:खाचा । चित्ती सीण त्याचा वाहो नये ।।

सुचवायचे एवढेच आहे की जे भक्तिमार्गात असतील ते आत्मनिवेदनाच्या स्थितीला पोचतील तेव्हा पोचतील पण नामजप ही निश्चितच एक संजीवनी आहे. जे नास्तिक असतील त्यांनी ' दगड दगड ' म्हटले तरी चालू शकेल. पण नामजप करणाऱ्यांना अंधश्रद्ध ठरवून वा मूर्ख, हास्यास्पद ठरवून त्यांची हेटाळणी करू नये. आणि अर्थातच नामजप करणाऱ्यांनीही त्यांची हेटाळणी करणाऱ्यांना किंमत देऊ नये. जास्तीत जास्त लोक भरकटण्यापासून वाचणे हे सर्वांच्याच हिताचे आहे, हे तर निर्विवाद आहे.

--- ००० ---

पाच वर्षांपूर्वीचीच अवस्था अजून तशीच आहे की झालीय काही प्रगती ? की खरोखर झालीय का प्रगती तेही कळलेलेच नाही ?

5 Years Ago

See Your Memories

Champra Deshpande updated his status.

SeltpSitgemSber o6,gnso g2s01re6 · Shared with Public

Public
लोकांना बुद्ध अजून कळलाच नाही.
लोकांना गांधी अजून कळलेच नाहीत.
लोकांना आंबेडकर अजून कळलेच नाहीत.
( आता तर, ' लोकांना आचार्य अत्रे अजून कळलेच नाहीत ' ! )
-- हे आपण नेहमीच ऐकत असतो.
असे म्हणणाऱ्याला तरी ते ते कळलेले असते, हेच त्यात एक समाधानाचे असते !
( पण, लोकांना मार्क्स अजून कळलेलाच नाही -- असे कधी कानावर येत नाही.
कारण, सगळे मार्क्सवादी अमर्याद हुशार असतात ! त्यांना कळले नाही,
असे होऊच शकत नाही ! )
तर मग आता करावे काय ?
त्या त्या विभूती कुणाला समजल्या आहेत, ते आधी ( एकमताने ! ) ठरवून,
ते सगळे आधी त्या त्या समझदाराकडून सर्वांनी समजून घेत बसावे ?
ते मुळात पूर्ण होणारे काम नाही -- आणि तेवढ्यात --
लोकांना शरद पवार अजून समजलेच नाहीत,
लोकांना मायावती अजून समजल्याच नाहीत
-- हे सुरू होणार !
तर मग करावे काय ?

वेदना

मी कोल्हापूरला असताना मला एकदा प्रचंड दाढदुखी आणि फ्लू हे एकत्र झाले होते ! वेदनेची ती तीव्रता, उंची आणि खोली पुन्हा कधीच आयुष्यात आली नाही. सध्याही माझे दात-पुराण चालू आहे, त्यावरून आठवले. ऐसी वेदना तो मै यूं पार कर लेता हूं !

जॅक पोलॉक नामक एक चित्रकार होता. त्याच्या चित्र शैलीला ठिबक चित्र वा कृती चित्र वा सर्वंकष चित्र म्हटले जाते. त्या शैलीत लिहिलेली ही एक कविता आहे.
ठिबक कविता

अमुक अशी असायला हवी कविता

एका ठिकाणी दिलेली कॉमेंट -- कुणालाही हे पटवून देण्याची वा यावर वाद घालण्याची जबाबदारी न घेता इथे खाली पोस्ट म्हणून देत आहे --
sentimentalism, emotionalism ( भावनिकता ) टाकून देणारी खूप कविता लिहिली जाते जगभर -- इथेही कुणाला त्या मार्गाने आपोआप जायचे असेल तर जाऊ द्यावे -- आपण जी बुद्धिप्रधानता म्हणतो ती बऱ्याचदा बुद्धीला वा तर्काला बांधील नसते, हेही समजून घ्यायला हवे. मराठी कवितेत व्यक्तिगत सुखदु:खे, मूडस आणि राग-लोभ-क्रोध यांचे प्रचंड स्तोम माजलेले आहे. वेगळी कविताही येत राहणारच. स्वागतशील राहायचे की नाही हा वाचकांचा प्रश्न आहे. एलियट escape from emotion ( भावनेपासून सुटका ) का म्हणतो, anti poetry ( न -- कविता ) कोणत्या कारणांनी येते, हेही समजून घ्यायला हवे. इथली माती, तिथली माती याच तत्त्वज्ञानात ज्यांना

अंतिम वाटत असेल त्यांचा प्रश्नच नाही. भावनिकतेत डुंबून राहणे हे मराठी कवितेचे डबके होण्याचे प्रमुख कारण आहे.

माझी प्रिय मैत्रीण सोनाली

एकदा एका ठिकाणी आम्ही काही लेखक, कलावंत मंडळी जमलो होतो. आमच्यांत कोल्हापूरची ही ग्रेट हस्ती सोनालीही होती. तिचे सगळे हिंडणे-फिरणे व्हील चेअरवरूनच चालते. अत्यंत साधी आणि प्रसन्न ' असण्याची ' ही व्यक्ती ओळख होताच जिगरी मैत्रीणच झाली ! त्या वेळी तिच्याशी जे एकदोनदा बोलता आले त्यावरून हिचे असणे हे, ही दिसते याहून खूपच प्रचंड आहे, हे लक्षात आले. तिच्या मनातला सर्वांबद्दलचा स्नेह जाणवत राहिला. जगण्यातल्या काही त्रुटी या किरकोळ दिसू लागल्या. तिच्या जिद्दीचे कौतुक करण्यापेक्षा तिच्या ' असण्याबद्दलच ' आदर आणि प्रेम बाळगायला हवे, हे समजले. या सगळ्यात कहर म्हणजे आमच्यासमोर तिने केलेले सुमारे पाऊण तासाचे भाषण ! मानवी जगण्याची समज ओतप्रोत भरलेले आणि स्वत:चे चिंतन मांडताना कोणताही मुलाहिजा न बाळगता, कोण काय म्हणेल याचे विचार तडीपार फेकून देऊन, ती बोलली ! सर्वांचे डोळे उघडणारे तर ते होतेच पण मधून मधून डोळ्यांत संवेदनशीलतेचे पाणी आणणारेही होते. मी तिचे ते भाषण कधीच विसरणार नाही.

तिच्या मर्यादा संभाळूनही ती काय काय करत असते हे मधून मधून कळत राहिले. तिच्याबद्दलचा आदर दुणावत राहिला. तिला आता तिने केलेल्या एका अनुवादासाठी साहित्य अकादेमीचे पारितोषिक मिळाल्याचे कळले आणि खूप आनंद वाटला ! आज नुसते फेसबुकवर थोडे फिरून पहा -- तिने कमावलेल्या प्रेमादराचे प्रचंड दर्शन होईल !

त्यानंतर पुन्हा आमची भेट झाली नाही. पण तिला मनातच स्थान दिलेले असल्याने प्रश्नच येत नाही ! माझ्यासारखीच अनेकांची अवस्था आहे !

प्रिय सोनाली, तुझे खूप मन:पूर्वक अभिनंदन ! बघू, हे कोव्हिड डिपार्टमेंट बंद झाल्यावर खास तुझ्या भेटीला कोल्हापूरला यायचे मनात आहे. जमल्यास भेटूच !

--- ००० ---

कवळी पण जून कथा

' कवळी ' हे विशेषण असले की आकर्षक असते पण ते जर नाम म्हणून आले तर रक्तच काढते. मी सध्या त्या मार्गात आहे म्हणून त्यावर लिहितोय. एका वेळी किती दात काढले जाऊ शकतात, ते बरे व्हायला किती दिवस लागतात, वगैरे अभ्यास सध्या चालू आहे. त्यात निरनिराळ्या समस्याही समोर येत आहेत.

एकाने एक फारच विचित्र बाब सांगितली. तो एकदा प्रवासात असताना एका सहप्रवाश्याने रात्री त्याची कवळी काढून, स्वच्छ करून, व्यवस्थित पॅक करून बॅग उघडून तीत कुलुपात ठेवून दिली. ते पाहून त्या एकाने विचारले, का हो, कवळी तर आहे, एवढी कुलुपात कशाला ठेवताय ? तर तो म्हणाला, तुम्हाला माहिती दिसत नाही, कवळ्या चोरीला जातात ! काही शहरांमध्ये त्या रस्त्यावर विकायला असतात. जातायेता कुणीही आपल्याला फिट बसणारी कवळी विकत घेऊन जातो. ना डॉक्टरकडे चकरा मारणे ना मापे देणे ! आणि स्वस्त काम ! आता ती कवळी इंपोर्टेड मटेरियलची आहे की स्वस्तातली याचे त्यांना काही देणेघेणे नसते. बरे, कवळीला काही चासिस नंबर वगैरे नसतो,

त्यामुळे ती कुणाची कुठून आणली वगैरे प्रश्नच नाही येत. ते सांगतात की या रिजेक्टेड ( नाकारलेल्या ) कवळ्या आम्ही विकतोय ! ( यात काही मृत व्यक्तींच्याही कवळ्या असतात म्हणे ! )

एका दृष्टीने हे बरेही असावे. माझ्या माहितीत एकजण आहेत, त्यांनी उत्तम कवळी घेतली करून पण ती त्यांना सूट नाही झाली. मग, ते ती फक्त जेवताना वापरतात आणि काढून ठेवून देतात !

म्हणजे कवळीचोर लोक ही समस्या सोडवून देतात ! टेस्ट करा, तुम्हाला सुटेबल कवळी घ्या आणि फुटा !

इट हॅपन्स ओन्ली इन इंडिया -- हे गाणे आठवणे इथे अत्यावश्यक !

--- ००० ---

**२३ सप्टेंबर २०२१**

मोकळी हवा

थोडी मोकळी हवा ज्यांना चालत असेल त्यांच्यासाठी ही पोस्ट. आधीच क्लियर करतो की ही माझ्या कवितांच्या समर्थनार्थ देत नाहीय. माझ्या कविता या अनेक कारणांनी कविताच नाहीयत. तो जाऊ दे विषय. जेम्स टेट नामक, माझ्या मते ग्रेट असलेल्या, कवीच्या या दोन कविता वाचा. आता अनुसर्जन बास. तशी इथे कशाचीच फारशी गरज नाहीय. भाषेत कविता असावी म्हणून थोडेफार कौशल्य आत्मसात करत थोडी कलाबिला करत राहिले की बास. स्वत:लाही मुळे हलवणारे प्रश्न नकोत आणि वाचकांच्याही डोक्यांना नको जास्त ताप. खाली लिंक देतोय. ज्यांना ' इथल्या मातीतले नसलेले ' चालू शकते त्यांनी वाचून पहा. वाचून झाल्यावर आपण नक्कीच म्हणू -- असेल पुलित्झर मिळालेला पण कविता म्हणून गद्य खपवत होता हा माणूस. आणि तिथले वाचकही च्युत्ते फसत होते. बघा –

https://granta.com/two-poems-tate/?fbclid=IwAR2iCJUtlEhRuMNO2dfSsZL3BrfgQPTfnR6R4hBiFRV1VpbBgoM_qEe7Txk

अगम्य ---शॅडो सेल्फी --- घर अमुचे आकाश – तीन फोटो.

कवितांचे परीक्षण

बऱ्याच कविता या खालीलपैकी एक वा अनेक वैशिष्ट्यांत सामावतात, असे दिसते --

१. कोणत्याही बाबतीत गांभीर्य नसून, मिळवलेली भाषा आणि विद्वत्ता यांतून विविध गुणदर्शन करत राहणारी कविता.

२. अनिश्चितता पूर्ण सोडून दिलेली, समजून घेण्या ऐवजी सांगण्याच्या भूमिकेत असलेली हिंसक कविता.

३. व्यक्तिगत भावभावना आणि मूडस यांचे स्तोम माजवणारी कविता.

४. सामान्य अनुभवांना ओळी, सांगीतिक लय, अलंकार, प्रतिमा यांतून मांडणे म्हणजेच कविता, अशा समजातून लिहिलेली कविता.

५. माझ्यापेक्षा वेगळे काही समजणारे मूर्ख आहेत असे समजणारी कविता.

६. माणसांचे आणि घटनांचे अंतिम मूल्यमापन सांगणारी कविता.

७. व्यवस्था म्हणजे काय हे आपले मत ठरवून व्यवस्था बदलायला निघालेली कविता.
८. कविता तथाकथित ' काव्या ' तून जे सांगत आहे ते सरळ गद्य उताऱ्यातून पूर्णपणे सांगून संपू शकते, अशी सूचकतेच्या अभावाची कविता.
९. अहंकारी, घमेंडी, आत्ममग्न, अस्मितांच्या बंधनांत अडकलेली, उर्मट, मग्रूर म्हणावी, अशी कविता.
१०. निसर्ग, आठवणी, दृश्ये इत्यादींची नुसती वर्णने करण्यात रमणारी कविता.
--- अशा कवितांचा आवाका फारसा मोठा नसतो. रंगून-रमून जायला त्या चांगल्या असू शकतात, पण, एकूणात, त्या कविता खुज्या असतात. सर्व माणसांना प्रस्तुत ठरावे असे काही तत्त्व त्यांच्यांत नसते. हे सर्व लक्षात घेऊन ' मराठी कविता ' या विषयावर एक सविस्तर लेख लिहिण्याचा विचार आहे. माझे इतरही काही लेखन चालू आहे. वेळ लागू शकतो, पण हे काम तर योजलेले आहेच. मतभेद असू देत, पण या कामाला तरी शुभेच्छा असाव्यात, ही विनंती.
--- ००० ---

साहित्यव्यवहारासाठी एक अतिमहत्त्वाचा लेख

टिचकीसरशी उडवू नका -- सुनीळ सामंत
( आज दिनांक २६-०९-२१ रविवार मटा )

" पुस्तके खपत नाहीत याचे महत्त्वाचे कारण त्यांची किंमत. पुस्तके स्वस्त न होण्याचे कारण त्यांच्या आवृत्तीची संख्या व पडून राहण्याचा काळ. पुस्तके स्वस्त करण्यात इंटरनेट महत्त्वाचे साधन बनू शकते. वाचकसंख्या वाढवण्यासाठी इंटरनेट महत्त्वाची भूमिका बाजावू शकते. इ-बुक, इंटरनेट, आणि नवीन तंत्रज्ञानाच्या नावाने बोटे मोडाल तर मोडून पडाल. " -- हे या लेखातले एक वाक्य आहे. हा पूर्ण लेखच, विशेषत: लेखक-कवींसाठी फारच महत्त्वाचा आहे.

माझी www.champralekhan.com ही वेबसाईट ( संकेतस्थळ ) २००९ पासून असल्याचे तुम्हाला माहीतच आहे. आयुष्यभरचे माझे सर्व लेखन मी इथे मोफत उपलब्ध करून दिलेले आहे. ही पोस्ट देण्याच्या निमित्ताने मी यातली आकडेवारी तपासून घेतली. वर्षाला साधारण किती वेळा लोक इथे व्हिजिट करतात हे पाहिले असता खालील माहिती मिळाली --
२०१५ -- ३९५८
२०१६ -- ३३९६
२०१७ -- ३९६५
२०१८ -- २३००
२०१९ -- २७६८
२०२० -- २९२८
२०२१ -- २७०५ ( सप्टेंबर पर्यंत )
भारत, अमेरिका, जर्मनी, कॅनडा, चीन, रशिया, ग्रेट ब्रिटन, थायलंड, ग्रीस, आयर्लंड, नेदरलँड, स्वीडन आणि फ्रान्स -- या देशांतून ही वेबसाईट व्हिजिट झालेली ( पाहिली गेलेली ) आहे. यातले काय काय डाऊनलोड केले गेले त्याचेही रेकॉर्ड आहे. अर्थात ही सगळी त्या त्या देशातली मराठी माणसेच असणार. माझ्यासारखा लेखक म्हणणार, वाचले जातेय ना, बास ! आणि इथे मराठीत हे असले लिहून लेखकाला मिळून मिळून पैसे मिळणार किती ?

सारांश, मी काळाची पावले ओळखून चाललोय, असे वाटते.

--- ००० ---

champralekhan.com

www.champralekhan.com

पंकजला खूप शुभेच्छा !

( ए, आपण चहा घ्यायचा ? – चा फोटो ).

कुमार गोखले

सुप्रसिद्ध छायाचित्रकार आणि जाहिरातकार कुमार गोखले यांचे निधन झाले आहे. माझ्या ' सध्या तरी शेवट गोड ' या नाटकाचे सुंदर, आकर्षक ब्रोचर त्यांनी तयार केले होते. त्या नाटकाचे पुण्यातल्या अक्टिव्ह थिएटर्स ने २५ प्रयोग केले होते.

कुमार गोखले यांच्या स्मृतीस मन:पूर्वक अभिवादन !

--- ००० ---

२८-०९-२०२१.

ही मित्रवर्य डहाके सरांची पोस्ट आहे – ( जेम्स टेटची The government Lake – ही कविता.

Ganesh Kanate

तुम्ही जनस्थान पुरस्कार स्वीकारताना उद्धृत केलेली कविता! 👌👌👌

· Reply

· 14h

Champra Deshpande

आनंद वाटला ! हा ' कवी ' आवडणारे आणखीही कुणी आहेत मराठीत !

· Reply

· 14h

Vasant Dahake

Champra Deshpande आपली ही पोस्ट येण्यापूर्वी ही कविता मी वाचली होती व माझ्या भाषणात तिचा उल्लेख केला होता. आपण आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की कवितेच्या नावाखाली हा गद्य खपवीत होता. तर गद्य म्हणजे काय असा प्रश्न मला पडला. कथा, ललित लेख, निबंध, पत्र, रोजनिशी, दस्तऐवज, वार्तापत्र, भाष्य, बातमी, जाहीर सूचना, निविदा, अहवाल ? म्हणजे यांपैकी हा काय खपवीत होता ? ते पाहावे म्हणून हा मजकूर येथे टाकला.

1

· Reply

· 9h

Champra Deshpande

Vasant Dahake ते माझे नव्हते म्हणणे -- इथल्या काही लोकांना कविता म्हणजे ती अमुक अशीच असायला हवी असे वाटते, ते माझ्या काही कवितांना गद्य म्हणत होते -- त्यांना उद्देशून ती उपरोधिक पोस्ट होती. माझ्या दृष्टीने हा एक उत्तमच कवी आहे !

· Reply

· 22m

Champra Deshpande
तुमची परवानगी गृहीत धरून शेयर करतोय --
· Reply
· 1m
Vasant Dahake
जरूर

' सहिष्णुता ' याचा अर्थ एका ठिकाणी असा आलाय -- " मी शहाणा आहे आणि तू मूर्ख आहेस, पण, ठीक आहे, मी तुझे ऐकून घेतोय आणि आत्ताच तुला खतम करत नाहीय ! "

माणूस कुठे निसर्गाशी वा जगाशी मिळताजुळता ( matching ) आहे ? आणि माणसातही शेकडो, हजारो, लाखो, कोट्यवधी विजोड जोडपी नाहीत ? तसेच फॅशनच्या जगातही विजोड असण्याचा एक विचार असणारच ना ? उलट, खरे तर, विजोड असणे, बेसूर असणे, हेच नॉर्मल म्हणायला हवे !

आहे तो अनुभव आणि आहे ती भाषा यांतून जर उत्तम कविता जन्म घेऊ शकते तर आहे तो आवाज आणि आहे ते स्वरज्ञान यांतून उत्तम संगीत का नाही निर्माण होणार ?

सांगून सुपरहिट
मी एक नाटक लिहिले होते. त्यात त्या काळातल्या हिंदी सिनेमाची एक बनावट स्टोरी ( गोष्ट नव्हे ) होती. त्याचे नाव होते, ‘ जागचं हलायचं नाही ‘. माझा ग्रेट दिग्दर्शक मित्र प्रकाश बुद्धिसागर याला ते खूप आवडले होते. तंत्राच्या अनेक करामती करून लोकांना चकित करत त्या नाटकाचा एक झगमगता प्रयोग त्याला व्यावसायिक रंगभूमीवर सादर करायचा होता. ते नाटक अर्थातच आहे तसे प्रायोगिक गरिबीत नसते आले. प्रकाशने त्याच्या आत्मविश्वासातून त्याचे नाव ठरवले होते, ‘ सांगून सुपरहिट ‘ ! पण, सुरुवातही न होता, तालमीतही न जाता, ती योजना बोंबलली आणि पुन्हा एकदा सवयीतले अपयश माझ्या खात्यात जमा झाले. नंतर खूप वर्षांनी, पुनर्लिखित स्वरूपात त्या नाटकाचा म्हणायला एकच प्रयोग, ‘ गोळ्या काढलेले पिस्तूल ‘ या नावाने झाला ! हे सांगायचे कारण म्हणजे, कविता लिहिण्याचे एक, सांगून सुपरहिट तंत्र मी आज इथे उघड करणार आहे. त्याच त्याच प्रकारच्या रटाळ कविता लिहिण्या-वाचण्याचा ज्यांना कंटाळा येत नाही त्यांच्यासाठी हे नाही आहे. नावीन्य आणि स्वत:ची मर्मदृष्टी यांचे नवविधा संगम करत राहावे असे ज्यांना वाटते त्यांच्यासाठीच ही पोस्ट आहे. मुख्यत: वैचारिक पायावर उभे राहून सामान्य अनुभवांची सौंदर्ययुक्त री ओढत राहणे म्हणजे कविता, अशी बाळबोध समज स्वीकारणाऱ्यांसाठी हे नाही आहे.
तंत्र म्हटले तर सोपे आहे. तुमचे जे काही आकलन असेल जगण्याच्या प्रक्रियेचे ते यातून व्यक्त होऊ शकेल. तरीही, मुख्यत: क्षणोक्षणी दिसणारी विसंगती आणि निरर्थकता ज्यांना जाणवत असेल त्यांच्यासाठी तर ही एक खाणच ठरू शकते. साधे कोणत्याही दिवसाचे एखादे वर्तमानपत्र घ्यायचे. मग कोणत्याही पानावरचे, त्या त्या वेळी समोर येईल ते ते वाचत, आपल्या आकलनाच्या अंगाने मांडत जायचे. यात, आपल्या डोक्यात असलेले वा सुचणारे असेही काही काही समाविष्ट करत जायचे. कविता म्हणजे हेच, असेच, अमुकच असे काही पकडून बसायचे नाही. बुद्धिगम्य अर्थाचा विचारही करायचा नाही आणि त्याच्या अभावाची भीतीही बाळगायची नाही. मानवी अनुभवाचे एक विश्वदर्शन यातून खुले होऊ शकते. याचा अर्थ जुन्या अभिव्यक्तिपद्धती नष्ट होतात, असे काही नाही. काही लोकांना असे म्हणायची एक हौस असते की आता मूर्षावादाचा काळ संपला, स्वच्छंदतावादाचा संपला, अतिवास्तववादाचा

संपला. तर तसे काही होत नसते. मानवी मनाच्या सर्व शक्यता चालूच राहतात. ( मराठीत वास्तववादाचा काळ कधीच संपत नाही ! ) हे पाहता, भावनिक आणि माणुसकीच्या प्रचाराच्या कविता लिहिणाऱ्यांनी निर्धास्त राहायला हरकत नाही. काही कवी हयातभर एकाच प्रकारची आवड जोपासणारे असतात तर काही, माणसांतल्या निरनिराळ्या प्रवृत्तींना खुश करणारे विविध गुणदर्शन करण्यात माहीर असतात. त्यांचे ते काम चालू राहू शकतेच. हेही काही असू द्या बाबा, अशी आपण त्यांना विनंती करू शकतो. हा एक वेगळा प्रकार, एवढेच राहू द्या सध्या. पण, अर्थातच, हे तंत्र, माझ्या त्या नाटकाप्रमाणे पूर्ण अपयशीही होऊ शकते. नाही तरी इथे कुठे कसला बौद्धिक अर्थ व्यक्त करायचा आहे, फेल झाले तर होऊ दे, असा विचार मी करतो – ही अर्थात सर्वांच्याच ‘ बसकी बात ‘ नाही याची मला जाणीव आहेच.
तर मी इथे प्रात्यक्षिक दाखवणार आहे. त्यासाठी मी घेतला आहे आज, मंगळवार, दिनांक ०५-१०-२१ चा पुणे मटा. चलो, शुरू करते हैं –

कल्पना
एखादी व्यक्ती अमुक असे वागते आहे, असे दोनतीनदा आपल्या लक्षात येते. ते आपल्याला आवडत नाही. ती व्यक्ती हेतूपूर्वक असे वागते आहे या कल्पनेने आपण त्या नात्यातला आपला पवित्राही बदलतो. फक्त एवढेच कशाला असे म्हणत कधी आपला एकूणच पवित्राही आपण बदलतो. ही सगळीच आपली कल्पना असू शकते. आपल्या आयुष्याची आखणी करत जायला या असल्या कल्पनेशिवाय आपल्याकडे असतेच काय ? म्हणजे, पवित्रे, भूमिका ठरवत जाणे हेच जगणे ? पवित्रा कोणताही असो, तो एक ताण निर्माण करणारा आणि त्रासदायकच प्रकार असतो. म्हणजेच , आपण सतत एक काल्पनिक आयुष्य जगतो की काय ? असे ताण निर्माण करत जगणे हेच जगणे असेल का अटळ ? -- असा प्रश्न कुणाला पडला तर तो आध्यात्मिक म्हणून फेटाळू नये, असे वाटते.
--- ००० ---

स्वातंत्र्य -- एक कलामूल्य
कवीचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य तसेच वाचकाचे आकलनस्वातंत्र्य ! कविता लिहून झाल्यावर कवीने बाजूला व्हायला हवे, मौन पत्करायला हवे. " अहो, अशी नाहीय ती कविता, असा नाहीय तिचा अर्थ, अहो, खरे तर अर्थच नाहीय या कवितेला -- " अशी कवितेची बाजू घेण्याची भूमिका त्याने घेऊ नये. मग, रोमँटिक कवितेचे उपरोधिक अर्थ वा आध्यात्मिक कवितेचे राजकीय अर्थ, असे काहीही होवो. हे असे सर्व असलेला समाज हा खूपच स्वातंत्र्यप्रेमी असणार. कवी, कलावंतांप्रमाणेच इथले वाचकही जिवंत आणि सर्जकतेने ओथंबलेले असणार ! तर, प्रश्न असा येतो की अशा एकूणच सर्जकतापरिप्लुत समाजात कवितेची वा कलेची गरजच काय ? ' करमणूक ' हे एक त्रिकालाबाधित मूल्य सोडले तर हवीय कशाला कविता ?
--- ००० ---

‘ गावाबाहेर ‘ ( कवितासंग्रह )
कवी – राहुल पुंगलिया – प्रकाशक –कॉपर कॉईन .
आधी न ठरवता मन मोकळे सोडून कविता लिहिली तर आपोआपच त्या कवीची स्वत:ची शैली निर्माण होते. मी आता प्रयोग करतो, वेगळी कविता लिहितो असे म्हणून कुणी वेगळी कविता नाही लिहू शकत. जाणीव, नेणीव, स्वप्ने, भ्रम, कल्पना – ही मनाची सगळी आयुधे यात सामील होत असतात. हे जर एक कौशल्य म्हणून नव्हे तर एक सहज लेखनप्रक्रिया म्हणून घडले तर त्या कवितेला एक नवीनता आणि ताजेपणा लाभत जातो. आंद्रे ब्रेटन हा अतिवास्तववादी कवी म्हणतो की मनाला असे पूर्ण खुले सोडावे एवढेच नव्हे तर कविता लिहून झाल्यावर कवीने त्याच्या व्यावहारिक हुशार मनाने तीत सुधारणा करत बसू नये. काही ठिकाणी खटकणे वा असंबद्ध वाटणे वा

ठेचकाळणे घडते असे वाटले तरी ते तसेच असू द्यावे. थोडक्यात म्हणजे कवितेत आपल्या उथळ तर्काला थारा देऊ नये. राहुल पुंगलियांचा हा संग्रह वाचताना हे आठवले. ही कविता निर्माण होतानाच ' एका माहीत नसलेल्या भानातून ' येत असल्यामुळे कधी जुनी होत नाही. ती पुन्हा पुन्हा वाचली जाऊ शकते. आंद्रे ब्रेटनची शैली आता जुनी झाली, असे म्हणता येत नाही. कोणतीही चांगली कविता एक अज्ञाताचा स्पर्श घेऊन येत असल्याने ती कधीच पुनरावृत्ती नसते. मराठीत काहीजणांना असे म्हणायची आवड आहे की आता अतिवास्तववादाचा काळ संपला, आता मूर्षावाद संपला, वगैरे. माझ्या मते असे काही होत नसते. अभिव्यक्तीच्या सर्व पद्धती जिवंत असतात आणि तींतून पुढे नव्याही पद्धती निर्माण होत असतात. अमुक पद्धतीने कविता लिहिली जाणे ही काही एखादी फॅशन नसते. पुंगलियांची कविता ही या मार्गाने वास्तववादाचा किनारा सोडून देणारी आहे. माझ्या दृष्टीने हे या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

कुठल्याही टोळीचा सभासद असणारा वा पारितोषिकांसाठी हपापलेला कवी अशी कविता लिहू शकणार नाही. या कवितेचे उगमस्थान असते एकटेपणा. आत्मनिष्ठेतून येणारा निडरपणा. ' सामाजिक असणे ' याबाबतचा जो आग्रह मराठीत गेली काही वर्षे हैदोस घालत आहे त्याकडे पाठ फिरवणारा हा कवी आहे. या दृष्टीने या संग्रहातले पुंगलियांचे मनोगत वाचण्यासारखे आहे. " साहित्यातून राजकारण करण्याच्या इच्छेमुळे साहित्य क्षुल्लक होत गेले " असे ते म्हणतात. या बाबतीतले आणखीही काही मुद्दे त्यांनी कुणाचा मुलाहिजा न ठेवता मांडलेले आहेत. एखाद्या कवीने असे परखड ' मनोगत ' लिहिणे ही मराठीत क्वचितच घडणारी घटना आहे.

जगण्याच्या प्रक्रियांचे त्यांतल्या अनेक धाग्यादोऱ्यांसह समावेशक भान घेत जाणे हीच ज्या कवितेतली सर्जकता आहे तिला व्यक्तिगत हेतू वा उद्दिष्टे विचारण्यात अर्थ नसतो. कशासाठी लिहिली ही कविता ? कवीचा एखादा मूड वा त्याचे एखादे दु:ख, वा विचारसरणी वा नीतीबोध देणे – असे काहीच नाही ? व्यवस्था बदलाचे तरी नको उद्दिष्ट ? तर तसले इथे काहीही नाही. इथे कवी एक स्वायत्त वास्तव उभे करत जातो आणि त्यातून मानवी मनाच्या अनेक क्रियाप्रतिक्रियांचा आवाका घेत जातो. हे असे समावेशक भान हेच अशा कवितेचे अस्तित्वसमर्थन असते. ही कविता कवितेची अनेक आग्रही वैशिष्ट्ये झुगारून देणारी आहे. त्यामुळे, मला हा संग्रह विशेष स्वागतार्ह वाटतो. याचे मूल्यमापन होत राहील, तो प्रश्न वेगळा. पण आत्ता, आधी आपले पूर्वग्रह, आग्रह बाजूला ठेवून या कवितेला ' या बसा ' तरी म्हणणे महत्त्वाचे आहे. आणि नुसते एवढ्यावरच थांबावे अशी ही कविता नाही. आशयाच्या अनेक शक्यता खुल्या करणारी ही कविता आहे, हेही लक्षात घ्यायला हवे.

फारशी मुद्दाम निवड करत न बसता मी इथे ' ही खोटारडी झाडं ' आणि ' बातमी ' या कवितांचा उल्लेख करेन. सैनिकांच्या बुटांखाली चमचे, वाट्या येणे हे एका अवाढव्य क्रूर वास्तवाला मूर्षारूप देणे आहे.

सरकारनं प्रत्येक सैनिकाला
बहाल केलंय डिजिटल मस्तक
डोळ्यांच्या डायलवर तरंगतात
भावनांची डौलदार जहाजं

या ओळी मला खूप आशयघन वाटल्या. यातल्या अनेक कविता अशा आहेत की त्यांवर खूप बोलता येईल. ' बातमी ' या कवितेचा शेवट बघा –

रात्री कधीतरी आठवले
तसे पत्र उघडून वाचले
तर भयानक बातमी
दूरवरची इथवर कशीबशी आलेली
इथून ही बातमी आता कुठे जाईल
आणि कोण या बातमीला घरामध्ये घेईल ?

ही कविता जगण्यातल्या घटनात्मकतेचे महत्त्वच प्रश्नांकित करते, असे मला जाणवते.

मी स्वत: एक ‘ लिहिणारा ‘ आहे. मी काही समीक्षक नाही. समीक्षेचे काम हे स्वत:ला समीक्षक म्हणवणाऱ्यांनी करावे. इथे, मला या संग्रहाबद्दल जे काही वाटले ते थोडक्यात पण सकारण सांगण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे. हा संग्रह निघण्यात माझा ‘ दुश्मन मित्र ‘ मंगेश काळे याचा विशेष  पुढाकार असल्याचे कवीने नमूद केलेले आहे. एकूणात, पुंगलिया, मंगेश आणि कॉपर कॉईन यांचे अभिनंदन !

--- ००० ---

कविता वाचण्या-समजण्या-मुरण्या ला लागणारा वेळ, काळ या विषयावर आपले मित्र गणेश कनाटे यांची एक पोस्ट वाचली. तीवर दिलेली माझी कॉमेंट --

ही पोस्ट वाचून माझ्या मनात काहीसे अपराधी भाव जागे झाले. मी तर कवितासंग्रह घेतला वाचायला की तो पूर्णच वाचतो. लगेच त्यावर अभिप्रायही देतो. असे अनेक कवितासंग्रहांबाबत घडलेले आहे. उदाहरणार्थ कालच राहुल पुंगलियांच्या ' गावाबाहेर ' वर मी लिहिले आहे. यावर विचार करता मला असे दिसते की कविता वाचताना मी खूप लवचिक, तरल असतो. माझी लुडबूड थांबवून कवितेलाच बोलू देतो. याचाच अर्थ कविता मला ' पोचणे ' हे माझे नसतेच कर्तृत्व. मी स्वत:ला त्या वेळी खूपच ' कमी ' केलेले असते. याचा सारांश असा दिसतो की कविता ' मला ' कधीच नाही समजत. ती ' मी नसण्याला ' समजते. त्यामुळे, ' मला ' अपराधी वाटण्याचे काही कारणच नाही.

--- ००० ---

उत्तर-आधुनिकता

आधुनिकतावादाच्या एका अवस्थेत, “ मानवी स्वातंत्र्य आणि मुक्तीच्या नावाखाली प्रबोधनामूल्ये ही सार्वत्रिक जुलूम-जबरदस्ती करू पाहतात, असा संशय बळावू लागला. “  ( आधुनिक समीक्षा-सिद्धान्त – मालशे-जोशी- पान २९. )

संहिता आणि वाचक यांवर हे पहा – “ या  सर्व प्रक्रियेला लेखकरूपी मूळ नसते, तर वाचकरूपी अंतिम साध्य असते. वाचकामध्ये, खरे म्हणजे वाचकत्वामध्ये, संहितेच्या अर्थाची जुळणी होण्याचे कार्य घडत असते. तेव्हा एका दृष्टीने पाहता लेखकत्वाच्या संकल्पनेचा अंत म्हणजे वाचकत्वाच्या संकल्पनेचा उदयच असतो, अशी भूमिका बार्थने घेतलेली आहे. “ ( त्याच पुस्तकातले पान १५८. ) म्हणूनच, उत्तरआधुनिकतावादात  असे म्हटले जाते की लेखकाची मूळ संहिता असे काही नसतेच तर फक्त वाचकांच्या कॉपीज असतात.

याचा आपण आपल्या साध्या पद्धतीने अर्थ पाहिला तर काय दिसते ? आंबेडकरवादकेंद्री कवीने लिहिलेली कविता समजा मराठावादकेंद्री वा ब्राम्हणवादकेंद्री वाचकाने वाचली तर तो तो वाचक त्याच्या अवस्थेतून ती कविता वाचणार वा तिचा अर्थ लावणार, म्हणजे मूळ आंबेडकरवादी कविता अस्तित्वातच नाही असणार. किंवा समजा ( समजा म्हणतोय ) एखाद्या तालिबान्याने ग्रेसची कविता वाचली तर तो स्वत:ची तालिबानिगिरी पक्की ठेवूनच तिच्याकडे पाहणार. हे असले विवेचन म्हणजे, माणसाचा हलकटपणा, हिंसकपणा, क्रूरपणा, द्वेष, महत्त्वाकांक्षा, स्ववर्चस्वाची इच्छा, सुखलालसा  हे सगळे सर्वांचे सतत अबाधितच असणार असे गृहीत धरणे आहे. असे जर असेल तर मूल्यात्मकता हा शब्दच रद्द होतो. उत्तरआधुनिकता हेच म्हणते. सत्य, स्वातंत्र्य वगैरे असले काही नसतेच, हाच इथे आकलनाचा पाया असतो. असे असेल तर मग कलानिर्मिती हवीच कशाला याचा विचार करायची वेळ येते.

माझ्या आकलनाप्रमाणे चांगली कलाकृती ही तिच्या निर्मात्याच्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याची त्याची प्रक्रिया असते आणि तिचे वाचकाने वाचन करणे हे त्याने स्वत:च्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडणे असते. हीच तर कवी आणि वाचक यांनी एकमेकांना भेटण्याची शक्यता असते. आणि ती असतेच. अन्यथा, ज्याच्या त्याच्या आवडीची करमणूक एवढेच कलेचे कार्य आहे, असे म्हणावे लागेल. त्यामुळे, मला असे दिसते की उत्तरआधुनिकतावाद हा

माणसाचा हलकटपणा आणि मूर्खपणा हेच फक्त सत्य असते, असे मानणारा आहे. कलानिर्मिती आणि मानवी मूल्य यांचा संबंधच नसतो, असे मानणारा आहे.
मला हे मुळीच पटत नाही. प्रत्यक्ष जगण्यात स्वातंत्र्याची म्हणजे स्वतःच्या प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याची शक्यता निश्चितच असते, असे मला दिसते. जगातल्या अनेक मोठमोठ्या कलावंतांनी याला दुजोरा दिलेला आहे. तुम्हाला काय वाटते ?
--- ००० ---

' तुका म्हणे हरिच्या दासा शुभकाळ सर्व दिशा ' हे असल्यामुळे मुद्दाम मुहूर्त पाळायची गरज नव्हती पण तसेच उद्दामपणे तो टाळायचीही गरज नव्हती ! तर, आज सीमोल्लंघन केले ! सप्टेंबर २०२० नंतर आज सकाळी फिरायला बाहेर पडलो. अर्थात समास्क. गर्दी नव्हती. ही शहरातली झाडे, खेड्यांत पिकांचे काय झाले वगैरे यांच्या डोक्यांत नसते. मस्त झाला पाऊस म्हणून हिरवीगार, स्वच्छ, खुशीत होती ! एका फुलझाडाची एक फांदी माझ्या स्वागतासाठी पार रस्त्यावर आली होती. तिला स्नेहाने स्पर्श केला. जरा पुढे गेल्यावर एका नगरसेवकाच्या गाड्या स्वच्छ धुऊन सज्ज होत्या. एकदोन दुकाने नवी दिसली, एकदोघांनी बोर्ड बदलले होते. किरकोळ काही विषय काढून आमच्या वॉचमन मित्रांशी बोललो. आहे, जग फारसे बदललेले नाही. आता रोज असे जायचे ठरवले आहे !
( शिवाय आज मुहूर्त चांगला होता, म्हणजे हे जमेलच ! )
--- ००० ---

माझे दोस्त
सकाळ झाली की सुमारे पन्नास-साठ ती उडायला सुरुवात करतात. तोच एकच ठरलेला एरिया. इकडून तिकडे आणि तिकडून इकडे. मी माझ्या खिडकीतून जरा लांबून पाहतो. ही बहुतेक कुणीतरी पाळलेली कबुतरे असावीत. सकाळी जरा पंख मोकळे करायला, खुश व्हायला आणि व्यायाम म्हणूनही त्यांना कुणी सोडत असावेत. की ती आपली आपलीच राहतात एक टोळी करून, कोण जाणे. काम ना धंदा ! किती वेळ उडावे ? सुमारे पाच ते सहा तास किंवा आणखी जास्तच असेल ! आता ती तीच टीम इतका वेळ उडत असते की थोड्या थोड्या वेळाने ती बदलते, ते नाही माहीत. सतत उडत असतात ! कितीही स्पीड कमीजास्त होवो, चक्कर थोडी कमीजास्त होवो, यांची ना कुठे टक्कर होते ना रागसंताप. अत्यंत स्मूथ  चालते काम. बरे यात कुठला खेळबीळ काही नसते. शर्यत वगैरेही नसते कधी. खाणे आणि असा उनाडपणा करणे, हेच जगणे ! त्यांच्या पोरांना फारसे शिक्षणही देत बसण्याचा फारसा प्रश्न नाही. वर वर चढा, प्रगती, करा, मोठे व्हा असली काही भानगडच नाही. असावीत ती मराठीच पण साहित्याचा आणि राजकारणाचा संबंधच नसल्याने ती ना पुरोगामी ना प्रतिगामी असणार. मीच कसा विवेकी आणि बाकीचे कसे अविवेकी, अशी काही भानगडच नाही. ना कुणी ग्रेट ना कुणी छोटे !
असाच पांढऱ्या पक्ष्यांचा समूह असाच अनेक तास उडणारा मी लंडनमध्येही पाहिला होता. तिकडे आमच्या कन्येकडे आम्ही महिनाभर राहिलो होतो तेव्हा. ते तर अधिकच विलोभनीय होते. समोर विस्तीर्ण हिरवेगार मैदान आणि हे पांढरे शुभ्र दोस्त ! तिथे मात्र ते कधी कधी त्या मैदानात उतरून थोडा वेळ बसत असत. पण हे असेच ! तासंतास उडणे ! भांडणबिंडण काही नाही, मजा नुसती !
नेटवर एकदा पाहिले या निमित्ताने तर हजारो पक्ष्यांचे समूह, उडतानाची डिझाईन्स, नक्षी आणि स्पीडही बदलत बिनधास्त हवी तशी उडू शकतात ! टक्कर न होता !
मला एक तीव्र शंका आहे की त्यांना मन हा प्रकार फक्त कामापुरताच असणार ! बाकी सगळे सौंदर्य आणि मजाच ! माणसाचे बिचाऱ्याचे मन सतत कार्यरत असते त्यामुळेच बिचाऱ्याची वाट लागत जाते. त्यालाही, कामापुरते मन वापरत, ही सगळी प्रगती टिकवत आणि वाढवतही, जगता येईल का, हाच एक महत्त्वाचा वाटतो प्रश्न !
--- ००० ---

Abhimanyu Bhupathi is with ಮಂಜು ನಾರಾಯಣ್ and 7 others

.

Octo6gb1eporm fs3m20 ratel 9:138 AM96 ·
'Chaduranga mattu Katte' happening at RANGASHANKARA today at 7 PM.
Originally written in Marathi by Sri Champra Deshpande
Translated to Kannada by Sri D.S. Chougale
Will be staged by Panchamukhi Natara Samuha.
Please do come and watch! Thanks in advance.

Octo6gb1eporm fs3m20 ratel 9:235 AM96 · Shared with Public
Public
आता, ' बुद्धिबळ आणि झब्बू ' कानडीत –

आणखी एक नाटक -- ' बुद्धिबळ आणि झब्बू ' -- कानडीत –

जे. कृष्णमूर्ती
जे. कृष्णमूर्ती स्वत:कडे कोणतेही ग्लॅमर घेत नाहीत आणि जर कुणी असे ग्लॅमर मिरवत असेल तर त्याला जुमानू नका असे सांगतात. माणसाच्या जगण्यात येणारे प्रश्न आणि समस्या यांवर आयुष्यभर ते बोलत राहिले, अनेकांशी चर्चा करत राहिले. जगातले अनेक तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, कलावंत त्यांत सामील होत राहिले. माणसाला त्याच्या दु:खातून बाहेर पडता येईल का, हा प्रश्न हजारो वर्षे अनेक धर्मांनी हाताळलेला होता. त्याचे धार्मिक अस्मितेचे आणि ओळखीचे स्वरूप घालवून कृष्णमूर्तींनी हे मैत्रीपूर्ण चर्चेच्या स्तरावर आणले. गुरुबाजी नाकारली. कोणतीही तथाकथित धार्मिक परिभाषा वा कर्मकांडांची अवडंबरे नाकारली. पुस्तकी ज्ञान कचऱ्यात टाकायला सांगितले. तू स्वत: तुझ्या प्रश्नांना सामोरे जाणे हा एकच मार्ग, असे त्यांनी सांगितले. यात कोणत्याही तडजोडी नाकारल्या. मानवजातीत हे काही क्रांतिकारक घडत होते. पण क्रांती बाहेर कुठे नाही तर स्वत:तच घडावी लागेल, हे त्यांनी सांगितले. सर्व समस्यांबाबत टप्प्याटप्प्याने, अगदी वैज्ञानिक पद्धतीने त्यांनी विवरण केले. " कशासाठी येता ४०-४० वर्षे माझे बोलणे ऐकायला -- ही काही धार्मिक करमणूक नव्हे ", असे ते म्हणत. ' वर्तमानात जगा ' आणि ' आत्ता नाही तर कधीच नाही ' असे ते म्हणत. जग असे संघर्षमय, हिंसक का होत चाललेले आहे, यावर ते अत्यंत गंभीरपणे बोलत.
यात खरे तर कुणाला काही प्रॉब्लेम असायचे कारणच नव्हते. पण धार्मिक खोटेपणा आणि पुस्तकी साम्राज्ये उभी करणारे यांची सिंहासने यामुळे आपोआप डळमळीत होत होती. त्याची त्यांना भीतीही वाटत होती. तसले अनेक लोक कृष्णमूर्तींबाबत अत्यंत संतापून बोलत. अजूनही बोलतात. एक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक तर ' हा भडवा काय सांगतो -- हे सगळे गीतेत सांगितलेले आहे ' अशा प्रकारे संतापताना मी पाहिलेले आहेत. प्रत्यक्ष स्वत: कोणत्याही समस्येला तोंड न देता ज्यांना शाब्दिक अधिकारपदे टिकवायची असत ते सगळे कृष्णमूर्तींच्या बाबतीत शत्रू होत. मला स्वत:ला अगदी बालपणापासून जगण्याबाबत गंभीर समस्या भेडसावत आलेल्या असल्याने मला त्या समजून घेण्याच्या प्रक्रियेत कृष्णमूर्तींची खूप मदत झाली. कोणतीही व्रतवैकल्ये, पूजा-अर्चा, दिवे लावणे, जयंत्या-पुण्यतिथ्या असले काहीही मला नको होते. आणि असे माझ्यासारखे जगात खूप लोक होते. ते आस्थेने कृष्णमूर्तींचे ऐकत-वाचत असत.

ज्यांना हे नाही आवडत त्यांनी आपापल्या गल्ल्या, राजधान्या संभाळत बसाव्यात ना. कृष्णमूर्तींना शिव्या देण्याचे, त्यांच्यावर इतके चिडण्याचे काय कारण, असे मला वाटे. कृष्णमूर्ती त्यांच्या श्रोत्यांनाही अनेकदा म्हणत की मी तुमच्यावर अवलंबून नाही, तुम्हीही माझ्यावर अवलंबून राहू नका. आहे तसे सुखासीन जगत राहू इच्छिणाऱ्यांना असा माणूस धोक्याचा वाटू शकतो, हे कळून आले.
अजूनही ज्यांना परंपरेतच फिट राहायचे आहे ते तसे राहातातच. ज्यांना नको आहे कोणतेही अवडंबर ते कृष्णमूर्ती ऐकतात-वाचतातच.
--- ००० ---

Manojchandra Mishra
Otchtober9 20hl at7 110n1f31:107 PMotied1 ·
सुंदर आरसा दाखवणारी माणसं.
तुम्हीही त्यातलेच चंप्र.
Thanks for letting me share Champra Deshpande.

Champra Deshpande was with Jaydeep Apte.
iOuScmu2ltpo6ober36 2gr7 agt l89:37 AM · Shared with Public
Public
नाटक -- ' ए, आपण चहा घ्यायचा ? ' --
खूप शुभेच्छा, जयदीप !

०२ सप्टेंबर' २१ ला मी, प्रा. मधुकर देशपांडे या माझ्या एका चुलत भावाबद्दल इथे एक ' जिंदगी का सफर ' ही पोस्ट दिली होती. कॅन्सरचे निदान झालेले असूनही, त्याने आणि त्याच्या कुटुंबाने ते सर्व एक वस्तुस्थिती म्हणून स्वीकारणे आणि बाकी रूटीन आहे तसे चालू ठेवणे, यावर ती पोस्ट होती. तो काल रात्री निवर्तला. रात्री साडेअकरानंतर त्याच्यावर अंत्यविधी झाला. स्मशानातून सुमारे साडेबाराला आम्ही घरी परतलो.
आमच्या पिढीतल्या भावंडांत पहिला नंबर त्याने लावला ! बाकी शांतता आणि स्मृतीस अभिवादन !

बिंदी-गिंदी, बासुंदी, मटण, कबाब, वगैरे.
माझा माझ्या एका मित्राशी संवाद चालला होता. मी त्याला विचारले की एखाद्या प्रांतात अमुक एका जातीची टक्केवारी जास्त आहे म्हणून त्या प्रांतात त्याच जातीचे, राजकारणासह सगळीकडे प्राबल्य असावे, इतर जातींना नाइलाजापुरतेच स्थान मिळावे, यामागे तर्क कोणता असतो ? तर तो म्हणाला की लोकशाहीत असे होणारच ना, संख्येवर संधीही मिळणारच ना ! पण क्षणात तो असेही म्हणे की धार्मिक ध्रुवीकरण वाईट, तो निव्वळ वेडेपणा आहे, अमुक धर्माचे लोक जास्त आहेत म्हणून त्यांचे प्राबल्य असावे, असे म्हणण्यात कोणताही शहाणपणा नाही ! हे आठवायचे कारण सध्या उडत असलेला सांस्कृतिक आणि उदारमतवादी यांच्यांतला धुरळा. आपण असे म्हणू शकतो की लोक सामान्यत: -- हिंदुत्ववादी, मुस्लिमवादी, धर्मनिरपेक्षतावादी आणि पुरोगामी अशा गटांत विभागले गेलेले दिसतात. एकदा असे गट वा भेद मान्य केले की ' शहाणपणा ' या विषयाला तिलांजली द्यावीच लागते. ' शहाणपणा ' हा शब्दही कुठे चर्चेत नसतो. जाती, धर्म, भाषा एवढेच काय देश यांवर आधारित एकदा माणसे विभागली गेली की शहाणपणा वगैरे काही मुद्दा राहातच नाही. काय, शहाणपणा म्हणजे ? तर त्याचे उत्तर, मी म्हणतो तेच – असेच येणार. शासनव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो, कशाचाही गौरव करायला लोकांना आवडत असो, कायदा सर्वत्र निर्बुद्धपणाचा – जंगलाचा कायदाच चालणार, हे ठरलेले आहे. नुसते ठरलेलेच नाही तर ते पूर्ण

मानवजातीने स्वीकारलेलेही आहे.  मुळात ‘ शहाणपणा ‘ ( wisdom ) म्हणजे काय, हे कुणालाही सांगता येत नाही. समजा अमेरिकेच्या कृती  ‘ चूक ‘ आहेत, तर काय ? निर्णय होणार ते ताकदीवर, जोरावर, जबरदस्तीवर. पूर्ण मानवजातीने ठरवले तर जगातली गरिबी चुटकीसरशी खतम होऊ शकते. पण तसे होऊ नाही शकत कारण पूर्ण मानवजातच समतेच्या, माणुसकीच्या विरोधात असते. ही रचना सर्वांनाच मान्य असते. त्यासाठी सैन्यावर, शस्त्रास्त्रांवर अब्जावधी रुपये खर्च करणे सर्वांनाच मान्य असते. शक्तिमान असणे, प्रबळ असणे हाच ‘ शहाणपणा ‘ हे सर्वांनाच मान्य असते. एकदा कोणतेही विभाजन, भेद मान्य केले की मग ‘ शहाणपणा ‘ या विषयावर कुणीही बोलण्यात अर्थ राहात नाही.

अशा  परिस्थितीत, ‘ शहाणपणा ‘ असे काही असू शकते का आणि काय, कसे असेल ते जगणे – असे प्रश्न काहींना पडू शकतात. ‘ आध्यात्मिक ‘ पळपुटे अशी त्यांची संभावना सर्वच सक्रिय भूमिकाधारकांकडून होऊ शकते. सर्वांचे म्हणणे एकच असते की कोणती का असे ना, एक बाजू घ्या आणि पेटवत, धडाधड भडकवत ठेवा सगळ्यांचे जगणे !

भाषेचा अभिमान बाळगणाऱ्यांना भाषेचे कितपत असते देणे-घेणे, तसेच धर्माचा अभिमान बाळगणाऱ्यांचा धर्माशी कवडीचा तरी संबंध असतो का, हे प्रश्न विचारले पाहिजेत. तसेच ‘ पुरोगामी ‘ हीही एक मूर्ख ओळख होऊन बसलेली आहे नुसती, हेही पाहायला हवे. अमुकच फक्त शहाणे, तेही जगात, इथे महाराष्ट्रातच फक्त उपलब्ध आहेत, असे कुणीच म्हणू शकणार नाही.

अलगता, ओळख, विभाजन आणि वैचारिक बांधिलकी – हे आहेत मूलप्रश्न. हे लक्षात येऊन तरी उपयोग काय ? एक तर संघर्षात सहभागी व्हा नाही तर पळपुटे म्हणून ख्यातनाम व्हा, यांतच निवड करावी लागणार !

कबाब खा, वर बासुंदी प्या – समानता ठेवा, म्हणजे झाले !

--- 000 ---

माझे जागतिक प्रतिनिधी

जानेवारी २०२२ मध्ये सिंगापूरला जगातल्या निवडक तरुण शास्त्रज्ञांना एका महान समिटमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. ‘ ग्लोबल यंग सायंटिस्टस समिट ‘ असे त्याचे नाव आहे. यात अनेक नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. त्यांची भाषणे ऐकायला मिळण्याबरोबरच त्यांच्यासमोर आपापल्या विषयातले काही सादरीकरण करण्याचीही संधी या तरुण शास्त्रज्ञांना मिळणार आहे. शिवाय, त्यांच्या निवडीप्रमाणे त्यांतल्या एखाद्या शास्त्रज्ञाशी एका छोट्या गटात होणाऱ्या चर्चेतही त्यांना सहभागी होता येणार आहे. विशेष म्हणजे यात माझे खास दोन प्रतिनिधी असणार आहेत ! चि. दुर्गा पारखी ही माझी नात ( कन्येची कन्या ) आणि तिचे नियोजित पती चि. श्रीजय देशपांडे – या त्या दोन व्यक्ती ! हा आनंद तुमच्याबरोबर शेयर करणे हे तर आहेच, पण, त्याचबरोबर, आता तरी तुम्हाला पटावे की मी लिहितो ते किती महत्त्वाचे आहे, हाही एक छुपा अजेंडा आहेच ! जगातल्या अत्यंत तीव्र स्पर्धेतून या दोघांची, आणखी काही तरुणांबरोबरच निवड झालेली आहे ! जय हिंद !

--- ००० ---

मंथन – कादंबरी -- ले ० सुहास भोळे – प्र ० सुहास भोळे.

‘  कामगार आणि मालकांच्या समस्येचे ज्वलंत दर्शन ‘ घडवणारी ही कादंबरी आहे. मुंबईतल्या एका मोठ्या कारखान्याचे मालक आणि एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या दोन युनियन्स यांच्यांतले संघर्ष, डावपेच, त्यांतले खऱ्याखोट्याचे मिश्रण आणि कोणत्याही टोकाला जाऊ शकणारी हिंसा यांचे चित्रण असलेली ही एक वास्तववादी कादंबरी आहे. असा एखादा मोठा पट हाताळायचा असतो तेव्हा त्यातली गुंतागुंत आणि ताणेबाणे यांचे विश्वसनीय दर्शन तेव्हाच घडवता येते जेव्हा लेखकाला तो माहोल, त्यातली माणसे आणि त्यांच्या जगण्यातले, कामातलेही अनेक बारकावे माहीत असतात. सुहास भोळे या बाबतीत माहीर असल्याचे जाणवत राहते. समाजाच्या वेगवेगळ्या

स्तरांतली माणसे या कथेच्या ओघात ते सहज पेश करत जातात. यातले अवी-गण्या प्रकरण जरा घाईत सांगितले गेल्यासारखे वाटले. पण एकूणात, लेखकाचा रोख हा, ही एक कथा ओघवत्या शैलीत सांगणे हाच आहे. खरे तर मानवी संबंधांचा हा एक बऱ्यापैकी मोठा पसारा उपलब्ध असूनही लेखक मानवी मनांच्या क्रिया-प्रतिक्रिया, त्यांच्यांत अंतर्भूत असणारे अनेक प्रभाव यांचा आवाका घेण्यात फारसे इंटरेस्ट घेत नाही. त्यामुळे, कलात्मक सखोलतेच्या बाबतीत ही कादंबरी कमी पडते. वृत्तपत्रीय वास्तववादाच्या मार्गानेच जात राहते.

या कादंबरीला ज्येष्ठ लेखक मधू मंगेश कर्णिक यांची प्रस्तावना लाभलेली आहे. ते म्हणतात, " चित्रमय शैलीने कथानक सादर केल्यामुळे वाचक यामध्ये गुंतून पडतो. लेखकाची ही पहिलीच कादंबरी आहे असे कुठेही वाटत नाही. नवथरपणाचा लवलेशही या कादंबरीत आढळत नाही. म्हणून सुहास भोळे यांच्या भावी कादंबरी लेखनाबद्दल उत्सुकता वाटते. " हे खरेच आहे.

यात एक प्रश्न महत्त्वाचा म्हणून चर्चेला येऊ शकतो, तो म्हणजे, आता ते तसे वातावरण फारसे कुठे अस्तित्वात नाही. मग आता आजच्या काळात हे का प्रस्तुत ठरावे ? माझ्या मते, हा प्रश्न बरोबर आहेही आणि नाहीही. नुसतीच कथा सांगणे या स्तरावरच जर एकूण निवेदन राहात असेल तर हा प्रश्न बरोबर ठरतो. परंतु, मानवी  जगण्यातले, अनेक प्रकारच्या नातेसंबंधांतले भान घेणे, त्या समस्यांचा सर्वांगीण आवाका घेणे, हे घडत असेल तर त्यातला अनुभव, वा वास्तव वा माहोल कोणता आहे याला महत्त्व राहणार नाही. शेक्सपियरची नाटके कोणता प्रस्तुत माहोल सादर करतात ? ही कादंबरी मात्र त्या तशा अपेक्षेत कमी पडणारी आहे.

छपाई करताना प्रत्येक पानावर खालचे मार्जिन किती असावे याचा विचार केलेला नाही. मुखपृष्ठ अगदीच ढोबळ वाटले. कादंबरीचे ' मंथन ' हे नावही तीतल्या मजकुराच्या मानाने मिळमिळीत वाटले. तरीही, एका वेगळ्या विषयावरची ' खरी ' कादंबरी म्हणून या कृतीचे स्वागत व्हायला हवे.

--- 000 ---

Champra Deshpande

fS1Nio6veomber 7 6lta0ltf 10r:c28 AgMdf  · Shared with Public

Public

जगण्याचा मार्ग

आज मी जरा म्हणजे मला मुळीच न कळणाऱ्या विषयावर लिहितोय. याचा अर्थ, एरवी, मी मला कळणाऱ्या विषयावरच लिहितो, असा माझा दावा नाही. बारावीनंतर प्रवेश कसा कुठे घ्यावा, हा तो विषय. सामान्यत: विद्यार्थ्यांना असो की त्यांच्या पालकांना, नेमके काय करावे याची स्पष्टताच नसते. मग, अमुक ठिकाणी, अमुक शिक्षण झाल्यावर मोठ्या पॅकेजच्या नोकऱ्या कशा मिळतात, हेच एकूण विचाराचे आणि निर्णयाचे सूत्र बनते. आर्टस आणि कॉमर्स सध्या सोडा, तिथे फार डोके चालवण्याचा प्रश्न नसतो. आपल्याला हवे ते कॉलेज मिळाले की झाले, असा तो एक सोपा निर्णय असतो. सायन्स वाल्यांचे मात्र फारच अवघड असते. पूर्वी विद्यार्थी जरा हुशार असला की त्याने डॉक्टर वा इंजिनियर व्हायचे, हे ठरलेले असे. आताही बरेचसे तसेच असले तरी महाविद्यालये, विविध कोर्सेस यांचा खूपच गुंताडा दिसतो. ( शिवाय ठिकठिकाणच्या फी, देणग्या, बाहेरगावी गेल्यास येणारे खर्च, वगैरे मुद्दे वेगळेच ! ) काय केले म्हणजे नोकरी उत्तम मिळेल, हेच असते विचारात. कुठे कोणत्या कंपन्या येतात मुलाखतींना, मुले निवडायला, ही माहितीही महत्त्वाची ठरते. क्वचितच एखाद्या विद्यार्थ्याला त्याला काय करायचे आहे याची स्पष्टता असते. खरे तर अशा वेळी निर्णय सोपा व्हायला हवा. पण तिथेही पालकांचे विचार वा इच्छा वेगळ्या असतात, त्यामुळे अशा वेळी संघर्ष होतात. प्रवेशासाठी जे फॉर्म  भरावे लागतात त्यांत आपल्या निवडींचे क्रम देणे हे फारच बुद्धिमत्तेचे काम असते, असे दिसते ! त्या कामात योग्य ती दृष्टी नसल्यामुळे बऱ्याच हुशार मुलांनाही त्यांना हवे ते कोर्सेस मिळत नाहीत, असे कळते. म्हणजे ही एक लॉटरीच आहे एक प्रकारची ! मुलांनी आणि

पालकांनी मिळून खेळायची तीन पत्ती ! यातून सगळे जे जसे घडत जाईल त्यातून घडत जाणार या देशाचे पुढील शिल्पकार !

कधी कधी म्हटले जाते की मुख्य म्हणजे जगण्यातल्या अनिश्चिततेचे शिक्षण मुलांना दिले जावे याची आपल्या शिक्षणात सोयच नाही आहे. आता, या प्रवेश प्रक्रियेत मात्र ते घडून येत आहे ! बरीच मुले नाराज होऊन उत्तम शिक्षणाचे मार्ग पत्करत आहेत ! हे सर्व पाहता माझे साधे भरडे जीवन बरे गेले असे मला वाटते !

--- ००० ---

मंगला आठलेकरांचा हा लेख खूपच विचारांना चालना देणारा आहे --
https://www.loksatta.com/.../dr-mangala-athalekar.../...

मंगला आठलेकर यांच्या भाषणाची लोकसत्तेची एक लिंक मी इथे विचारार्थ दिली होती. त्यावर राहुल पुंगलिया यांनी चांगले लिहिलेले असून त्याची पोस्ट दिलेली आहे. तिथे देण्यासाठी मी कोमेन्ट लिहिली पण ती जास्त शब्दसंख्येमुळे तिथे घेतली जात नाही आहे. त्यामुळे ती मी इथे माझी पोस्ट म्हणून देत आहे --

पुरस्कार, वगैरे.

मंगला आठलेकर यांच्या लोकसत्तेतल्या एका भाषणाची लिंक मी चर्चेसाठी इथे पोस्ट केली होती. त्यावर समंजसपणे वाचकांनी आपापले विचार, आकलने मांडावीत, अशी अपेक्षा होती. प्रथमच, त्यावर, राहुल पुंगलिया यांनी काही चांगले विचार मांडलेले असून ते नक्कीच चर्चेला चालना देणारे आहेत. पुंगलियांच्या कविता जरी मला आवडत असल्या तरी त्याचा अर्थ आमची एकमताची वा एका ‘ भूमिके ‘ ची टोळी असते, असे नाही. त्यामुळे, माझ्या आकलनाप्रमाणे मी लिहीत आहे.

कोणतीही सत्ता ही स्थिर असते आणि स्थिर राहण्याच्या प्रयत्नात असते. सर्जकता ही प्रवाही असते – स्थिरतेशी तिला काही देणेघेणे नसते. त्यामुळे, कलावंतांचा, साहित्यिकांचा सत्तेबरोबर सतत संघर्ष असणारच. हा संघर्ष, खरोखर प्रवाही असणारे कलावंत आणि वेगळ्या प्रकारची स्थिरता हवी असणारे कलावंत – या दोघांचाही सत्तेशी असणारा वेगवेगळा संघर्ष असा असू शकतो. तसे पाहायला गेले तर अनुभव, स्वभाव, विचार या सर्वच बाबतीत कोणत्याही दोन व्यक्ती एकसारख्या नसतात, याचाच अर्थ त्या छुप्या वा उघड संघर्षातच असतात. वैचारिक स्तरावर आदर्श, सर्वसमावेशक, अलगता निर्माण न करणारे काही असू शकते का ? तर याचे उत्तर ‘ नाही ‘ असेच येणार. कोणतीही वैचारिक मांडणी सर्वांच्या दृष्टीने परिपूर्ण, निर्दोष वा ‘ न गोंधळलेली ‘ असू शकत नाही. त्यामुळेच, आठलेकर बाईंना पुरस्कारवापसीवाले गोंधळलेले वाटतात, पुंगलियांना आठलेकर बाई गोंधळलेल्या वाटतात, मला पुंगलिया गोंधळलेले वाटतात आणि आता मी हे जे लिहितो आहे तेही आणखी कुणाला गोंधळलेले वाटू शकते. त्यामुळे, एकमेकांना गोंधळलेले म्हणण्यात फारसा अर्थ नाही.

पुंगलिया म्हणतात ते बरोबरच आहे – वशिलेबाजी, भ्रष्टाचार हा कुठेही असू शकतो. मग ते अर्ज करणाऱ्यांना दिलेले पुरस्कार असोत की अर्ज न करता दिलेले असोत. कोणतीही व्यक्ती, संस्था वा सरकार हे कोणत्याही कलावंताच्या विचाराशी एकरूप असू शकत नाही. विचारवंतांचे खून असोत की निवडणुकीच्या काळात होणारे कार्यकर्त्यांचे खून असोत, त्यांत मूल्यात्मक फरक करता येणार नाहीत. एक वा अनेक शेतकऱ्यांच्या, आता एसटी कर्मचाऱ्यांच्या वा विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होत राहणे हे तितकेच भयानक असते. गरीबीचे अस्तित्व वर्षानुवर्षे टिकून असणे, शिक्षण, आरोग्य यांत समानता नसणे, हेही सगळे भयानकच असते. हे सर्व पाहता, कोणत्याही कलावंताने खरे तर पुरस्काराच्या फंदातच पडू नये. कथा सांगून द्रव्याची अपेक्षा ठेवणाऱ्याला तुकाराम शिव्या देतो. कलेचे कार्य हे मानवी जगण्याला मूल्यात्मकता देण्याचे आहे, हे मान्य असेल तर तेही एक धर्मकार्यच आहे. ही काही उपयुक्त उत्पादनांची व्यापारी देवघेव नाही असू शकत. कलावंतांना जर श्रेयसासाठी काम करायचे असेल तर

तुकारामाचे म्हणणे नक्कीच महत्त्वाचे ठरते. आणि एकूण मानवी व्यवहार पाहता कोण त्या अर्थाने मूल्यात्मक काम करत आहे, हे एकमताने ठरणे अशक्य आहे. तसे तर देशात धर्मभेद असणे, जातीवर आधारित राजकारण असणे हेही प्रचंड हिंसक आणि घातक आहे. अशा अनेक गोष्टींना जनतेचा पाठिंबा आणि प्रोत्साहनही असल्याचे दिसते. एक तर पुरस्कार न घेणेच बरे आणि घ्यायचे असतील तर सर्व भेदाभेदांपासून मुक्त असे आपण आहोत का, हेही पाहायला हवे. युद्धविरोध हे मूल्य असेल तर ते आपल्या आकलनात, आचरणात आहे का, हेही कलावंताने पाहायला हवे. नाही तर एकमेकांना गोंधळलेले म्हणत आहे ते चालू ठेवणे, हेच घडत राहील. आणि अमुक मूल्य महत्त्वाचे, तमुक नाही, असे तरी काही असते का, याचेही आत्मचिंतन कलावंताच्या जगण्यात असायला हवे. की सर्व मूल्यांमध्ये एकात्मता असते – हाही प्रश्न विचारात घ्यायला हवा. असे जर नसेल घडत तर आपल्याला फक्त आपापले राजकीय स्वार्थ साधायचे असून मूल्यात्मकतेशी आपल्याला काही देणेघेणे नाही हे स्पष्टपणे पाहायला हवे. मग, आता चालतेय तसेच, लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे संख्येची शक्ती याच तत्त्वावर सगळे चालत राहणार, यात शंकाच नाही.

--- ००० ---

लोकशाही आणि सत्ता

लोकशाहीत प्रभावी ठरण्यासाठी वा सत्तेवर येण्यासाठी खालील उपाय होत असतात –

१. लोकांना आपुलकीने, प्रेमाने आपले विचार पटवणे.

२. धाक, दहशत, पैसा वा इतर शक्य ते सर्व अशा कोणत्याही माध्यमातून मते मिळवणे.

३. परिस्थिती अशी तयार करणे की जीमुळे लोक आपल्याकडे वळतील.

४. निवडणुकीची व्यूहरचना अशी करणे की तुल्यबळ विरोधकाची मते विभागली जावीत.

५. जात, धर्म, इतिहास, विभूती हे मुद्दे वापरून लोकांना आपल्याकडे वळवणे.

६. वरीलपैकी अमुक मुद्दे कसे घातक आणि अहिताचे आहेत त्याचा प्रचार करणे.

७. उत्तम, आकर्षक आणि हितकारी जाहीरनामा तयार करणे. ( जरी तो वाचून त्यावर आधारित मतदान फारसे कुणी करणार नाही, हे माहीत असले तरी. )

वरील सर्व उपाय वा मार्ग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे वैधच समजले जातात. त्यांतले काही आपण वापरले तर वैध, दुसऱ्याने वापरले तर अवैध, असे असते. परंतु, सर्वच संबंधित व्यक्ती या जनहिताची कळकळ बाळगणाऱ्या आहेत, हे मान्य करूनच सर्व डावपेच आखणे क्रमप्राप्त असते. हे सर्व असे करणे हे कोणत्याही हुकूमशाहीपेक्षा नक्कीच चांगले, यावर सर्वांचे एकमत असणे म्हणजेच लोकशाही.

( माध्यमचर्चा, मते आणि उथळ निरीक्षणे यांवर आधारित अशी ही पोस्ट आहे. फार गांभीर्याने घेऊ नये. )

--- ००० ---

आत्मप्रेम, आत्मरती, आत्मगौरव

मानसशास्त्रातले कोणतेच संशोधन हे सत्य धरून चालू नये कारण ते सारखे बदलत असते, असे म्हणणारे लोक आहेत. तुम्ही कोणती विचारसरणी स्वीकारणार हे तुमच्या जनुकनकाशावर अवलंबून असते, असे संशोधन समोर आले की काहीजण खूपच संतापतात कारण आपली असाधारण बुद्धी आणि अथक अभ्यास यांच्या तपस्येतून आपण आपली मते, भूमिका वा विचारसरण्या ठरवल्या आहेत, ही त्यांची खात्री असते. या समजाला धक्का बसणे म्हणजे त्यांनी मानलेला तो एक भ्रम होता फक्त, असे होते. ते त्यांच्या जगण्याला परवडणारे नसते. आता, अलीकडेच माणसात नार्सिसिस्टिक प्रवृत्ती का असतात यावर एक संशोधन झालेले आहे. आत्मप्रेम, आत्मरती, आत्मगौरव यांचे एवढे काय महत्त्व असते मानवी जगण्यात, हा तो मूळ प्रश्न आहे. " मराठ्यांच्या मुलींना ज्या हाताने फुगडी घालता येते त्याच हाताने शत्रूची गर्दनही छाटता येते " असे काही वाक्य सध्या एका मालिकेच्या जाहिरातीत

टीव्हीवर सतत चालू आहे. अरे, हो ना ! पण आता का अशा कानठळ्या बसवताय आणि गरज का वाटते हे सध्या सांगायची आणि कुणाला ? की फक्त हे एक जुने ऐतिहासिक सत्य एंजॉय करणे आहे ? फक्त एक करमणूक नुसती ? हाच विचार पुढे नेला तर असे दिसते की शिवाजी, बाजीराव, आंबेडकर, गांधी, सावरकर अशा अनेक विभूतींच्या गौरवाची गरज सततच निरनिराळ्या समूहांना वाटत असते. काहींना वाटते की बाबा हिंदू धर्मात जेवढा तत्त्वज्ञानाचा विचार झालेला आहे तेवढा जगात कुठेच नाही झालेला, त्यामुळे, आम्हीच होणार जगद्गुरू ! काहींना वाटते की आम्हीच होणार जगातली महासत्ता ! पण काय गरज काय हे असे होण्याची ? सारखेच इतरांनी तुम्हाला शूर, पराक्रमी, शहाणे म्हणत तुम्हाला आरत्या ओवाळत राहावे, अशी ही परावलंबी अपेक्षा असायचेच काय कारण सतत मनात ? यावर काही संशोधन झालेले आहे. कारण याचे बरेवाईट परिणामही घडत असतात.

त्यात एक मुद्दा असा आहे की व्यक्तिगत स्तरावर या लोकांना एक न्यूनगंड असतो. एक तर आपण कमी पडतोय किंवा इतर लोक आपल्याला आपल्या योग्यतेप्रमाणे मोजत नाही आहेत, आपल्याला योग्य ते स्थान वा मान दिला जात नाही आहे, अशी यामागे भावना असते. तज्ञ म्हणतात की काही प्रमाणात हा आत्मगौरव जरूर असावा, तो उपयोगी असतो – आत्मविश्वास देतो, कार्यशक्ती देतो. होय, पण काही म्हणजे किती प्रमाणात ? काही लोक म्हणतातच ना की बाबा महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, द्वेष, सूडभावना, हिंसा हेही सगळे लागणारच जगण्यात जसे प्रेम, मार्दव, संवेदनशीलता, वगैरे. होय, पण म्हणजे किती ? दिसते असे की माणसाला असे सर्व गोष्टींचे प्रमाण ठरवून काही जगता येत नाही. एकूणात जगण्याची बोंबच होत राहते. व्यक्तिगत वा सामूहिक आत्मगौरवाचे रूपांतर शेवटी पूर्वग्रह, द्वेष, हिंसा या दिशेनेच जात राहते. अतिरेकीपणा, नक्षलवाद हे आपण वाईटच म्हणतो पण याच्याही मागे अशी काही न्यूनगंडाची, योग्य सन्मान मिळत नसल्याची – तशा भावनांची कारणे असू शकतील. राजकारणी, लेखक, कवी, कलावंत यांनाही वाटत असते की माझ्या कामाला योग्य स्थान दिले जात नाही आहे. मग तेही टोळ्या करायचे मार्ग अवलंबतात. म्हणजे ज्यांनी समंजसपणा, परिपक्वता यांच्या दिशेने जावे तेच हिंसकपणाच्या दिशेने जातात !

यावर सामूहिक प्रबोधनाने काही मार्ग सापडेल ? आणि करणार कोण हे प्रबोधन ? की प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे मन समजून घ्यावे लागेल ? या एकूण प्रकाराच्या दोन लिंक्स खाली देत आहे –

https://www.theatlantic.com/.../group-narcissism/620632/...

आणि –

https://getpocket.com/.../11-mental-tricks-to-stop...

हे माणसाच्या जगण्यातले महत्त्वाचे प्रश्न आहेत. की अमुक एका विचारसरणीची सत्ता आली की सगळे आलबेल होणार आहे ?

--- ००० ---

अंतिमला गेलेल्या सर्वांचे अभिनंदन

!

Rajesh Deshpande is feeling happy with Suruchi Virkar and 50 others

·

Y18esterdayt Spa6it8 s9:45f Ar7Me006 ·

सृजन द क्रिएशन च्या कलाकारांनी केलेला चं. प्र.देशपांडे लिखित बुद्धिबळ आणि झब्बू हा दीर्घ अंक महाराष्ट्र कल्चरल सेन्टरच्या स्पर्धेत अंतिम फेरीत दाखल। अभिनंदन

! #srujanthecreation

१६-११-२१.

एसी चे मोल

माझा एक मित्र कार्यालय ठरवायला गेला होता. लग्न, जेवण, वगैरे. कार्यालयाचे समजा अमुक एक भाडे होते. ते सांगून कार्यालयाचे मालक म्हणाले, एसी हवा असेल तर पंधरा हजार जास्तीचे पडतील. मित्र म्हणाला, इतके कसे एसीचे ? फार तर दोनतीन हजार ठीक आहेत. यावर मालक म्हणाले, एसी ही एक चैनीची बाब असते, तिला मोल नसते. आणि खरे कारण वेगळेच आहे. मित्राने, काय, म्हणून विचारले. ते म्हणाले की एसी असल्यावर माणसे आरामात बसून खातात जास्त ! तेही विचारात घ्यावे लागते !

--- ००० ---

‘ सजग ‘ आणि देशीवाद .

मित्रवर्य सतीश तांबे यांच्या नेतृत्वाखाली ‘ सजग ‘ ची वजनदार वाटचाल चालू आहे, हे खूपच आनंदाचे आहे. या अंकाच्या प्रवासात जुलै-सप्टेंबर २०२१ च्या अंकाची दुसरी आवृत्ती काढावी लागत आहे, हे आजच कळले. ही अर्थातच मराठी साहित्याची शेवटची धुगधुगी ठरणार नाही याची खात्री वाटते. नुसताच क्रिया-प्रतिक्रियांच्या जंजाळात सापडलेला आपला साहित्यविचार अधिक मोकळा होत जाईल अशी आशा बाळगायला बळ देणारी ही घटना आहे.

या अंकात आपले मित्र गणेश कनाटे यांचा ‘ नेमाडेप्रणीत देशीवादाची कालबाह्यता ‘ हा एक अत्यंत अभ्यासपूर्ण असा सविस्तर लेख असून हा लेख साहित्यविचारात नेहमीच मौलिक मानला जाईल यात शंका नाही. नेमाड्यांच्या देशीवादाचा इत्थंभूत धांडोळा आणि झाडाझडती घेणारा असा हा लेख आहे. या लेखामुळे नेमाडपंथीयांच्या डोळ्यांत अंजन पडेल आणि जग त्यांना नव्याने दिसू लागेल, असे वाटते.

या लेखात अंतर्भूत असलेला अभ्यास आणि अनेक संदर्भ आणि त्यांवरच्या चर्चा या अंगाने फार सविस्तर काही मी लिहू शकणार नाही. पण या एकूण प्रकारात गोची कशामुळे होते एवढ्याच विषयावर बोलणार आहे. नेमाडे असोत की देशीवादाची भलावण करणारे रसाळ सर असोत, यांची सगळी भिस्त माणसाच्या प्रभावयुक्ततेवर आणि प्रभावग्रस्ततेवरही ( conditioning ) असल्याचे दिसते. साहित्य वा कलानिर्मिती म्हणजे कलावंताने आपापल्या प्रभावयुक्ततेतून आपापले जगण्याचे अनुभव मांडत जाणे, असे हे दोघेही गृहीत धरतात. एकूणात बुद्धिप्रामाण्यवादी आणि सध्याचे द ग्रेट पुरोगामी यांचाही हाच घोळ होत असतो. लेखक आणि वाचक दोघेही प्रभावबद्धच फक्त जगू शकत असतील तर कलेतली सर्जकता म्हणजे काय, या प्रश्नाची कुणीच चर्चा करत नाही. नुसतीच प्रभावयुक्तता म्हणजे, मराठी नाटकाप्रमाणे कधी विनोद, कधी सुखदु:खे एवढेच चालू राहते, याकडे कुणी पाहात नाही. आणि अशा मर्यादेतच जर सर्व कलाव्यवहार घडत असेल तर त्याला सांस्कृतिक मूल्यात्मकतेचे अंगडेटोपडे तरी कशाला, हे विचारात घेणे सुचत नाही. शेक्सपियर, बेकेट, पिरांदेल्लो, आयनेस्को वा पेसोआ विचारात घेतले तर त्यांच्या कलेत कोणतेच प्रभावद्रव्य  ‘ आपले ‘ नसते आणि तरी ते एकूणच मानवजातीला महत्त्वाचे कशामुळे ठरतात, हे विचारात घ्यावेच लागेल. आणि नुसते परदेशी वा परभाषिकच कशाला, इथलेच कलावंत घेतले तरीही सर्वांची प्रभावयुक्तता खूपच भिन्न भिन्न असते – तीही सर्वांची ‘ आपली ‘ नसते. त्याचे काय ? प्रभावयुक्तता ही निव्वळ मतमतांतरांच्या मर्यादेत फिरते. तिला मूल्यात्मकता असू शकत नाही. त्यामुळेच मग, जातिव्यवस्था की जातीयता, असली फालतू, निरर्थक मखलाशी करत बसावे लागते. स्त्री-पुरुष समानतेचा विचार करताना स्त्रीला गर्भाशय असते, अशा बालिश मुद्द्यावर हुशारी करत बसावे लागते. हे असले लोक टीकाकार, समीक्षक म्हणून गाजतात पण आशयाच्या पाण्यात उतरण्याची हिंमत फारशी करत नाहीत, त्याचे कारण म्हणजे हीच मूठ झाकली ठेवण्याची चलाखी, हेच असते. EXISTENCE precedes essense या प्रकाराला हे स्पर्शही करू शकत नाहीत. कारण इसेन्स म्हणजे नंतर जमवलेले अनुभवाचे साठे हेच फक्त त्यांना ‘ शक्य ‘ वाटते. कनाट्यांच्या या लेखात वैश्विकतेचा मुद्दा येतो. ती कधी अवतरते कलेत ? यावर जाणिवेच्या भाषेतच फक्त आणि दाखवता येणाऱ्या तार्किक पुराव्याशिवायच बोलावे लागणार. वैश्विकतेची प्रक्रिया असलेल्या मान्यताप्राप्त कलाकृती पाहिल्या तर त्यांचे निर्माते या ना त्या पद्धतीने,

प्रभावयुक्ततेतून बाहेर पडण्याचे बोलतात असे दिसून येते. ‘ परि त्या विश्वंभरे बोलविले’, ‘ परतत्त्वाचा स्पर्श ‘, गाओ सांगतो तो distanced gaze, वर्डस्वर्थ सांगतो ती tranquility, एलियट सांगतो तो escape from personality या गोष्टींचा विचार न करता गेली ४० वर्षे हे देशीवादाचे दळण दळले जात आहे. त्यातून फक्त काही किरकोळ मखलाशी आणि बहुतांश कचरा निर्मितीच होत आलेली आहे, याचे कारण हेच आहे. कृष्णाने अर्जुनाला कर्तृत्व स्वत:कडे न घेण्याबद्दल सांगणे, जगत असतानाही दु:खातून मुक्त असणे शक्य असते, हे बुद्धाचे सांगणे यांसारखेच सार्त्रच्या ‘ फ्लाईज ‘ या नाटकाचे उदाहरणही पाहता येते. भाऊ आणि बहीण दोघे मिळून त्यांच्या आईच्या खुनाची योजना ठरवतात, प्रत्यक्षात भाऊ तलवार खुपसतो पण तो त्या कृत्याच्या प्रभावाच्या बाहेर राहतो आणि बहीण मात्र पश्चात्तापाच्या घोंघावत्या माशांना बळी पडते ! कला वैश्विक होण्याची कारणे अनेक कलाकृतींच्या प्रक्रियांमध्येच दिसू शकतात पण प्रभावयुक्ततेशिवाय काही असूच नाही शकत, हे या संकुचित, मूल्यहीन, आपमतलबी लोकांना गृहीत धरायचे असते.
कनाटे यांचा हा लेख अत्यंत उद्बोधक आणि देशीवादातली हवा घालवणारा आणि या अर्थाने मौल्यवान झालेला आहे. आपले अनेक देशीवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि पुरोगामी यांचा कलानिर्मिती क्षेत्रातला वावर पाहता अनेकदा जाणवणारा हा प्रश्न आहे. जे असेल ते सगळे विचारपद्धतीत, विचाररचनेत आणि अनुभवसाठ्यातच असते, हा भ्रम त्यांना टिकवायचा असतो ! सर्जकताहीन क्षुद्रपणा चालू ठेवायचा असेल तर तत्त्वज्ञानाचे म्हणावेत असे प्रश्न टाळावेच लागतात !

--- ००० ---

निसर्गविभ्रम –

अपघाती चित्र –

“Convictions are more dangerous foes of truth than lies.”
सत्याचे असत्यांपेक्षा धोक्याचे शत्रू म्हणजे ठाम मते.
— Friedrich Nietzsche

कलाजाणीव

आशय आणि तंत्र एकत्रच असते वगैरे ठीकच आहे, पण, कलाजाणीव हा एक सोयीसाठी स्वतंत्र प्रकार मानायला हरकत नाही. माझी कलाजाणीव समजा वाचन-लेखनातून विकसित होत आलेली आहे. ती जी काय असेल ती विकसित होण्यात वेगवेगळ्या माध्यमांतल्या अनेक कलावंतांची मला मदत झालेली असते -- त्यांचे संस्कारही मी स्वीकारलेले असतात. गेली काही वर्षे, माझ्या कलाजाणीवेला सचेत ठेवण्यासाठी मी आणखी एक विशेष प्रकार करत असतो. नेटवर उत्तमोत्तम चित्रकारांची खास म्हणावीत अशी खूप अमूर्त चित्रे उपलब्ध आहेत. त्यांतले त्या त्या वेळी आवडेल ते एक चित्र निवडून मी ते माझ्या डेस्कटॉप पार्श्वभूमीवर घेत असतो. दर ८-१५ दिवसांनी हे चित्र मी बदलतो. यामुळे, प्रत्येक वेळी संगणकावर काम सुरू करण्यापूर्वी मला या चित्राचे दर्शन होते ! या उपक्रमाचा आपली कलाजाणीव विकसित व्हायला खूप उपयोग होतो ! करून बघा ! प्रत्येक वेळी त्या त्या चित्रातले नवे काही कळते -- खूप रिच वाटते ! बघा तर करून !

--- ००० ---

साहित्य म्हणजे जर फक्त राजकारण असेल तर ' संपादन म्हणजेच साहित्यिक भान ' याचा अर्थ भूखंड संपादन असा घ्यावा लागेल !
( आजचा मटा ) ( २५-११-२१. )

साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

डॉ. जयंत नारळीकर हे येत्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या विज्ञान कथा आणि कादंबऱ्या ही त्यांची मराठी साहित्याला विशेष देन आहे. मराठीलाच काय, जगालाही आदर वाटावा अशी काही कामे त्यांनी विज्ञान क्षेत्रात केलेली आहेत. त्यांचे गुरु हॉईल यांच्या समवेत त्यांनी केलेले काम जगन्मान्य झालेले आहे. मोठा दणका ( Big bang ) उपपत्ती रद्द ठरवणे आणि वैश्विक गुरुत्वाकर्षणाच्या क्षेत्रात न्यूटन व आईन्स्टीन यांच्याही पुढची सत्ये उलगडणे, अशी त्यांची अद्वितीय कामगिरी आहे. त्यामुळे, एकूणात, मराठी सारस्वताने ( हा शब्द वापरला म्हणून कृपया रागावू नये, त्यात थोडा उपरोधाचा अंशही आहे ) त्यांना अध्यक्ष म्हणून स्वीकारलेले आहे.
या निमित्ताने काही प्रश्न समोर येतात, त्यांबाबतच्या विचारांसाठी ही पोस्ट आहे. मला स्वत:ला म्हणाल तर या सोहळ्याचे कधीही सोयरसुतक नव्हते आणि अजूनही नाही. त्यामुळे, ना देणे ना घेणे, अशा दृष्टीने मी यावर लिहू शकतो. मीही एक काहीसा लेखक असल्याने मराठीतल्या अशा ' सांस्कृतिक ' घटना मला दिसणे आणि त्यांबद्दल काही विचार माझ्या मनात येणे, हे क्षम्य समजता येऊ शकेल. या वेळी, अध्यक्ष म्हणजे नारळीकर, पूर्ण तीन दिवस हजेरी लावणार की मधून मधून ऑन लाइन डोकावणार, असाही विषय चर्चिला गेल्याचे कळते. पण ते पूर्ण तीन दिवस तिथे असणार, हे आता ठरलेले आहे. पण हा प्रश्न निघणे साहजिक होते. ते जरी ८२ वर्षांचे असले तरी त्यांचे अध्यापनाचे आणि संशोधनाचे काम चालू आहे. तीन दिवस, या साहित्य सोहळ्यासाठी ते थांबवावे का, हा प्रश्न महत्त्वाचा आहेच. एरवीही त्यांना असे प्रश्न पडत असणारच. वैज्ञानिक व्यतिरिक्त इतर मराठी वाचनाला कितपत वेळ द्यावा ? आणि थोडक्या वेळात नेमके वाचावे तरी काय ? ही शक्यता लक्षात घेतली तर मराठी साहित्याची सद्यस्थिती आणि एकूणातच इथे महत्त्वाचे काम करून गेलेले लेखक, कवी यांचे वाचन जाऊ द्या, माहिती तरी त्यांना असेल का याची शंका वाटते. या पार्श्वभूमीवर, त्यांच्या अध्यक्षीय भाषणात जर राजन खान, सतीश तांबे, रवी लाखे, प्रेमानंद गज्वी असे उल्लेख आले तर तो एक सुखदाश्चर्याचा मोठा दणका ठरेल, हे नक्की ! ( Big bang ).
हे पाहता, आपापल्या क्षेत्रात अद्वितीय काम केलेल्या आणि मराठीत थोडेफार लेखन केलेल्या कुणाचाही, खरे तर या पदासाठी विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ, अभिनय क्षेत्र घेतले तर, हंसा वाडकर, दादा कोंडके, प्रभाकर पणशीकर, डॉ. श्रीराम लागू, विजया मेहता यांची आत्मचरित्रे आहेत. ती महत्त्वाचीच आहेत ना ? लेखन किती पानांचे आहे, असा निर्बुद्ध निकष तर आपण स्वीकारणार नाही. याचप्रमाणे, खेळाडू, उद्योगपती, राजकारणी यांचीही आत्मचरित्रे आहेत. त्यांनाही या पदासाठी योग्य समजायला हवे.
साहित्य म्हणजे प्रामुख्याने कथा, कादंबरी, कविता, नाटक वा समीक्षा ही कल्पना सोडून दिली तरी चालू शकते. कळत-नकळत आपला प्रयत्न काय चालू आहे तर साहित्यातल्या एकूण प्रवाहांची, आज साहित्यात काय घडते आहे याची दखल घेणे आणि त्यावर सभान चर्चा, चिंतन होणे, हे बंदच व्हावे. राजकारणाशिवाय साहित्य असू शकत नाही तर राजकारण म्हणजे साहित्यच ठरते. त्यामुळे, ही एक यशस्वी होणारी युक्ती ठरू शकते की थोडेफार काही लिहिलेले इतर क्षेत्रांतले मान्यवरच अध्यक्ष म्हणून निवडत जायचे. याचे फायदे दोन होतील. एक तर त्यांच्या साहित्यबाह्य कामाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि फुकटच्या, निरुपयोगी साहित्यचर्चा टाळणे वा त्यांना विरामच देणे. मध्येच एखादा बळीचा बकरा म्हणून साहित्याबाबत बोलणारा घ्यावा आणि त्याच्यावर हल्ले करून त्याला नामोहरम करावे. याचाही साहित्यचर्चा संपवायला उपयोग होईल.
आता हे तरी करायची गरज का आहे ? तर एक परिस्थिती समजून घ्यायला हवी. एकूणच मराठीत, सध्या, देशीवाद, बुद्धिप्रामाण्यवाद आणि पुरोगामीपणा यांची चलती आणि प्रभाव आहे. या प्रकारचे लोक सामान्यत: साहित्यातल्या विविध प्रवाहांबद्दल स्वागतशील नसतात. ते आपल्या भूमिका आणि मते यांनी बद्ध असतात. त्यामुळे, जगातले तर जाऊच द्या, इथलेही अनेक प्रकारचे लेखक, कवी ते आत्मीयतेने आणि चिकित्सेने वाचू शकत नाहीत. त्यामुळे, साहित्याचा बराच भाग त्यांच्या आवाक्याबाहेरच राहतो. ते समजून घेण्याचा प्रयत्नही न केल्याने ते काही समजतच नाही. मग, ते तसले सगळे बिनमहत्त्वाचे आणि असंवेदनशील लेखन असते असा कांगावा करत राहावे लागते.

त्यांनी कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा थांबत नाही. त्यातून मग त्यांना न्यूनगंड येतो आणि ते आक्रमक होतात. त्यांना नको असलेले साहित्य नष्टच व्हावे, असे त्यांना वाटू लागते. आणि तसे प्रयत्न घडत राहतात. लोकशाहीत, अर्थातच, हे स्वीकारावेच लागेल. ज्याने त्याने आपापल्या समजुतीने, आकलनाने काम करत राहणे, हाच एकमेव मार्ग आहे. तरीही, या अशा पोस्टसारख्या अर्धवट, चुकीच्या पद्धतीने का असे ना, हा सगळा प्रकार आपल्या समोर असणे, विचारात असणे, वाया जाणार नाही, असे वाटते.
--- ००० ---

महाराष्ट्र कला मंच दीर्घ अंक स्पर्धेच्या अंतिम फेरीत सृजन द क्रिएशनच्या कलाकारांचा प्रयोग, उद्या 28 नोव्हेंबर रोजी.सकाळी 10 वाजता ..ज्योत्स्ना भोळे सभागृह पुणे येथे।

मित्रवर्य तिळवे यांच्या एका पोस्टवर, मी २३ घरे बदलल्याचे लिहिले होते -- त्या बाबतीत १० नोव्हे ' १८ च्या ' सामना ' मध्ये आलेली, अनुराधा राजाधयक्ष यांनी घेतलेली माझी मुलाखत -- ( हा फोटो तिथे देता न आल्याने इथे दिला आहे -- )

समृद्ध करणारा २३ घरांचा प्रवास ( अनुराधा राजाध्यक्ष यांनी घेतलेली मुलाखत – ‘ लेखकाचे घर ‘ फुलोरा पुरवणी ‘ सामना ‘ दिनांक १०-११-१८. )

Champra Deshpande
घरांची यादी अशी आहे --
विजापूर -----१
मालाड ----- २
पुणे -------- ८
कोल्हापूर -- २
राहुरी --- १
राहुरी फॅक्टरी १
वाळकी ----- १
संगमनेर --- १
अकोले --- १
लोहारा ---- ३
अ' नगर --- २
-----------------
एकूण ----- २३.
-----------------

‘ धडपड ‘ निर्मित
#मी_तू ( दोन अंकी नाटक )
लेखन-दिग्दर्शन – अश्विनी शिंगरे देशपांडे.

मराठीत आलेले हे नवे अत्युत्तम नाटक संगणकावर पाहिले. आजचे जगणे शारीरिक व मानसिक सर्वच दृष्टींनी रोगट झालेले आहे, असे आपण म्हणत असतो. आपण हे जे म्हणतो ते प्रामुख्याने या जगण्याचा आपल्याला जो त्रास होतो, सतत जे संघर्षात राहावे लागते, त्यामुळे असते. पण, या रोगाची प्रक्रिया, त्याचे पूर्ण दर्शन वा समज आपल्यासमोर नसते. ती समज हे नाटक समग्रतेने उभी करते. यापूर्वी मराठीत या रोगाचे असेच दर्शन राजीव नाईक यांच्या, ' साठेचं काय करायचं ' या नाटकाने घडवले होते. मानसिक समस्येचे साकल्याने दर्शन घडणे हे त्या क्षणी तिच्यातून बाहेर पडणेच असते. कारण ती समस्या अशी पूर्णतेने पाहताना तुम्ही तिचा भाग नाही राहू शकत. स्त्री-पुरुष भेदाचा जरी काही प्रश्न नसला तरी, आपल्याकडे उत्तम स्त्री-नाटककार खूपच कमी आहेत, या पार्श्वभूमीवर या नाटकाची लेखिका म्हणजे मराठीतला एक विशेष टप्पा आहे, असेच म्हणावे लागेल. त्यातही आणखी विशेष म्हणजे ती एक अत्युत्तम दिग्दर्शिकाही आहे हे स्पष्टच दिसते आहे. या नाटकातले संवाद, त्यांचे उच्चारण आणि फेक आणि मुख्य म्हणजे प्रत्येक संवादासोबत घडत जाणाऱ्या, बोलणाऱ्या व उपस्थित असलेल्या पात्रांच्या सर्व मानसिक प्रक्रियांचा वेधही इथे दृश्य रूपात व्यक्त होत राहतो. अर्थातच सर्वच कलाकार आणि तंत्रज्ञ यांची सर्जक साथ असल्याशिवाय ते घडू शकले नसते, हे खरेच आहे.

पैसे खूप मिळवणे आणि उच्च दर्जाचे राहणीमान ठेवणे, हे तर आहेच, पण, मला प्रचंड यशस्वी व्हायचे आहे, टॉपची व्यक्ती व्हायचे आहे – ही मानसिक हाव हा आजच्या जगाचा एक असाध्य रोग आहे. आणि तसे यश साध्य करण्याची बौद्धिक कुवत असलेल्या व्यक्ती एकाच कुटुंबात असतील तर ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे हे नाटक आहे. उत्तर म्हणजे निराकरण या अर्थी नव्हे तर दर्शन या अर्थी. असे उच्च दर्जाचे बौद्धिक जगणे आणि वातावरण यांच्याशी परिचित असलेले, ते माहीत असलेले लोक मुळात कमीच असतात. त्यांतली एखादी व्यक्ती असे नाटक उभे करू शकावी ही एक फारच वेगळी आणि अपवादात्मक घटना आहे. या कुटुंबातला पुरुष एका आंतरराष्ट्रीय कंपनीत मोठ्या पदावर आहे, त्याची पत्नी एका बँकेत जनरल मॅनेजर आहे आणि मुलगी, तिच्या एका मित्राच्या साहाय्याने एक यशाच्या इमल्यांची स्वप्ने असलेला उद्योग उभा करत आहे. घरातले तिघेही असे पराकोटीचे महत्त्वाकांक्षी असल्यावर त्यांच्यांतल्या संबंधांचे आणि एकूणच जगण्याचे काय होईल ते म्हणजे हे नाटक ! या नाटकात, वर उल्लेख केलेल्या रोगाची एक तीव्र अवस्था आपल्याला दिसते. यातच लिंगभेदामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे, हे पाहून जखमी झालेली या नाटकातल्या पुरुषाची एक प्रिय सहकारी स्त्री त्याच्यावर लैंगिक दुर्वर्तनाचा आरोप करते. अशा, म्हटले तर घातक अशा कौटुंबिक संकटाच्या वेळीही प्रत्येक व्यक्ती स्वविचारात राहणे हे एक अजब क्रौर्य आपल्याला इथे दिसते. गंमत म्हणजे, हे सगळे या जगण्याचा एक ' नॉर्मल ' भाग म्हणून यांनी स्वीकारलेले आहे ! फारसा ऊरबडवेपणा नाही ! एखाद्या वर्तमानपत्री रुक्षपणाने हे सगळे आपल्याला दिसत जाते !

ही अशी कलाकृती लिहून सादर होणे ही मराठीतली एक महत्त्वाची घटना ठरावी. असे नाटक जमून येऊन प्रेक्षकांसमोर यायला असंख्य बाबी जमून याव्या लागतात. ते इथे घडलेले आहे. त्यामुळे, या एकूणच टीमचे मन:पूर्वक स्वागत आणि धन्यवाद ! ही मराठीत एका ' खास ' नाटकाची भर आहे !

--- ००० ---

आकर्षकपणा

सामान्य माणसाचे डोके निकामी करणाऱ्या हजारो घटना रोज घडत असताना त्यात आता ही आणखी एक अजब नवी भर ! आजच्या पुणे मटातल्या दोन एकाच विषयावरच्या बातम्या ! एका बातमीत खासदार शशी थरूर यांचा सहा महिला खासदारांबरोबरचा सेल्फी आहे. त्यावर ट्वीट करताना थरूर त्यांना ' आकर्षक ' म्हणालेत ! याचा अर्थ त्यांनी स्त्रियांचे वस्तूकरण केले असा त्यावर आक्षेप आहे. आता त्याच मटाच्या पुरवणीत दुसरी एक बातमी आहे ती यामी गौतम या अभिनेत्रीबद्दलची आहे. आता लौकरच येणाऱ्या तिच्या ' दसवी ' या चित्रपटात ती जेलरच्या भूमिकेत असणार आहे. तर इथे एक वेगळाच प्रश्न आहे. या पोलिसी भूमिकेतून ती कशी काय लोकांना नेहमीप्रमाणे

आकर्षित करणार -- हा तो प्रश्न ! गौतमी म्हणते पहा तर माझे काम ! आधीच कशाला चिंता ? म्हणजे दिसेलच ती आकर्षक, असा तिचा दावा दिसतोय !
या दोन बातम्यांमुळे काही प्रश्न निर्माण होतात, ते असे --
१. स्त्रिया आकर्षक असतात की नसतात ?
२. स्त्रियांचा आकर्षकपणा वगळून फक्त त्यांच्या कामाबद्दलच बोलावे, हे अनेकांना का जमत नसावे ?
३. एखाद्या अभिनेत्रीची ' आकर्षक ' हीच प्रसिद्धी असेल तर तेच तिचे कामही असल्याने तिचे वस्तूकरण व्हायचे राहते का ?
४. स्त्रियांना स्वत:ला त्या आकर्षक वाटणे हा अपमान वाटतो का ?
५. आकर्षकपणाचा मुद्दा कधी येऊच नये यासाठी स्त्रियांना काय करता येईल ?
६. त्यांचा आकर्षकपणा जाणवूच नये यासाठी पुरुषांनी काय करायला हवे ?
७. आणखीही काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे काय असतील ?
-- नसता डोक्याला खुराक !
--- ००० ---

'अस्तित्व ' आयोजित
कल्पना एक, आविष्कार अनेक – या स्पर्धेसाठी सुचवलेली कल्पना --
' हे किरकोळ, ते महत्त्वाचे ' ----- २०१३.

प्रमुख पाहुणे वापरतील
निर्भय अभिव्यक्तिस्वातंत्र्य !
वही तो होगी शुरुआत !

साहित्य संमेलनाची सुरुवात -- ही बातमी देताना टीव्ही ९ ने
तिथले मल्लखांबाच्या खेळाचे मनोहारी दृश्य दाखवले !

याची सत्यासत्यता ज्याची त्याने पाहावी -- चर्चा करून हे वा ते एकमेकांना पटवून देण्याचा हा विषय नाही --
1. All political action is divisive.
2. A man who is passionate about the world and the necessity for change, must be free from political activity, religious conformity and tradition - which means, free from the weight of time, free from the burden of the past, free from all the action of will: this is the new human being. This only is the social, psychological, and even the political revolution.
-- JK.

बाकी इतर सर्व बदल म्हणजे, गटाराच्या पाण्याने सतत भरली जात असलेली टाकी साफ करत बसणे आहे, असे जेके म्हणतात.

०४ डिसेंबर २०२१.

मालमसाला

एकूणच साहित्याचा मालमसाला कोणता ? तर मानवी जगण्यातल्या समस्या, हाच ! एक राजकारणी म्हणाले, खरे तर आम्हीच तुम्हाला भरपूर मालमसाला मिळेल याची तरतूद करत असतो -- तरीही, साहित्यिकांच्या व्यासपीठावर आम्हाला नको म्हणणे हा कृतघ्नपणा आहे ! ( त्यांचे शब्द हेच, असेच नव्हते -- ते सोडा. )
त्यांनी इतके प्रयत्न करूनही जर साहित्याची भरभराट होत नसेल तर तो साहित्यिकांचा करंटेपणा म्हणावा लागेल.
--- ००० ---

रॅगिंग न करण्याचे हमीपत्र ऑनलाइन भरा -- विद्यापीठाच्या प्राचार्यांना सूचना -- ( आजचा पुणे मटा पान ३. )

अध्यक्ष
नुकत्याच झालेल्या साहित्य संमेलनाचे सूप वाजले असले तरी येत्या चारच महिन्यांत होणाऱ्या पुढील साहित्य संमेलनाची दवंडीही पिटली गेलेली आहे. आता, कधी कधी, वृद्धत्वापर्यंत केलेल्या साहित्य सेवेचा मान म्हणून एखाद्याला या संमेलनाचा अध्यक्ष करायची इच्छा होत असे. पण आता, अध्यक्ष हा हिंडताफिरताच असायला हवा, असे एक ठरल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर, अलीकडेच पडलेल्या पायंड्याप्रमाणे, तो ' योग्य ' राजकीय भूमिकाही मांडणारा असायला हवा, हेही ठरलेले आहे, असे मानायला हरकत नाही. ( तशा भूमिकेच्या अभावी नारळीकरांचे भाषण तसे वायाचे गेले, असे काहींना वाटू शकते. ) ज्या साहित्यात राजकीय भूमिकाच नाही, ते कसले साहित्य आणि त्या तसल्या साहित्याचे संमेलन तरी कशाला -- हाही विचार मान्य झालेला आहे, असे मानायला हरकत नाही. त्यामुळे, अध्यक्ष ' योग्य ' राजकीय भूमिका मांडणारा असावा, ही झाली दुसरी अट. आता काही लोक पारंपरिक वेडे म्हणावेत असे असतात. त्यांना वाटते की अध्यक्षाने साहित्यावर वा साहित्याच्या एका भागावर तरी थोडे बोलावे. साहित्य म्हणजे राजकारणच असले तरी साहित्य हे साहित्यही असते, यालाही, थोडी तरी मान्यता असावी. ही अट जर मान्य झाली तर तशा अध्यक्षाला तयारीसाठी किमान तीन महिने तरी देणे हे उचित होईल. तर, सारांशरूपाने, हिंडताफिरता असणे, भूमिकावाला असणे आणि साहित्याबाबतही, जाता जाता का असे ना, बोलणारा असला पाहिजे -- या तीनही अटी पाळू शकणारे कोण कोण सुचताहेत ? की, हिंडताफिरता असणे आणि साहित्याबाबत बोलणारा असणे, या दोनच अटी बास होतील ? आपापली मते आणि अपेक्षित अटी पाळून अध्यक्षपद कोण भूषवू शकेल त्यांची नावे सुचवावीत. रागलोभ, चिडचिड न करता, शांतपणे हे काम होऊ शकले तर संभाव्य अध्यक्ष समोर दिसू लागल्याने, लगेचच येणाऱ्या या उत्सवाच्या आनंदाला सुरुवात करता येईल. खुलेपणाने नावे सुचवावीत.
आता, माझा आणि संमेलनाचा काय संबंध -- मी का ही उठाठेव करावी, हा प्रश्न योग्यच आहे, पण, आपलाच एक मराठी बांधव म्हणून एवढे चालवून घ्यावे, ही विनंती.
--- ००० ---

उदास गाणी

जे का रंजले गांजले – हे लिहिणारा तुकाराम काही एखादा पंडित वा प्रयोगशाळेत प्रयोग करून सिद्धांत सांगणारा माणूस नव्हता. माणसाच्या मनाचे सखोल उत्खनन करणे आणि उलट प्रक्रियेने बाहेरून पूर्ण मन पाहणे हे त्याला

त्याच्या चिंतानातून साध्य झालेले होते. Empathy या शब्दाला नेमका मराठी शब्द वापरात नाही. मला सापडलेला ‘ समानुभूती ‘ हा शब्द मला योग्य वाटतो. किंवा मग ‘ संवेदनशीलता ‘ आहेच. दु:ख वा औदासीन्य यांच्या कल्पनेने घेतलेल्या अनुभवानेही मेंदूत आरोग्यकारक आणि सर्जक क्रिया घडतात, असे संशोधन आहे. शोकांतिका पाहून जगण्यात विरेचन ( catharsis ) ही क्रिया घडते असे अरिस्टॉटल म्हणून गेला. त्यातून एक प्रकारची प्रगल्भता येते, अशी ती मांडणी होती. अलीकडच्या काळात झालेले संगीतविषयक संशोधन हेच सांगते आहे. आपण उदास गाणी का ऐकतो, विशेषत: आपल्या तरुणपणातली आपली आवडती उदास गाणी आपल्या मेंदूत काय घडवतात यावर संशोधन झालेले आहे. अशी गाणी मेंदूची कल्पनाशक्ती आणि सर्जकता वाढवतात कारण अशा गाण्यांमुळे मेंदूतल्या आंतरजोडण्या अधिक सक्षम होतात आणि मेंदूत आरोग्यकारक रसायने उद्दीपित होतात, असे दिसून आलेले आहे. संगीत म्हणजे नुसते लिखित गीत नव्हे तर त्याची चाल, वाद्यमेळ, गायकाचा चिंतनशीलतायुक्त आवाज, हे सगळेच असते. त्यामुळे, इथे एक लक्षात घ्यावे लागते की मंगेश पाडगावकर, ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, सुरेश भट, जगदीश खेबुडकर, गुरू ठाकूर, वैभव जोशी, संदीप खरे – हे गीतकारही मराठी लोकांचे आरोग्य जोपासत आलेले आहेत. हिंदी चित्रपट संगीताची इथली वर्षानुवर्षांची लोकप्रियताही हेच काम करत आलेली आहे. संगीताचा हा अप्रत्यक्ष गुण आपल्या अवधानात नसतो, पण, ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. संगीत खिन्नता घालवू शकते, काळजी आणि वेदनाही कमी करू शकते, असे संशोधन आहे. ‘ साथी न कोई मंजिल ‘, ‘ कोई हमदम न रहा ‘, ‘ अकेला हूं मै ‘, ‘ सौ बार जनम लेंगे ‘ वगैरे पूर्वी आपल्याला आवडून गेलेली आणि आता ऐकताना तो काळ मनात जिवंत करणारी गाणी अशा बाबतीत विशेष कार्यक्षम असतात. ज्यांना शास्त्रीय संगीत समजते आणि आवडते ते तर या बाबतीत श्रीमंतच म्हणायला हवेत.

सगळेच संगीत असे हितकारक असते, असे नाही. कानठळ्या बसवणारे, क्रोध-संताप व्यक्त करणारे, आक्रमक वा हिंसक संगीत जगण्यात असे अर्थपूर्ण तर नाहीच ठरत, पण, अहितकारक ठरते. मानवी जगणे बिघडवणारे, सौहार्द नष्ट करणारे ठरते. इथे हेही लक्षात घ्यायला हवे की संगीत-शत्रू असणे ही काही फारशी भूषणावह बाब नाही. तसे असणे म्हणजे स्वत:च्या जगण्यातली समृद्धी कमी करून घेणे तर आहेच, पण, नीट, मानवी जगण्याच्या शक्यताही घालवून घेणे आहे. महाराष्ट्रात संतवाङमय , कीर्तने, भजने, लोकगीते ही दिलासा देण्याबरोबरच आरोग्याचेही काम करत आलेली आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

कला म्हणजे नुसतीच करमणूक वा टाईमपास नव्हे. इतरांची सुखदु:खे ही आपली सर्वांची सुखदु:खे आहेत याची जाणीव आणि समज कला देत असते. धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या माणसाचे भले करण्यात फेल गेलेल्या आहेत – अपयशी झालेल्या आहेत. आता विविध कलांचे अस्तित्व हीच फक्त आशा आहे. कला क्षेत्रातल्या सर्व शक्यता ओपन – खुल्या ठेवणे आणि कलेतल्या समावेशकतेचे महत्त्व ओळखणे – समजणे, हे फार महत्त्वाचे आहे. तीच, तेवढीच फक्त आता मानवी जगण्यात मौलिकता येण्याची आणि सतत प्रवाही राहण्याची शक्यता आहे.

--- ००० ---

गणेश ह.दिघे

Decemube08ari7 om1n10g0o,3 02021 ·

आज संध्याकाळी माझे विद्यार्थी , Champra Deshpande आणि Premanand Gajvee या दोन "महान" मराठी नाटककारांच्या नाटकांचे नाट्यवाचन " रंगशाळे"त करणार आहोत. व्हिडीओ फक्त मागेल त्यालाच पाठवील. बाकी नाटककारांना "मानधन" हवे असेल तर मी काय देतो हे तुम्ही जाणताच. 😊

गरीब झालोय. गुलाबाचे एक फुल एवढेच मानधन आगामी सहा महिन्यात देऊ शकतो.

गणेश ह.दिघे

Deucethmbe0cptr o10hfrt, 200215 ·

Champra Deshpande गेले तीन दिवस रंगशाळेत " ढोलताशे " वाजताहेत सर. मुलांना तुम्हाला भेटायचे आहे. तुमच्या सवडीने वेळ द्या, तुम्ही नाटक "कसे "लिहिता याची प्रचंड उत्सुकता आहे मुलांना. तुमच्या तिरकस भाषेचे आणि कठोर रंगसंवादाचे चाहती आहेत माझी मुले.

Girish Patke आणि Nisarg Deshmukh तुम्ही सरांची मुलाखत घ्यावी अशी इच्छा आहे.

सध्या रंगशाळेची आर्थिकस्थिती मानधन देण्याइतकीही नाही ☹ याल ?

प्रबुध्द विचारधारेतील महान आणि आदरणीय नाटककार Premanand Gajvee सर, तुम्हाला वेळ असेल तेव्हा याल रंगशाळेत? " आंबेडकरी नाट्यलेखन कार्यशाळा " घेतोय. या विषयावर महाराष्ट्रात तुम्हाला पर्याय नाही. सध्या माझीच आर्थिक स्थीती अत्यंत खराब आहे,मी मानधन देऊ शकणार नाही.माझ्या मुलांना तुम्हाला ऐकायचे आहे, तुमची मुलाखत मी किंवा टेक्सासदादा घेईल. याल ?

( जाहीर पोस्ट टाकायचे कारण एवढेच की "काही" नाटकं करता येत नाहीत )

टेलर्स

जळगाव जिल्ह्यातल्या लोहारा या गावी असताना माझा जो टेलर होता त्याचे नाव होते दिलखुश टेलर्स. बालपण आजारपणात करपून गेलेला मी माणूस. त्या पार्श्वभूमीवर माझ्या आयुष्यातला सगळ्यात मोठा विनोद त्याने केला होता. बरेचसे दणदणीत शेतकरी असलेल्या त्या गावात त्याच्या मते तीन उत्तम तब्येतीची माणसे होती – त्यांत मी एक होतो ! डोळ्यांत आनंदाश्रू यावेत असा विनोद ! अर्थात तोवर माझी तब्येत खरेच चांगली झालेली होती म्हणा. माझी मुले शिकायला मुंबईत असूनही त्यांचेही कपडे इथेच शिवले जात. एखाद्या वेळी उशीर झाला तर सकाळी सहाची लाल परी सुटायच्या आत तो कपडे तिथे स्टँडवर आणून देई ! आज हा खरे तर नंतर आठवला – याच्या आधी आठवला तो कोल्हापूरचा बॉम्बे टेलर्स ! तो एका पायाने अधू होता. बिंदू चौकातून खाली लक्ष्मीपुरीकडे जाताना त्याचे दुकान होते. अत्यंत प्रेमळ माणूस ! “ आपण ही अशी करू या तुमची कॉलर – “ असे तो म्हणे. माझ्या शर्टात जणू त्याला प्राणपणाने इंटरेस्ट होते ! किंवा जणू तो शर्ट आम्ही दोघे आलटून पालटून वापरणार होतो ! चांगले आत्मीयतेने वागणारी माणसे वर्षानुवर्षे असंख्य मनांतून कशी जगत असतात, याचे हे एक उदाहरण ! आज टेलर याच विषयाने माझे मन गजबजून टाकायला तसेच कारण घडले. शर्टाचा साईज मला ४२ घट्ट होतो आणि ४४ दुसऱ्या कुणाचा तरी उधार आणल्यासारखा मोठा होतो. यावर, मुलगा म्हणाला की बाबा, आज तुम्हाला एक वेगळाच टेलर दाखवतो. तुमची मापे इथे घेणार आणि मग तुम्ही निवडाल त्या कापडाचा शर्ट तुम्हाला मुंबईहून शिवून घरपोच येणार. रेडीमेडचा बाप म्हणावा असा असतो तो शर्ट ! म्हणून मग मी, मुलगा आणि माझी धाकटी नात, जिचा सल्ला आम्ही सगळेच ऐकतो, असे तिघेजण गेलो. आमच्या घरापासून बरेच लांब. कोरेगाव पार्कला. याच्याही दुकानाचे नाव ‘ बॉम्बे शर्ट कंपनी ‘. एका मोठ्या आलीशान हॉलमध्ये हे दुकान आहे. तो परिसर आणि हे दुकान एकदम शांत. पुस्तकांप्रमाणे बाईंड केलेले कापडांचे नमूने होते. त्यांतले, विशेषत: नातीच्या सल्ल्याने एक निवडले. त्या टेलरने अत्यंत सौजन्यशील बोलत आदबशीरपणे, बारकाईने मापे घेतली. “ तुम्हाला ही बटणांची नको कॉलर, ही बिनाबटणांची अशी घेऊ या – “ तो म्हणाला. “ आणि ही बटणे बघा – ही परफेक्ट होतील ! “ म्हटले होय, मान्य ! च्यायला, हा बॉम्बे म्हणजे त्या कोल्हापूरच्या बॉंबेचा भाऊच दिसतोय, माझ्या मनात आले. मग सगळे, माझे नाव, पत्ता, फोन, ईमेल, वगैरे झाले. लगेच ती सर्व नोंद मला मेसेजमध्ये आली. यापुढे, तुम्ही नुसते कापड आणि हा तुमचा नंबर कळवलेत की आठ दिवसांत शर्ट तुमच्या घरी पोचेल, तो म्हणाला. त्यानंतर असाच सगळा कार्यक्रम माझ्या मुलाच्या बाबतीतही झाला. मध्येच त्याने बिसलेरीच्या बाटल्याही दिल्या. तो एकटाच होता दुकानात.

डॉक्टर्स, इंजिनियर्स, आर्किटेक्टस किंवा मोठमोठे व्यापारी किंवा कारखानदार हे आपापल्या क्षेत्रात स्पेशलच असतात, हे आदरासह माहीत होते. पण यात टेलर या व्यक्तीचा समावेश करावा लागेल, असे कधीच वाटले नव्हते. अत्यंत शांत, सौजन्यपूर्ण आणि अत्यंत ब्रिलियंट माणूस ! कापडांचे प्रकार, शिलाईचे दोरे, ते कधी वेगळ्या रंगांचे असावेत, यापासून ते कोणत्या प्रसंगी कसे कपडे हवेत याची जणू त्याने डॉक्टरेटच घेतलेली असावी, असे वाटले ! त्याच्या दुकानात गर्दी नसते. एकेकदा मापे देऊन गेलेली अशी बांधलेली गिर्हाइके. आम्ही इथे कुठे आलोय असे वाटावे अशी सगळी थोर मंडळी. त्याने नावेही सांगितली, ती इथे नाही सांगत. लाखभर रुपयांचा शर्टही त्याच्याकडून मिळू शकतो ! आम्हालाही त्याने त्याच इज्जतीची वागणूक दिली ! माझ्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या मराठी लेखकाच्या तेजाचा तो परिणाम असावा ! नाही, नाही, तोच एक चांगला माणूस आहे, त्यामुळेच !
--- ००० ---

माझ्या कविता

माझ्या कवितांचा आशय एकच असला तरी त्या कविता मात्र असंख्य प्रकारच्या असतात. माझी अमुक एक अशी ठरलेली शैली नाही. या अर्थाने कविता हे एकच माध्यम नसून कवितेची अनेक माध्यमे माझी कविता वापरते. आशयाची स्पष्टता असल्याने कशातूनही, कुठूनही कविता सुरू होते आणि अनपेक्षित आकार घेत जाते. ही स्पष्टता वैचारिक नसते. विचाराच्या मर्यादा, अपुरेपणा, निरुपयोगीपणा आणि त्याची विध्वंसकताही दाखवणारी असते. त्यामुळे प्रत्येक कविता तशी जरा हाताबाहेरच राहते. तरीही, मी लिहीत असलेल्या कवितांचे प्रकार असे सांगता येतात -- सुबोध, दुर्बोध, काव्यमय कविता, गद्य कविता, काव्यमय गद्य, प्रतिमांची कविता, प्रतिमाहीन कविता, अब्सर्ड, अतिवास्तववादी, अस्तित्ववादी, अमूर्त, निरर्थक, भाषेचा गौरव करणारी, भाषेचा नाश करणारी, गंभीर, विनोदी, उपरोधिक, विसंगतींचे दर्शन घडवणारी, चित्रमय, चित्रहीन, वगैरे. असे असले तरी, माझी कविता कशी नसते तेही सांगायला हवे -- ती एक मूड गिरवत गुंग करणारी नसते, संगीत लयीचा वापर ती फारसा करत नाही, ती एखाद्या अनुभवाचा प्रत्यय देणारी नसते, रूटीन सुखदु:खांचे सामान वापरत हसू वा रडू निर्माण करण्यात तिला रस नसतो, ती कोणत्याही व्यावहारिक कृतीला प्रवृत्त करत नाही, वगैरे. मग असते तरी काय ती ? तर मुख्यत: ती वैचारिक अर्थ लावण्याची सवय मोडणारी असते. माहितीच्या क्षेत्रात मावणारी नसते. असे तरी का, तर, मानवी समस्यांची मुळे पाहणे हे तिचे काम असते, म्हणून. समस्या समजण्याचा क्षण ही एकमेव अशी चाकोरीतून बाहेर पडण्याची शक्यता असते, म्हणूनही. थोडक्यात, ती कोणतीही वैचारिक चाकोरी वा दिशा स्वीकारणारी नसते. इतक्या प्रकारची कविता असल्यामुळे, सगळ्याच कविता सगळ्याच वाचकांना पोचल्या नाहीत तरी अनेक कविता खूप वाचकांना पोचू शकतात. या अर्थाने, कवितेचे प्रेम टिकवणे आणि वाढवणे, ही कामेही या कविता करत असतात. अर्थात, यात माझा दावा असा कुठलाच नाही. कारण, कोणतेही श्रेय मिळवण्यासाठी नसतातच या कविता. सतत काही ना काही मिळवण्याचे जगणेच प्रश्नांकित करणाऱ्या या कविता स्वत: कशी कुठली इच्छा वा हाव बाळगू शकतील, कोणते उद्दिष्ट ठरवू शकतील ?
कविता ही शब्दांत वा ओळींत नसून समोर दिसणाऱ्या घाटाच्या बाहेर असते आणि तेच वाचकाला जाणवावे यासाठीचे, माझ्या कुवतीतले कौशल्य ही कविता वापरते.
--- ००० ---

कॉलेज प्रवेश आणि सल्लामसलतींचे महापूर

तुम्हाला पहिल्या राऊंडमध्ये मिळालेले मेकॅनिकलच ठेवा, ते कॉलेज दर्जेदार आहे -- पण मेकॅनिकल ला नोकऱ्या कमी पगाराच्या मिळतात -- अहो, सध्या सी एस च्या मागे पळताहेत सगळे पण चार वर्षांनंतर बाहेर पडणाऱ्या या

सगळयांना थोड्याच मोठ्या नोकऱ्या मिळणार आहेत -- दुसऱ्या फेरीत तुम्ही सी एस, आय टी , आणि इ एन टी सी यासाठी जरा कमी नावाजलेली कॉलेजेस दिलीत तरी योग्य होईल -- देणगी देऊन त्या कॉलेजात सी एस घेण्यात काही अर्थ नाही -- खेळ वा नाटकबिटक यांत इंटरेस्ट असेल तर उपस्थितीच्या बाबतीत खूप कडक नसलेली बघा कॉलेजेस --खाजगी कॉलेजांत फी जास्त असते पण मोकळीक जरा जास्त मिळते -- नाही तरी हे करता करता ते करावेच लागते मग हे काय वाईट आहे -- नुसते बी इ ला कुणी विचारत नाही हो -- पुण्याबाहेरचे ऑप्शन्स नाहीतच का -- आणि मुलाखतींना कुठे कुठल्या कंपन्या येतात त्याला फार नका महत्त्व देऊ -- आमच्या माहितीतली एक मुलगी साध्या या कॉलेजातून मेकॅनिकल होऊन सरळ थेट बोईंगमध्ये लागली नोकरीला -- पण या स्वायत्त कॉलेजात सी एस मिळत असेल तर सोडू नका संधी -- अहो नशीब वेगळेच चालते -- माझ्या माहितीत दोन मित्र बी इ झाले आणि धंदा पोल्ट्री फार्मचा करतात -- दूसरा राऊंड हा बेटरमेन्टचा म्हणजे अधिक चांगली शक्यता निवडण्याचा असतो, हे लक्षात ठेवा -- म्हणजेच यात असेच पर्याय मागा की ज्यातले काहीही मिळाले तरी सध्या मिळालेल्याचा त्याग करायची तयारी आहे -- पुढच्या सहा वर्षांचे प्लॅनिंग हवे -- जग इतके अस्थिर झालेय -- आणि आर्टिफिशियल इंटेलिजेन्स चे प्रस्थ वाढत जाणार आहे -- तेव्हा सगळे चित्रच पालटत जाईल --
हे फक्त इंजिनियरिंगचे -- आणखी खूप आहेत अभ्यासक्रम -- खूप, असंख्य सल्ले, हितचिंतकांचे तळमळीचे शब्द यांचे महापूर येत राहतील -- निर्णय एका मार्गानेच शक्य आहे -- आणि तोही तुम्हाला हवे तेच मिळण्यात यशस्वी होईलच असे नाही -- आणि तुम्हाला जे हवेसे वाटतेय ते बरोबर वा योग्यच ठरेल असेही नाही -- जगणे समजायला याहून आदर्श अशी कोणती असू शकेल समस्या ?
--- ००० ---

२८ नोव्हेंबरच्या माझ्या पोस्टमध्ये एका कात्रणाचा फोटो दिला होता -- तो लेख वाचता येत नव्हता -- आता तो लेख उपलब्ध झाल्याने खाली देत आहे ---

फुलोरा --- ( सामना १० नोव्हेंबर २०१८. )
लेख 30 ( लेखकाचे घर )
चं. प्र. देशपांडे
समृद्ध करणारा २३ घरांचा प्रवास

चं. प्र. देशपांडे यांची ' नातं ' ही एकांकिका मी पूर्वी केली होती. कामाचा अवर्णनीय आनंद आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार ज्यांच्या लेखनानं मिळाला होता, त्यांच्याच लिखाणामागची ऊर्मी जाणून घेता येईल असं वाटलं सुद्धा नव्हतं.. पण अतर्क्य, अनपेक्षित गोष्टींनी आयुष्य विणलं जातं, म्हणूनच जगणं सुंदर होतं, ही माझी धारणा, चंप्रं शी बोलताना अधिकच दृढ झाली... ते म्हणाले, " मानवी संबंधात ,विचार आणि बुद्धीचा उपयोग शून्य आहे.. प्रत्येकाचं मनाचं प्रोग्रामिंग वेगळं असतं ..त्यामुळे व्यक्त होण्याच्या पद्धती वेगळया असतात.. म्हणूनच रिलेशनमध्ये घर्षण असतंच.. आणि त्यावर बौद्धिक, वैचारिक सोल्युशन नसतं .. फक्त वैयक्तिक पातळीवरच नाही, तर देशा देशातल्या संबंधात सुद्धा हेच दिसतं .. एक प्रकारची absurdity आहे ही.. मी बुद्धिप्रामाण्यवादी नाही.. त्यामुळे अमुक एक प्रकारचं वागलं की माणसाचं भलं होईल, वगैरे पद्धतीचं लेखन मी कधीच केलं नाही.."
जगण्याची मूल्यं एकापेक्षा जास्त असतील, तर जगण्याचीच वाट लागते " असं त्यांचं म्हणणं.. त्यांचं ‘ सामसूम ‘ नावाचं नाटक ,नीती आणि न्याय, या दोन मूल्यांची टक्कर दाखवणारंच आहे ..त्यांचं म्हणणं असं, की समजा नीती हे एकच तत्त्व जरी पाळायचं ठरवलं, तरी आपल्या मनातच मुळात दोन प्रवाह असतात, त्यांची टक्कर होतेच.. जसं की व्यभिचार करू नये हे सांगणारं एक मन असतं, जे आपल्यावर नियंत्रण ठेवतं आणि त्याच वेळी, संधी मिळाली तर व्यभिचार करायला हरकत नाही, असं दुसरं मन सांगत असतं ..अशा वेळी कोणत्याही मनाचं ऐकायचं ठरवलं, तरी

संघर्ष सुरू होतोच मनात ... आपण तर जगताना चार-चार तत्त्वं पाळायला  जातो.. मग टक्कर अपरिहार्यच .. मला हे जे जाणवलं आहे,  ते नुसतं बोलण्यापेक्षा नाटकातून दाखवावं असं वाटतं, म्हणून लिहितो मी.. मी जगण्याच्या प्रक्रियेत मला झालेलं आकलन व्यक्त करण्यासाठी लिहितो ..घरातल्याही माणसांची जगण्याची उद्दिष्टं वेगवेगळी असतात.. त्यातून होणारं घर्षण ज्या घरात कमी होतं, ते घर समजूतदार घर असतं, असं ते म्हणाले..  चंप्रं ची बँकेची नोकरी.. निरनिराळ्या गावांत, खेड्यांत, बदली... त्यासाठी घराचा सगळा बाडबिस्तरा घेऊन वारंवार केलेली स्थलांतरं.. एकूण 23 घरांतून आजवर झालेला प्रवास... बँकेची नोकरी करून लेखनासाठी काढलेला वेळ.. त्यामुळे बऱ्याच घरांत जे साचेबद्ध सुखाचे आकृतिबंध असतात, त्याला दिला गेलेला छेद.. या सगळ्यांना समजून घेणारी पत्नी आणि मुलं, यांनी चंप्रंच्या घराला, त्यांच्या "घर" या संकल्पनेतलं घरपण दिलं.. त्यांचं नाट्यवर्तुळ, त्या निमित्तानं अनेकांची होणारी वेळी-अवेळी ऊठबस, रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या चर्चा, त्या वेळी बायकोनं समजूतदारपणे दिलेली साथ, त्यांना खूप महत्त्वाची वाटते.. मी घाईघाईनं ऑफिसला जाताना लिहून अर्धवट ठेवलेले कागद न आवरता गेलो, तर त्यातला एकही कागद इकडचा तिकडे झालेला नसायचा..हा मुलांचा समजूतदारपणा अधोरेखित करताना त्यांचा २३ घरांचा प्रवासही त्यांनी सांगितला.."माझं पहिलं घर विजापूर.. कर्नाटकातलं.. मराठी पेक्षा कानडी जास्त चांगलं यायचं मला.. मित्रमंडळी कानडी... तिथली माझ्या आयुष्यावर प्रचंड परिणाम करणारी गोष्ट म्हणजे डांग्या खोकला... जो गेलाच नाही.. त्यातून दमा सुरू झाला.. हे आजारपण कित्येक वर्षे टिकलं ..लहानपणापासून विचारात पडायला कारणीभूत ठरलेली ही घटना.. वाटायचं असं असतं का आयुष्य ? वडील शिक्षक ..त्यांना मुंबईत पार्ले टिळक विद्यालय मध्ये नोकरी मिळाली..  मालाड पश्चिमेला आम्ही राहायला आलो.. एकटेपणा, आत्मकीव, यात गुंतलेला असायचो मी, कारण आजारपण.. ' मी आहे '  हे सिद्ध करण्याचा मार्ग म्हणजे वाचन आणि लेखन असं वाटलं मला ..भरपूर हिंदी चित्रपट पहाणं हे करमणुकीचं साधन होतं माझं. पडद्याला चिकटून बाकडं असायचं..ती जागा पकडायला आधीच्या शो च्या मध्यंतरात रांगेत जाऊन उभा राहायचो.. ३१ नवे पैसे तिकीट होतं त्याचं .. "

" पहिली कविता सतराव्या वर्षी लिहिली..इस्माईल युसुफ कॉलेजमध्ये होतो . .

शंकर वैद्य सर होते शिकवायला ..त्यांना कविता दाखवल्या.. त्यांनी मराठी वाङमय मंडळात कार्यक्रम ठेवला.. एम ए ची मुलगी माझ्या कवितांचा अभ्यास करून तिथे बोलली.. विजय तेंडुलकर, चिं. त्र्यं. खानोलकर, शांता शेळके अशी थोर मंडळी, शंकर वैद्यांकडेच भेटली...पुण्यात सेंट्रल बँक ऑफ इंडियात नोकरी लागली ..अनेक ठिकाणी बदल्या झाल्या, त्यांत कोल्हापूर सगळ्यात आवडलेलं गाव.. अभिनेते, दिग्दर्शक ,चित्रकार यांचा तिथे ग्रुप होता.. मी नाटक लिहिण्याच्या अगोदरच, प्रसन्न कुलकर्णीनं जाहीर करून टाकलं होतं की या वर्षी राज्य नाट्य स्पर्धेत चंप्रं चं नाटक करणार .. त्या माझ्यावरच्या प्रचंड विश्वासामुळेच, ' एक गगनभेदी किंचाळी ' हे पहिलं नाटक लिहून झालं.. माझ्या घरातच ' प्रत्यय ' या संस्थेची स्थापना झाली आणि ते नाव सुद्धा मीच सुचवलं.. ' दिनकर पुरोहितचा खून ' हे दुसरं नाटक प्रकाश बुद्धिसागरनं दिग्दर्शित केलं, तेही तिथेच लिहून झालं.. दूरदर्शननं एक स्पर्धा घेतली होती.. महाराष्ट्रातल्या ८५  संघांनी तीत भाग घेतला होता.. तेव्हा ' नातं ' हा दीर्घांक तयार होता... त्याचीच एकांकिका करून त्या स्पर्धेत सादर झाली आणि पहिली आली. ' नातं ' कशी सुचली ते सांगताना ते म्हणाले, टीव्ही वर्तमानपत्र आणि आजूबाजूच्या घटनांचे पडसाद उमटतच असतात मनावर..  पती-पत्नीच्या नात्यात काही विशिष्ट आडाखे आहेत, की पतीनं पत्नीचं रक्षण करावं, वगैरे.. वाटलं, नातं कंडिशनल असेल, म्हणजे अमुक एक केलं तरच नातं टिकतं वगैरे, तर अशा नात्यांचा धांडोळा घेतला पाहिजे.. म्हणून एक भयंकर सिच्युएशन घेतली, की बायकोवर बलात्कार झाला, तेव्हा नवरा पळून गेला ...आणि मग म्हटलं बघूया काय होतंय ते..  लिहायला लागल्यावर जाणवलं, कुठल्याच गोष्टीत तथ्य नाहिये ...मी वास्तववाद घेतो आणि जगणं कसं absurdity नं भरलेलं आहे ते दाखवतो..आणि याच्या अवेअरनेस मध्येच त्यातून सुटका आहे, असं मला वाटतं... खूप गावं, माणसं बघितल्यामुळे विचारात लवचिकता आली माझ्या हे तर नक्कीच.. जळगाव जिल्ह्यातल्या लोहारा या ठिकाणी बदली झाली, तेव्हा दोन खोल्यांचं घर मी आधीच निवडलं होतं.. त्यात जो कडबा साठवलेला होता, तो मी राहायला येण्यापूर्वी साफ

करून द्यायचं  मालकांनी कबूल केलं होतं..पण बायकोसह ट्रक मधून प्रवास करत तिथे गेल्यावर मालक म्हणाला, आता भाड्यानं घर देण्याचा विचार आम्ही कॅन्सल केला आहे.. मग त्या वेळी तात्काळ दुसरं घर शोधलं.. ते धाब्याचं होतं.. तिथे रात्री उंदीर धावायचे छतावरून.. एकदा एका उंदराला सापानं पकडलेलं बघितलं आणि माझं धाबं दणाणलं.. मग तात्काळ घर बदललं.. काही  घटना आयुष्यात अशा घडल्या की आपल्याच बाबतीत  असं का घडतंय  हे प्रश्न पडले..त्यातूनच हस्तरेषांचा अभ्यास केला .. सात-आठ वर्षं जगातले सगळे पामिस्ट वाचले.. लक्षात आलं, की हस्तरेषा ही अंधश्रद्धा नाही.. आयुष्यात जे घडणार ते हातावर उमटलेलं असतं यात काही शंका नाही.. पण या अभ्यासात, लेखन ,वाचन, बंद झालं होतं..म्हणून  हस्तरेषांचा अभ्यास करणं बंद म्हणजे बंद करून टाकलं.. बँकेत काम करून फावल्या वेळात, कधी रात्री जागून, कधी सुट्टीच्या वा रजेच्या दिवशी लिखाण करत राहिलो. कारण खेळाडूंना जशा सवलती बँकेतून मिळतात तशा लेखकांना मिळत नाहीत.. मला पडलेल्या प्रश्नांची उकल करताना जाणवलेल्या गोष्टी सांगण्याची  पॅशन होती, म्हणून माझ्याकडून लिखाण झालं... पुण्यातल्या घरामध्ये घर मालकाशी झालेल्या वादातून पोलिस कंप्लेंट पर्यंत मजल गेली आणि  ' धागेदोरे ', ' वस्तू '  या कलाकृतींत पोलीस इन्स्पेक्टर या पात्राची रचना झाली..मुलं मार्गी लागल्यानंतर नोकरी सोडली.. खूप मेहनतीनं सगळ्या लिखाणाचं संगणकीकरण केलं.. त्यातून वेबसाईट तयार झाली.. आज त्यावर माझं सगळं साहित्य मोफत उपलब्ध आहे.. सुमारे पंधरा देशांतून वर्षाला चार हजार लोक त्या वेबसाईटला भेट देतात.. लेखकाचं घर असं माझं घर कधीच नव्हतं.. दोन पोती भरून पुस्तकं होती, ती बदलीच्या गावी घेऊन जायचो.. पोत्यातच ठेवायचो..वेगळी जागा देऊ शकलो नाही त्यांना कधी ..थोडक्यात नलेखकाचं असं माझं घर..ननाट्यासारखं .. " पण आता मात्र त्यांची स्वतंत्र खोली आहे, जी लेखकाची खोली वाटावी अशीच आहे.. पुस्तकं, संगणक, संदर्भ ग्रंथ, पुरस्कार, यांनी भरलेली.. " पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या बाबतीत असं म्हणतात की ते नाटकाचा तिसरा अंक पहिल्यांदा लिहू शकतील इतकी त्यांची नाटकाची बांधणी डोक्यात पक्की असायची.. पण पुढच्या पानावर काय लिहिणार हे देखील मला माहिती नसतं... इतकंच कशाला, एखादा विनोद जर माझ्याकडून लिहिला गेला, तर तो लिहिता लिहिता मजेत मीच हसतो ", असं चंप्र जेव्हा म्हणाले तेव्हा त्यांच्या लेखणीच्या उत्स्फूर्ततेचं उत्तर मिळालं .. चंप्र शी बोलताना, अतर्क्य गोष्टी अनपेक्षितपणे आयुष्यात येण्याची खात्री इतकी समजूतदार झाली, की  अनेक प्रश्नांच्या जंजाळात अडकून आलेली अस्वस्थता खरोखरच दूर पळाली...' नातं ' या एकांकिकेच्या निमित्तानं जोडलं गेलेलं हे नातं, आयुष्याच्या एका वळणावर, विचारांना स्वच्छ वळण देऊन गेलं.. अवेअरनेस इटसेल्फ इज फ्रीडम हे त्यांचं वाक्य खऱ्याअर्थानं प्रत्ययाला आलं..

--- अनुराधा राजाध्यक्ष

anuradharajadhyaksha@gmail.com

घरांची यादी अशी आहे --

विजापूर -----१

मालाड ----- २

पुणे -------- ८

कोल्हापूर -- २

राहुरी ---     १

राहुरी फॅक्टरी १

वाळकी ----- १

संगमनेर --- १

अकोले --- १

लोहारा ---- ३

अ' नगर --- २

-----------------

एकूण ----- २३.

-----------------

--- ००० ---

ही मुलाखत रेकॉर्डवर घ्यायची राहिली होती -- ते काम पूर्ण केले ---
११-०५-२०१९ च्या ' सामना ' मध्ये नमिता वारणकर यांनी घेतलेली माझी मुलाखत आली होती. तिचा मजकूर -- ज्येष्ठ नाटककार, लेखक चं. प्र. देशपांडे यांनी आपले सर्व साहित्य संकेतस्थळावरून वाचकांसाठी खुले केले आहे. अगदी येणारे नवे पुस्तकही वाचकांना येथे उपलब्ध होईल.

नव्या वाटेवरची बुजुर्ग पावले !

० वाचकांसाठी संकेतस्थळाच्या माध्यमातून आपले लेखन विनामूल्य उपलब्ध करून देण्यामागे काय विचार आहे ?
--- संकेतस्थळ तयार करण्यामागे खास विचारपूर्वक, योजनापूर्वक असं काही झालेलं नाही. सुरुवातीला माझी काही पुस्तकं निघाली. नंतर मी नोकरीच्या निमित्ताने निरनिराळ्या गावी फिरत होतो. त्यामुळे, कुणाशी फारसा संपर्क राहिला नाही आणि पुस्तके प्रकाशित होण्याबाबतचे माझे प्रयत्न त्या काळात झाले नाहीत. त्यानंतर १९९६ साली म्हणजे माझ्या वयाच्या ५० व्या वर्षी मी स्वेच्छानिवृत्ती घेतली तेव्हा आपल्या लेखनासाठी प्रकाशक मिळवण्यापेक्षा त्याचं संगणकीकरण करू आणि त्याची सीडी तयार करू, असा विचार करून २००३ साली ती सीडी प्रकाशित केली. त्या कामाला प्रतिसाद फारसा मिळाला नाही. त्यातूनच पुढे याची वेबसाईट सर्वांना उपलब्ध करून द्यायचे ठरवले. २००९ साली ती वेबसाईट सुरू केली. २०१० साली महाराष्ट्र राज्याचं सुवर्णमहोत्सवी वर्ष होतं. त्या वेळी शासनाने मराठी संकेतस्थळ स्पर्धा आयोजित केलेली होती. त्या स्पर्धेत या संकेतस्थळाला पारितोषिक मिळालं. हे सगळं ठरवून झालं नाही. घडत गेलं.
संकेतस्थळ --
www.champralekhan.com
० आपल्या नाट्यलेखनाच्या शैलीविषयी काय सांगाल ?
--- माझ्या दृष्टीने माणसाच्या जगण्यातले सगळे प्रश्न हे मानसिक, बौद्धिक किंवा प्रतिक्रियांचे असतात. मी लिहायला सुरुवात करतो आणि नाटक घडत जातं. दिसणाऱ्या समस्या आणि पडणारे प्रश्न यांतून विषय सुचतात. मुख्यत: कुठल्याही तात्त्विक आणि मूलभूत प्रश्नांमधूनही विषय सुचतात. उदाहरणार्थ, माणसांमध्ये संघर्ष का होतात, हिंसा का होते, बरोबर वागणं वा कृती म्हणजे काय – या अशा प्रश्नांशी आपल्या सगळ्या समस्या निगडित आहेत. त्यामुळे, अनुभव, वाचन, माहिती यांद्वारे मनात जे साठलेलं असतं ते त्याभोवती जमायला लागतं. त्यातून नाट्यलेखन प्रक्रिया घडत जाते.
० वाचक, कलाकार आणि रंगकर्मींना आपल्या संकेतस्थळाचा कसा फायदा होईल ?
--- माझी सगळीच नाटकं, एकांकिका संकेतस्थळावर उपलब्ध असल्यामुळे त्यांना निवड करणं सोपं होईल. निरनिराळ्या कारणांनी लोक असा शोध घेत असतात. ते सहज एका क्लिकवर उपलब्ध असेल. तसेच कविता, वैचारिक लेख वगैरेही वाचक कधीही सवडीने वाचू शकतील. जगात कुठेही ते सहज मिळेल. फारसे खर्चिकही नाही. प्रयोग करायला वा काही सिनेमा काढायचा असेल तर मात्र मानधन पडेल. अभ्यासाला, वाचायला माझ्या परवानगीची गरज नाही.
० मोफत लेखन उपलब्ध करून देणारं हे असं पहिलं संकेतस्थळ आहे. याबद्दल लेखक म्हणून काय भावना आहेत ?

--- संकेतस्थळाचं काम ओघाओघात घडत गेलं. त्यामुळे, मी  समाधानी आहे. पुस्तकांच्या किंमतीही भरामसाट आहेत. वितरण व्यवस्थेच्या अडचणी आहेत. विक्रेत्यांचे कमिशनही असणारच. अडथळे खूप आहेत. पाचशे वा हजाराची आवृत्ती संपायला दहा वा जास्त वर्षे लागतात. महाराष्ट्रात हजारभर तरी वाचनालये असतील. तरीसुद्धा पुस्तकांच्या आवृत्त्या संपत नाहीत. लक्ष ठेवून साहित्य विकत घेणं हा प्रकार कमी आहे. त्यामुळे, माझं लेखन संकेतस्थळावर प्रसिद्ध करणं मला सोयीस्कर वाटतं.

० व्यावसायिक नाटक आणि प्रायोगिक नाटक यांविषयी काय वाटतं ?

--- व्यावसायिक नाटक प्रेक्षकांच्या सवयींना धक्का लावत नाही. ते त्यांच्या मानसिक सवयी संभाळतं. तर प्रायोगिक नाटक प्रेक्षकांच्या मानसिक सवयींची फिकीर करत नाही. ते आशयाच्या अंगानं जातं. म्हणूनच ते सर्जक नाटक असतं. सर्जकता म्हणजे स्वत:च्या सवयीतून बाहेर पडून जगण्याचे भान घेणे. असं नसेल तर ते करमणुकीचं नाटक असतं किंवा वास्तवदर्शी असतं

---------- मुलाखत – नमिता वारणकर

---------- namita.warankar@gmail.com

--- 000 ---

एवढे काय असेल

झी बिझिनेस वर आजच सकाळी एक बाटली आणि तिचे आवरण खोके दाखवले गेले. आसाम दिब्रुगढ चहा चे ! ती एक किलो चहाची होती बाटली. किंमत ऐकून उडाल  दहा फूट ! आदरातिथ्याचे, प्रेमाचे, सद्भावनेचे माध्यम म्हणून वापरले जाणारे चहा इतके लोकप्रिय पेय नाही. कारण चहा परवडायलाही बरा असतो ! शिवाय जरा तरतरी आणतो, ते वेगळेच. म्हणून तर गरिबापासून श्रीमंतापर्यंत हा एक कायमस्वरूपी स्नेहाचे प्रतीक म्हणून अढळ स्थानावर आहे. पण, हा काही वेगळाच दिसतोय प्रकार ! या चहाची किंमत आहे एक लाख रुपये किलो ! च्यायला, एवढे काय असेल यात ? तीव्र वा सौम्य किक देणारी दारू वा इतर कोणतेही द्रव्य आपण समजू शकतो -- पण, चहा ? हे शोभून नाही दिसत. त्या चॅनेलवर या चहाची वैशिष्ट्ये काही सांगितली गेली नाहीत. मला तर कल्पनेनेही ती कळू शकत नाहीत. आपल्याला अमृततुल्य असतो माहीत, पण, हे साक्षात अमृतच असेल की काय ? मला कदाचित जरा अज्ञानामुळेही हे प्रश्न पडत असतील. पण, इतर कुणी याबाबत काही सांगू शकेल काय ? एक तर वास्तव माहिती वा काल्पनिकही चालेल. एवढे काय असेल यात ? ( नेटवर मिळणाऱ्या माहितीप्रमाणे, हा चहा एका वेगळ्याच क्लोनपासून मिळतो, याचे उत्पादन बरेच खर्चिक आणि अवघड आहे , वगैरे. ते ठीक हो, पण आहे काय एवढे विशेष यात, ते सांगा ना -- )

--- ००० ---

( नक्की आठवत नाही, पण, ) जीएंच्या ' तुती ' या कथेतली आई तिच्या मुलाला म्हणते, " तू बाकी काही हो न हो पण दगड मात्र नक्की हो ! " याचप्रमाणे, विंदांची ' माझ्या मना बन दगड ' आहेच माहिती आपल्याला. या दोन महान कलावंतांच्या या अभिव्यक्तींवरून आपल्याला या एकूण विवेकी महाराष्ट्राच्या जगण्याचा स्तर अंतर्यामी माहीत असतोच. आता आले सांताक्लॉजचे दिवस ! खूप सांताक्लॉज आपापली कामे करून जातील, पण शेवटी त्याच टोपीतला तोच सांता ग्रेट ठरेल जो एखाद्या विद्वान मुलाच्या हातात अध्यक्षपदाचे खेळणे देऊन जाईल ! बाकी काही जमो न जमो, असा सांता व्हायला जमले पाहिजे !

समन्वय

१. बैलगाडा शर्यतींसाठी बैलांना खास तयार केले जाते, त्यांना उत्तम पोषक आहार दिला जातो, पैलवानांसारखी त्यांची बडदास्त ठेवली जाते. अशा तंदुरुस्त बैलांची पैदास व्हावी म्हणून गायींनाही छान पोसले जाते. त्यामुळे, अशा शर्यती कायद्याने बंद करणे म्हणजे गायीबैलांवर अन्याय करणे आहे.
२. या शर्यतींच्या जल्लोषासाठी बैलांचे हाल केले जातात, त्यांचा छळ केला जातो. दारू पाजून त्यांना त्यांच्या नैसर्गिक कुवतीच्या बाहेर पळवले जाते. मुळात बैल हा प्राणी अशा शर्यतींसाठी योग्यच नाही आहे. बैलांवर स्वत:च्या करमणुकीसाठी असे अन्याय करणे हा भयानक क्रूरपणा आहे.
३. या दोन्ही बाजूंचा आणि न्यायालयाचाही मान राखणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी समन्वयाचा मार्ग -- उपाय हा असा करता येईल -- बैलांना पोषक आहार वगैरे चालूच ठेवायचे, वाटल्यास, त्यांना आवडत असल्यास त्या समारोहात त्यांना दारूही पाजायची. पण, शर्यत नाही लावायची. ही शर्यत आहे, असे सांगून त्यांच्यावर दडपण आणायचे नाही. त्यांना रमतगमत, गप्पा मारत चालू द्यायचे. त्यात, त्यांनाही नकळत जी बैलजोडी पहिली येईल तिच्या मालकाला द्यायचे बक्षीस !
माणूस ज्या समस्या निर्माण करतो त्या बटाटा आणि पतंग यांच्या असतात. दोन्हींचा काही संबंधच नसतो. त्यांची तुलनाही नाही होऊ शकत. बैलांना चांगले पोसणे आणि त्यांचा छळ करणे हे दोन विभागच वेगळे आहेत ! त्यांच्यांतून समन्वयाचा मार्ग काढणे म्हणजेच absurdity -- मिथ्यानाट्य वा मूर्खानाट्य ! मानवी बुद्धी असे असंख्य चमत्कार करत जीवन नाट्यमय करत असते !
😀😁
--- ००० ---

God is dead. Marx is dead. And I don’t feel so well myself.
-- Eugene Ionesko.

इहवाद आणि कला

इहवाद म्हणजे जे इंद्रियगम्य आणि तर्काधिष्ठित आहे तेच सत्य मानणे. इहवाद म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोण, नास्तिकता. परलोक, स्वर्ग-नरक, पुनर्जन्म, मोक्ष-मुक्ती वगैरे न मानणे. श्रद्धा, भक्ती, नियती असले सर्व नाकारणे. याच्या उलट समजा भक्तिमार्गी वा आस्तिक असतात. पण अशा या दोन प्रकारांत – त्यांच्या जगण्यात मूलभूत असा काही फरक असतो का ? दोन्ही प्रकारची माणसे दु:ख भोगणारी, महत्त्वाकांक्षी, भीतिग्रस्त, वर्चस्ववादी, हिंसक, प्रेमळ, क्रूर, युद्धखोर, वगैरे असलेली दिसतात. दोन्ही प्रकारांत अलगता आणि अस्मिता यांचा प्रभाव दिसतो. एक म्हणतो, देव योग्य तेच करतो, दुसरा म्हणतो, ‘ माणसा माणसा माणूस हो ! ‘ दोघांचीही मने सारखीच विदीर्ण, वखवखलेली, सूडाने पेटलेली आणि अमानुष असतात. त्यामुळे, दोघांपैकी कुणीही, आपण फार शहाणे, शूर, श्रेय समजणारे, विशाल समजुतीचे आहोत, असा भ्रम बाळगायचे कारण नाही. धर्म, तत्त्वज्ञान, विचारसरण्या हे सगळे माणसाच्या भल्याच्या बाबतीत अपयशी ठरलेले आहेत. आणि आता आशा बाळगावी असे एकच क्षेत्र उपलब्ध आहे, ते म्हणजे कलेचे. मानवी जगण्यात काही मूल्यात्मता असू शकते का याचा शोध फक्त कलेतूनच घेतला जाण्याची शक्यता आहे. सर्जकता, स्वातंत्र्य, दु:खमुक्ती ही जर मूल्यात्मता मानली तर कलेबद्दल काय बोलता येईल ?
माणसाच्या जगण्यात मूल्यात्मता नसण्याची कारणे कोणती ? प्रभावयुक्त असणे, अलगता, अस्मिता, अस्थिरतेची-अनिश्चिततेची भीती, वर्चस्वाची इच्छा – हीच. ही कारणे तर इहवादाची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. असे असूनही

तेच अगदी पोटतिडिकीने समता, बंधुत्व, स्वातंत्र्य यांचा जयघोष करत असतात. माणसाच्या मेंदूची कुवत आणि त्याची परिस्थितीसापेक्षता – हा तर इहवादाचा पायाच म्हणावा लागेल. कारण, जे आहे त्यातून मुक्ती हा विषयच वर्ज्य आहे. बुद्धाची निर्वाण कल्पना ही मरणोत्तर मिळणारे रत्न-पारितोषिक नाही. ते जिवंतपणी, याच आयुष्यात असणारे मूल्य आहे. इथे हेही लक्षात घ्यायला हवे की मूल्यात्मता ही धर्मातली वेगळी, वैचारिक वेगळी आणि कलेतली वेगळी, असे असू शकत नाही. ती एकच असते – असावी लागते. ती म्हणजे ‘ स्वनिरपेक्ष समावेशकता ‘ हीच फक्त असू शकते. फक्त विचाराच्याच क्षेत्रात जगणारे आस्तिक असोत की नास्तिक, दोघेही ती नाकारत असतात. स्वत:ला इहवादी म्हणवणारे तर ती अधिक शूरपणे आणि कट्टरपणे नाकारत असतात. आणि त्यात ते नुसते आत्मतुष्टच नाही तर दुरभिमानी आणि आक्रमक जगत असतात. इहवाद्यांमध्ये या बाबतीत जराही लवचिकपणा असू शकत नाही. ‘ इतर लोकांना ‘ दु:खमुक्ती वा स्वातंत्र्य यांच्या शक्यता तरी मान्य असल्याने ते अधिक लवचिक असू शकतात. त्यामुळे, कलेतून जर असे समावेशक भान व्यक्त होत असेल तर ते स्वीकारू शकतात. टी. एस. एलियटने स्वमुक्ती म्हणणे, वर्डस्वर्थने शांततेतली स्मृती म्हणणे, गाओने दुरून अवलोकन म्हणणे यांतून त्याच मूल्यात्मतेचा निर्देश होतो, हे इथे समजून घ्यायला हवे. तुकाराम जेव्हा म्हणतो की हे माझे नाहीत शब्द – परि त्या विश्वंभरे बोलविले, किंवा ज्ञानेश्वरांनी सांगितलेला परतत्त्वाचा स्पर्श – हे सगळे तेच आहे.
त्यामुळे, संतांची कविता ही तिच्यातला दु:खमुक्तीचा आशय सोडून नुसती कविता म्हणून पाहू, असे म्हणणे हे जगण्यातलीच मूल्यात्मता नाकारणे असते, हे नीट पाहायला हवे. हे सर्व पाहता, इथे असे म्हणायचे आहे की इहवादी कला असे काही असेल तर ती कला मूल्यात्म असणे शक्यच नाही. मुळात इहवादच मूल्यात्म असणे शक्य नाही. इहवादाचा आणि मूल्यात्म कलेचा काही संबंधच नाही असू शकत. कलेच्या क्षेत्रात ते उपरे आणि फुकटचा टेंभा मिरवणारे लोक असतात. माणुसकीच्या, समतेच्या निरर्थक गप्पा मारत काळ व्यतीत करणारे ते आळशी, डल लोक असतात. कलाक्षेत्र जेव्हा अशा लोकांच्या ताब्यात जाते तेव्हा मूल्यात्मतेची वेगाने वाट लागत राहते आणि ते लोक जी शाब्दिक रूपातली मूल्ये मानत असतात ती अधिकाधिक दुरावत जातात, यात शंकाच नाही.
--- ००० ---

कादंबरी
त्या त्या काळाचा दस्तावेज तयार करण्याचे कामही कादंबरी करत असते, असे मानलेही जाते आणि काहींची तशी अपेक्षाही असते. आता काळाचे दस्तावेज तयार होण्याचे अनेक मार्ग आणि साधने अस्तित्वात आहेत. हे पाहता, आता, कादंबरीच्या दस्तावेजाचे कितपत महत्त्व आहे ?

काल माझी नात चि. दुर्गा ( मुलीची मुलगी ) हिचा विवाहसोहळा पुण्यात संपन्न झाला ! ती तिच्या सासरी नागपूरला रवाना झाली !

हुसेनभाईचा कुणी नाद न्हाय करायचा ! ( कादंबरी )
ले ० युसुफ शेख – प्र ० अक्षर प्रकाशन.

आधी या कादंबरीच्या शीर्षकाबद्दलच बोलायला हवे. हे शीर्षक म्हणजे काही एखाद्या मुसलमानाने वापरलेली आव्हानात्मक भाषा नाही आहे. ‘ चांगल्या ‘ ला पाठिंबा, आधार देणाऱ्या एखाद्या बलवान माणसाचे हे गंमतीतले, प्रेमातले धमकावणे आहे. फार तर सूक्ष्मशी शक्तीची जाणीव देणेही. पण यात तशी संघर्षमयता नाही. हुसेन स्वत: कुणावर कुरघोडी करणे वा वर्चस्व गाजवणे यासाठी ही भाषा वापरत नाही. उदाहरणार्थ, अभिव्यक्तीची कोणतीही काटछाट न करता आलेला जयशा-बाळी प्रसंग पहा. इथे हुसेन स्वत:च हे वाक्य म्हणतो. पण ते समर्थनीय आणि योग्यही ठरते. यात पुढे निवेदकाचे एक वाक्य आहे, “ सर्वांना स्वत:चं महत्त्व ही निर्विवाद गोष्ट वाटते. पण ते काही

अंतिम सत्य नसते. "  या कादंबरीच्या  लेखकाचा हाच आहे दृष्टिकोण. सामोपचाराचे, समंजसपणाचे महत्त्व सांगणारी ही एक उत्तम कादंबरी आहे. स्वत: युसुफ शेख हे जगमित्र असल्याचे फेसबुकवर प्रत्ययाला येतेच. त्यांचे काही मतभेद असतील तर कोणत्याही जातिधर्माच्या आधाराशिवाय ते सौम्यपणे मांडतात आणि ते ताणून धरायचाही प्रयत्न करत नाहीत.

तसे तर हुसेन हा काही या कादंबरीचा नायक वगैरे नाही. त्याला प्रमुख पात्रही म्हणता येणार नाही. ही एका खेड्यातल्या वस्तीची, अत्यंत बारकाईने सांगितलेली समावेशक कथा आहे. यात अनेक पात्रे आहेत. म्हटले तर आपापल्या सामाजिक स्थितीची जाणीव असलेली पण तरीही मिळूनमिसळून जगणारी ही माणसे आहेत. या कथेत एक खून घडतो पण त्याच्याशी हुसेनाचा काही संबंध नसतो. एका छोट्या भागातले राजकीय ताणतणावही शेवटी कुठेतरी केंद्रित होऊन कसे एखाद्या गळूसारखे फुटतात ते दर्शवणारे ते घटित आहे. ही कादंबरी तशी एखाद्या पात्राची नसून त्या एका वस्तीची, तिथल्या माणसांची, त्यांच्यांतल्या ताण्याबाण्यांची आणि तरीही असणाऱ्या त्यांच्यांतल्या सलोख्याची आहे. जाती-धर्माच्या अस्मिता लेखकाला निरर्थक आणि अमानवी वाटणे हे या कादंबरीचे आशयद्रव्य आहे. हुसेन आणि सोनी यांच्यांतले प्रेमप्रकरण म्हणजे या माणसांतले सुप्त ताणेबाणे एका सामाजिक समस्येत रूपांतरित होणे आहे. सलोखा असला तरी मनांतले भेद कार्यरत असतातच याची विदारक जाणीव देणारा हा कथाभाग आहे. या कादंबरीचा शेवट तो सलोखा आणि तो ताण यांच्यांतला एक समन्वय साधणारा आहे. भेदांसह जगण्याची एक दिशा सूचित करणारा आहे.

ही काही वाक्ये पहा – " राजकारणात यशस्वी होण्याकरता कित्येक गणिते जुळणे आवश्यक असते. भारतीय सामाजिक परिस्थितीत जातिपातींची भूमिका निर्णायक ठरणे हे ओघानेच आले. " ( पान ८२ ). " हिंसा हे समाजातील हितसंबंधाचंच रूप असून हिंसा हे एक स्वायत्त तत्त्व होऊ लागले , त्याचे तत्त्वज्ञान तयार होऊन त्याला फसवे सामाजिक अधिष्ठान मिळाले की सर्व समाजाचाच विनाश अटळ होतो. काही समाजाचा थोड्या उशिराने होत असेल तर काही समाज लगेच रसातळाला जातात. " ( पान ९३ ).

सतीश तांबे, हेमंत कर्णिक आणि डॉ. शमसुद्दिन तांबोळी यांचे, या कादंबरीवर वेगवेगळ्या कोणांतून लिहिलेले लेख अभ्यसनीय आहेत.

व्यक्तिव्यक्तींत असो की गटागटांत असो, मानवी संबंधांत ताणेबाणे असतात, घर्षण असते आणि अस्मितांतून येणारी हिंसाही असते. ही नुसतीच सामाजिक समस्या नसून मानवी जगण्याचीच एक जटिल परिणती आहे. मग यावर करावे तरी काय ? त्या त्या वेळच्या समजुतदार ' तडजोडी ' फक्त ? समन्वयाची मलमपट्टी आणि फारसे नुकसान न होता वेळ निभावून नेण्याचे ' शहाणपण ' फक्त ? अशा समस्यांचे समूळ उच्चाटन होणे, असे काही घडू शकेल का, हा प्रश्न ही कादंबरी वाचून मनात येतो. छे, छे, असेच असणार मानवी जगणे, असा झटपट निष्कर्ष मान्य करून एका अर्थी असे निराशेचे जगणेच स्वीकारणे भाग आहे का, हा प्रश्न इथे विचारावाच लागणार.

एकूणातच ही एक उत्तम सामाजिक कादंबरी आहेच पण शिवाय एका मुसलमान लेखकाने सामाजिक आस्थेने आणि प्रेमाच्या भावनेने लिहिलेली कादंबरी म्हणूनही ही एक विशेष कलाकृती ठरेल. यासाठी मित्र युसुफ शेख यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

--- ००० ---

**३१ डिसेंबर २०२१.**